भारत वर्ष

(हिंदुस्थानचे संक्षिप्त गॅझेटिअर)

लेखक

श्रीधर शामराव वळसंगकर

(किंमत १।। रुपया)

भारत—वर्ष

अथवा

हिंदुस्थानचें संक्षिप्त गॅझेटीयर

लेखक व प्रकाशक

श्रीधर शामराव हणमंते वळसंगकर

स्टेशनमास्तर उरळी जि. पुणें.

मुद्रक,

बाबुराव भाऊराव फुले,

श्रीकृष्ण छापखाना पुणें.

सन १९२६ राजशक २५३

किंमत १॥ रुपया

अर्पण पत्रिका

भारत-वर्ष

अथवा

हिंदुस्थानचें संक्षिप्त गॅझेटियर

हें पुस्तक

भारत वर्षाच्या इतिहासाचे सूक्ष्म अध्ययन कर-
णाऱ्या व भारताचा भावी इतिहास उज्जल
करूं इच्छिणाऱ्या जिज्ञासू साहित्य
सेवकांस लेखकानें अत्यंत आदरानें
अर्पण केलें असे.

श्रीधर शामराव हणमंते वळसंगकर
स्टेशन मास्तर
स्टेशन उरळी जि. पुणें

किंचित् प्रास्ताविक

भारतवर्ष अर्थात हिंदुस्थानचें गॅझेटिअर लिहिण्याचा उपक्रम मराठी भाषेंत तरी नवीन आहे यांत शंका नाहीं. इंग्रज सरकारनें दर एक जिल्ह्याचें, तालुक्याचें गॅझेटिअर तयार करून ठेवलेलें आहे; व त्यांतून त्या त्या ठिकाणीं प्रसिद्ध असलेल्या विशिष्ट गोष्टी नमूद केलेल्या असतात. परंतु सामान्य वाचकांस हिंदुस्थानासंबंधानें साकल्येंकरून ज्ञान एकदम व्हावें अशी इच्छा झाल्यास ती तृप्त करणारा एकहि ग्रंथ मराठी भाषेंत उपलब्ध नाहीं. व या दृष्टीनें श्री. हणमंते यांनीं केलेला उपक्रम उपयुक्त व स्तुत्य ठरतो. वास्तविक रीत्या पाहिलें तर गॅझेटीयर म्हणजे एक प्रकारचा इतिहास होय. किंबहुना इतिहास व भूगोल यांचें तें एक मिश्रण होय. इतिहास हा निसर्गाच्या भूमिकेवर करण्यांत आलेला मानवी घडामोडींचा खेळ होय; तर भूगोल हा निसर्गसिद्ध व, परंतु मानवी करामतीनें क्वचित् क्वचित् त्यास अलंकारिलेला असा असतो. व अशा ह्या इतिहासभूगोलांची उपयुक्तता, मनोरंजन, व जिज्ञासा-तृप्ति या दृष्टीनें मधुर मीलन करून लिहिलेला ग्रंथ म्हणजेच गॅझेटिअर होय. गॅझेटियरची कल्पना आणखी एका सादृश्यानें विशद करतां येईल. दररोज घडणाऱ्या गोष्टींचा जसा कच्चा खर्डा लिहितात, त्याप्रमाणें दैनिक व कालिक वर्तमानपत्रें हीं कच्च्या खर्ड्या प्रमाणें होत; व त्यांतील महत्त्वाच्या गोष्टींचें विशेष दृष्टीनें वर्गीकरण करून संकलीकरण करणें म्हणजे गॅझेटिअर, ही दैनिक पत्राची खतावणी होय. असो.

अशा प्रकारचें गॅझेटिअर लिहिण्याचा प्रघात पाश्चात्य राष्ट्रांतून पुष्कळ आहे. दरसाल 'इअर बुक' म्हणजे वार्षिक घडमोडींची जंत्री टाइम्स ऑफ इंडिया मार्फत प्रसिद्ध होत असते, त्याचप्रमाणें हिंदुस्थानसरकारहि आपल्या सर्व राज्यकारभाराच्या दृष्टीनें व वस्तुस्थितिनिदर्शक असा एका वृत्तांत प्रसिद्ध करीत असतें. परंतु तो केवळ वर्षाचा आढावा किंवा सिंहावलोकन या दृष्टीनें उपयुक्त असतो. त्यापेक्षां गॅझेटिअरची कल्पना अधिक चिरस्थायी आहे. कोणाही परस्थ अगर अपरिचित माणसास हिंदुस्थानचें सामान्यतः ज्ञान होण्यास इअर बुक किंवा सरकारी वार्षिक वृत्तांत उपयोगी पडणार नाहींत तर अशा गॅझेटिअरसारख्या पुस्तकांचाच

त्यास उपयोग होईल. कारण अशा पुस्तकांतून सर्व प्रकारच्या विषयांवर माहिती दिलेली असते. असो. रा. हणमंते यांनीं सदरहू पुस्तकांत हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास त्रोटक स्वरूपांत दिला असून आधुनिक चळवळीची नीटनेटकी माहिती किंवा तिचें वस्तुनिर्दशन केलें आहे, असें म्हटलें असतां तें योग्य होईल. हें पुस्तक ज्यानें वाचलें त्यास हिंदुस्थानच्या इंग्रजपूर्व इतिहासाची कल्पना तर येईलच पण इंग्रजी आमदानींतही घडलेल्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक, वाङ्मयाविषयक, भूगोलिक, शेतकीविषयक, व्यापारविषयक, इत्यादि अनेक प्रकारची माहिती मिळेल. अशा प्रकारचें पुस्तक इंग्रजींत अगर अन्य भाषांतून भाषांतरित झाल्यास परदेशियांना हिंदुस्थान देश एकवार पाहण्याची जिज्ञासा तर होईलच; पण ती झाल्यावर देखील ती कशी पुरी करावी हें ह्या पुस्तकावरून नीट समजेल. रा. हणमंते यांनीं हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं किती श्रम घेतले, याची कल्पना प्रस्तुत लेखकास नाहीं असें नाहीं. सबंध भारतवर्षाचें सार्क्षत कां होईना, पण गॅझेटिअर तयार करणें हें कार्य किचकट, कंटाळवाणें व प्रयासजन्य आहे; तथापि चिकाटीनें व दीर्घ परिश्रम करून रा. हणमंते यांनीं हा एक उपयुक्त ग्रंथ रचून मराठी वाङ्मयांत निःसंशय भर टाकली आहे. महाराष्ट्रीय जनता रा. हणमंते यांच्या परिश्रमाचें चीज करो अशी महाराष्ट्र जनताजनार्दनाचे ठायीं प्रार्थना करून हें अल्पसें प्रास्ताविक संपवितों.

हरि मोरेश्वर जोशी.

लेखकाचे दोन शब्द

पाहुनि पर भाषेचे ग्रंथ तसे त्यांतलेंहि सुविचार
निजकाव्यें गुंफावी साधु म्हणति यासही सदाचार ॥— " मोगरे "

सन १९११ सालीं मराठी रेलवे गाईड अथवा वाटेचा सोबती नांवाचें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें. मराठींत त्याप्रकारचें पुस्तक त्यावेळीं तरी नवीनच असल्यामुळें तें लोकांस बरेंच आवडलेंहि. तथापि त्यांत केवळ त्रोटक वर्णनेंच दिली असल्यामुळें पुन्हां योग आल्यास तीं साधार व सविस्तर द्यावीत अशा सूचना कित्येक स्नेह्यांनीं व आश्रयदात्यांनीं केल्या. त्यास अनुसरून गॅझेटीयरच्या धर्तीवर प्रस्तुतः पुस्तक लिहिलें आहे, यांत प्रथम भागांत प्राचीन काळापासून ते आज तागायत भारत वर्षाच्या इतिहासाचें सिंहावलोकन सूत्रमय भाषेत तथापि सुसंगतपणें केलें असून दुसऱ्या भागांत देशांतील ऐतिहासिक, धार्मिक अगर व्यावहारिक दृष्ट्या कोणत्या ना कोणत्यातरी कारणांकरितां प्रसिद्ध अशा लहान मोठ्या स्थलांची माहिती आटोपशीर पण मुद्देसूद तसेंच मनोरंजकपणें व वर्णानुक्रमानें दिली आहे. आणि शेवटीं हिंदुस्थानांतील प्रमुख राजकीय विभाग, नद्या, पर्वत भाषा इत्यादि अनेक उपयुक्त परिशिष्टें जोडली आहेत. स्वदेशाचें सर्व सामान्य ज्ञान व त्याच्या इतिहासाची संकलित अोळख प्रत्येकास असणें जरूर आहे. व ती जिज्ञासू वाचकांस विशेषतः विद्यार्थ्यांस प्रस्तुत पुस्तकानें होईल अशी आशा आहे.

पुस्तक प्रकाशनाचे बाबतींत आम्हांस थोडाबहुत अनुभव आल्यामुळें स्वतः प्रसिद्ध करण्याचा प्रथम विचार नव्हता त्यामुळें कांहीं मजकूर "लोकमित्र" मासिकांतून दिला पण ते अर्धवटच राहिलें इतकेंच नाहीं, पण बाकीची हस्तलीखित प्रत लोकमित्रकारांनीं परतही न केल्यामुळें कांहीं भाग पुन्हां लिहून काढावा लागला व स्वधर्माचे संपादक रा. हरिभाऊ जोशी यांच्या सौजन्यानें व प्रोत्साहनानेंच केवळ हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें साहस केलें व वेळोवेळीं ज्या प्रेम पूर्वक सूचना त्यांनीं केल्याबद्दल प्रस्तुत लेखक त्यांचा अतिशय ऋणी आहे. तसेंच संदर्भ ग्रंथ म्हणून ज्या ज्या पुस्तकांचे सहाय झालें त्यांचा नामानिर्देश अन्यत्र केलाच आहे. अर्थात त्या त्या ग्रंथकारांचेहि आभार मानणें जरूर आहे. असो. ज्याच्या कृपाप्रसादानेंच प्रस्तुत प्रयत्न सिद्धिस गेला त्या श्रीशालाच शतशः प्रणाम असोत.

मित्ती कार्तिक वद्य एकादशी
शके १८४८ } श्रीधर शामराव हणमंते वळसंगकर
स्टेशनमास्तर उरळी जि, पुणें.

स्मरणीय गोष्टींचे काल

इ. स. पूर्वी

२००० वैदिक कालारंभ

१४०० महाभारतकाल रामायण महाभारत तयार होते. चातुर्वर्ण्याची उत्पत्ती

१००० तर्कप्रामाण्य प्रधान काल. वर्षाचे महिने बारा ठरविले गेले, चांद्रमानाचा सौरमानाशीं मेळ घालण्याकरितां दर तीन वर्षांनीं १ महिना अधिक धरण्याचें ठरलें.

६०० इराणचा राजा दारियस याची हिंदुस्तानावर स्वारी.

५२२ गौतम बुद्धाची धर्मोपदेशास सुरवात.

४७७ गौतम बुद्धाचे देहावसान

३२७ आलेक्झान्डरची स्वारी.

३२६ चंद्रगुप्ताकडून हूण लोकांचा (सिरीयन) पराजय.

३९७ चंद्रगुप्ताचा मृत्यु.

२६९ अशोकाचा राज्याभिषेक.

२२४ अशोकाचा मृत्यू

५७ विक्रम संवतारंभ

इ. स. नंतर

४७६ ज्योतिषशास्त्राचा जनक आर्यभट्ट याचा जन्म, पृथ्वी आपले आसाभोंवतीं फिरते हा सिद्धांत स्थापित झाला,

६२२ इस्लाम धर्माचा उदय.

७१२ अरब लोक सिंधप्रांत काबिज करतात.

७१७ हिंदुस्तानांत पारशी लोकांचें आगमन.

७८८ शंकराचार्यांचा अवतार

१०२४ महंमद गिझनीची सोरटी सोमनाथावर स्वारी.

११९३ दिल्लीचा शेवटचा हिंदुसम्राट पृथ्वीराज चव्हाण महंमद घोरीकडून मारला गेला.

१२०६ दिल्लीस कुतुब घराण्याची स्थापना

१२३० कुतुबमिनार बांधला.

१२९० खिलजी घराण्याची स्थापना

१३२० तघलख घराण्याची स्थापना
१३४४ विजयानगरच्या हिंदुराज्याची स्थापना,विशेषतः हिंदुस्थानांत दक्षिणेकडे फार मोठा दुष्काळ.
१३४७ बहामनी राज्याची स्थापना.
१४६९ शीख पंथाचा प्रवर्तक गुरु नानक याचा जन्म
१४९८ वास्कोडिगामा हिंदुस्थानांत येतो.
१५२६ पानपतची लढाई,बाबरचा जय. मोगल घराण्याची स्थापना
१५३९ जालंधर जवळ नानकचा मृत्यू.
१५५६ अकबर राज्यावर येतो. पानपतची दुसरी लढाई
१५९४ डच व्यापाऱ्यांचे हिंदुस्तानांत आगमन.
१६०० ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली.
१६०१ गुरु अर्जुनाकडून आदि ग्रंथाची रचना.
१६०४ फ्रेंचांचें आगमन.
१६०५ अकबराचा मृत्यू, जहांगीर गादीवर येतो.
१६०८ भगवद्भक्त तुकारामाचा जन्म.
१६२३ तुळसीदासाचा मृत्यू.
१६२७ शिवाजी जन्म, जहांगीरचा मृत्यू. शहाजहान गादीवर येतो.
१६५८ शहाजहानची कैद व अवरंगजेब आपल्यास बादशहा म्हणवितो.
१६७४ शिवाजीचा राज्याभिषेक.
१६७५ नववा शीख गुरू तेज बहादुर याचा अवरंगजेबाकडून वध.
१६८० शिवाजीचा मृत्यू .
१६९० कलकत्याची स्थापना.
१७०७ अवरंजेबचा मृत्यू व मोगल साम्राज्याचा ऱ्हास.
१७१० शाहू गादीवर येतो.
११७९ मोगल बादशहाकडून मराठे चौथाईचा हक्क मिळवितात.
१७२१ गंगानदीजवळ भूकंप.
१७३९ नादिरशहाची स्वारी. पोर्तुगीज सत्तेचा ऱ्हास.
१७४४ इंग्लिशफ्रेंच यांचा सामना.

१७५७ प्लासीची लढाई.

१७७३ रेग्यूलेटींग अक्ट पास झाला,

१७७४ ब्रम्होसमाजाचा उत्पादक राजा राममोहनराय याचा जन्म.

१७८० हिंदुस्तानातील पहिले वर्तमानपत्र हिकिज गॅझेट.

१७८९ मुंबईचे पहिले वर्तमानपत्र बाम्बे हेरल्ड प्रसिद्ध झाले, कालिदासाच्या शाकुंतलाचे इतर भाषांत भाषांतर.

१७९५ अहल्याबाई होळकरीण इचा मृत्यू.

१७९९ म्हैसूरच्या शेवटच्या लढाईचा शेवट. टिपूचा मृत्यू.

१८०२ वसईचा तह.

१८०३ मुंबईस मोठी आग.

१८१८ पेशवाई बुडाली. मराठ्यांचा सत्तेचा नाश.

१८२४ आर्यसमाजाचे उत्पादक दयानंद सरस्वती यांचा जन्म.

१८३८ हिंदुस्थानांतील पहिलें पोष्ट उघडलें.

१८३९ रणजितसिंगाचा मृत्यू.

१८५१ हिंदुस्थानांत पहिले तारायंत्र सुरु झाले.

१८५३ हिंदुस्थानांतलि पहिली रेल्वे लाईन मुंबई ते ठाणा २० मैलसुरूं झाली, इंग्रजी शिक्षणाचा आरंभ

१८५४ पोस्टाची तिकीटें सुरूं करण्यांत आली.

१८५६ लो. टिळकांचा जन्म.

१८५७ शिपायांचे बंड .झांशीची राणी लक्ष्मी ठार होते. विश्वविद्यालय स्थापन झालें.

१८५८ ईस्टइंडिया कंपनीकडून राज्यकारभार काढून घेण्यांत येऊन महाराणी व्हिक्टोरिया इनें आपणाकडे घेतला.

१८६५ ओरिसांत भयंकर दुष्काळ, सुमारें १० लाख माणसें मृत्यूमुखीं पडले

१८६९ महात्मा गांधींचा जन्म.

१८७० इंडियन पिनल कोडांत १२४ अ हें राजद्रोहाचें कलम घालण्यांत आले

१८७३ जंग केरपूर येथें आकाशांतून शिलावृष्टी झाली.

१८७५ आर्य समाजाची स्थापना.

१८७७ हिंदुस्तानांत भयंकर दुष्काळ ५० लाख माणसें मेलीं.

१८७८ देश भाषेंतील मुद्रणनियंत्रणाचा कायदा व हत्यारांचा कायदा करण्यांत आला.

१८८० पुण्यास पहिल्या राष्ट्रिय स्थापना.

१८८५ हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना. स्थानिकस्वराजाचा कायदा पास झाला.

१८८७ महाराणी व्हिक्टोरियाची ज्युबिली.

१८९१ संमतीवयाचा कायदा पास झाला.

१८९२ हिंदी कौन्सिलांचा कायदा

१८९४ दादाभाई नौरोजी इंग्लडचे पार्लमेन्टांत निवडून आले.

१८९५ मुंबई व पुणें येथें हिंदुमुसलमानांचे दंगे.

१८९६ दुष्काळ हिंदुस्तानांत प्लेग नांवाचा रोग आला. लो. टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला.

१९०३ बादशहा सप्तम एडवर्ड गादीवर आले.

१९०५ बंगालची फाळणी. ब्रिटिश मालावर बहिष्कार' सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना. पंजाबांत कांगरा जिल्ह्यांत धरणीकंप.

१९०६ मुस्लिम लीगची स्थापना. एक आण्याचे निकलचे नाणें सुरू करण्यांत आलें, कलकत्यास राष्ट्रीय सभेनें स्वराज्याची मागणी केली.

१९०७ मवाळ जहालांचा तंटा, सुरतेस कांग्रेसमध्यें दुही, लाला लजपतराय यास हद्दपार केलें. अरविंद घोष वगैरे पुढाऱ्यांस शिक्षा झाल्या.

१९०८ लो. टिळकास ६ वर्षांची शिक्षा झाली. संमतिचा कायदा.

१९०९ मोर्ले—मिंटो सुधारणा. गोखल्यांचे मोफत व सक्तीचे शिक्षणाचे बिल नापास झाले.

१९१० प्रेस ॲक्ट करण्यांत आला. मुद्रण स्वातंत्र्याची मुस्कट दाबी.

१९११ बंगालची फाळणी रद्द झाली, दिल्ली हिंदुस्तानची नवी राजधानी करण्यांत आली. दिल्ली दरबार. पंचम जार्ज हिंदुस्तानांत आले.

१९१२ लॉर्ड हॉर्डीजवर बॉंब फेकण्यांत आला.

१९१३ डॉ रवींद्रनाथ टागोर यांस नोबेल प्राईज मिळालें.

१९१४ युरोपमध्यें जागतिक युद्ध सुरू झाले.

१९१५ ना. गोखले यांचा मृत्यु. काशीस हिंदु विश्वविद्यालय स्थापन झाले.

१९१६ होमरूल लीग स्थापन झाल्या.

१९१७ मि. बिझांट यांस अटक. दादाभाई नौरोजी परलोकवासी झाले, हिंदुस्तानांतील राजकीय प्रकर्णाचा खालिता प्रसिद्ध करण्यांत आला.

१९१८ जागतिक युद्ध संपले. इन्फ्ल्यूएन्झा नांवाचा साथीचा ताप हिंदुस्तानांत उम्दवला. मॉंटेग्यूचेल्म्सफर्ड सुधारणांचा विचार करण्याकरितां कॉंग्रेस लीगच्या खास बैठकी.

१९१९ रौलॅट बिल पास झाले. सत्याग्रहास सुरवात. सुधारणा जाहीर करण्यांत आल्या. पंजाबांत लष्करी कायदा. जालियनवाला बाग येथील कत्तल.

१९२० लो. टिळक कैलासवासी झाले. कलकत्त्याच्या स्पेशल कांग्रेसमध्यें असहकारिता निश्चित झाली. गुजराथ विद्यापीठ व अलीगड युनिव्हर्सिटी स्थापन झाली.

१९२१ मोपल्यांचे बंड. एक कोटी टिळक फंड जमा झाला. विदेशी कापडांची होळी. युवराजांचे आगमन व बहिष्कार. दास, नेहरू व लजपतराय यांस अटक व तुरुंगवास.

१९२२ प्रेस ॲक्ट रद्द झाला. म. गांधीस पकडले, मुलतानास हिंदूमुसलमानांचा दंगा. कायदेभंग कमेटी कौन्सिल बहिष्कार काढून टाकण्याची शिफारस करते. स्वारज्यपक्ष स्थापना झाला.

१९२३ नागपूरला सत्याग्रह. नाभाच्या महाराजांस पदच्यूत केलें. अकाली शिखांची चळवळ. अकाली दळ, शिरोमणी गुरुद्वार प्रबंध कमेटी, या संस्था बेकायदेशीर ठरविण्यांत आल्या. मलकाना रजपुतांचे शुद्धीकरण

१९२४ हिंदुमुसलमान समाजांत दुही. मुसलमानी अत्याचारास सुरवात.

१९२५ नागपुरास हिंदुमुसलमानांत समेट. दे. बं. दास वारले. कोहट गुलबर्गा सोलापूर वगैरे ठिकाणीं हिंदुमुसलमानांत दंगे

१९२६ इंदूरचे महाराजांस पदच्यत केले. कलकत्त्यास हिंदुमुसलमानाचा दंगा संस्थानिकांचे बाबतींत इंग्रज सरकारनें स्वयंभू सत्तेचे श्रेष्टत्व हे अलिखित धोरण जाहिर केले.

भारतवर्ष

अथवा

हिंदुस्थानचें संक्षिप्त गॅझेटीयर

रूपरेषा—हिंदुस्थानदेश ह्मणजे आशियाखण्डापासून दक्षिणेस समुद्रांत पसरलेला एक आवाढव्य व विषम असा त्रिकोण आहे. या त्रिकोणाचा विस्तार उत्तर अक्षांशाच्या आठव्या अंशापासून पस्तिसाव्या अंशापर्यंत आहे. म्हणजे विषुववृत्ताच्या अत्यन्त उष्ण प्रदेशापासून समशीतोष्ण कटिबन्धाच्या अगदीं आंतल्या-प्रदेशापर्यंत या देशाची व्याप्ती आहे. **कलकत्ता** हें ठिकाण ८८ रेखांशावर आहे. ह्मणजे **कलकत्यास** सहा वाजतां सूर्य मावळतो, तेव्हां इंग्लण्डांत नुकतेच कोटें बारा उलटतात. हिंदुस्थानची उत्तर दक्षिण लांबी व पूर्व पश्चिम रुंदी ही दोन्ही सारखींच सुमारें १९०० शें मैल आहेत. क्षेत्रफळ १७, ७३, १६८ चौरसमैल आहे; म्हणजे एक रशिया वगळला तर सर्व यूरोपखंडाच्या क्षेत्रफळाहुन अधिक आहे. लोकसंख्या (देशी संस्थाने धरून) एकतीस कोटी, पन्नास लक्ष आहे. या विस्तीर्ण प्रदेशास देशापेक्षां **खंड** ह्मटल्यास तें अधिक शोभेल.

भौतिकस्वरूप—उत्तरेस हिमालय पर्वत, ईशान्येस व पूर्वेस ब्रह्मपुत्रनद, आग्नेयेस बंगालचा उपसागर, दक्षिणेस हिंदीमहासागर, पश्चिमेस सिंधूनद व अरबी समुद्र हीं आहेत.

या मर्यादेंतील या देशाचा प्रदेश जगांत अतिशय उंच अशा प्रदेशापासून दोन नद्यामधला सुपीक व समुद्रसपाटी जवळ जवळ असलेला सखल प्रदेश, निसर्ग हवा व पाणी यांत असलेली विविधता वगैरेंनीं संपन्न आहे.

हिंदुस्थान देशाकडे स्थूलदृष्टीनें पाहाणारासहि या देशावर निसर्गाची पूर्ण कृपा आहे, असें तात्काळ दिसून येतें.

" हिंदुस्थान हा सगळ्या पृथ्वीचा एक लहानसा नमुना आहे. " असें एकानें म्हटलें आहे. तें सर्वथैव खरें आहे.
जगांतील निरनिराळ्या भागांत सृष्टीची जीं भिन्नभिन्न स्वरूपें आढळून येतात तीं सर्व एकत्र नांदतांना दिसतात. प्रेक्षकाचें मन भारून टाकणारें सृष्टिसौंदर्य, सुपीक जमीन, घनदाट अरण्यें, अत्युच्च पर्वत, प्रचंड नद्या, कडक थंडी अतिशय कडक उष्णता, त्याचप्रमाणें वृक्षशून्य व खडकाळ मैदानें, जलशून्य वालुकामय प्रदेश, अशा प्रकारची विविध स्वरूपें दृग्गोचर होतात.

तीन-प्रदेश-प्रथमविभाग हिमालय—विमानांत बसून हिंदुस्थानच्या भू-भागाचें निरीक्षण करूं लागलों तर आपणांस असें दिसून येईल कीं, विशिष्ट मर्यादांकित अशा तीन निरनिराळ्या प्रदेशांचा हिंदुस्थानांत समावेश होतो. **पहिला** म्हणजे **हिमालय** पर्वत व त्याच्या उतरणीवरील प्रदेश. **दुसरा** हिमालयापासून निघालेल्या सिंधू, गंगा, यमुना, वगैरे **नद्या** ज्या मैदानांवरून आपली नूपुर गर्जना करीत पतिराजाच्या (समुद्राच्या) भेटीस जातात तो व **तिसरा** म्हणजे **विंध्याद्रीच्या** दक्षिणेस पूर्व-पश्चिम घांटामधील दक्षिणची डोंगरपठार,

हिमालयाच्या उंचीचा कळस होतो तीं ठिकाणें **कांचनगंगा व गौरीशंकर** हीं दोन जगांत अति उंच शिखरें असून त्यांची उंची २९०२ फूट आहे. हिमालयाच्या दोन रांगांच्या दरम्यानच्या दरींतून पश्चिमेकडे **सिंधू, सतलज** ह्या वाहतात व पूर्वेकडील अज्ञेय अशा भागांतून **ब्रह्मपुत्रा** नद निघतो. **तिबेट व हिंदुस्थान** यांजमधील हिमालयाच्या उंच भागावर अखंड बर्फ असतो. या डोंगरापैकीं एकाची तर लांबी साठ मैल असून त्यावरील बर्फ उष्णतेनें खालीं येतो. हिमालयाच्या स्वाभाविक तटबंदीमुळें जलसंचयास चांगली मदत होते. उन्हाळ्यांत **हिंदीमहासागराच्या** पाण्याचें बाष्पीभवन होऊन जे वायूप्रवाह बनतात ते जसजसें उत्तरेकडे वळतात तसतसे त्यामध्यें ढग उत्पन्न होऊं लागतात व हिमालयाच्या पायथ्याशीं आल्यावर ते वर चढूं लागतात, तेव्हां त्यामध्यें जलातिरेक होऊन हिमालयावर फार मोठी वृष्टि होते; अगर हे वारे हिमालयाची उंच शिखरें ओलांडतांना गोठून जाऊन त्यांचें बर्फ बनतें. हिमालयांतलें जगांत अतिवृष्टीचें ठिकाण म्हणजे **चेरापुंजी** हे आसामांत आहे. एक वर्षी तर ६७ फूट म्हणजे तिमजली इमारत सहज जलमय होईल एवढा मुसळधार पाऊस पडला.

द्वितीय विभाग नद्यांचा प्रदेश—उत्तर हिंदुस्थानच्या प्रशस्त मैदानावरून जाणाऱ्या हिमजन्य **सिंधु, सतलज, गंगा, यमुना** व **ब्रम्हपुत्रा** या सर्वच नद्या गलबतें जाण्याजोग्या प्रशस्त व प्रचंड जलौघानें सतत व स्वच्छंदानें विहरणाऱ्या असल्यामुळें कृषिसृष्टीस, व्यापारास अगर राजकीयदृष्ट्या भूभागाची विशिष्ट राजमर्यादा ठरविणाऱ्या कामीं त्यांचा अत्यंत उपयोग झाला आहे. भूगोलशास्त्रवेत्त्यांनीं निर्णीत केल्याप्रमाणें सिंधु व ब्रम्हपुत्रा या दोन नद्यांची लांबी गंगेहून अधिक असली तरी त्यांचे प्रवाह बऱ्याच अंतरापर्यंत हिमालयांत अज्ञेय प्रदेशांत आहेत. गंगा हिमालयांतून बाहेर पडल्यावर लौकरच तिचा कालव्यामुळें कृषीस उपयोग होतो व प्रवाहहि गलबतें जाण्याजोगा प्रशस्त होतो. पुरानें जी जमीन भिजते व कांठच्या प्रदेशांत जो गाळ जमतो त्यानें एक पीक बुडाले तरी दुसरें दुप्पट जोरांत येईल अशा आशेनें शेतकरी आनंदांत असतो. लोकोपकाराच्या दृष्टीनें पाहतां हिंदुस्थानांतील दुसरी कोणतीहि नदी गंगेची बरोबरी करूं शकत नाहीं. नदीमार्गे व्यापार व मालाची ने आण गंगेप्रमाणें जगांत कोणत्याच नदीनें होत नाहीं. धार्मिक पवित्रतेपेक्षां शेतकी व व्यापार या कामीं तिची उपयुक्तता व महत्व अधिक, यामुळेंच ती अधिक वंदनीय झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण गंगा अगर तत्तुल्य ब्रम्हपुत्रा व सिंधु, सतलज वगैरे नद व नद्या यांचा प्रथम जमीन तयार करणें व ती सुपीक करणें नंतर पैदास चहूंकडे फैलावणें असा तीन प्रकारांनीं उपयोग होतो. बहुतेक मोठ्या नद्या या देशाचे राजमार्ग आहेत. शेतकीच्या पैदासेची आयात, निर्गत व अंतर्गत प्रदेशांतील मालाची ने आण नदीमार्गें फार थोड्या खर्चांत होते. सचेतन शरिराला जशा धमन्या अगर रक्तवाहिन्या तशा बंगालला गंगा ब्रम्हपुत्रा व त्यांच्या असंख्यात शाखा या आहेत. या त्यांच्या विपुलतेमुळें आपत्तीहि तशाच येतात. महापुरानें नुकसान झालें नाहीं असें एखादे वर्ष क्वचितच जाते. शिवाय या दोन मोठ्या प्रवाहांत स्थलांतर तर नेहमींच होत असते. एकाकाळीं गंगाकिनारीं असलेलें विशाल व सुंदर असें राजधानीचें शहर कनोज हें हल्लीं नदीतीरापासून चार मैलांवर उजाड भागांत आहे. ईस्टर्न बंगाल रेल्वेचें पाहिलें अंत्य ठिकाण कुरसी याची पुरानें नासधूस झाल्यावर गोलांडा हें नवीन स्टेशन नदीकांठीं मजबूत व भक्कम धरण घालून वसविण्यांत आलें. परंतु १८७५ च्या आगस्ट महिन्यांत तें भक्कम धरण व रेल्वे

स्टेशन वगैरे सर्व वाहून जाऊन त्याठिकाणीं जलमय होऊन गेलें, तेव्हां रेल्वेला आपलें ठाणें नदीपासून दोन मैल लांब न्यावें लागलें.

तृतीय विभाग दक्षिण—या भूभागाचे जे तीन प्रदेश प्रथम कल्पिले त्यांपैकीं दोन्हींचें वर्णन वर आलेंच आहे. राहिला तिसरा प्रदेश म्हणजे दक्षिण अगर दक्षिणची डोंगर पठार. वस्तुतः दक्षिण म्हणजे **नर्मदा** व **कृष्णा** या दोन नद्यांमधला प्रदेश, तथापि विंध्याद्रीच्या दक्षिणेस **कन्याकुमारी**पर्यंत द्वीपकल्पाच्या सर्वच भागास दक्षिण असें मानण्याची साधारण प्रवृत्ती आहे. दक्षिण देशाच्या उत्तरेस **विंध्य,** पूर्वेस पश्चिमेस त्याच नांवाचे घांट म्हणजे तीन्ही बाजूस गिरिपर्वत-समूहाचें आवरण आहे. **नर्मदेच्या** दक्षिणेस **विंध्याद्रीशीं** समांतर असा **सातपुडा** पर्वत असून या दोन लंबायमान गिरिराजांचे वंदनीय चरण मध्यप्रांताच्या पहाडी प्रदेशांत एकमेकांस मिळतात. **विंध्याद्रीच्या** पश्चिमटोंकाला **अबू** पहाड हें समुद्रांतून जसें एकादें बेट वर निघतें तसें **राजपुतान्याच्या** मैदानावर **अरवली** डोंगरांमधून निघालेलें सुळक्यासारखें शिखर; व पूर्वटोंकास **पारसनाथ** हीं दोन्ही पांच हजार फूट उंच शिखरें **जैनधर्माची** पवित्र स्थानें असल्याबद्दल प्रसिद्धच आहेत. कोकणपट्टींतून पश्चिमघाटानें आंत शिरण्यास अनेक प्रसिद्ध खिंडी अगर मार्ग आहेत. उदाहरणार्थ मुंबईहून चाळीस मैलांवरील बोरघाटाची घळण १७९८ फूट उंच आहे. समुद्रकिनाऱ्याच्या बाजूनें देशावर प्रवेश करूं पाहणाऱ्या केवढयाहि मोठया सेनेस एकादी लहान टोळी थोपवून धरीत असे; म्हणून बोरघाट म्हणजे प्राचीनकाळीं दक्षिणची गुरुकिल्ली मानण्यांत येत असे. आतां डोंगराच्या खांद्यासभोंवतीं लपेटलेल्या खिंडीवरून मध्यें आड आलेल्या सुळक्याला बोगदे पाडून उभ्या डगरीच्या तोंडाशीं असलेल्या अरुंद खडकाच्या कंगोऱ्याला बिलगून रेल्वे म्हणजे लोहमार्ग नेण्यांत आला आहे. एका ठिकाणीं नागमोड तर इतकी अणीदार आहे कीं, तिला वळसा अगर वळण घेतां येणें अगदीं अशक्य आहे. याकारणानें आगगाडीला थांबावें लागून दिशा बदलून सपाट भागावरून उलट दिशेनें जावें लागतें. याठिकाणीं जी. आय. पी. रेलवेनें स्टेशन केलेलें असून त्यास " रिव्हरसिंग " असें नांव आहे. त्याचप्रप्रमाणें **थळघांटांतूनहि** साधा व आगगाडीचा रस्ता नेण्यांत आला आहे. विंध्य व सातपुडा यापासून निघालेल्या **नर्मदा व तापी** बहुतेक समांतर वाहात येऊन **खंबायतचे** आखातास मिळतात,

पश्चिमघाटांतून निघालेल्या **कृष्णा गोदावरी** व **कावेरी** या नद्या त्यांच्या दुर्भेद्यत्वामुळें देशाची सर्व रुंदी आक्रमून येऊन पूर्वेस बंगालचे उपसागरास मिळतात.

खनिज द्रव्यें—हिंदुस्थानांत निरनिराळ्या स्थलीं खनिज संपत्ती विपुल आहे. लोखंड दगडी कोळसा, तांबें, पितळ, गंधक, शिसे, कथील, अभ्रक, मीठ, सोनें, रुपें, हिरे वगैरे अमोलिक सर्व धातू व जिन्नस यांच्या खाणी हिंदुस्थानांत सर्वत्र आहेत. या सर्व द्रव्यांचें व्यापारी स्वरूपाचें वर्णन प्रस्तुत लेखांत योग्यस्थलीं येईलच; तथापि अशोधित धातूंच्या खाणी विविध ठिकाणीं आहेत.

दगडी कोळशाच्या खाणी **बंगाल, आसाम, मध्यप्रांत, निजामचें राज्य** यांत आहेत. लोखंडाच्या खाणी **बंगालयांत** बराकपुरास **तांबें** दक्षिण हिंदुस्थानांत व राजपुतन्यांत सांपडतें. मिठाच्या खाणी पंजाबांतील डोंगरांत आहेत. **सोनें** कित्येक नद्यांच्या प्रवाहांत सांपडतें. मोठ्या प्रमाणावर सोन्याच्या खाणीं म्हणजे म्हैसूर संस्थानांत **कोलार** येथें, निजामचे राज्यांत **रायचूर** भागांत **हट्टी** व **गदगनजीक** कबुलायतकट्टी येथें असून या सर्वांत मिळून दरसाल क्रोडो रुपयांचें सोने निघतें. चुनखडिचें निरनिराळ्या रंगाचे दगड व संगमरवरी पाषाण पुष्कळ जिल्ह्यांत विपुल आहेत. पूर्वीच्या गोबळकोंड्याच्या हिऱ्याच्या खाणी पाडित असल्या तरी आजला बुंदेलखंडांतील पन्ना संस्थानांत तेवढ्या त्या चालू आहेत.

लोकसंख्या—हिंदुस्थानच्या लोकसंख्येचा सन १९२१ सालचा खानेसुमारीचा आंकडा ३१५००१०९९ आहे. म्हणजे ती एकंदर जगाच्या सुमारें एक पंचमांशाबरोबर आहे. हिंदुस्थानची सार्वभौम सत्ता हल्लीं ब्रिटीशांकडे आहे, तरी लहानमोठीं संस्थानें अद्यापि इतकीं आहेत कीं, एकंदर देशाचा एक तृतीयांश आजला देशी अमलाखालीं आहे. त्यांची प्रजा म्हणजे एकंदर हिंदुस्थानच्या लोकसंख्येच्या एक पंचमांश आहे; म्हणजे एकंदर हिंदुस्थानच्या क्षेत्रफळाचा दोनतृतीयांश इंग्रजसरकारचें राज्य असून लोकसंख्येचें प्रमाण जवळ जवळ चार पंचमांश आहे.

देशी संस्थानें व संस्थानिक आणि त्यांचे अधिकार—देशी संस्थानिक एकंदरींत सार्वभौम सरकारच्या अनुमतानें आपला कारभार चालवितात. तथापि **हैदराबाद** व **बडोद्यासारखीं** मोठीं संस्थानें निदान अंतर्गत राज्यकारभार स्वतंत्रपणेंच करतात. कांहीं इंग्रज सरकारच्या मदतीनें चालवितात व कांहीं आपली

नुसतीं नांवाची राहिलीं आहेत. बहुतेक संस्थानांचा महसूल व जमात स्वतःची असते. महत्वाच्या संस्थानिकास आपल्या प्रजेपुरता फांशीचा अधिकार आहे; परंतु त्यांचें मांडलिक राज्याचें राजकत्व मान्य करून तहनाम्याप्रमाणें अंकित करून प्रत्येकाचे अधिकार नियमित केले आहेत. सार्वभौम या नात्यानें इंग्रज सरकार मांडलिक संस्थानिकांना एकमेकांशीं युद्धप्रसंग अगर परराष्ट्राशीं मित्रत्वाचे तह करण्यास परवानगी देत नाहीं. संस्थानच्या राज्यकारभारांत कोणताहि घोंटाळा उत्पन्न झाल्यास तो नाहींसा करून एकंदरींत शांतता राखण्याचा अधिकार इंग्रजसरकारनें आपल्याकडे ठेविला आहे.

इंग्रजी मुलुख व चवदा राजकीय विभाग—हिंदुस्थानांतल्या इंग्रजी मुलखाचे एकंदर चवदा राजकीय विभाग अगर प्रांत असून त्यांवर प्रत्येकीं स्वतंत्र स्थानिक अधिकारी असतो. त्या सर्वांवर वरिष्ठ सरकार म्हणजे **व्हॉइसराय** अथवा गव्हर्नर-जनरल-इन्-काउन्सिलची देखरेख असते. व्हाइसरायाचा दरबार अगर कायदेकाउन्सिलची बैठक हिंवाळ्यांत **दिल्लीस** व उन्हाळ्यांत हिमालयांत **सिमल्यास** असते. गव्हर्नर जनरल व मुंबई, मद्रासचे गव्हर्नर हे बहुधा ब्रिटिश मुत्सद्दीवर्गांपैकीं असून त्यांची नेमणूक विलायतेस खुद्द बादशाहाकडून होते व तिची मुदत पांच वर्षांची आहे. खालचे अधिकारी बादशाहाचे हिंदुस्थानांतले सर्वांत मुख्य प्रतिनिधी म्हणजे व्हाइसराय् यांजकडून नेमले जातात. चवदा भाग येणेंप्रमाणें:—

मुंबई, बंगाल, मद्रास, संयुक्तप्रांत पंजाब बहार, आणि ओरिसा, मध्यप्रांत, कुर्ग आसाम, ब्रह्मदेश, दिल्ली, अंदमान, व निकोबार बेटें हे असून यांत उरलेली व अलग देशी संस्थानें हीं सर्व मिळून एकंदर प्रांतावर लोकसंख्या व क्षेत्रफळ यांचे आंकडे प्रस्तुत लेखांत शेवटीं जोडलेल्या परिशिष्टांत दिले आहेत.

निरनिराळे मानववंश व प्राचीनकाल—ह्यांत पृथ्वविर फार प्राचीन व इतिहासप्रसिद्ध असे जे देश आहेत, त्यांत हिंदुस्थान हा एक आहे. हा देश म्हणजे एक खंडच आहे, ह्मणून सांगण्यांत आलेंच आहे. या देशांत अनेक जातींचे, विविधधर्मांचे, निरनिराळ्या भाषा बोलणारे व भिन्न भिन्न आचारविचारांचे लोक राहतात. जातिभेद, भाषाभेद, धर्म व आचारविचार यांत असलेली भिन्नता या देशांतल्यासारखी विविधता पृथ्वीवरल्या दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं, याचें कारण

अज्ञात कालापासून निरनिराळ्या देशांतून परकीय लोक येथें येऊन त्यांनीं वस्ती केली हें होय.

मूळचे रहिवासी—उत्तरध्रुव प्रदेशाकडून आर्यांचे इकडे आगमन होण्यापूर्वी **भिल्ल, कोंड, संताळ,** वगैरे रानटी लोक या देशांत कसें व केव्हां आले याचा शोध अद्याप लागला नाहीं. यांस आर्यांनीं अनार्य हें नांव दिलें. मध्य–हिंदुस्थान व बंगाल्यांत वगैरे हल्लीं या जातीचे जे लोक आहेत, ते मुळच्या अनार्य लोकांचे वंशज होत. **अंदमान** व त्याच्या आसपासच्या बेटांतील मूळचे लोक याच जातीचे, **मलबारकडील नायर** लोक याच वर्गांतले आहेत. त्यांच्यांत एक विलक्षण व निंद्य चाल आहे ती अशी कीं, एका स्त्रीस अनेक नवरे असतात. त्यांच्यामध्यें नांवाला लग्नें होतात मात्र; पण नवरा, बायको व मुलें एकत्र कुटुंबांत राहणें हें त्यांस माहीत नाहीं. त्यांचा शरीरसंबंधीं व्यवहार सर्व पशूप्रमाणें चालतो. कोणी कोणाचा नवरा ना कोणी कोणाची बायको, वाटेल तिनें वाटेल त्याशीं व्यवहार करावा. त्याबद्दल त्यांच्यांत कोणालाच खंती वाटत नाहीं. एका कुटुंबांत दहा पांच पुरुष असले तर त्यांची बायको एकच असते. त्यांत नाते ना गोते. यामुळें पुरुषाच्या इस्टेटीस स्वतःचा मुलगा मालक न होतां, बहिणीचा मुलगा वारस समजला जातो. या घाणेरड्या चालीचा त्यांस विधिनिषेध नाहीं. **संताळ** लोक बंगाल्यांत संताळ म्हणून जिल्हा आहे त्यांत विशेषतः आहेत. ते जंगलांत राहत व रानांतील कंदमूळांवर उदरनिर्वाह करीत. अलिकडे ते बरेंच सुधारूं लागले आहेत. हे लोक आपल्या स्त्रियांस विशेष मान देतात, म्हणजे दुसरें लग्न सहसा करीत नाहींत. या लोकांखेरीज सुधारलेले असें दुसरे कांहीं मूळचे लोक प्राचीनकाळीं हिंदुस्थानांत होते. त्यांना द्रविड असें म्हणत. ते मोठमोठ्या नद्यांच्या खोऱ्यांतून व सपाट प्रदेशांतून राहत असत. जंगल तोडून जमीन तयार करीत. ते वस्त्रें वापरीत व सोन्याचे अलंकार घालीत. आर्यांनीं हिंदुस्थानावर स्वारी करून पुढें त्यांस जिंकलें. तथापि त्यांच्यापेक्षां हे द्रविड लोक सुधारणेंत मागें होते असें मात्र नाहीं. हल्लीं यांची वस्ती देशाच्या मध्य व दक्षिण भागांत आहे.

आर्यांची मूळस्थिती—आर्यांचे मूलस्थान प्रथम मध्यआशियांत रशिया देशाच्या दक्षिणभागांत होते असें कोणी म्हणतात. अलिकडील **टिळक, सापोंट,** वगैरे कित्येक विद्वानांच्या मतें ते उत्तरध्रुव प्रदेशाजवळ रहात होते. तेथून चोहोंकडे पसरले. शतपथब्राम्हण आदीकरून वैदिक वाङ्मयांत व प्राचीन संस्कृत ग्रंथांत

ते न एतमुत्तरं गिरिधश्चधिदुद्राव '' म्हणजे प्रलयकाली मनु उत्तरगिरिवर म्हणजे हिमालयावर जाऊन पोहोंचला. वगैरे हिमालयास जी उत्तरगिरि ही संज्ञा दिली आहे तीवरून सप्तसिंधूचा प्रांत हेंच आर्यांचे मूलस्तान असेंहि कित्येकांचे मत आहे. त्यांचा वर्ण गोरा असून चेहरे सुंदर होते. आकाश, सूर्य, अग्नि व वायु यांस ते देव मानीत. त्यांचा आपणांवर कोप होऊं नये म्हणून ते त्यांची आराधना करीत. ते युद्धांत सांपडलेल्या स्त्रियांशीं विवाह करीत त्यांच्या निरनिराळ्या शाखा असत. त्यांतून राजाची निवड होत असे व त्या राजाचा अधिकार सर्व जातीवर चालत असे. कालांतरानें लोकसंख्या वाढली तशी कांहीं प्रजा पोट भरण्याकरितां मार्ग फुटेल तिकडे जाऊ लागली. आर्यांच्या एकाच गोटांतून निघालेल्या काहीं शाखांनीं यूरोपखंडांत जाऊन जर्मनी, इताली इंग्लंड वगैरे देशांत वसाहती केल्या; व कांहीं पूर्वेस हिमालयाच्या त्रिकटमार्गानें हिंदुस्थानांत शिरले. सिंधूनदाच्या दोन्ही तीरांवर व सरस्वती आणि धृषद्वती यांचे दरम्यान प्रथम त्यांनीं आपली वसाहत केली. युरोपांतले जर्मनी, इग्लंड वगैरे देशांतले लोक, हिंदुस्थानांतले ब्राह्मण, क्षत्रीय रजपूत वगैरे नांवाखालीं मोडत असलेले लोक हे मूळच्या एकाच आर्य जातीचे वंशज होत असें तज्ज्ञांचें मत आहे.

आर्य लोक पृथ्वीवरील ज्या ज्या देशांत गेले त्या त्या देशच्या मूळच्या रहिवाशांस प्रथम त्यांनीं जिंकून आपलें वर्चस्व स्थापित केलें. त्याप्रमाणें हिंदुस्थानांत आलेल्यानेंहि मूळच्या अनार्य लोकांस पादाक्रांत करून त्यांस आपले दास बनविलें.

हिंदुस्थानांत आलेले आर्य लोक त्या प्राचीन कालीं देखील विद्येनें किती श्रेष्ठ होते याची साक्ष अर्वाचीनांस त्यांचा ऋग्वेद नामक ग्रंथ आजतागायत देत आहे. ऋग्वेद ग्रंथ म्हणजे आर्यांचे विद्याविषयक एक स्मारकच आहे. देवतांची स्तुति असलेल्या या काव्य-ग्रंथाचा काल निश्चित झालेला नाहीं. कित्येकांच्या मतें तो इ. स. पूर्वी तीन हजार वर्षें तर कित्येक अर्वाचीन पाश्चात्य विद्वानांच्या मतें इ. स. पूर्वी चौदाशें वर्षें त्याचा रचनाकाल असावा. तथापि एवढें खरें कीं, बौद्धधर्माचा उदय (इ. स. पू. ६००) होण्याच्या पुष्कळच वर्षी हिंदुस्थानांत वैदिकधर्म होता. वेदग्रंथ व त्यांतले त्यांत ऋग्वेदाइतका जुना ग्रंथ जगाचे पाठीवर दुसरा नाहीं.

वेदकाल
ऋग्वेद
इ. स. पूर्वी ३००० वर्षे

विद्वान् पंडितास ऋषि असें म्हणतात. हे ऋषि यज्ञयाग-समयीं लहान लहान कवनें (सूक्तें) रचून तीं म्हणत असत. आरंभीं हीं सूक्तें लिहिलीं नव्हतीं, कारण त्याकाळीं लेखनकला अवगत नव्हती. तीं गुरुमुखानें श्रवण करून मुखोद्गत करण्याचा परिपाठ होता. त्यावरून त्यांना " स्मृति " हें नांव पडलें. आरंभीं निरनिराळ्या ऋषींच्या आश्रमांतून निरनिराळीं सूक्तें म्हणण्याची चाल असे. कालांतरानें तीं सर्व एकत्र करण्यांत आलीं तेव्हां त्यांस " **संहिता** " ' एकीकरण ' असें नांव मिळालें. अशा रीतीनें जो ग्रंथ निर्माण झाला त्यास ऋग्वेद संहिता असें म्हणतात. त्यांत एकंदर १०१७ सूक्तें व त्यांच्या १०५८० ऋचा आहेत व त्यांत मुख्यत्वेंकरून देवाची प्रार्थना फार ओजस्वी भाषेंत आहे.

वेदांत दिलेल्या वर्णनावरून हिंदुधर्मांत आजला प्रचलित असलेला जातीभेदाचा निर्बंध त्या काळीं नव्हता. त्या काळच्या स्त्रिया सती जात नसत.

वेदांतील वर्णनावरून त्याकालची सुधारणा

तांबे, पितळ, लोखंड, वगैरे धातु ज्ञात असून त्यांचा उपयोग सार्वत्रिक होत असे. **लोहार, कासार, सोनार,** इत्यादि कसबी त्याकालच्या आर्यांत होते. आर्य-योद्धे रथांत बसून लढाई करीत. हत्ती नाहीं तरी घोडा लढाईंत उपयोगांत आणला जात असे.जनावरांत गाईला मोठा मान असून संपत्ती मोजण्याचें तें एक प्रमाण असों. ते सोम या नांवाच्या मादक पेयाचें सेवन करीत. त्याकालीं स्त्रियांस मोठा मान असे व त्यांस धर्मशिक्षण दिलें जात असे. **अरुंधती** व **विश्वावरे** सारख्या कांहीं स्त्रिया विद्वान होत्या. या साध्वी स्त्रियांची गणना ऋषिमंडळांत होई. वेदांतील कांहीं उत्तम ऋचा स्त्रियांनीं रचिल्या आहेत.

जगांतील सर्व धर्मग्रंथांत वेद हे अतिशय प्राचीन असून त्यांत देवतांची स्तुति मंत्र द्रष्ट्या ऋषींनीं फार उच्च व ओजस्वी भाषेंत केलेली आहे. वेदांमधील विविध उद्गारांत

वेदांतील देवतांविषयींच्या उच्च भावना ऋग्वेदांतर्गत

त्या काळच्या आपल्या पूर्वजांचें जें प्रतिबिंब दृग्गोचर होते त्यावरून ते सदैव यौवनाची व वैभवाची इच्छा करणारे होते. भक्ताचा भाव असेल त्याप्रमाणें त्यास ईश्वरी स्वरूपदर्शन झालें तेंहि वीर्यस्फूरित व आवेशानें भरलेले असें होते त्यांचे मरुत राजेलोकास जाणारे बलिष्ठ अग्नि. तर सदा तरुण, तेजस्वी आणि अश्विनीकुमार तर भीषण पराक्रम करणारे आहेत.

" ऐहिक वैभव ही परमपदावर चढण्याची पहिली व आवश्यक पायरी आहे. " हें तत्व त्यांनीं दूरदृष्टीनें जाणूनच वैभव व यौवन यांची याचना केलेली वेद–ग्रंथांत आढळून येते. निरनिराळ्या मंत्रांनीं देवतांची जी स्तुति करण्यांत आली आहे तिच्या मूळ ऋचा येथें देण्यास अवकाश नसून ते इष्टहि नाहीं. प्राकृत व जिज्ञासू वाचकांकरितां श्रुतिग्रंथांत आलेल्या ऋग्वेदांतील कांहीं ऋचांच्या भाषांतराचे निवडक वेंचे दिले आहेत.

" ज्याप्रमाणें वस्त्राचा व हिंवाळ्या रात्रीचा अत्यंत निकट संबंध असतो त्याप्रमाणें तुम्हीं दोघे एकमेकांशीं संलग्न आहां " सू-३४

" उत्कर्ष जसा रमणीय असतो, पृथ्वी जशी विस्तीर्ण आहे, गिरी जसा पुष्पफलांनीं परिपूर्ण असतो, उदक जसें हितकर असतें, तेजस्वी अश्व जसा वेगानें दौड करतो अथवा एकादी महानदी जशी सामर्थ्यवान् असते तसा हा आहे. अ.१ सू–६५

ज्याअर्थी तूं अतिशय ज्ञाता आहेस त्याअर्थी आमच्या बाप आजापासून चालत आलेला स्नेहसंबंध तूं सोडूं नकोस. सू–७१

एकाद्या पाहुण्याची बरदास्त उत्तम ठेविली म्हणजे तो जसा खूष होतो तसा हा अग्निदेव. (भक्तावर संतुष्ट होतो.) सू–७३

ज्याप्रमाणें उंदीर कोष्ट्यांच्या मागांतील दोरे खाऊन टाकतात त्याप्रमाणें मला चिंता खाऊन टाकीत आहे. सू–१०५

यांत काव्यदृष्ट्या प्रतिभा व माधुर्य यांबरोबरच क्रमाक्रमानें आढळून येणारे वेंचक उपमा, सूक्ष्म निरिक्षण थोडक्या शब्दांत हृदयंगम उपमांनीं ईश्वराचे विविध गुणवर्णन, करुणवाणी, व्यावहारिक व मनोरंजक विचार यांचे ज्ञान व मनन यांपासून कोणा मुमुक्षुजीवाच्या मनाची तळमळ शांत होऊन तो ईश्वररूपी लीन झाल्याशिवाय राहील ?

आर्यांचे दुसरे प्रयाण. ब्राम्हण काल इ. स. पूर्वी १५००

सिंधुनदाच्या दोन्ही तीरावर व पूर्वेस गंगा, यमुना या नद्याकडे प्रयाण करीत असतां ऋग्वेद रचना झाली असावी असें तज्ञांचे मत आहे. वाढती लोकसंख्या वरून आर्यांचे आगमन होऊं लागले तसतशी जुन्या आर्यांची वसाहत हळु हळू पुढें पसरूं लागली; अशा रीतीनें ते पूर्वेस गंगा व

यमुना या नद्यापर्यंत व दक्षिणेस **विंध्याद्री** ओलांडून नर्मदेपर्यंत येऊन पोहोंचलें. प्रथम वसाहत करून राहिलेल्या व मागाहून वरवर आलेल्या आर्यांचें समेलन होऊन वर सांगितलेली मोठी क्रांती ज्या कालीं घडून आली त्याच कालीं त्यांच्या राजकीय स्थितींतहि क्रांती झाली. वेदकालांत राजाचा अधिकार युद्धांत सेनाधिपत्य घेणें व सार्वजनिक गोष्टींचा निर्णय करणें एवढाच काय तो होता. ब्राह्मणकालांत राजे हे जमीनीचे मालक बनून त्यांची लहान लहान राज्यें अस्तित्वांत आलीं. **कोसल** म्हणजे हल्लींचा **अयोध्याप्रांत**, **विदर्भ** म्हणजे **वऱ्हाड**, **विदेह** व **मगध** म्हणजे हल्लींचें उत्तर व दक्षिण **बहार** हीं प्राचीन राज्यें

लहान लहान राज्यें

व तेथील **दशरथ**, **जनक** व **भीमक** इत्यादि राजे यांच्या अनेक कथा **रामायण** व **महाभारत** या राष्ट्रीय ग्रंथांत आलेल्या आहेत; परंतु राजांच्या नांवाशिवाय त्या राज्याचा दुसरा इतिहास मिळत नाहीं. अशारीतीनें जिकडे जिकडे आर्यलोक गेले तिकडे मूळच्या अनार्यांस जिंकून त्यांनीं आपलीं राज्यें स्थापिलीं; आपला धर्म स्थापिला व आपली संस्कृत भाषा सुरू केली.

सर्व वेदांत **ऋग्वेद** हा पाहिला आहे व तोच सर्वांपेक्षां महत्वाचा आहे. त्याचे दहा मंडल (अध्याय) आहेत. व सरासरी पंधरा प्रकारच्या

ग्रंथोत्पत्ति.

वैदिक छंदांत त्याची रचना आहे. प्राचीन सूक्तसमूह म्हणजे ऋग्वेदसंहिता हा प्रथम एकच ग्रंथ होता. त्याचेच पुढें चार वेद झाले. त्यास **ऋक्**, **यजु**, **साम** व **अथर्व** अशीं नांवें आहेत. त्यांत पहिले तीन मुख्य असून त्यांस ॥ **त्रयी विद्या** ॥ असें म्हणतात. या चार वेदावरच ग्रंथरचना थांबली नाहीं. मोठमोठ्या यज्ञांचेवेळीं विद्वान् लोक एकत्र जमत तेव्हां अनेक गहन विषयांवर

त्रयी विद्या.

चर्चा व वाद होत असत. असे वाद व त्यावरील निर्णय कालांतरानें पुष्कळ झाल्यामुळें त्यांचा समावेश त्या त्या वेदांवरील स्वतंत्र ग्रंथांत करण्यांत आला, त्यास **ब्राह्मण** असं म्हणतात.

वैदिक मंत्राचा आशय विशेष स्पष्ट व्हावा ह्मणूनच ब्राम्हण **ग्रंथाची–टीकेची** उत्पत्ती झाली. संहिता पद्यांत आहे पण ब्राम्हण ग्रंथ गद्यांत आहेत

ऋग्वेदाच्या ब्राह्मणामध्यें यज्ञकर्मांचे विधान आहे. यजुर्वेदाच्या ब्राह्मणांत अध्वर्युच्या व सामवेदाच्या ब्राह्मणांत–टीकेंत–उद्गाताच्या कर्मांचीं विधानें आहेत. ब्राह्मण ग्रंथांच्या शेवटीं " अरण्यकें " आहेत. घर सोडून वनांत जाऊन राहिल्यामुळें ज्यांनीं यज्ञयागादि करणें टाकून दिलें आहे त्यांच्याकरितां अरण्यकांपुढें उपनिषदें, परमेश्वरस्वरूप कसें आहे, सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय या तिन्ही अवस्था कोणत्या नियमांनीं चालू आहेत व त्यांचा हेतू काय इत्यादि गहन प्रश्नांचा सूक्ष्म विचार असून त्यांत सर्व वेदान्ताचें सार भरलेलें आहे. **परमेश्वरस्वरूपाचें** वर्णन **उपनिषदांत** असें केलें आहेः–

" मनोमयः प्राणशरीरो भारूपः सत्यसंकल्प
आकाशात्मा सर्वकर्मा सर्वकामः सर्वगंधः
सर्वरसःसर्वमिदमभ्यत्तोऽवाक्यनादरः "

तात्पर्य, मनोमय, ज्याचें प्राण हेंच शरीर, प्रकाश हेंच रूप, सत्य हे ज्याचे विचार, आकाश हा आत्मा, सर्व कर्मांचा, व्यसनांचा, सुगंधाचा व रुचींचा स्थानभाव जो, सर्व विश्वास व्यापून राहिला आहे, यव, व्रीहि व मोहरी ' पेक्षांही लहान, पृथ्वी आकाश व सर्व विश्वापेक्षांहि मोठें असें तें **ब्रम्ह** आहे.

यज्ञासंबधीं अथवा कर्मकाण्डाचा विषय जेव्हां फार प्रचाराचा झाला व साधारण लोकांना ब्राह्मण ग्रंथांचा अर्थ नीट समजण्याची अडचण भासूं लागली त्यावेळीं श्रौत, गृह्य व धर्मसूत्रांची उत्पत्ति झाली. थोडक्यांत पुष्कळ अर्थाचा समावेश होणाऱ्या व ध्यानांत ठेवण्यास सुलभ अशा वाक्यांस ' सूत्रें ' अशी संज्ञा आहे. श्रौतसूत्रांत यज्ञयागांचे नियम-

सूत्रें

गृह्यसूत्रांत जनन, मरण, विवाह इत्यादि संस्कारांचे विधी व धर्मसूत्रांत समाजाचें नियम न करणारें कायदे आहेत. ह्यांशिवाय **व्याकरण, न्याय, वेदान्त** वगैरे विषयावरहि पुढें अनेक सूत्रग्रंथ निर्माण झाले. **धर्मसूत्रांत** जे कायदे आहेत त्यावरच पुढें स्मृति नामक विस्तृत **ग्रंथ** लिहिले गेले. ते ज्या ऋषींनीं लिहिले त्यांच्या नांवा– वरून त्यांना **मनुस्मृति**, पाराशरस्मृति, **याज्ञवल्क्यस्मृति**, इत्यादि नांवें आहेत. याखेरीज आर्यांचे मुख्य **ग्रंथ** म्हणजे इतिहास व पुराणें हें होत. इतिहासांत महाभारत व रामायण ही दोन काव्यें येतात. **पुराणांची** संख्या एकंदर **अठरा**

आहे,या पुराणग्रंथातहि आर्यांचा इतिहास व सामान्य नीति सांगितली आहे श्रुति स्मृति, व पुराणें यांवरच हिंदुसमाज व त्यांचा धर्म याचा सर्व पाया रचलेला आहे.

आर्य लोक आपल्या मूळच्या ठिकाणाहून प्रयाण करीत असतां त्यांची जीं स्थित्यंतरें झालीं व त्यांस ज्या अडचणी आल्या त्यावरून चातुर्वण्याची उत्पत्ति झाली

चातुर्वर्ण्याची उत्पत्ति

हिंदुस्थानांत आल्यावर मूळच्या अनार्य लोकांशीं जेव्हां युद्ध प्रसंग नेहमींच येऊं लागले तेव्हां केवळ लढाईकरितां म्हणून शस्त्रास्त्रविद्यानिपुण असे लोक आर्यांना कायमचे तयार करावे लागले. यांसच राजन्य अथवा क्षत्रिय हें नांव मिळालें. राजन्य याचेंच हल्लीचें अपभ्रष्टरूप रजपूत.यज्ञयाग, अध्ययन व अध्यापन करणारे ते ब्राह्मण, कृषि किंवा क्रयविक्रय करणारे ते वैश्य,आणि मूळच्या अनार्य लोकांस शूद्र असें म्हणतात.

वेदकालांत जरी हे वर्ण उत्पन्न झाले होते तरी शूद्राखेरीज बाकीच्या तीन्हीं वर्णांत एका वर्णातून दुसऱ्या वर्णांत पाहिजे तेव्हां जातां येत असे.परंतु ब्राह्मणकालांत चारी वर्ण एकमेकांपासून अलग राहूं लागले. ब्राह्मण हें विद्येनें श्रेष्ठ असल्यामुळें

चातुर्वर्ण्यव्यवस्था

इतर वर्ण त्यांना त्याचप्रमाणें मान देऊं लागले. जसजसा आर्य लोकांचा हिंदुस्थानांत अधिकाधिक प्रवेश झाला तसतसें त्यांच्यांत मूळच्या अनार्यांचें जास्त मिश्रण होऊं लागले, तेव्हां उच्च वर्णांस विशेषत: ब्राह्मणांस आपल्या आर्य-वंशांत भेसळ न होण्याची खबरदारी घेण्याच्या हेतूनें त्यांनीं खालच्या वर्णाशीं रोटी व बेटी व्यवहार बंद केला. इतर वर्णांनींहि ब्राह्मणांचे अनुकरण केलें; तथापि त्यांच्यांत कडक निर्बंध पाळला गेला नाहीं, हेंच हल्ली हिंदु लोकांत ज्या हजारों जाती उत्पन्न झाल्या आहेत याचे मुख्य कारण आहे.

आर्यावर्तातील ब्राह्मणशाखेनें जेव्हां आपण यज्ञकर्माचे अधिकारी व धार्मिक विधीचे पुरस्कर्ते म्हणून आपण श्रेष्ठ असल्याचे जाहीर केलें तेव्हां क्षत्रियांनीं विरोध करण्यास सुरवात केली. आर्य लोकसत्ताक राज्यांतील या दोन प्रबल शाखां-मध्यें अशा रीतीनें स्वत:चे श्रेष्ठत्व स्थापण्याचें हेतूनें विलक्षण स्पर्धा उत्पन्न झाली.

ब्राह्मण क्षत्रिय यांच्यातील स्पर्धा किंवा लढा

वसिष्ठ व विश्वामित्र यांजमधलि ब्रह्मर्षि व राजार्षि यासंबंधीचें कथानक वैदिक ग्रंथांत अनेक ठिकाणीं आलेलें आहे. कांहीं काळ ब्राम्हणांनीं क्षत्रियांचे वर्चस्व मध्यंतरीं थोडे-बहुत मान्य केलें होतें तरी परशुरामानें जेव्हां एकवीस वेळां ब्राम्हणांच्या वतीनें लढुन क्षत्रियांचा संहार केला तेंव्हां या लढयाचा कायमचा निकाल अखेरीस ब्राम्हणांस अनुकुल असा झाला.

ब्राम्हण शाखेनें आपला आधिकार अशा रीतीनें प्रस्थापित केल्यानंतर त्याचा उपयोग शहाणपणानें केला. प्राचीन वैदिककालापासून पुढाऱ्यांनीं ही गोष्ट लक्षांत घेतली कीं, धार्मिक वर्चस्व जर पाहिजे तर ऐहिक सुख व डामडौल यांचा त्याग केला पाहिजे. शुद्राचे कर्म जसे सेवा करणें, वैश्यांचे कृषि व क्रयविक्रय आणि क्षत्रियांचे सार्वजनिक हितशत्रूंचा समाचार घेणें हें कर्तव्यकर्म, तसेंच लोककल्याणास्तव देवाची आराधना करणें हें ब्राम्हणांचे कर्तव्य होय. ही कर्तव्याची जाणीव असणें हें श्रेष्ठतेचे खरे निदर्शक आहे. ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेविली होती. कर्तव्यकर्माची जाणीव न राहिल्यामुळें ब्राम्हण समाजाचा अनादर हल्लीं होत आहे.

ब्राम्हणांचे वर्चस्व स्थापित होते व त्याचा उपयोग तें शहाणपणानें करतात.

ब्राह्मणशाखेनें घेतलेला श्रेष्ठ दर्जा एकंदर आर्य जातीस हितावह झाला, कारण त्यांनीं सर्व आर्यबांधवांकरितां आपली प्रगल्भ भाषा व वाङ्मय यांचा चांगला विकास केला. ब्राम्हण हे केवळ धर्माधिकारी तत्वज्ञानी होते, एवढेंच नाहीं तर ते स्मृतिकार, शास्त्रवेत्ते व कवीहि होते. मूळच्या अनार्य लोकांवर त्यांचे वजन तर विलक्षण बसलें. या जंगली रहिवाशांस धातूची ओळख व परमेश्वराविषयीं सम्यकज्ञान त्यांनीं करून दिलें. ऐतिहासिक कालांत तर त्यांनीं या लोकसमुदायास हिंदुधर्माच्या सामाजिक व धार्मिक कक्षेंत आणिलें.

ब्राम्हणांनीं केलेली कामगिरी

जगांतल्या कोणत्याहि तत्वज्ञानाचा उगम प्राणिमात्राच्या जननमरणाच्या कल्पनातीत अशा गूढ तत्वापासूनच झालेला आहे. त्याचाच वैदिककालापासून

ब्राम्हणांचे तत्वज्ञान व षटदर्शनें

पुढें पुढें गहन विचार ब्राम्हणांनीं केला. या दृश्य जगाची रचना अगर घटना कोठून व कशी उत्पन्न झाली व ती कोणत्या नियमांनीं बद्ध आहे; आपण पहातों हें जग व आपण स्वतः कोठून आलों इत्यादि गहन विचार व त्यांचें अस्खलित व विस्तृत विवेचन सांख्य, योग, वेदान्त, न्याय आणि वैषेशिका अशा एकंदर सहा दर्शनग्रथांत केलें आहे म्हणून त्यांस षटदर्शनें ह्मणतात. साही दर्शन-ग्रंथ तत्वतः जवळ जवळ एकच आहेत. कारण त्या सर्वांत अथ ते इति पर्यंत प्राप्त जन्माचें इतिकर्तव्य व पुनर्जन्मांतून सुटका म्हणजे आत्मा कैवल्यपदाप्रत अर्थात मोक्षास कसा जाईल ? या एकाच गोष्टीचा त्या त्या दर्शनकार महात्म्यांनीं विचार करून आपापलीं मतें नमूद केली आहेत.

वेदकालानंतरची आर्यांची सुधारणा, त्यांची संस्कृति व धार्मिक, राजकीय, सामाजिक इत्याद्यनेक बाजूनीं आर्यांची प्रगती दाखविणारे ग्रंथ म्हणजे

रामायण—महाभारतकाल
इ. स. पूर्वी १५०० ते १०००

म्हणजे रामायण व महाभारत हे होत प्राचीन आर्य लोकसत्ताक राज्यांतलि ब्राह्मण हे केवळ वेदान्त, तत्वज्ञान शास्त्र व स्मृति ग्रंथ यांचेच हक्कदार अगर जिम्मेदार नव्हते पण ते व्यावहारिक वाङ्मयाचे उत्पादक,पुरस्कर्ते व संरक्षक होते. धर्म तत्वज्ञान व कायदा यांखेरीच संस्कृत वाङ्मयांत मुख्यत्वें इतिहास व पुराणें ह्मणजे रामायण व महाभारत हे दोन प्रचंड काव्यंग्रथ, नाटकें व पुष्कळशीं गहन काव्यें, मीमांसा, चरित्रें, निरुक्तें वगैरे भाषाशास्त्रावरील ग्रंथ यांचा समावेश होतो. आर्यांचा प्राचीन इतिहास उपलब्ध नाहीं असा पाश्चात्यांचा आक्षेप आहे; परंतु आर्यांचा इतिहास त्यांच्या पुराणग्रंथांतून ग्रथित केलेला आहे, कारण " इतिहासपुराणम् पंचमम् वेदानाम् वेदम् (अध्येमि) असें ऋषीवाक्य आहे.

रामायण हें वीरपुरुषाचे चरित्रत्माक महाकाव्य आहे. त्यामध्यें चरित्र-विषयक नायकाचे म्हणजे श्रीरामाचें मुख्यतः चरित्रकथन असलें तरी त्या कालची समाजरचना व तदन्तर्गत अनेक गोष्टींची त्यांत चर्चा करण्यांत आलेली आहे. त्यांत असलेले स्वभाव व सृष्टिसौंदर्य राजकीय व्यवस्था व व अध्यात्मविचार यांवरून त्या काळच्या समाजाची प्रगति कसकशी झाली होती

हें दिसून येतें. रामाची सत्यप्रियता, भरताची बंधुप्रीति, सीतेची पतिनिष्ठा, मारुतीची स्वामिसेवातत्परता इत्यादि काव्यांतील प्रमुख व्यक्तींच्या उच्चतम गुण-समुच्चयाबरोबरच कवीची (वाल्मिकी) कल्पनाशक्ती, प्रतिमा, विचारगौरव, वर्णनशैली यांचेयोगानें कथाभाग विशेष खुलल्यामुळें काव्यांत रसाचा परिपोष फार बहारीचा झाला आहे, ह्मणुनच पंतांनीं "वाल्मिकीच्या जन जैसा तृप्तिस पावें कुळासकट कवनीं " ह्मणजे वाल्मिकीच्या कवनानें कोण तृप्त होणार नाहीं ? असें म्हटलें आहे.

रामायणानंतर महाभारत झालें. महाभारताचा काल विद्वानांनीं त्या कालच्या ग्रहस्थितीवरून ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. नुकतेच चितूरचे रा. वेलंदे गोपाळ ऐयर यानीं अनेक बाजूंनीं विचार करून तो इ. स. पूर्वी ११९४-११९५ ठरविलर आहे. महाभारतांतील कौरव पांडवाचा विरोध व युद्ध प्रसंग हा मुख्य कथाभाग आहे. तथापि त्या काळचा धर्म, आचारविचार, समाजवर्णव्यवस्था, युद्धकला राज्यव्यवस्था, शास्त्रें व कला यांचा अभ्यास, स्त्रीशिक्षण व व्यवहार, इत्यादि अनेक गोष्टींचा इतिहास सामग्रेकरून सांगितलेला आहे. महाभारताचे महत्त्व ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे " म्हणवूनी महाभारतीं जें नाहीं तें नोहेचि लोकीं तिहीं । येणे कारणें ह्मणजे पाही । व्यासोच्छिष्ट जगत्रय । असें आहे.

महाभारत
इ० स० पूर्वी
१२०० वर्षे

भारताची एकंदर अठरा पर्वें असून त्यांत आलेलें पात्रविचैत्र, विषय वैचित्र व स्वभावाचे स्वाभाविक वर्णन तर दुसऱ्या कोणत्याच ग्रंथांत आढळणार नाहीं. त्या कालीं स्त्रीशिक्षण किती शुद्ध पायावर दिलें जात असें हें सुभद्रेनें द्रोपदीस केलेल्या आपल्या पांच नवऱ्यास कसें मुठींत ठेवलेंस ? " या प्रश्नास दिलेल्या " मी संसाराचा जमाखर्च ठेवित असतें ' या उत्तरावरून दिसून येतें. त्या वेळची सत्यप्रीति व करारीपणा पहावयाचा झाल्यास, प्रत्यक्ष मुलगा दुर्योधन युद्धारंभीं आशीर्वाद घेण्यास आला असतां साध्वी गांधारीनें दिलेले " धर्म तेथें जय " हें चोख उत्तर पहावें " भारतं श्रुणुया नित्यं भारतं परिकीर्तियेत ' भारतं मानसे यस्य तस्य हस्तगतो जयः " असें भारतमहात्म्याविषयीं ह्मटले आहे. रामायण, महाभारत ग्रथांत त्या काळची धार्मिक, सामाजिक, तशीच राज-

कीय बाब, समाजाची त्या काळची परिस्थिती व तत्संबंधीं विस्तृत विवेचन करण्यांत आलें असल्यामुळें हे दोन्ही ग्रंथ भावी हिंदुराष्ट्रास आजतागायत आदर्शरुप होऊन राहिले आहेत.

इतिहास व पुराणें यांचा किती निकट संबंध आहे हें श्रावणीमध्यें वेद वेदांगाच्या तर्पणांत ' इतिहास पुराणं तर्पयामि '' असें ह्मटलेलें आहे या एकाच

पुराणें

गोष्टीवरून सिद्ध होते. महापुराणें अठरा असून खेरीज उपपुराणें आहेत. अष्टादश पुराणांत मत्स्य, विष्णू, वायू, व ब्रम्हांड हीं पुराणें महत्वाची व जुनीं आहेत. तीं सर्व व्यासकृत आहेत. त्यांत त्या त्या कालचे पुण्यश्लोक ऋषि व राजे यांचीं चरित्रें व वंश ही आजलाहि इतिहासांत प्रमुख मानलेलीं अंगें वर्णिली असून खेरीज त्या कालच्या महत्वाच्या गोष्टींचा त्यांत उल्लेख आहे. धर्मराजापासून सातवा वंशज जो अंतिम कृष्ण याच्या मुलाचे वेळेस हस्तिनापुर शहर गंगेच्या प्रवाहानें वाहून गेलें. या ऐतिहासिक गोष्टीसंबधानें सर्व पुराणांची एकवाक्यता आहे.

तर्क प्रामाण्य प्रधान काळ पूर्वी १००० ते ५५०

संस्कृत व्याकरण पाणिनी.

पाश्चात्य देशांत भाषा शास्त्राचा उदय होण्यापूर्वीच हिंदुस्थानांत संस्कृत भाषेची मूळ तत्वें ठरून गेलीं होतीं. पाणिनी हा संस्कृत व्याकरणाचा एक तज्ञ होऊन गेला. परंतु इ. स. त्याच्याहि पूर्वी अनेक वैयाकरणी होऊन गेले असले पाहिजेत. पाणिनीचा काल अनिश्चित आहे. तथापि डॉ. भांडारकरांच्या मतें तो इ. स. पूर्वी आठशें वर्षें झाला असावा. पाणीनीचें व्याकरण, त्यांतील मजकुराचा ठामपणा, भाषेंतील धातूंचें मूलतत्वविवेचन व शब्दाची पद्धतशीर परिभाषा याबद्दल जगांतल्या सर्व व्याकरण ग्रंथांत अत्यंत श्रेष्ठ दर्जाच आहे. त्यांत संस्कृत भाषेची विशिष्ट स्वरुपें अगर लक्षणें यांची तर्कशास्त्रशुद्ध एकवाक्यता करण्यांत आली आहे. पाणिनचिं व्याकरण ह्मणजे मानवी शोधाचे व उद्यम कुशलतेचें एक अत्यंत परिणत स्वरूप होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. पाणिनीच्या काळीं संस्कृत ही प्रचारांतील भाषा होती.

संस्कृत ज्योतिषाचे विद्वानांनीं तीन काल कल्पिले आहेत. पहिला ह्मणजे वैदिक काल. त्या कालींहि ग्रहांचे वेध स्वतंत्रपणें घेतले जाऊन त्यावरून अनुमानें व सिद्धांत

स्थापित केले जात असत. त्या काळच्या शास्त्रज्ञांनीं वर्षाचें तीनशें साठ दिवस धरून पांच वर्षांनीं एक महिना अधिक धरायाचा अशा रीतीनें सौर

ज्योतिष

वर्षाची कालगणना बरीच बिनचूक केली होती. चंद्राच्या कला व त्याच्या कक्षेंतली आठ्ठावीस नक्षत्रें यांची त्यांना माहिती होती. दुसरा काल ह्मणजे ग्रीक लोकांच्या या देशावर स्वाऱ्या होऊं लागल्या तो. ग्रीकांच्या प्रेरणेनें हिंदु ज्योतिषी वहारमिहीरनें (इ. स. पूर्वी ५०४) संस्कृत नांवाबरोबर ग्रहांची ग्रीक नांवें दिलीं आहेत व त्याच्या एका ग्रंथांत ' होरा शास्त्र ' अशी ग्रकि संज्ञा आहे. कांहीं बाबतींत तर ब्राह्मण ज्योतिषांनीं ग्रकिांच्याहि पुढें मजल मारिली, तेव्हां त्यांची कीर्ति युरोप खंडांत पसरली. प्राचीन हिंदुशास्त्रज्ञाविषयीं लिहितांना राजस्थानचे इतिहासकर्ते कर्नल टॉड यांनीं "ज्यांचें ज्योतिषज्ञान पाहून सांप्रतहि युरोपियन पंडितास आश्चर्य वाटतें, असे जोतिष शास्त्रज्ञ, युरोपीय तज्ञांच्या अद्यापहि आदरास पात्र होणारीं सुंदर लेणीं कोरणारे शिल्पशास्त्रज्ञ व मूर्तीकार आणि स्वर बदलून श्रोत्यांचें अंतःकरणास आनंदांतून दुःखांत व दुःखांतून आनंदांत सहज लीलेनें भ्रमण करावयास लावणारे गायक हिंदुस्थानावांचून दुसऱ्या देशांत कोठचें सांपडणार ? " असे उग्दार काढले आहेत. नवव्या शतकांत अरबांनीं हिंदु ज्योतिषापासून पुष्कळसें ज्ञान संपादन करून घेतलें. संस्कृत ज्योतिषावरील सिद्धांत ग्रंथांची आरबी भाषेंत भाषांतरेंहि करविलीं. वराहमिहिरामागून ब्रह्मगुप्त व त्यानंतर बाराव्या शतकांत भास्कराचार्य हे प्रख्यात ज्योतिषशास्त्रज्ञ होऊन गेले. भास्कराचार्यांचे ज्योतिषावरील सिद्धांत शिरोमणी व करण कुतुहल हे दोन ग्रंथ सर्वमान्य आहेत. भास्कराचार्यांनंतर मुसलमानी अमलांत हिंदु ज्योतिषांचा हळुहळु ऱ्हास होत गेला. त्यानंतर ह्मणण्यासारखा विद्वान शास्त्रज्ञ क्वचितच निपजला. आठराव्या शतकांत ज्योतिषाचा चाहता जयपूरचा राजा दुसरा जयसिंह यानें आपली राजधानी जयपूर, काशी, मथुरा व उज्जनी येथें वेधशाळा बांधल्या व त्यांतून घेतलेल्या वेधावरून त्यानें तयार केलेली ताऱ्यांची याद ह्मणजे त्याच्या चातुर्याचें एक स्मारकच आहे. ही याद " तिज महंमदशाही " या नांवानें प्रसिद्ध आहे. असें नांव देण्याचें कारण त्यानें महंमदशहाच्या अनुज्ञेवरून हिंदु पंचांगांत सुधारणा करण्याचें काम हातीं घेतलें होतें. राजा जयसिंगची काशीची वेधशाला आजला आस्तित्वांत असून जिज्ञासूंस ती एक प्रेक्षणीय चीज आहे.

उपवेद.

वैद्यशास्त्र, युद्धकला, संगीतशास्त्र व शिल्पकला या चार शास्त्रांना उपवेद असें मानण्यांत येउन आर्यांनीं त्यांना आयुर्वेद, धनुर्वेद, गंधर्ववेद, व शिल्पकला अशीं नांवें दिलीं. धनुर्वेदाचा पहिला अध्यापक म्हणजे महापराक्रमी विश्वमित्र होय. संस्कृत वीररसप्रधान काव्यावरून एवढी गोष्ट निर्णीत होतें कीं, ख्रिस्ती शकाच्या पुष्कळच पूर्वी हिंदुस्थानांत युद्धकलेला शास्त्रीय स्वरूप आलें होतें; नंतरच्या अग्निपुराणांत तरी बऱ्याच अध्यायांत याच विषयाची पद्धतशीर चिकित्सा केली आहे. हिंदुराष्ट्र सांप्रत जरी हीन दीन झालेले असले तरी प्राचीन-कालीं या राष्ट्रांत श्रेष्ठ-कलाकौशल्य व युद्धविद्या, सुखकारक राज्यपद्धति, शहाणपणाचे कायदे व उच्च प्रकारचें ज्ञान हीं सर्व नांदत होतीं. असें एकानें (कलकत्ता रिव्ह्यू डिसेंबर १८६१) म्हटलें आहे तें मनन करण्याजोगें आहे.

आर्यवैद्यक इ. स. पूर्वी ४०० वर्षें

ज्योतिषांत तसेंच आर्यवैद्यकांत अथवा आयुर्वेदांतहि त्या कालीं स्वतंत्र प्रगति झाली होती. विशेष जातीच्या रोगांची नांवें जीं पाणिनीनें आपल्या व्याकरणांत दिलीं आहेत, त्यावरून हें उघड होतें. प्राचीन संस्कृत कोशकार (इ. स. पू. ५६) आपल्या अमरकोशांतील शारिर प्रकरणांत या शास्त्राची संवृद्धि पूर्वीची आहे असें कल्पितो, आणि आठव्या शतकाच्या सुमारास तर आर्य वैद्यकाचे पुरस्कर्तें चरक व सुश्रुत यांच्या ग्रंथाची अरबी भाषेंत भाषांतरें झालीं होती. आयुर्वेदाचें मुख्य पीठ काशी हें होतें. आरबी अथवा युनानि वैद्यकांचा पाया बगदादच्या खलिपाच्या आज्ञेवरून करविलेल्य संस्कृत ग्रंथाच्या आरबी भाषांतरावर उभारलेला आहे. आर्यवैद्यकांत शास्त्रांचीं सर्व अंगें व उपांगें यांचा पुष्कळच खल केला आहे. त्यांत शरिराची रचना इंद्रियें स्नायु व अस्थिबंध यांचें वर्णन आहे. आज वैद्यकातलें मुख्य अंग होऊन राहिलेली शस्त्रक्रिया केवळ आजची नाहीं. शस्त्रक्रिया आर्य वैद्यांना माहीत होती. शरिराच्या निरनिराळ्या भागावरील अंग छेदन, मोडलेले हाड बसविणें, मुतखडा काढण्याची विद्या आणि पोट व गर्भाशय याजवरील शस्त्रक्रिया त्यांत करतां येत होती. इतकेंच नव्हे तर प्राचीन शस्त्रवैद्य चंचल वायूची चिकित्सा भिवईच्या वरची पांचवी मज्जातंतू कापण्याच्या अलिकडील पद्धतिनुरूप वार्णितात. या शस्त्रक्रियेला हल्लींहि तेंच नांव दिलें आहे. शस्त्रक्रियेच्या शस्त्रांची

संख्या १२५ होती. शस्त्रक्रियेची उपकरणें तयार करणें व फळ्यावर मेण पसरून त्यावर अगर मृत प्राण्याच्या शरीरावर शस्त्रक्रिया करून दाखवून विद्यार्थ्यांस शिक्षण देणें या कामीं ते पुष्कळ झटत असत. सूतिका शास्त्रांतहि ते पारंगत होते. बौद्ध कालांतहि बुद्धधर्मीय राजांनीं निरनिराळ्या ठिकाणीं जीं सार्वजनिक अगदालयें सुरू केलीं, तीमुळें आयुर्वेदाची पुष्कळ वाढ झाली परंतु बौद्ध धर्माचा लय होऊन ब्राह्मणधर्म स्थापित झाल्यानंतर ब्राह्मणांनीं शस्त्रक्रिया वार्जिली [हातची सोडली] व मुसलमानाकडे राजकीय प्रभुत्व आल्यामुळें युनानि वैद्यकास राजाश्रय मिळाला. या अगर अशाच कारणामुळें आयुर्वेदाची प्रगति खुंटली. हल्लींच्या वैद्यकीय शाळांत फक्त इंग्रजी वैद्यकाचे शिक्षण दिलें जातें. आर्य वैद्यकाचे शिक्षण मिळण्याची सोय आजला एखाद दुसऱ्या खासगी संस्थेखेरीज देशांत फारशी नसल्यामुळें पाढिक आर्य वैद्य फार दुर्भिळ झाले. अशा व नवीन नवीन शोधांपासून आर्य वैद्यक मागें पडूं लागलें आहे.

मनुष्यवैद्यकाप्रमाणें अश्व, गज वगैरे पशुवैद्यकहि पूर्ण दशेस आले होते, हें सुश्रुत चरक वगैरे नरवैद्यकावरील ग्रंथाप्रमाणें पशुवैद्यकावरहि ग्रंथ झाले होते यावरून दिसतें. परंतु आजला ते सर्व उपलब्ध नाहींत. शरीररचना गुणावगुण व चिकित्सा यांची दिलेली माहिती शालिहोत्र ग्रंथांतील आहे असें ह्मटलें आहे. शालिहोत्र नांवाचा मुनि होऊन गेला. अश्ववैद्यकावरलि पाहिला शास्त्रोक्त ग्रंथ त्यानें लिहिला, परंतु त्यावरून पांडवांपैकीं नकुलानें लिहिलेला संक्षिप्त ग्रंथ प्रचारांत आहे. अश्वविद्या जाणणारास साळुत्री म्हणतात. तें शालिहोत्राचें अपभ्रष्ट रूप होय. अश्ववैद्यकावरील संस्कृत ग्रंथांची भाषांतरें शहाजहानच्या कारकीर्दीत फारशी भाषेंत झालीं आहेत.

शिल्पशास्त्रासहि उपवेद ही संज्ञा आहे. शिल्पशास्त्रांचा पूर्ण विकास होण्याचें पुष्कळसे श्रेय बुद्धधर्मीयांकडे आहे. वैदिक संस्कारांना शिल्पशास्त्र विटाच्या स्थंडिलावर भागत असे. हिंदुस्थानांत दगडाच्या इमारती वगैरे प्रचंड कामें करणारे पहिले लोक ह्मणजे बौद्ध होत. त्यांचे विहार व देवळें म्हणजे हिंदुस्थानच्या शिल्पकलेचा दोन हजार वर्षांचा दृश्य इतिहासच आहे. मुसलमान जेत्यांनीं आपल्या काळांत हिंदु शिल्पकलेस ... तःचे वळण दिलें. तथापि बादशाही इमारतींत देखील हिंदु शिल्पकलेने

आपलें स्वत्व स्थापित केलें होतें, हें मोंगल साम्राज्यांतल्या भव्य इमारती पाहणाऱ्या प्रेक्षकांस दिसून येईलच. ग्वालेरचा राजप्रासाद, आग्रा, दिल्ली येथील भव्य मशिदी व दक्षिण हिंदुस्थानांतलीं जुनीं देवालयें हीं कलाकौशल्य अथवा नक्षीकाम याजबद्दलच्या अप्रतिम मूर्त प्रतिमा होत. कार्ला व अजिंठा येथील लेण्यांतील उत्कृष्ठ पट व काश्मीरच्या विणकामांतील रंग आणि आकृति यांचें चमत्कृतिजन्य मिश्रण या गोष्टींनीं इंग्लंडच्या अभिरुचींतील सुधारणेस पुष्कळच मदत झाली आहे. चित्रकलेंत लहानशा तसबीरीखेरीज त्या कालीं विशेषशी सुधारणा झाली नव्हती. तथापि कांहीं पोथी पुस्तकांवरील चित्रें सफाईदार निघत असत. उदाहरणार्थः—इंग्लंडांत विंडसर येथील बादशाही वाचनालयांत शहाजहाननामा म्हणून ग्रंथाची जी हस्तलिखित प्रत आहे ती होय. ही अयोध्या प्रांतांत सरकारला बाराशें पौंडास विकत मिळाली असून हल्लीं तीं खुद्द बादशहाचे ताब्यांत आहे.

शास्त्रशोधांत व शास्त्ररचनेंतहि प्राचीन आर्यांचा अचाट उद्योग व सूक्ष्म आणि तीव्र दृष्टि पदोपदीं दिसून येतें. विद्वान व वेदवेत्त्या ब्राह्मणांनीं जेव्हां धर्म, अध्यात्म विद्या व तत्त्वज्ञान यांवर विशिष्ट अधिकार म्हणून आपला हक्क स्थापित केला व मुख्य मुख्य शास्त्रें व कला हीं उपवेद मानण्यांत आलीं, तेव्हां धर्मशास्त्रानुसार त्यांनीं सर्व आर्यजातीवर सामाजिक प्रभुत्वहि संपादन केलें. प्राचीन धर्मशास्त्रावरील ग्रंथ गृह्यसूत्राच्या कालचे आहेत. तथापि मनुस्मृति व याज्ञवल्क्य स्मृति हे दोन ग्रंथ त्यानंतरचे आहेत. अशा या धर्मशास्त्रांची संख्या एकंदर ५६ आहे. त्यांत पूर्वोक्त मनु व याज्ञवल्क्य स्मृति प्रमुख असून अर्वाचीन हिंदु धर्मशास्त्राची उभारणी या दोन स्मृति ग्रंथावरच आहे. स्मृति ग्रंथांत तत्कालीन कायदे व न्यायपद्धती याचा सविस्तर खल करण्यांत आला असून हिंदुधर्माचे मूळ आधार- भूत ग्रंथ म्हणून धर्मविषयक बाबतींत आजलाही ब्रिटिश कोर्टांतून त्यांचा आधार घेतला जातो.

धर्मशास्त्रें
इ.स. पूर्वी ५००

पुराणग्रंथानंतरचे संस्कृत काव्यग्रंथ म्हणजे रघुवंश व कुमार संभव हीं होत. रघुवंशांत अयोध्येचा सूर्यवंशी राजा रघु व त्याचा वंश व विशेषतः त्याच वंशातील श्रीरामचंद्राचें जीवन चरित्र आहे. हे दोन्ही ग्रंथ कविकुलगुरु कालिदासाचे आहेत.

संस्कृत नाटकें कालिदास.

कालिदासाला कीर्तिरूपानें अमर होण्याचें कारण केवळ हे दोनच ग्रंथ नव्हेत तर तो संस्कृत नाट्यकलेचा पिता हे आहे. उज्जनीचा[1] राजा विक्रमादित्याच्या दरबारांत जीं नवरत्नें होतीं त्यापैकीं कालिदास हा एक होता. या विक्रमादित्यानें आपल्या नांवाचा शक चालू केला.(इ. स. पूर्वी ५७) त्यास विक्रम सवंत असें म्हणतात, व तो नर्मदेच्या उत्तरेस चालतो. कालिदासाचें अत्यंत प्रसिद्ध असें नाटक म्हणजे शकुन्तला. या नाटकाचें संविधानक थोडक्यांत असें आहे कीं, शकुन्तला ही कण्वऋषीची कन्या. कण्व एकदां आश्रमाबाहेर गेले असतां मृगया करीत आलेल्या सोमवंशी राजा दुष्यंताची व तिची भेट झाली. तेव्हां जवळ दुसरें कोणी नाहीं असें पाहुन परस्पर अनुरक्त होऊन त्यांनीं क्रीडा केली व पुढें तिला योग्य कालीं पुत्र झाला. त्याचें नांव भरत. हाच चंद्रवंशाचा प्रख्यात मूळ पुरुष होय. परत जातांना खुण म्हणून राजानें आपली मुद्रिका तिला दिली, परंतु ब्रह्मशापामुळें ती गमावली. पुत्र झाल्यानंतर ती पतिगृहाकडे गेली. परंतु दुष्यन्तानें तिला ओळखलें नाहीं. अशा स्थितींत तिला फार दुःख झाल्यावर मुद्रिका उघडकीस आल्यामुळें राजानें तिचा स्वीकार केला; व तिच्या पुत्रास– भरतास सार्वभौम पद मिळालें. शकुन्तलेचें इंग्रजींत भाषांतर हिंदुस्थानांत संस्कृतचें अध्ययन केलेले पहिले इंग्रज पंडित सर वुइल्यम जोन्स यांनी सन १७८९ मध्यें केलें आहे. या भाषांतरामुळें मूळ ग्रंथांची व त्याच्या कवीची महति युरोपखंडांत सर्वत्र गायली जात आहे.

आर्यांचा पराक्रम बुद्धिमत्ता व दीर्घोद्योग यामुळें त्यांची भराभराट होऊन जशी सत्ता सर्वत्र स्थापित झाली तद्वतच त्यांचा वैदिकधर्महि उदयास येऊन त्याचे महत्व विशेष वाढलें, पण इ. स. ६०० मध्यें त्याला उतरती कळा लागण्यास सुरुवात झाली. ह्याच सुमारास गौतमाचा जन्म झाला. गौतम शक्य

बौद्धकाल. इ. स. पूर्वी ५५०

नांवाच्या एक क्षत्रिय जातीचा होता. त्याच्या बापाचें नांव शुद्धोदन असून तो कपिलवस्तु[2] येथील राजा होता. आपला मुलगाहि क्षत्रियास उचित असा शूर व साहसी निघावा असें शुद्धोदनास साहजिकच वाटे. परंतु मर्दानी खेळ खेळण्याचें सोडून गौतम एकांतांत विचार करीत असे. असे लहाणपणापासूनच कांहीं

१ हरिद्वाराहुन ३० मैलांवर.

२ काशीच्या उत्तरेस १०० मैलांवर

गौतमबुद्ध.

कारणामुळें त्याचें मन संसारसुखास व राज्योपभोगास विटलें होते. त्याचें एका सुंदर राजकन्येशीं लग्न होऊन एक पुत्रहि झाला होता. नूतन आपत्य स्नेह अगर स्त्री व राज्यलोभ हीं सर्व मायापाशांत अधिकच बद्ध करणार या विचारानें त्यानें सर्वसंग परित्याग करून अरण्याचा रस्ता धरला. कांहीं काल पाटणा जिल्ह्यांत राजगडाजवळ दोन ब्राम्हण योग्यापाशीं त्यानें योगाभ्यास केला. देहाला क्लेश दिल्याशिवाय आत्म्याला शांति मिळावयाची नाहीं असा त्यांनीं उपदेश केल्यामुळें गौतमानें गयेजवळ सहा वर्षें घोर तपश्चर्या केली. तथापि त्याचे मनास शांति मिळेना, तेव्हां अरण्यांत बसून देह कष्टविल्यानें मोक्ष मिळणार नाहीं तर तो लोकांस उपदेश करूनच मिळविला पाहिजे असें त्यास वाटलें व तो लोकांस उपदेश करूं लागला तेव्हां त्यास बुद्ध म्हणजे 'ज्ञानी' व त्यानें स्थापिलेल्या नवीन मतास बौद्ध हें नवीन नांव मिळालें.

त्याच्या मतें मनुष्याची मुख्य कर्तव्यकर्में म्हणजे मनोनिग्रह, अहिंसा अगर भूतदया आणि शुद्धाचरण हीं तीन होत. इच्छा नाहींशीं करून पुनर्जन्म बंद करणें व निर्वाण ह्मणजे मोक्षपद मिळविणें हें या धर्माचें मुख्य पर्यवसान आहे. त्यानें सर्व प्राणिमात्रांत मोक्षाचा मार्ग सारखाच सुगम करून दिला त्यांतच बुद्धाच्या यशाचें सर्व रहस्य आहे. मोक्षमार्ग सर्वांस सारखा मोकळा असून तो देवाची आराधना करून नव्हे तर स्वतः सत्कर्मानें प्राप्त करून घेतला पाहिजे, पाप दुःख अगर मुक्ति व मनुष्याच्या या जन्मांतील, मागल्या अगर भावी जन्मांतील स्थिती हीं सर्व त्यांच्या कर्मांचीं फळें आहेत. सुख अगर दुःख हें आपल्या गतजन्मांतल्या आचरणाचे अगर कर्मांचे फळ आहे असें त्यानें उपदेशिलें. विषयवासना व मनाचे मोह यांस जिंकून निर्वाण पदाची प्राप्ती करून घेणें हें त्यांच्या उपदेशामृताचे सार आहे. गौतमबुद्ध इ. स. पूर्वी ४८४ त मरण पावला, यावेळीं त्याचें वय ८० वर्षांचें होतें.

धर्मक्रांति अशोक इ. स. पूर्वी २७२–३१

बुद्धानंतर उत्तरेकडील बहुतेक राजांनीं त्याच्या नूतन धर्मास उत्तेजन दिलें. पंडिताकडून त्या धर्माची पुस्तकें लिहवलीं व सरकारी खर्चानें धर्मोपदेशक रवाना केले. मगध देशच्या अशोक राजानें इ. स. पूर्वी २५७ चे सुमारास बौद्ध धर्म स्वीकारिला. अशोक हा सुप्रसिद्ध चाणक्याच्या साहाय्यानें नंदांचा उच्छेद करून सार्वभौम सत्ता स्थापन करणारा चंद्रगुप्त याचा नातू असून तो महा वैभवशाली चक्रवर्ती राजा होऊन

गेला. त्यानें बौद्धधर्म हा राजाश्रित धर्म केला व आपल्या मगधदेशांत बौद्धांचे पुष्कळ विहार (मठ) बांधले. त्यावरून या प्रांतास बहार हें नांव पडलें असें म्हणतात. अशोकानें धर्मसंबंधीं राजाज्ञा खडक व खांब यांच्यावर खोदवून त्या सर्व राज्यांत प्रसिद्ध केल्या. अशा तऱ्हेचे स्मारकस्तंभ अगर स्तूप त्यानें एकंदर ८४ हजार उभारले होते अशी दंतकथा आहे. आजला देशाच्या निरनिराळ्या भागांतील लेणी व शिलालेख, बौद्धधर्म प्रसारकांच्या कार्यक्षेत्राची मर्यादा किती विस्तृत होती याची साक्ष देतात. हिंदुस्थान सरकारच्या आर्किऑलॉजिकल खात्याचे डॉ. ज. कनिंगहॅम यांनीं अशा खडकावरील व लेण्यांतील शिलालेखांची गणना एकंदर ४० केली आहे. त्याचा तपशील येणें प्रमाणें:—

खडकावरील लेख १ शहाबाझगढी पेशावरपासून ४० मैलांवर, २ खालतीं यमुनातीरीं, ३ गिरनार काठेवाडांत ४ ते ७ धैाली कटक जिल्ह्यांत, ८ सासेरम काशीच्या आग्नेयेस ७० मैल, ९ रुपनाथ यात्रेचें प्रसिद्ध ठिकाण जबलपुरापासून ३५ मैल, १० व ११ वैराट जयपुराहून ४१ मैल, १२ खांडगिर (कटक) १३ देवटक नागपूरहून ५० मैल. लेणीं:—१ ते ३ बाराबर व ४ ते ६ नागार्जुनी डोंगर गयेहून १५ मैल, ७ ते १५ खांडगिरी (कटक) १६ व १७ सर्गुजा जिल्ह्यांत रामगडास लेख असलेले अशोकच्या वेळचे खांब,:—दिल्ली शिवालिक, २ दिल्ली मीरत (दिल्लीस) ३ अलाहाबाद, ४ लारियान बंदगड बेटियापासून १५ मैल, ५ लारिया अरराज; पाटणाचे उत्तरेस ७० मैल. ६ व ७ दिल्लीच्या खांबावर जोडलेले. व ९ अलाहाबादेच खांबावर जोडलले १० साची येथें.

कनिष्क
इ. स. ४०

अशोकानंतर बौद्ध धर्माचा प्रसार करणारे राजे म्हणजे कनिष्क व दानशूर शिलादित्य हे होत. या राजांनीं अफगाणिस्तान, तिबेट, चीन, जपान ब्रह्मदेश, सिंहलद्वीप वगैरे देशांत उपदेशक पाठवून बुद्धधर्माचा प्रसार केला. राजाश्रित धर्म झाल्यामुळें त्या धर्माचा या देशातहि कळस झाला. सुमारें दोन चार शतकांत त्यानें उत्तर व पूर्व आशिया व्यापिली. आजला मूळ जन्मभूमींत फारसा मागमूस राहिला नसला तरी आशिया खंडातल्या निरनिराळ्या देशांत जो हा धर्म प्रचलित आहे व त्याच्या अनुयायांची संख्या इतर कोणत्याही धर्मापेक्षां अनेकपटींनं अधिक आहे, याचें सर्व श्रेय त्या काळच्या निरपेक्ष बुद्ध भिक्षुंस दिलें पाहिजे. कनिष्काचे राज्य हिमालयाच्या दोन्ही बाजूस पसरलें होतें. तथापि त्याचे मध्यकेंद्र काश्मीर होते

याचेच कारकीर्दीत म्हणजे बुद्धाच्या मरणानंतर ४०० वर्षांनीं बुद्ध भिक्षुंची चौथी मोठी सभा भरली होती.

बौद्धधर्म आणि ब्राह्मणधर्म सन ४०० ते ६४५

बौद्धधर्मास राजाश्रय मिळून तो सर्व आशिया खंडांत पसरला, तथापि खुद्द हिंदुस्थानांतल्या ब्राह्मण धर्माचा त्यास समूळ नाश करतां आला नाहीं, एवढेंच नाहीं पण ग्रीस इसिहासकार मेग्यास्थिनीस यानें लिहून ठेविलेल्या हकीकतीवरून दोन्हीं धर्मांचें समकालीन अस्तित्व होतें असेंच नव्हें, तर अशोकनंतरच्या काळांत ब्राह्मणधर्माचेंच वर्चस्व होतें, असें दिसून येतें. शिलालेख, स्थानिक दंतकथा, संस्कृत वाङ्मय व नाटकग्रंथ यावरून ब्राह्मणांचें वर्चस्व चांगलेंच टिकून होतें, ही गोष्ट उघड दिसतें. सन ४०० पासून तर याजबद्दल चिनी प्रवाशांचा विश्वसनीय पुरावा उपलब्ध आहे. बुद्ध भिक्षु व ब्राह्मण या उभयतांसहि सारखा मान दिला जात असे, असें आपणांस आढळून आल्याचें फाहियान हा चिनी यात्रेकरू लिहितो. हुयेनसंगानें त्या वेळच्या लोकस्थितीचें जें वर्णन लिहून ठेविलें आहे त्यांत तो असें म्हणतो कीं, जनतेची अनुमती मिळण्याचे कामीं दोन्ही पंथांत स्पर्धा चालू असून ब्राह्मणधर्माचा पुन्हा वरपगडा होऊं पहात आहे.

शिलादित्य सन ६३४

धार्मिक तशीच राजकीय सत्ता देखील सारखीच विभागली गेली होती. तथापि कान्यकुब्ज अथवा कनोज येथें हुयेनसंगास बुद्धधर्मीय सम्राट शिलादित्याचें साम्राज्य असलेलें आढळून आलें. हिमालय ते दक्षिणेस नर्मदेपर्यंत त्याची सत्ता होती. धर्मप्रसार व दानधर्म या दोन बुद्ध तत्त्वांचा पूर्ण परिपोष त्यानें केला म्हणून त्यास सातव्या शतकांतला अशोक असें म्हणतात. पहिली गोष्ट त्यानें सर्वसाधारण धर्मपरिषद भरविली. या परिषदेस २१ मांडलिक राजे व त्यांजबरोबर त्यांचे पदरचे विद्वान् बौद्ध व ब्राह्मण पंडित हजर होते. प्रथम बौद्ध व ब्राह्मण यांजमध्यें विशेषतः सांख्य व वैशेषिका या दोन दर्शनांचा वाद व नंतर बुद्धांमधल्या दोन पंथांतील मतभेद यांचा विचार झाला. परिषदेच्या पहिल्या दिवशीं मोठ्या समारंभानें बुद्धाचा पुतळा अभिषिक्त करण्यांत आला. दुसऱ्या दिवशीं सूर्याची मूर्ति व तिसऱ्या दिवशीं महादेवाची लिंगस्थापना करण्यांत आली. शिलादित्याची दानशूरत्वाविषयीं फार ख्याति आहे. असें सांगतात कीं, तो दर

पांच वर्षांनीं सर्व सरकारी खजिना दानधर्मांत खर्चून टाकीत असे. प्रयागास त्रिवेणी संगमावर सारखे दोन अडीच महिने मुक्तद्वार अन्नसंतर्पण शिलादित्य करीत असे. याचे हुयेनसंग फार रसभरित वर्णन देतो. बौद्ध व ब्राह्मण हा भेद न मानतां समान भावेनें तें दानधर्म करी.उत्सव समाप्तीस राजमंदिरांतील चीजवस्त गरिबास देऊन टाकी.अशा रीतीनें भूतदया हें जें बुद्धाचें आदितत्त्व तें अंतःकरणांत पूर्णपणें भिनलेला व निरपेक्ष असा शिलादित्यासारखा राजपुरुष दुसरा झाला नाहीं.

ब्राह्मण वैदिक धर्माची पुन्हां स्थापना.

बौद्धधर्माचा पाडाव करण्याकरितां त्यांतल्या कांहीं कांहीं गोष्टी ब्राह्मणांनीं आपल्यांत घेतल्या. उदाहरणार्थ बौद्ध भिक्षूप्रमाणें ब्राह्मण संन्यासी विद्यादानाचे कार्मी श्रम घेऊं लागले. त्यामुळें हळूं हळूं बौद्धधर्माचा लोप होऊन, वैदिकधर्माची पुन्हा स्थापना झाली. ह्या पुनरुज्जीवनाचे कामीं पहिला धर्मोपदेशक म्हणजे बहार प्रांतांत राहणारा कुमारिल भट्ट हा होय.

शंकराचार्य इ. स. ७१० ते ४२

हा सातव्या शतकाचे अखेरीस होऊन गेला. षड्दर्शनाचे शेवटचे दोन भाग म्हणजे पूर्व व उत्तर मीमांसा. पूर्व मीमांसेंत यज्ञ कर्माचा समावेश असून उत्तर मीमांसेमध्यें उपनिषदांत सांगितलेला वेदांत धर्म प्रतिपादिलेला आहे. बौद्धधर्माच्या भरभराटींत या दोन्ही मीमांसांचा लोप झाला होता. कुमारिल भट्टानें पूर्व मीमांसेवर विस्तृत टीका लिहून यज्ञ यागादि कृत्यांचें समर्थन केलें. त्याचप्रमाणें पुढें आठव्या शतकांत शंकराचार्यांनीं उत्तर मीमांसेचें समर्थन करून हिंदुस्थानांत वैदिक धर्माची पुन्हां स्थापना केली. वेदांताची उपपत्ति शिकवित शिकवीत सर्व देशभर फिरुन ठिकठिकाणीं मठ स्थापन केले ते अद्यापि चालू आहेत. शंकराचार्य वयाच्या बत्तिसाव्या वर्षी हिमालयांत केदारनाथ येथें समाधिस्थ झाले.

बौद्धधर्म व जैनधर्म

श्रीमत् शंकराचार्यांनीं बौद्धमताचें खंडन केल्यानंतर त्या धर्माचें या देशांतील अस्तित्वच नाहींसें झालें. हल्लीं देशांत बौद्धांनीं बांधलेली प्रसिद्ध जुनीं देवालयें व जैनमत ह्याशिवाय त्या धर्माचें स्मारक येथें कोणतेंच राहिलें नाहीं. बाहेरील देशांत मात्र तो धर्म अद्यापि चालू आहे. बौद्ध धर्म या देशांतून वस्तुतः नाहींसा झाला, तथापि त्याचें अस्तित्व एका निराळ्या प्रकारें आहे. गौतमबुद्ध

व जैन धर्माचा स्थापनकर्ता महावीर हे दोघेहि राजकुलोत्पन्न असून समकालीन होते. पाटणाच्या उत्तरेस २७ मैलावर बेसर म्हणून एक खेडें आहे. त्याठिकाणीं पूर्वी वैसाली नामक शहर होतें. तेथील राजा महावीर संसाराचा त्याग करून तो मठवाशांत जाऊन राहिला व स्वतःचे वागणुकीचें कडक नियम बांधून त्यांचा त्यानें लोकांत उपदेश केला त्यास पुढें जिन ' ज्ञानी ' हें नांव मिळालें.

जैन व जैनमत.

हे लोक आपल्यास जेवढा भाग अनुकूल तेवढा खेरीजकरून बाकीचे वेद कबूल करीत नाहींत. अहिंसा परमोधर्मः हें त्यांचें मुख्य धर्मतत्त्व आहे. काळाचे ते तीन भाग मानतात. त्यापैकीं पहिल्यांत मागें होऊन गेलेले चोवीस, दुसऱ्यांत आतां असणारे चोवीस व तिसऱ्यांत पुढें होणारे २४ मिळून ७२ तीर्थंकर यांची ते भक्ती करतात. ह्या सर्व सिद्धांचे भव्य पुतळे त्यांच्या देवळांत उभे केलेले असतात. जैन लोक दानशूरपणाबद्दल प्रसिद्ध आहेत.

इतर देशांच्या संबंधानें हिंदुस्थानच्या इतिहासास प्रारंभ

शिकंदर

हा प्रारंभ प्रथम ग्रीक लोकांच्या स्वारीनें होतो, ग्रीस देशचा बादशहा अलेकझांडर धि ग्रेट (शिकंदर=जग जिंकणारा) यानें हिंदुस्थानावर इ. स. पूर्वी ३२७ त स्वारी केली. अटकेस सिंधुनद उतरून हिंदुस्थानांत येतांच त्याची व पौरस राजाची मोठी चकमक झडली. तींत शिकंदरास जय मिळाला. याचें कारण पौरस व इतर राजकुलें यांच्यांत सख्य नव्हतें. त्याच्या मनांत सर्व हिंदुस्थान पादाक्रांत करून त्या वेळचे ज्ञात जग जिंकावयाचें होतें, पण त्याच्या सैन्यानें पुढें येण्याचें नाकारल्यावरून त्यास परत जाणें भाग पडलें, पंजाब व सिंधमधील दोन वर्षांच्या मोहिमेंत त्यानें कोणताहि प्रांत हस्तगत केला नाहीं. तर तेथील निरनिराळ्या राज घराण्यांशीं संगनमताचें अथवा सख्य संबंधाचे तह केले, शहरें वसविलीं, ठिकठिकाणीं ग्रीक पलटणी ठेविल्या. सैन्याच्या नाराजीमुळें परत जात असतां तो बाबीलोन येथें (इ. स. पूर्वी ३२३ त) मरण पावला. त्याच्या मागें त्याचें राज्य सेलुकस निकेटर नामक त्याच्या सेनापतीस मिळालें.

याचवेळीं नवीन शक्ति अगर सत्ता उदयास आली. स्वसत्ता स्थापन करणें अगर प्रतिस्पर्ध्यांचें पारिपत्य करण्याचे हेतूनें हिंदुस्थानांतले जे कांहीं साहसी पुरुष

चंद्रगुप्त इ. स. पूर्वी ३२६

शिकंदरच्या छावणींत सामील झाले होते. त्यांत चंद्रगुप्त मौर्य हा एक होता, त्यानें पंजाब व सिंध प्रांतांत ग्रीक सत्तेचा शेवट करून आपलें राज्य स्थापलें. हा मूळचा मगध देशाचा रहाणारा असून तेथल्या नंद घराण्यापैकींच एक होता. ग्रीकांची सत्ता संपुष्टांत आणल्यावर त्यानें इ. स. पूर्वी ३२१ त मगध देशावर स्वारी करून नंदांचा नाश केला. व राजधानीचें शहर पाटलीपुत्र (पाटणा) हें घेऊन तेथें आपल्या मौर्य घराण्याची सार्वभौम सत्ता स्थापन केली. व तो हिंदुस्थानचा पहिला सार्वभौम राजा झाला.मेगॅस्थिनीस नामक ग्रीक इतिहासकार चंद्रगुप्ताच्या दरबारीं होता. त्यानें दिलेल्या हकीकतीवरून राज्यव्यवस्था उत्तम होती, असें दिसून येतें. त्यावेळचा त्यानें लिहून ठेवलेला इतिहास व सामान्य निरिक्षणानें केलेलीं टिपणें यांवरूनच पाश्चात्य जगास प्रथम हिंदुस्थानची खरीखुरी माहिती झाली. सिथियन किंवा शक नांवाच्या लोकांनीं इ. स. पूर्वी १०० च्या सुमारास आपल्या शौर्याच्या जोरावर बॅल्ट्रीयाचें राज्य बुडवून मध्य आशियांत एक नवीन राज्य व उत्तर हिंदुस्थानच्या कांहीं भागांवर आपला अम्मल स्थापित केला होता.

विक्रमादित्य इ. स. पूर्वी ५७.

उत्तरेकडे सिथियनांनीं आपला अम्मल बसविल्याचें ऐकून माळव्यांत उज्जनीस राज्य करणारा राजा विक्रमादित्य यास अतिशय त्वेष येऊन त्यानें त्याचें पारिपत्य करण्याचें योजिलें. व मोठ्या पराक्रमानें त्यांच्याशीं लढून जय मिळविला व या जयाचें स्मरण रहावें म्हणून इ. स. पूर्वी ५७ व्या वर्षी त्यानें आपला विक्रम संवत् चालू केला, तो उत्तर हिंदुस्थानांत अद्यापि चालत आहे. विक्रम राजा जसा शूर तसा विद्वानहि होता. यामुळें विद्या व विद्वान यांचा तो पोशिंदा होता. त्याचे कारकिर्दीत अनेक काव्यग्रंथ व नाटकें निर्माण झालीं. त्यानें आपल्या पदरीं महान महान कवी व विद्वान लोक बाळगिले होते. ते त्याच्या सभेंतलीं नवरत्नें या नांवानें प्रसिद्ध आहेत. बृहत्संहिताकार वराहमिहिर, प्रख्यात ज्योतिषी ब्रह्मगुप्त, किरातार्जुनीय ग्रंथाचा कर्ता भारवी, वासवदत्ता नाटिकेचा कर्ता सुबंधु, कविकुल गुरू कालिदास वगैरे विद्वान पुरुष विक्रमादित्याचे पदरीं होते.

बौद्ध धर्माचा प्रसार व भरभराटीचा कळस झाल्यावेळीं देखील ब्राम्हणांचें

हिंदुधर्माचा उदय.

वर्चस्व होतेंच व त्याच्या ऱ्हासकालीं तर त्यांनीं आपलें पाऊल पुढें टाकलें. सातव्या शतकांतला चिनी प्रवासी हुएत्संग यास बौद्धधर्म व ब्राम्हणधर्म हे दोन्हीं बरोबरीनें चालत असल्याचें आढळून आलें. या दोन्हीं पंथांतील झगड्या-मुळें आठ ते सोळा शतकापर्यंत अनेक ब्राह्मण प्रेषित अथवा धर्मोपदेशक निर्माण झाले. त्यांत आरंभींचा म्हणजे कुमारिल भट्ट हा बंगाल्यांत सातव्या शत-काच्या अखेरीस होऊन गेला.

हिंदुधर्माचा दुहेरी पाया, जात आणि धर्म.

१ जात

समाज व्यवस्था व धार्मिक ऐक्य हीं दोन्हीं हिंदुधर्मांत आहेत. हिंदूची सामाजिक व्यवस्था जातीवर आहे व या जाति-भेदाची पाळेंमुळें समाजांत फार खोलवर गेलीं आहेत. या जातिविशेषाचें सामान्य स्वरूप म्हणजे चातुर्वर्ण्य व्यवस्था.ही वस्तुतः प्राचीन आर्य शाखेंतहि होती. हेंच वर्गीकरण आजला देखील मूळभूत असें आहे, ही गोष्ट दशवार्षिक शिरगणतीवरून सिद्ध होतें. परंतु जातिभेदाची मूळ उत्पत्ती गोत्रभेद अगर गुणभेद यावर असली, तरी तिचा वरचा मजला लोकांच्या उद्योगधंद्यावर उभारलेल्या एका निराळ्याच तत्त्वावर सुव्यवस्थित केला गेला आहे. गोत्र व उद्योगधंदा या वर्गीकरणाच्या दोन तत्त्वांस भूगोलविषयक परिस्थितीचीहि आणखी जोड मिळाली आहे. याचेंच प्रत्यक्ष रूपांतर म्हणजे प्रचलित जातिभेद होय, व अशा तऱ्हेनें झालेल्या जातिभेदाची इतकी परमावधी हिंदुस्थानांतल्याप्रमाणें जगांतल्या दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं हें खरें, तथापि जातिभेद हें नामविशेष नसलें तरी, लहान मोठा अगर गरीब व श्रीमंत हा भेद अगर ही विविधता जगाच्या आरंभापासून सार्वत्रिक आहे, व ती तशी अस-णारच.

जातिमंडळ.

जातिनिर्बंधाच्या कडकपणामुळें समाजास एक प्रकारची बळकटी व स्थैर्य आलें आहे हें खरें. तथापि परस्पर ऐक्य व सहानु-भूति यांचा अभाव हा अनुषंगिक दोष मात्र या योगें हिंदुसमाजांत दृढमूल झालेला आहे. प्रत्येक जात म्हणजे कांहीं अंशीं जातिमंडळ आणि एक धर्मपंथ असल्यासारखें असतें. अशा मंडळाच्या निकालाची अम्मलबजावणी दंडामुळें जारीनें होते. आगाळिक कर-

णारानें दंडाची भरपाई करण्यास नाकारल्यास त्यास बहिष्कृत करण्यांत येतें. अशा या संघामुळें कांहीं भानगडी उपस्थित झाल्यास संप करून विरुद्ध बाजूला आपलें म्हणणें मान्य करण्यास भाग पाडतां येतें. उदाहरणार्थः—१८७२ मध्यें अहमदाबाद येथील कापडाच्या व्यापाऱ्यांनीं कपड्यास खळ देणाऱ्या लोकांकडून कमी दरानें काम घेण्याचें आपापसांत ठरविलें तेव्हां त्यांच्या जातिसंघानें तसें करण्याचें नाकारिलें व सहा आठवडेपर्यंत संप करून काम बंद पाडलें, त्यामुळें अखेरीस त्यांस तडजोड करावी लागली.

जातिबहिष्कार.

या जातिनिविष्ट सामाजिक व्यवस्थेला समाजांतल्या उद्योगहीन व अयोग्य मनुष्यापासून स्वसंरक्षणार्थ एखादें अस्त्र असावें हें उघड आहे. या दृष्टीनें पाहतां हिंदूचे समाज शासनाचें अप्रत्यक्ष प्रतिकाररूप मुख्य अस्त्र म्हणजे बहिष्कार हें आहे. या अस्त्राच्या प्रखर माऱ्यापुढें टिकाव धरणें फार कठिण जातें. बहिष्कारामुळें मनुष्य अपंक्त व शरीरसंबंधास वर्ज होतो. या कारणानें समाजाचा आज्ञा मोडणारा मनुष्य कितीहि करारी असला तरी त्याला हार खावी लागतें, अशा रतीनें सर्व साधारणपणें नसलें तरी त्या त्या जातीपुरतें ऐक्य साधतां येतें.

धर्म
ब्राम्हणधर्म
संस्थापक

तथापि हिंदुधर्म ह्मणजे केवल जातीवर अवलंबून असणारी समाज घटना आहे असें नाहीं, तर भक्ती अगर उपसना यावर उभारलेला एक धार्मिक संघ आहे, बौद्ध धर्माचे या देशांतले स्वतंत्र अस्तित्व नाहींसे होऊन ब्राम्हण धर्माची पुनः स्थापना झाल्यानंतर त्या दोन्ही पंथांतले उच्च रहस्य ह्मणजे ब्राम्हणांचे—ईश्वराचे अवतार—व बौद्धांचे—मनुष्याची धार्मिक समानता—या दोन्ही तत्त्वांची परिणति होऊन त्यास नवीन स्वरूप आलें. सन ७०० पासून आजतागायत हिंदुधर्माचे एकामागून एक अनेक धर्मप्रवर्तक होऊन गेले ही गोष्ट हिंदु समाजास अभिमानास्पद आहे. मध्य युगांतल्या संतांची चरित्रें व त्यांनीं केलेले चमत्कार सुमारें ३०० वर्षांपूर्वी नाभाजीनें रचलेल्या भक्तमाला या ग्रंथांत ग्रथित केलेलीं आहेत. भक्तमाला हा ग्रंथ समजण्यास बिकट असा आहे. तथापि मागाहून त्यावर झालेल्या टीका व भाषांतरें यामुळें तो सर्वमान्य झाला असून त्यांस हिंदुधर्माची एक सुवर्ण कथा असेंहि म्हणतात.

बौद्धांचा पाडाव करून वैदिक धर्माची ध्वजा लावणारा अगर ज्याला हल्लीं

हिंदुधर्म असें म्हणतात त्याचें पुनरपि जोरदार बीजारोपण करणाऱ्या धर्म प्रवर्तकांच्या मालिकेंत पहिला ह्मणजे कुमारिल भट्ट हा वहार प्रांतांतला एक वैदिक ब्राम्हण होता. त्यानें सर्व देशांत प्रवास करून त्या काळचे राजपुरुष व लोक यांस उपदेश करून आपलें मत स्थापिलें. आपलें हें काम पुढें असेंच चालूं ठेवण्याविषयीं पट्टशिष्य शंकराचार्य यांस सांगून कुमारिल भट्टांनीं समाधि घेतली. हा सातव्या शतकांत होऊन गेला.

कुमारिल भट्ट.

शंकराचार्यांचा जन्म मलबार प्रांतीं झाला. ते आपल्या अद्वैत (जीव आणि शिव हीं एकच आहेत) मताचा प्रसार करीत कन्याकुमारीपासून काशीपर्यंत सर्व देशभर फिरले. बौद्धमताचें पूर्ण खंडण करून विजय संपादिला. त्यांची मतें व वादांत जिंकून मिळविलेलें यश याचा सविस्तर वृत्तांत त्यांचा प्रिय शिष्य आनंदगिरी यानें आपल्या शांकरदिग्विजयांत ग्रथित केला आहे. शंकराचार्यांनीं उत्तर मीमांसेचें समर्थन व वेदांततत्त्वाचें स्पष्टीकरण करून सामान्य जनांस उपदेश केला आणि वैदिकधर्म म्हणजे हिंदुस्थानचा राष्ट्रीयधर्म केला. शंकराचार्यांच्या ब्राह्मण शास्त्रीय अनुयायांस स्मार्त ब्राह्मण अशी संज्ञा असून त्यांची संख्या दक्षिण हिंदुस्थानांत पुष्कळ आहे. परमेश्वर अनेक नसून सर्व विश्वाचा नियंता जो परमेश्वर अगर परब्रम्ह म्हणून जें आहे तें एकच आहे, शिव विष्णू इत्यादि उपास्य देवतांचीं नांवें अनेक असलीं तरी सर्वांभूतीं परमेश्वर एकच आहे या मताचा त्यांनीं पुरस्कार केला. वास्तविक शिव ही देवता नवीन नसून वैदिक कालीं आर्य लोक तिची आराधना रुद्र या नांवानें करीत.ती आचार्यांचे कालीं शिवाच्या नांवानें होऊं लागली व त्याच्या मतास शैव अगर स्मार्त हें नांव मिळालें, व त्याचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर झाला व आजला देखील सामान्यपणें देशाच्या बऱ्याच भागांत शिवाची आराधना अगर शैव मत अधिक प्रचलित आहे.

शंकराचार्य
सन ७१०-४२

अद्वैत मताचें सार म्हणजे ' ब्रम्हसत्यं जगन्मिथ्या' याचा अर्थ जगत् नांवाचा पदार्थच नाहीं व ब्रह्म कोणत्याहि प्रमाणाला गोचर नाहीं म्हणजे त्या दोन्ही पदार्थांना अस्तित्व नाहीं असें सांगितल्यामुळें हें नूतन मत अगदीं अवलंबनीय नाहीं असें तत्कालीन लोकांना वाटलें, या शैवमताचा अतिरेक होऊन ईश हा जीवाहून

भिन्न आहे,या ज्ञानाचा लोकामध्यें प्रायः लोप झाला, तेव्हां द्वैत अगर वैष्णव मत उदयास आलें. जगत्कर्ता ईश जड व चेतन जगताहून भिन्न असून तो सृष्टि, स्थिति, लय यांस कारण, सकल गुण परिपूर्ण व सर्वव्यापी आहे हें द्वैत मताचे मुख्य सिद्धांत आहेत. द्वैतमताचे प्रथम आचार्य श्रीमत् मध्वाचार्य शके ११२० त बद्रिकाश्रमीं समाधिस्त झाले.

मध्वाचार्य
सन ११९८-९८

यांनीं भाष्य वगैरे एकंदर सदतीस ग्रंथ लिहिलें असून त्यांचा प्रमुख मठ त्यांची जन्मभूमी मंगळूर जिल्ह्यापैकीं उडपी येथें आहे.

मध्वाचार्यांनंतर द्वैत अद्वैत मतांची सांगड घालून विशिष्टाद्वैत म्हणून वैष्णव मताचा एक नवीन सिद्धांत प्रस्थापित करून त्या नवीन पंथाची प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या वैष्णव धर्मप्रवर्तकांत दक्षिण हिंदुस्थानांत होऊन गेलेले रामानुजाचार्य हे पहिले होत. बाराव्या शतकाच्या मधल्या काळांत त्यांनीं स्मार्ती-विरुद्ध चळवळ चालविली. दक्षिणेंतल्या चोल वंशीय राजानीं स्मार्त मतास राजश्रित करून तें आपल्या राज्यांत सर्वत्र जारीनें चालू करण्याचा विडा उचलिला. व रामानुजाचा छळ केला. तेव्हां ते म्हैसूरच्या जैन राजपाशीं जाऊन राहिले. या राजाच्या लेकीची पिशाचबाधा हरण करून त्यास आपल्या मताचा अनुयायी बनविलें. रामानुजांनीं आपल्या हयातींत एकंदर ७०० मठ स्थापिलें होते असें ह्मणतात त्यापैकीं हल्लीं चार अस्तित्वांत आहेत.

रामानुज
सन ११५०

तेराव्या शतकाचे अखेरीस धार्मिक बाबतींत अशी एक सुधारणा अगर क्रांति घडून आली कीं, त्यायोगें वैष्णव मत म्हणजे हिंदुस्थानाचा राष्ट्रीय धर्म झाला. रामानंद हा रामानुजाच्या मागून धर्मगुरूच्या गादीवरील पांचवा पुरुष होय. त्याचें वास्तव्य काशीस असे. तथापि गांवोंगांव हिंडून सर्व उत्तर हिंदुस्थानांत त्यानें वैष्णवमताचा प्रसार केला. रामनंदाचे एकंदर बारा शिष्य बहुतेक हीन वर्णाचे,व पट्टशिष्य तर साळी होता. यावरून प्रत्येक वर्णास हा नवीन पंथ स्वीकारण्यास मुभा असल्याचें दिसून येतें. बारा शिष्यांपैकीं कबीर हा एक मुसलमान शिष्य बंगाल्यांत होऊन गेला.

रामानंद
१३००-१४००

गुरूनें ज्या प्रमाणें हिंदूच्या सर्व वर्णीयांस एका पंथाचे अनुयायी बनवून ऐक्य साधण्याचा प्रयत्न केला, त्याप्रमाणें कबीरानें देखील कोणी

कोणत्याहि जातींचा, धर्माचा अगर मताचा असो त्याचा देव एकच आहे,

कबीर

कबीराचें म्हणणें असें कीं, हिंदूचें क्षेत्र (काशी) पूर्वेस आहे आणि मुसलमानाचें क्षेत्र (मक्का) पश्चिमेस आहे; परंतु तुम्हीं आपले अंतःकरण शोधा, कारण हिंदु व मुसलमान या दोघांचाहि जो देव आहे तो प्रत्येकाच्या हृदयांत आहे. कबीराच्या मरण काळचा एक चमत्कार असा सांगतात कीं, त्यांच्या प्रेतावर हिंदु व मुसलमान या दोघांनीं दहनविधि आपापल्या पद्धतीप्रमाणें व्हावा म्हणून आपला हक्क सांगितला; कलह होऊं लागला, तेव्हां कबीर एकदम उठून बसला व प्रेतवस्त्राच्या खालीं काय आहे पहा, असें सांगून अदृश्य झाला. सर्वजण पाहतात तों प्रेत नसून नुसता सुंदर फुलांचा ढीग आहे असें दिसलें. तेव्हां सर्वांसच आश्चर्य वाटलें, त्यांतली निम्मी हिंदूनीं व निम्मीं मुसलमानांनीं घेऊन विधि आपापल्या पद्धतीप्रमाणें केला. कबिराचा मठ बंगाल्यांत पुरीस आहे.

चैतन्य
४८५-५२७

हा साधू बंगाल्यांत होऊन गेला. यानें वैष्णव मताचा प्रसार बंगाल व ओरिसा प्रांतांत केला. तो नडिया येथें राहणाऱ्या एका ब्राम्हणाचा मुलगा होता. लग्न झाल्यानंतर वयाच्या चोविसाव्या वर्षी त्यानें सर्वसंगपरित्याग केला, या खेरीज त्याच्या खासगी चरित्राची फारशी माहिती नाहीं. तथापि त्याच्या मताविषयीं पुष्कळसा पुरावा उपलब्ध आहे, मोक्षाचा मार्ग सर्वांस सारखाच मोकळा आहे व तो साध्य करण्यास धर्मविधीपेक्षां ईश्वरचिंतन अधिक श्रेयस्कर आहे, असें त्याचें मत आहे. धर्मगुरूच्या ठिकाणीं लीनता ठेवणें हें त्या ग्रंथाचें एक लक्षण असे. पूर्ण श्रद्धा व सतत भक्तीनें ईश्वर चिंतन करून आत्म्याला मोक्ष अगर मुक्ती द्यावी हें या पंथाचे ध्येय आहे. हा सत्पुरुष १५२७त हें नश्वर जग सोडून गेला.

चैतन्याच्या मागून वैष्णव मताचे व इतरहि मतमतांतरोंचे अनेक धर्मप्रवर्तक होऊन गेले व त्यांनीं प्रतिपादिलेलीं मतें व पंथभेद यामुळें हिंदुधर्मांत विविध वैचित्र्य आलें आहे. उपास्य देवतेच्या साकार प्रतिमा यद्यपि भिन्न असल्या तथापि विश्वाचा पालनकर्ता असून जो इंद्रियास अगोचर व कल्पनेस अगम्य असा परमेश्वर तो एकच आहे, ही हिंदुधर्माची स्पष्ट भावना आहे. व परमतसहिष्णुता तर हिंदुधर्माइतकी दुसऱ्या कोणत्याच धर्मांत नाहीं. लोकमान्य

टिळक यांनीं हिंदूधर्माची व्याख्या ' प्रामाण्य बुद्धिर्वेदेषु सधानानामनेकता । उपास्यानामनियमएतद्धर्मस्य लक्षणम् ॥ ' अशी केली आहे. ह्मणजे वेदाचे प्रामाण्य साधनांची अनेकता आणि उपास्यांचा अनियम हीं हिंदुधर्माचीं विशेष लक्षणें होत.

धर्ममेनं समालंब्य विधिभिः संस्कृतस्तु यः ।
श्रुतिस्मृति पुराणोक्तैः क्रमप्राप्तैरथापिवा ॥
स्वेस्वे कर्मण्यभिरतः श्रद्धाभक्ति समान्वितः ।
शास्त्रोक्ताचार शीलश्च सर्वे हिंदुः सनातनः ।

श्रुतिस्मृति प्रतिपादित अशा विधीनीं ज्यांचे संस्कार झाले आहेत, व चातुर्वर्ण्याप्रमाणें प्राप्त कर्तव्यकर्माचे व शास्त्रांनीं प्रतिपादिलेल्या आचारांचे जो श्रद्धेनें व भक्तीनें आचरण करीत आहे तो हिंदू होय, असें ह्मटलें आहे.

अर्वाचीन इतिहास १०००-१५२६

हिंदुस्थानांत बौद्धधर्माचा लय होऊन वैदिक धर्माचा पुन्हा प्रसार होत चालला असतां अरबस्थानांत महमद नांवाचा धर्मस्थापक पुरुष ५७० त जन्मला. त्यानें स्थापिलेल्या धर्मास महमदी अगर मुसलमानी धर्म म्हणतात. त्याचें धर्मपुस्तक कुराण. हें अरबी लिपींत लिहिलेलें आहे. हिंदुस्थानच्या संपन्नतेची कीर्ति पश्चिमेकडील देशांत सर्वत्र पसरली असल्यामुळें अरब लोकांचा इकडे डोळा होताच. त्यांचा पुढारी महमद कासीम यानें सन ७१२ त जलमार्गानें सिंधवर स्वारी करून कांहीं वेळ आपलें ठाणें बसविलें, तरी तेथल्या कडव्या रजपूत लोकांनीं तें तेव्हांच उठविलें. रजपुतांचे पराक्रमामुळें त्यांस इतकी दहशत बसून गेली कीं, ते स्वदेशीं पळाले, इतकेंच नव्हें, तर त्यांनीं पुढें तीन शतकेंपर्यंत हिंदुस्थानाकडे चुकून देखील पाहिलें नाहीं. याचें कारण त्यावेळच्या हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतले रजपूत राजे व त्यावरील कनोजच्या गुप्त घराण्याची सार्वभौम सत्ता, माळव्यांतलें विक्रमादित्याचें परमार घराणें व दक्षिणेंतल्या पांड्य, चोल व केरळ घराण्यांची कोणाहि परकी स्वारी करणारांस थोपवून अडथळा करण्याचे कामीं असलेली संघशक्ति हें होय.

महमदी धर्म व अरबांच्या स्वाऱ्या.

हिंदूंचा प्रतिकार

महमद कासीमानें केलेला प्रयत्न फसल्यानंतर ३०० वर्षांनीं ह्मणजे ९७७ तें ११७६ चे दरम्यान दोन प्रबल सरदारांच्या अटोकाट प्रयत्नास कोठें थोडेसें यश आलें व त्यांनीं पंजाबचा थोडासा भाग जिंकून घेतला. दक्षिणेंतील हिंदूंची सत्ता तर १५६५ मधील सुप्रसिद्ध तालिकोटची लढाई होईपर्यंत केव्हांहि पूर्णपणें नामशेष झाली नव्हती. आणि अवघ्या शंभर वर्षांच्या अवधींत म्हणजे १६५० त हिंदुस्थानांतल्या मोंगल साम्राज्याची वाताहत करण्याचें काम दैवी नेमानेमानें ज्याकडे आलें होतें, ती सत्ता [जिला इतिहासांत मराठ्यांची जूट हें नांव आहे] उदयास येऊं पाहात होती, ह्मणजे हिंदूंची धर्म जागृतीची मोठी चळवळ चालूं झाली होती.

मुसलमानांची मंद प्रगति व अल्पकालिक सत्ता.

मुसलमानांस हिंदुस्थान सहज पादाक्रांत करतां आलें, असें जें सामान्य मत आहे तें वस्तुतः ऐतिहासिक घटित गोष्टींच्या विरुद्ध आहे. हिंदुस्थानांतील मुसलमानांचें राज्य म्हणजे त्यांत उस्मानच्या स्वारी (६३६) पासून अहमदशाहा अब्दालीच्या घनघोर युद्धा (१७६१) पर्यंतच्या अकरा शतकांतल्या अनेक वेळां झालेल्या स्वाऱ्यांत एक तर्फी विजय यांचा समावेश होतो. सर्व हिंदुस्थानभर मुसलमानांचें एकछती राज्य केव्हांहि नव्हतें. बऱ्याच भागावर प्रबल हिंदू घराणीं राज्य करीत असत. मुसलमानी साम्राज्याच्या ऐन भरभराटीच्या काळांत हिंदू राजे खंडणी देत व बादशाहाच्या दरबारीं आपला वकील पाठवीत. दिल्लीचे हें अधिराज्य देखील (१५७८-१७०७) एक शतकाहून अधिक टिकलें नाहीं. या अल्पकालाचे शेवटीं राजपुतान्यांतल्या हिंदूंनीं—रजपुतांनीं—पुन्हा चांगलीच उचल खाल्ली. पंजाबांतल्या शीख धर्मपंथांत लष्करी बाणा खेळूं लागला व दक्षिणेंत ब्राह्मणांचा मुत्सद्दीपणा व इतर वर्णांचें सैनिकत्व या अन्योन्य आश्रयानें बनलेल्या मराठ्यांच्या जुटीने तर मुसलमानी राज्यास खंडणी द्यावयास भाग पाडलें, यदृच्छेनें महत्वास चढलेली इंग्रजी सत्ता जर देशांत या वेळीं नसती तर मुसलमानी अर्धचंद्राचे जागीं हिंदूंचें भगवें निशाण फडकलें असतें, असें अधिकारी तज्ज्ञाचें मत आहे,

या पांचशें वर्षांच्या अवधींत जीं निरनिराळीं मुसलमान राजघराणीं होऊन गेलीं त्यांची फक्त नांवानिशी खालील कोष्टकांत दिली आहे, शिवाय नंतरच्या मोंगल

इ. स. १००१ ते १५१६

व मराठ्यांचे काळांतल्या केवळ विशिष्ठ अशा ठोकळ गोष्टींचें संक्षिप्त वर्णन प्रस्तुत पुस्तकांत वाचकांस अढळून येईल. इतिहास विषयक विविक्षित गोष्टींचा सविस्तर खुलासा देण्याचें येथें अर्थातच प्रयोजन नाहीं. जिज्ञासूंनीं तो विविक्षित अशा इतिहास ग्रंथांत निरनिराळ्या मुसलमान घराण्याच्या कारकीर्दीत पहावा.

कोष्टक

१ गझनी घराणें		१००१ तें ११८६
२ घोरी	,,	११८६ तें १२०६
३ गुलाम	,,	१२०६ तें १२९०
४ खिलजी	,,	१२९० तें १३२०
५ तघलक	,,	१३२० तें १४१४
६ सय्यद	,,	१४१४ तें १४५०
७ लोदी	,,	१४५० तें १५१६

हिंदुमुसलमानानांमधील पहिली चकमक म्हणजे लाहोरचा राजा जयपाळ यानें गझनीवर केलेली स्वारी होय. यांत त्याचाच पराजय होऊन त्याला तेथील राजा सबग्तगीन याशीं तह करून खंडणी देण्याचें कबूल करून परत यावें लागलें. या नंतरचा या घराण्यांतला प्रसिद्ध म्हणजे महमद गझनी हा होय.

महमद गझनी १००१ ते १०३०

या अवधींत त्यानें हिंदुस्थानावर एकंदर सतरा स्वाऱ्या केल्या. त्यांतली शेंवटली म्हणजे गुजराथेंत सोमनाथाच्या देवालयावरील होय. या देवालयाचा विध्वंस करून त्यानें पुष्कळ द्रव्य नेलें. तो फार द्रव्यलोभी होता, तो इतका कीं, मरतांना त्यानें आपल्या दौलतींचें शेंवटचें दर्शन घेतलें. आतां या दौलतीस आपण अंतरणार म्हणून त्यास रडें कोसळलें, तथापि तो विद्वानांचा चहाता होता. फर्दूसी हा प्रसिद्ध कवी त्याच्या पदरीं होता. त्यानें शहानामा हें काव्य रचून महमदास आणून दाखविलें, तें त्यास आवडल्यामुळें काव्य पुरें झाल्यावर प्रत्येक श्लोकास एक सोन्याचें नाणें देण्याचें महंमदनें कबूल केलें. तीस वर्षें परिश्रम करून फर्दुसीनें काव्य पुरें केलें. त्याचे एकंदर साठ हजार श्लोक झालेले पाहून

फर्दूसी

इतकें सुवर्ण द्यावें लागणार म्हणून महमुदानें त्याऐवजीं रुप्याची नाणीं देवं केली, तेव्हां फर्दुसी दरबारांतून निघून गेला. व महमुदावर त्यानें एक उपहासात्मक काव्य रचिलें. तें या राजपुरुषाचा जन्म नीच कुलांत झाल्याची आज तागायत साक्ष देत आहे. मागाहून या गोष्टीचा महमुदास पश्चाताप होऊन त्यानें सुवर्ण नाणीं पाठवून दिलीं. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं, कारण देणगी घेऊन आलेले लोक फर्दूसी रहात होता त्या ठिकणीं एका वाटेनें शहरांत जात असतां दुसऱ्या वाटेनें कवीचे प्रत बाहेर चाललें होते. शहानामा ग्रंथाची हस्तलिखित प्रत बिकानेर लायब्ररींत आहे. ती काबूलच्या हकीम अल्लीमर्दनखान यानें शहाजहानास १६१७ त नजर केली होती.

महमद घोरी
११८६–१२०६

गिझनी घराण्यांतल्या शेंवटच्या राजास पदच्युत करून महमद घोरीनें स्वतःच गादी बळकाविली. घोर म्हणून अफगाणिस्तानांत एक जुनें शहर आहे. हा तेथला राहाणारा. यानें हिंदुस्थानावर दोन तीन स्वाऱ्या केल्या. पाहिलींत [११९१] महमदाचा सपशेल पराभव झाला व तो जीव घेऊन पळून गेला, आणि कडेकोट तयारी करून तो पुन्हां [११९३] हिंदुस्थानांत आला. या दुसऱ्या खेपेस पूर्वीप्रमाणें रजपुतांत जूट नसल्यामुळें पृथ्वीराज चव्हाण मारला जाऊन रजपुतांचा पुरा मोड झाला.

पृथ्वीराज.

पृथ्वीराज हा दिल्लीचा शेंवटचा हिंदु सम्राट होय. दिल्ली व कंनोज या दोन घराण्यांत सार्वभौमत्वाबद्दल मोठा मत्सर असे. हें प्रभुत्व जाहीर करण्याचें मिषानें कनोजच्या राठोड राजानें अश्वमेध यज्ञ केला, या प्रसंगीं सर्व मांडलिकांस विशिष्ट कामें करावीं लागतात त्याप्रमाणें पृथ्वीराजास द्वारपाळाचे काम सांगण्यांत आले होतें, यावेळीं राजकन्येंचें स्वयंवरहि होतें, पृथ्वीराजाचें तिजवर प्रेम जडलें होतें. व तो आपल्या नेमल्या ठिकाणावर रुजू झाला नसल्यामुळें कनोजच्या राजानें त्याठिकाणीं वेडावाकडा पुतळा करून ठेवला, अखेर तिनें त्या पुतळ्यास माळ घातली, तेव्हां पृथ्वीराजानें पुढें होऊन तिला आलिंगिले व तिला घोड्यावर बसवून तो दौडत आपल्या राजधानीस निघून गेला. याचा तिचे बापास राग येऊन त्यानें पृथ्वीराजावर स्वारी केली व दुसऱ्या बाजुनें दिल्लीवर हल्ला करण्यास अफगाणांस बोलावून दोन्ही हिंदु राज्यांचा नाश करून घेतला. महमद घोरी

व त्याचे सैनिक यांचे पाय कायमचे टेंकलें जाण्यास रजपुतांचे आपसांतले कलह व या घराण्यांतले वैरच कारण झालें.

गुलाम घराण्याचा स्थापक कुतुबुद्दीन हा महमद घोरीच्या प्रीतींतला एक गुलाम होता. याला त्यानें आपला सुभेदार नेमला होता. घोरी निपुत्रिक मरण पावल्यामुळें दिल्ली येथील गादी कुतुबुद्दीनाला मिळाली.तो मूळचा गुलाम असल्यामुळें त्याच्या वंशास गुलाम घराणें असें नांव मिळालें,तथापि तो न्यायी व सद्गुणी होता.या घराण्यांतील दोन प्रसिद्ध माणसें म्हणजे कुतुबुद्दीन व रेझिया बेगम हीं होत. कुतुबुद्दीनाची साक्ष त्यानें दिल्लीस बांधलेला कुतुब मिनार हा विजयस्तंभ आज तागायत देत आहेच. दिल्ली येथील मुसलमानी तक्तावर बसून राजकीय कारभार स्वतंत्रपणें चालविणारी स्त्री रेझिया ही एकटीच. ती कुराण पढलेली, लोकहित दक्ष व उत्साही असल्यामुळें इतिहासांत तिला सुलतान हे पुरुषवाचक नांव मिळालें आहे. परंतु एका हबशी गुलामावर तिची भक्ती होती, ही गोष्ट दरबारी मंडळीस न आवडल्यामुळें त्यांनीं तिला कैद करून ठार मारिलें.

कुतुबुद्दीन
१२०६–१०

गुलाम घराण्यापैकीं शेंवटच्या राजास ठार मारून जलालुद्दीन खिलजीनें गादी बळकावली व तो स्वतःच पुढें आपल्या पुतण्याकडून मारला गेला. याजवरून राज्यतृष्णा किती अनावर असते व तिचे पायीं कसलींहि अनन्वित कृत्यें करण्यास मनुष्य कसा प्रवृत्त होतो हें अल्लाउद्दीन याच्या चरित्रावरून उघड होतें. अल्लाउद्दीन हा दक्षिणेंत स्वारी करणारा पहिला मुसलमान बादशहा होय. याच्या इतका राज्य विस्तार करून त्यास स्थायिकत्व कोणी आणलें नव्हतें. अल्लाउद्दीनाच्या दक्षिणेंतल्या स्वाऱ्या व देवगिरीच्या रामदेव राजाचा पराजय व झालेले तह, त्यानंतर गुजराथेंतील हिंदूंनीं केलेलें बंड, रजपुतांनीं चितोड पुन्हां काबीज केलें वगैरे हकीगत, इतिहासांत नमूद आहेच.

अल्लाउद्दीन खिलजी
१२९५–१४१५

खिलजी घराण्यांतल्या शेंवटच्या राजाच्या अमलास लोक त्रासले ही संधि साधून पंजाबचा सुभेदार ग्यासुद्दीन तघलख यानें दिल्लीची गादी बळकावली. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा महंमद तघलख हा गादीवर आला. त्याचा स्वभाव विलक्षण वेडगळ व क्रूर असे. दिल्ली मोडून दौलताबाद राजधानी करणें तांब्याचीं नाणीं सोन्याच्या ऐवजीं चालविणें वगैरे

फिरोज शहा तघलख
१३१५–१३८८

भलभलते तो व्रत करीत असे. परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं. महमदाचे मागून त्याचा चुलत भाऊ फिरोजशहा हा प्रजाहितदक्ष बादशहा झाला. धर्मशाळा, विहिरी व तलाव वगैरे लोकोपयोगी कामें त्यानें केलीं. तथापि त्याचें नांव अजरामर होण्याचें मुख्य कारण, त्यानें बांधलेला यमुना नदीचा कालवा हें असून तो अद्यापि चालू आहे. याचे मागें अनेक उलाढाली झाल्या. निरनिराळीं हिंदू व मुसलमानी राज्यें स्वतंत्रपणें कारभार पाहू लागलीं. शेवटीं महमद तघलख हा नामधारी बादशहा गादीवर असतां समरकंद येथील प्रसिद्ध तैमूरलंगची हिंदुस्थानावर स्वारी झाली. महमद तघलखाचा पराजय करून त्यानें दिल्ली शहर हस्तगत केलें. शहर लुटून हजारों लोकांची कत्तल केली. तैमूरलंग निघून गेल्यानंतर निरनिराळ्या राजक्रांत्या होउन सय्यद व लोदी वंश अल्पकाल सत्ताधीश झाला. तथापि त्याची खरी सत्ता केवळ दिल्ली पुरतीच होती. राज्यांतल्या निरनिराळ्या भागांत अस्वस्थता व अंदाधुंदी माजून राहिली होती, तिचा फायदा घेऊन तैमूरलंगाच्या वंशांतील बाबर नांवाच्या साहसी पुरुषानें निर्बल झालेल्या लोदी वंशाचा शेवट करून दिल्लीस मोगल बादशाहीची स्थापना केली. गझनीच्या महमदापासून लोदी घराण्याच्या समाप्तीपर्यंतच्या पांचशें वर्षांचें महत्व जगाच्या इतिहासांत मोठें आहे. कारण या कालांत युरोपांतील लोकाचें अज्ञानपटल दूर होऊन ते ज्ञानार्जनानें सुसंस्कृत होऊं लागले. छापण्याची कला त्यांस सांपडली. नौकानयन शास्त्रांतहि त्यांची प्रगति झाली. कालांतरानें त्याचा परिणाम असा झाला कीं, युरोपियनांस इतरांवर प्रभुत्व मिळालें. परंतु हिंदु लोक कालचक्राचें फेऱ्यांत सांपडल्यामुळें ते आपल्या स्वातंत्र्यास बहुतेक मुकले.

दैव अनकूल झाल्यामुळें बाबरास पानपतच्या लढाईत यश मिळून दिल्लीचें राज्य हातीं आलें. ऐतिहासिक कालांत पानिपतच्या रणभूमीवर जे भयंकर तीन युद्ध प्रसंग झाले (१५२६।५६।६१) त्यांतला हा पहिला होय. बाबराचा रजपुतांनीं बराच पिच्छा पुरविला होता. मेवाडचा राजा संग हा बाबरासारखा महत्वाकांक्षी व दीर्घोद्योगी असून दिल्लीचें तक्त काबीज करण्यास झटत होता, पण बाबरानें त्याचा फत्तेपूर शिक्री येथें पुरा मोड केला. बाबरानें थोडेच दिवस राज्य केलें तथापि राज्यकर्त्यांत त्याची योग्यता

मोगल वंश बाबर
१५२६–३०

मोठी आहे. तो विद्वान व रसिक असून त्यानें तुर्की भाषेंत आत्मचरित्र लिहुन ठेवलें आहे. त्यांत मरणापूर्वीच्या एक वर्षापर्यंतची सर्व हकीकत दिली आहे.

बाबराचे पश्चात त्याचा मुलगा हुमायून गादिवर बसला. तथापि लोदी घराण्यांतले जुने अफगाण सरदार मोगलांना वश झाले नव्हते व ते त्यांस पाण्यांत पाहात असत. हुमायून गादिवर बसल्या-

हुमायून नंतर दहा वर्षांनीं शीरखान नामक अफगाण सरदारानें

१५३०-४० बंड केलें व कनोज येथील लढाईत (१५४०) हुमायुनाचा पराभव करून त्यास हिंदुस्थान सोडून पळायास लावलें. सिंध मधून जात असतां वाटेंत समरकोट येथें त्यास अकबर हा मुलगा झाला. त्याचा बहुतेक काल लढण्यांत गेला. तरी त्यानें लोकोपयोगी पुष्कळ कामें केलीं. हुमायून शेवटीं इराण देशाच्या बादशहाचे आश्रयास जाऊन राहिला. व शीरशहाच्या मदतीनें दिल्लीचे राज्यपद पुन्हां मिळीवलें. परंतु तो पुढें जिन्यावरून पडून लवकरच मरण पावला. हुमायून सुस्वभावी होता. पण राज्य चालवण्यास अवश्यक असे गुण त्याचे अंगीं नसल्यामुळें बापानें कमावलेलें राज्य त्यास राखतां आलें नाहीं. त्याचा पुत्र अकबर यास पुढें राज्य मिळाल्यामुळें तो मात्र पराक्रमी निघाला.

मोगल साम्राज्याचा खरा स्थापक अकबर हा गादीवर बसला तेव्हां चौदा वर्षांचा होता. हुमायूनच्या मरणासमयीं त्याचा

अकबर विश्वासू सरदार बहिराम व अकबर हे पंजाबांत अफगा-

१५५६-१६०५ णाशीं लढत होते. बहिराम हा हुमायूनाच्या ज्या सैन्यानें त्यास पुन्हां राज्यपद मिळवून दिलें त्याचा मुख्य सेनापति होता. अकबर अल्पवयस्क असल्यामुळें बहिराम हा "खानबाबा" ह्मणजे राजपिता या सन्मान्य नांवानें राजप्रतिनिधि झाला, पण त्याची अधिकारलालसा व करडा स्वभाव दुःसह झाल्यामुळें अकबरानें त्यास दूर केलें. तेव्हां रागावून बहिरामनें बंड केलें, पण अकबरानें तें मोडलें व पूर्वीचें स्मरून त्यास उदार मनानें त्याच्या अपराधाची क्षमा केली. अकबराची पहिली सात वर्षे पदरच्या मुसलमान सरदारांनीं केलेलीं बंडें मोडण्यांत गेलीं. नंतर त्याचें लक्ष रजपूत संस्थानाकडे वळलें. कांहीं काल लढून अगर शरीरसंबंध जोडण्याच्या विलक्षण योजनेनें अकबरानें जयपूर वगैरे हिंदू राज्यें आपल्या कह्यांत आणलीं. उदेपू-

रच्या राणा प्रतापसिंहानें मात्र केव्हांहि आपलें घराणें नीतिभ्रष्ट होऊ दिलें नाहीं. हिंदुस्थानांतला शुद्ध रजपूत वंश म्हणजे उदेपूरचा शिसोदिया वंशच होय. हिंदू लोकांस मोठमोठ्या जागा देऊन मुसलमानांस जेरीस आणण्याचे कामीं अकबरानें त्यांचा उपयोग केला. त्याचे कारकीर्दीचे सुरुवातीस त्याचें राज्य म्हणजे दिल्ली आग्र्याच्या आसपासचा थोडासा मुलूख एवढेंच कायतें. पण त्याच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दींत राज्यविस्तार इतका झाला कीं, सर्व उत्तर हिंदुस्थान त्याच्या ताब्यांत आलें, परंतु दक्षिणेंत मात्र अहमदनगरच्या चांद बिबीच्या शौर्य व मुत्सद्दीपणामुळें त्याचा पाय फारसा रोंवला गेला नाहीं. अकबराची पहिलीं वर्षे भरभराटीचीं गेलीं. परंतु त्याचा पुत्र सेलीम व्यसनी निघून कुटुंबांत कारस्थानें डोकावूं लागल्यामुळें अंतकालीं त्यास दुःख झालें, त्याची कबर शिकंदरा येथें आहे.

त्याचीं धर्ममतें

अकबराचे मनांत सर्व धर्मांविषयीं सारखीच सहानुभूति होती, विशेषत: हिंदुधर्मास धर्म व वाङ्मय विषयक संस्कृत ग्रंथांचीं फारशींत भाषांतरें करून त्यानें जो आदर दाखविला त्यामुळें कर्मठ मुसलमान त्याचा हेवा करूं लागले. सर्व धर्मांचे विद्वान जमवून त्यांतील उदार तत्त्वें एकत्र करून दी-नें-इलाहि हा नवीन धर्मपंथ स्थापिला. परंतु त्याचे पश्चात तो फार दिवस टिकला नाहीं.

त्यानें केलेल्या सुधारणा

प्रत्येक प्रांतांवर स्वतंत्र अधिकारी असून त्यास मुलकी व लष्करी दोन्ही अधिकार दिलेले असत. राजा तोडरमल म्हणून अकबराचा हिंदू प्रधान होता. त्यानेंच जमिनीची मोजणी पहिल्यांदा केली. त्यानें बसविलेली पद्धतच थोड्याशा फरकानें आजला हिंदुस्थानांत चालू आहे. कायम धाऱ्याची पद्धत असलेल्या बंगाल्यांत तर त्याचें नांव सर्वतोमुखीं आहे. अकबराच्यावेळीं जमाबंदीचा वसूल एकंदर ४२ कोट रुपये असावा असा अंदाज आहे. लष्कर व न्याय खात्यांतहि त्याची व्यवस्था चोख असून ज्याच्या त्याच्या धर्माप्रमाणें शासन पद्धति ठेविली होती. व हिंदूवरील जिझिया हा जुलमी कर त्यानें बंद केला.

ऐने अकबरी

अकबराच्या पदरीं जे विद्वान होते त्यांत राजा तोडरमल, फैझी व अबुल फाजल हे प्रमुख होत. अबुल फाजल हा वसूल खात्याचा प्रधान असून त्याला राज्य कारभाराची उत्तम माहिती होती. त्यानें लिहिलेल्या ऐने अकबरी या सर्वमान्य

ग्रंथांत अकबराचा राज्यकारभार व दिनचर्या याची फार मनोरंजक व उपयुक्त माहिती आहे. हा थोर पुरुष राजपुत्र सेलीमच्या चिथावणीनें मारला गेला. दिनचर्या लिहून ठेवण्याच्या प्रघातास तवारिख म्हणतात. या तवारिखांवरून त्या काळाचा मोगलांचा इतिहास समजण्यास बरीच मदत होते.

अकबराचे मागें त्याचा पुत्र सेलीम हा जहांगिर म्हणजे जग जिंकणारा हे बडेजावी नांव धारण करून गादीवर बसला, तथापि त्या नांवास शोभण्यासारखें कोणतेंच कृत्य त्याचें हातून झालें नाहीं. त्याची बावीस वर्षांची कारकीर्द मुलांची बंडे मोडणें, बायकोचें प्रस्थ माजविणें व ऐषआराम ह्यांत गेलीं. दक्षिणेंत स्वाऱ्या करून थोडासा मुलूख त्यानें मिळविला. त्याचा बंडखोर मुलगा शहाजहान हा अहमदनगरच्या राजाचा हबशी प्रधान मलिकंबर याचे आश्रयास जाऊन राहिला होता. जहांगिरची सारी कारकीर्द नुरजहान या लावण्यवती स्त्रीच्या वृत्तांतानें भरलेली आहे. तिच्या पहिल्या नवऱ्याचा खून करून त्यानें तिला आपली पट्टराणी केली. तो मद्यपि व विलासी होता. तथापि न्यायाच्या कामीं तो दक्ष असे. कोणाहि मनुष्यास न्याय मिळण्यास अडचण पडूं नये व बादशहाकडे दाद लागावी म्हणून त्यानें राजवाड्यांत एक घंटा टांगून तिची सांखळी बाहेर रस्त्यावर लावून ठेविली होती. ती ओढली म्हणजे घंटा वाजे व पाहिजे त्याची दाद बादशहाकडे लागे. हॉकिन्स व सर टॉमस रो हे दोन इंग्रज वकील व्यापाराच्या सवलतीं मागण्याकरितां प्रथम याच्याच कारकीर्दीत आले होते. हा १६२७ त मरण पावला.

जहांगिर
१६०५–२७

शहाजहान गादीवर आल्यावर पहिलें काम त्यानें नुरजहानला नेमणूक करून देऊन स्वस्थ बसवून इतर वारसदारांचा खरपूस समाचार घेतला. कारकीर्दीचे आरंभीं व अखेरीस दोन मोठीं युद्धें झालीं. बाकी मध्यंतरींचा काळ शांतीचा व भरभराटीचा गेला. दक्षिणेंत शहाजहाननें अहमदनगरचें राज्य बुडवून दिल्लीस जोडलें खरें, पण अफगाणिस्थानांतला कंदाहार प्रांत इराणच्या शहानें बळकाविल्यामुळें काबूल पलीकडे मोगलांची सत्ता राहिली नाहीं. मोगल वंशांतील अत्यंत भाग्यशाली बादशहा म्हणजे शहाजहान. याला इमारती बांधण्याचा नाद असे. आपल्या सौंदर्यानें जगास दिपविणारा आग्र्याचा ताजमहाल, मोती-मशीद, दिल्लीचे राजवाडे वगैरे पृथ्वीवर अत्यंत सुंदर अशा इमारती म्हणजे शहाजहानच्या वैभवाची आज तागायत स्मारकेंच होऊन राहिलीं आहेत. सन १६५७ त शहाजहान

शहाजहान
१६२७-५८

आजारी पडला. तेव्हां त्याचा मुलगा अवरंगझेब यानें भावास ठार मारून बापास कैदेंत टाकिलें व आपण बादशहा झाला. शहाजहान पुढें कैदेंतच मेला. प्रत्यक्ष पोटचे मुलगे बंडखोर निपजावे असा जणूं अकबराचे वंशास शापच होता. तेव्हां सर्वांप्रमाणें त्यालाहि म्हातारपणीं पुत्रापासून छळ भोगावा लागला. शहाजहानच्या कारकीर्दींत मोगल साम्राज्याच्या भरभराटीचा कळस झाला. त्याच्या मागून झालेल्या बादशहानें नवीन मुलूख काबीज करून राज्य विस्ताराच्या कामीं मदत केली खरी, परंतु त्याचवेळीं त्यानें मोगल सत्तेच्या ऱ्हासाचेंहि बीज पेरिलें.

अवरंगझेब कपटी तसाच धूर्तहि असल्यामुळें बापास कैदेंत टाकून भावांस व त्यांच्या मुलांबाळांस त्यानें यमलोकचा रस्ता दाखविला व आपण अलमगीर म्हणजे विश्वजेता हें नाम धारण केलें, औरंगझेबची कारकीर्द अनेक कारणांनीं महत्वाची आहे. शहाणपण उद्योग व दृढ निश्चय यांत तो अकबराच्या बरोबरीचा होता. पण इतर गुण अगदीं उलट होते. लोकांत एकी करणें हें अकबराचें व लोकांत फूट पाडून आपण सुरक्षित राहणें हें औरंगझेबाचें धोरण होतें. त्यानें जिझिया कर पुन्हा बसविला व फाजील धर्मवेडानें तो हिंदुवर जुलुम करूं लागला, हीच गोष्ट पुढें त्याचे राज्य मोडकळीस येण्यास कारण झाली. दाक्षिणेंत विजापूर व गोवळकोंडा हीं दोन मुसलमानी राज्यें जोरावत चाललीं होती व मराठ्यांचा उदय होऊन शिवाजीनें रायगडास राज्यहि स्थापिलें, तेव्हां औरंगझेबानें स्वतः स्वारी करून मराठ्यांनीं अगोदरच मोडकळीस आणलेलीं तीं राज्यें मोगल साम्राज्यास जोडिलीं (१६८८) यानतर तो मराठ्यांच्या पारिपत्यास लागला. त्याच्या कारकीर्दीच्या शेवटचीं २० वर्षे ह्यांतच गेलीं. त्याला दिल्लीस पुन्हा जाणें झालें नाहीं. संभाजीस कैद केल्यानंतर मराठी राज्य मध्यंतरीं डबघाईस आलें होतें, परंतु त्या काळच्या बाणेदार मराठ्यांनीं अखेरपर्यंत बादशहाशीं लढून शेवटीं जय मिळविला. यांतच शेवटीं मराठ्याच्या हल्ल्यास जेरीस येऊन वृद्धापकाळानें ग्रस्त झालेला शेवटचा पराक्रमी मोगल बादशहा १७०७ मधें अहमदनगर येथें मरण पावला. बापाची आपण जी दशा केली तीच आपले मुलगे आपली करतील म्हणून त्यानें अंतकाळीं त्यांस जवळ येऊं दिलें नाहीं. औरंगझेबाचे वेळीं एकंदर वसूल ८० कोट रुपये होता. तो जबरदस्त उद्योगी होता. याचे एकच उदाहरण म्हणजे स्वहस्तें लिहिलेल्या कुराणाच्या प्रती विकून त्यानें

अवरंगझेब
१६५८-१७०७

आपल्या अंत्यविधी करितां पैसे जमवून ठेविले होते, एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

औरंगझेबानंतर मोगल सत्तेचा सारखा ऱ्हास होत गेला. या अवधींत तक्तावर बसलेले बादशहा निव्वळ नामधारी असत. निरनिराळ्या प्रबळ सरदारांचें प्राबल्य असे. मध्यवर्ती सत्ता झुगारून या प्रबल सरदारांनीं दक्षिणेंत हैद्राबादेस, उत्तरेस अयोध्या प्रांतांत वगैरे स्वतंत्र राज्यें स्थापिलीं. शिवाय शेजारच्या शीख, रजपूत व दक्षिणेतल्या मराठी सत्तेचा शह, दिल्लीस केव्हांच बसला होता. या अशा उतरत्या काळांत मराठ्यांसारख्या जबरदस्त शत्रूस मोगलांस आळा घालतां आला नाहीं. नादिरशहा व अहमदशाहा अब्दाली यांच्या स्वाऱ्या हे दोन राज्यक्रांतीचे प्रसंग या काळांत झाले. शेंवटचा नामधारी बादशहा बहादुरशाहा १८५७ चे बंडांत सामील झाल्यामुळें इंग्रजांनीं कैद करून त्यास ब्रह्मदेशांत पाठविलें व तिकडेच तो मरण पावला. अशा रीतीनें दिल्लीपद पादशाहीचा शेंवट झाला.

मोगल शाहीचा शेवट
नामधारी बादशहा
१७०७-१७५७

महाराष्ट्राच्या भाग्योदयाचें एक जबरदस्त कारण त्या वेळच्या साधुसंतांनीं केलेली धर्मजागृति होय. ही धर्मजागृतीची चळवळ दोन चारशें वर्षे चालू होती. मोगलांचा अम्मल बसून हिंदुस्थान सर्वत्र म्लेंच्छीमय होऊन गेलें व हिंदुधर्माचा समूळ उच्छेद होतो कीं काय अशा परिस्थितींत यदृच्छेनें अवतरलेल्या मुकुंदराज, ज्ञानदेव एकनाथ, तुकाराम व रामदास इत्यादि साधुसंतांनीं आपल्या पवित्र वर्तनानें व उपदेशानें महाराष्ट्रांत स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांजबद्दल लोकांच्या मनांत विलक्षण अभिमान उत्पन्न केला. मुसलमानांचे आपसांतील कलह, राज्यांतलि अव्यवस्था व धर्मजागृतीनें प्रज्वलित झालेला स्वाभिमान यामुळें महाराष्ट्रांतलें लोक एकवटून राज्य स्थापनेच्या कामास लागले व शिवाजीसारखा योग्य पुढारी मिळतांच त्यांच्या प्रयत्नास लवकरच मूर्त स्वरूप आलें.

मराठी अंम्मल
मराठ्यांचा उदय.

शिवाजीचा बाप शहाजी विजापूरकरांच्या पदरीं असे. विजापूरची आदिलशाही व अहमदनगरच्या निजामशाहीचें वतीनें लढून दिल्लीचे बादशाही फौजेस टक्कर दिल्यामुळें शहाजीचें वजन पुष्कळच वाढलें. व त्यांस पुणें व सुपे या दोन परगण्यांची जहागिर मिळाली. शिवाजीचा जन्म पुणें जिल्ह्यांत शिवनेरी किल्ल्यांत झाला. शिवाजीचें बालपण आई जिजाबाई व गुरु

शिवाजीचा जन्म
सन १६२७

दादोजी कोंडदेव यांच्या शिक्षेत गेलें. दादोजीनें त्यास दांडपट्टा व निशाण मारणें वगैरे शौर्याचीं कामें शिकवलीं. सह्याद्रीच्या डोंगरी मुलखांतील मावळे लोक शिवाजीनें आपलेसें करून घेतलें. त्यांत तान्हाजी मालुसरे व बाजी फसलकर हे अगदीं त्याचे जिवलग होते. लहानपणापासूनच मुसलमानापासून होत असलेला गो–ब्राम्हणांचा छळ पाहून त्यांस अत्यंत त्वेष येई. व या जुलुमाचा आपण प्रतिकार केला पाहिजे असें त्यांस वाटे. याच त्याच्या मनःप्रवृतीचे पर्यवसान पुढें स्वतंत्र हिंदु राज्य स्थापण्यांत झालें. मावळे लोकांच्या साह्यानें त्यानें एका मागून एक एक सर्व डोंगरी किल्ले हस्तगत करण्याचा सपाटा चालवून विजापूरकरांचे मुलखांत धूमाकूळ माजविला, तेव्हां विजापूरच्या बादशाहानें अब्झुलखान नांवाच्या शूर सरदारास शिवाजविर पाठविले. परंतु शिवाजीने वाघनखें खुपसून त्यास ठार मारलें. यानंतर विजापूरच्या बादशहानें तह केला, तेव्हां शिवाजीचें महत्व पुष्कळच वाढलें. मोंगलांशीं झालेल्या पाहिल्या सामन्यांत त्यानें शाहिस्तेखान याचा पराभव केला. व शहाजीचे मरणानंतर सन १६६४ त शिवाजीनें राजा हें पद धारण केलें व आपल्या नांवांचे नाणें पाडलें व विजापूरची अदिलशाही व दिल्लीची बादशाही या दोन प्रबळ राजसत्तेस झुगारून देऊन स्वराज्य स्थापना केली. तेव्हां त्याचा यशोदुंदुभि संपूर्ण महाराष्ट्रांत गाजूं लागला व मोठमोठे राजेहि त्यास मान देऊं लागले. तीस वर्षांच्या दीर्घोद्योगानें राज्य स्थापना केली हें जाहीर करण्याकरितां शिवाजीनें काशीकर गागाभट्ट नामक विद्वान पंडिताकरवीं सन १६७४ त रायगडास राज्याभिषेक करविला. शिवाजीनें श्रीसमर्थ रामदासांपासून गुरुपदेश घेतला होता. कोणत्याहि बिकट प्रसंगीं त्यांची सल्ला घेतल्यावांचून तो कोणतीच गोष्ट करीत नसे. त्यानें सर्व राज्य समर्थांस अर्पण केलें. तेव्हां रामदासांनीं राज्याचे निशाण तेवढे भगवें ठेवण्यास सांगून राज्य परत दिलें. समर्थ व शिवाजीसारख्या अधिकारी गुरुशिष्यांची महति वर्णावी तितकी थोडीच आहे. शिवाजीचे अंगीं शौर्य साहस व मुत्सद्दीपणा हीं सारखींच होती. त्याचा मुत्सद्दीपणा त्यानें केलेल्या राज्यव्यवस्थेवरून दिसून येतो. अष्टप्रधान नेमून त्यांजकडे राज्याचीं निरनिराळीं

अब्झुलखानाचा वध. सन १६५९

राज्याभिषेक सन १६७४
कारकीर्द १६७४–८०

कामें सोपविलीं होतीं. शिवाजीस प्रसंगीं क्रूर व धर्मवेड्या मुसलमान लोकांशी नेहमीं प्रसंग पडल्यामुळें केव्हां केव्हां कपटानें वागावें लागलें हें खरें. तथापि जात्या तो दयाळू व मनाचा थोर होता. याबद्दल त्याच्या अनेक गोष्टी इतिहासांत नमूद आहेत. शिवाजीच्या साक्षरतेबद्दल अद्यापि वाद आहे. व त्यावेळच्या धामधुमीच्या काळांत विद्यावर्धनाकडे त्यास फारसें लक्ष देणें शक्य नव्हतें. तथापि राजव्यवहारकोश नांवाचा ग्रंथ त्यानें तयार करविला. यावरून तो विद्येचा चहाता होता. गुडघीचा आजार होऊन शिवाजी ता. ५ एप्रील सन १६८० त मरण पावला. त्यावेळीं त्याचें वय ५३ वर्षांचें होतें. शिवाजीस संभाजी व राजाराम असे दोन पुत्र होते.

संभाजी
१६८०–८९

शिवाजीचे मागून त्याचा मुलगा संभाजी गादीवर बसला. तो बापाप्रमाणेंच शूर होता. त्याचें आयुष्य पोर्तुगीज व मोंगल लोकांशीं लढण्यांत गेलें. त्यांत त्यानें आपलें शौर्य उत्तम तऱ्हेनें प्रगट केलें. पण तो दुर्व्यसनी निघाल्यामुळें त्याचा शेवट वाईट झाला. बापाचे वेळचें प्रधानमंडळ मोडून कलुशा नामक कनोजी ब्राम्हणाच्या हातीं सर्व राज्यसूत्रें दिलीं. विजापूर व गोवळकोंडा येथील मुसलमानी राज्यें बुडविल्यानंतर औरंगझेब मराठ्यांच्या मुलखांत शिरला. तेव्हां संभाजी संगमेश्वरास मद्यसेवनांत गुंग होता, त्यावेळीं. एका सरदारानें त्यास पकडून बादशाहाकडे नेलें. बादशाहानें संभाजीस मुसलमान होण्यास सांगितलें. तेव्हा तूं आपली मुलगी देशील तर मुसलमान होतो असें म्हणून त्यानें मुसलमानी धर्माची निंदा केली. तेव्हां औरंगझेबानें क्रूरपणानें त्याचा वध केला. (१६८९). संभाजीचा धर्माभिमान अत्यंत जाज्वल्य होता. प्राणांवर बेतलें तरी त्यानें स्वधर्म सोडला नाहीं. संभाजीचे वधानंतर त्याचे स्त्रीपुत्रांस औरंगझेबानें पकडून दिल्लीस नेलें.

राजाराम
१६८९–१७००

संभाजीचे मागून त्याचा धाकटा भाऊ राजाराम हा गादीवर आला. याचे कारकर्दींत मराठ्यांवर अनेक संकटें आलीं व कांहीं काल राजारामास महाराष्ट्र सोडून कर्नाटकांत जिंजीस जाऊन राहावें लागलें. व तेथेंहि मोगलांनीं त्याचा पिच्छा पुरविला, परंतु राजारामानें प्रल्हाद निराजी, धनाजी जाधव व संताजी घोरपडे या मुत्सद्दी व सेनानायकांच्या कर्तबगारीनें राज्यांचा बचाव

केला. जिंजीहून परत आल्यावर राजारामानें सातारा ही आपली राजधानी केली व तीच मराठेशाहीअखेर होती. राजाराम आकस्मिक ताप येऊन १७००त अल्पवयांतच मरण पावला, त्यास दोन मुलगे होते. राजारामांत विशेष प्रखर असा गुण नव्हता. यामुळें त्याचे कारकीर्दींत राज्याचें पुष्कळ कल्याण झालें.

राजारामाचे पश्चात त्याची स्त्री ताराबाई आपला मुलगा शिवाजी याचे नांवें राज्याकारभार चालवूं लागली. पण औरंगझेबाचे मृत्यूनंतर शाहू कैदेंतून सुटून येऊन ताराबाईशीं लढून त्यानें गादी घेतली. शाहूचा काळ बादशाहाच्या जनानखान्यांत गेल्यामुळें अनुभवानें प्राप्त होणारें ज्ञान व शौर्य त्याच्यांत उत्पन्न झालें नाहीं. तो ऐष आरामांत निमग्न असे. सेनापती धनाजी जाधव यास शाहूनें प्रांतांतील जमाबंदीचें काम दिलें होतें. या जाधवांच्या हाताखालीं बाळाजी विश्वनाथ भट हा हुषार व कारस्थानी पुरुष कारकून होता. यानें आपल्या कारस्थानानें ताराबाईचे पक्षाचा मोड करून शाहूचा पक्ष उचलून धरला. या कामगिरीबद्दल शाहूनें त्यास आपला पेशवा नेमलें. स्वतः विलासी असल्यामुळें सर्व कारभार त्याच्याकडे सोंपविण्यांत आला. शाहूस संतान नव्हतें. ताराबाईचा नातू रामराजा यास त्यानें दत्तक घेतला. लौकिकांत राजाचा मान राखून पेशव्यांनीं सर्व कारभार मुखत्यारीनें करावा अशी व्यवस्था करून शाहू (सन १७४९) मरण पावला. शाहूनंतर सन १८४८ त साताऱ्चे राज्य खालसा होईपर्यंत एकंदर चार राजे झाले, पण ते केवळ नामधारी होते. त्यांच्या हातून कोणतेंहि महत्कृत्य झालें नाहीं. अगर त्यांस तसा अवसर मिळाला नाहीं. राज्याची सर्व सत्ता पेशव्यांच्या हातीं आली. त्यांनीं आपलें वास्तव्य पुण्यास केल्यामुळें सर्व कारभार पुढें पुण्यास चालूं लागला.

शाहू
१७०८–४०

नामधारी राजे

पेशवे ब्राम्हण खरे, पण शिवाजी व इतर मराठे सरदार यांच्या पराक्रमानें महाराष्ट्र जेव्हां दणाणून गेला तेव्हां क्षात्रविद्येकडे साहजिकच सर्वांचें लक्ष वेधलें. ब्राह्मण जरी मूळचे कारकुनी बाण्याचे होते तरी मराठे सरदारांच्या सहवासानें क्षात्र तेजाचीहि अभिरुचि त्यांस लागत गेली. लेखणी व तरवार यांचा सारखा उपयोग करून आपल्या धन्याचा भगवाझेंडा ज्यांनीं अटकेपर्यंत फडकवून कीर्ति संपादिली

पेशव्यांची कारकीर्द
बाळाजी विश्वनाथ
१७१४–२०

अशापैकीं पेशवे हे एक होत. बाळाजी विश्वनाथ मूळचा श्रीवर्धन येथील राहणारा, बाळाजीचे हातांत कारभार आल्यानंतर देशांतला बंडावा मोडून मराठी राज्यास हितावह अशा अनेक गोष्टी त्यानें केल्या. याशिवाय मुख्य गोष्ट दिल्लीस फिरूकशियर बादशहा गादीवर असतां सय्यद बंधूच्या कारस्थानास मराठी फौजेचें सहाय्य देऊन त्यांजकडून दक्षिणचे सहा सुभे आणि चौथाई व सरदेशमुखी हे हक्क संपादिलें. तो बुद्धिमान व धोरणी होता. बाळाजी १७२० त मरण पावला. त्यास बाजीराव व चिमाजी आप्पा हे दोन मुलगे होते.

बाळाजीचे पश्चात थोरला मुलगा बाजीराव हा पेशवा झाला, बाजरािव स्वतः शूर व धाडसी असल्यामुळें त्यांस सहाय्य करणारे अनेक नवीन सरदार पुढें आले. बाजीराव व धाकटा भाऊ चिमाजी आप्पा या उभयतांसहि लहानपणापासून युद्ध प्रसंग व राजकारण यांची चांगली माहिती झाली होती. प्रथम खानदेश व माळवा हे प्रांत हस्तगत करून त्रिंबकराव दाभाड्याचा डभई नजिक पराभव करून आपापसांतील तंटा मिटविला, दाभाडे वगैरे स्वकीय, निजाम वगैरे मुसलमान व पोर्तुगीज अशा तीन पक्षाबरोबर युद्धप्रसंग झालें. बाजीरावाची सर्व कारकीर्द धामधुमीची असल्यामुळें अनेक शूर सरदार उदयास येऊन मराठी राज्याच्या शक्तीची जरब सर्वत्र बसविली. निजाम उल्मुल्ख हा औरंगझेबाचें तालमेंत तयार झालेला एक प्रमुख व मोगलांच्या पडत्या काळांत राज्यधोरण जाणणारा एवढा एकच पुरूष होता. निजामानें हैद्राबादेस स्वतंत्र राज्य स्थापिलें होतें, राज्य कमीवण्याच्या उद्योगामुळें मराठ्याचें व निजामचें कायमचें वैर जुंपलें. बाजीरावानें निजामाचा अनेक वेळां मोड केला. व इ. स. १७३८ त भोपाळ येथें झालेल्या लढाईंत तर निजाम पूर्ण हतवीर्य झाला. याशिवाय बुंदेलखंडच्या छत्रसाल राजाची मुक्तता, जंजिऱ्याच्या शिद्दीचा मोड, वसईचा वेढा इत्यादि प्रसंगीं पराक्रम करून मुलुख संपादन केला. मराठ्यांची सत्ता वाढविली. गुणी मनुष्याचा योग्य गौरव करून त्यास पुढें आणणें हा बाजिरावाचा विशेष गुण होता. यामुळें शिंदे, होळकर गायकवाड, विंचूरकर आणि पवार वगैरे ज्यांनीं मराठ्याची सत्ता हिंदुस्थानच्या चारहि दिशेस पसरविली, असे सर्व प्रमुख सरदार उदयास आले. बाजीराव मोठी फौज घेउन उत्तर हिंदुस्थानावर स्वारीवर जात असतां इ. स. १७४० त नर्मदा तीरीं मरण पावला.

बाजीराव
१७२०–४०

बाजीराव अत्यंत सुंदर पुरूष असल्यामुळें मस्तानी नावांची मुसलमान स्त्री त्याच्या सौंदर्यास भुलून प्रेमपाशांत गुंतली होती, बाजरिवास औरस तनि व मस्तानीपासून झालेला एक असे चार पुत्र होते.

बाजीरावाचे मागून वडील मुलगा बाळाजी यास पेशवाईची वस्त्रें मिळालीं. बापाचें शौर्य व आजाचा मुत्सद्दीपणा हे दोन्ही गुण बाळाजीचे अंगीं होतें, त्यामुळें मराठशाहीचें महत्व त्यानें वाढविले. या कामीं त्याचा

बाळाजी बाजीराव
१७४०--६१

भाऊ सुप्रासिद्ध राघोबा दादा व चिमाजी आप्पाचा मुलगा सदाशिवराव भाऊ यांचें सहाय्य मिळालें, मुसलमानांचा पाडाव करणें ही बाळाजीच्या राजकारणांतील मुख्य गोष्ट होय. कनार्टक म्हैसूर वगैरे प्रांत पेशव्यानें जिंकले. रघुनाथराव दादा मल्हारराव होळकर, दत्ताजी शिंदे, वगैरेनीं उत्तरेकडे थेट हिमालयापर्यंत मुलुख काबीज केला. दिल्ली हस्तगत करून बादशाहीचीं सूत्रें आपल्या हातीं घेतली. फक्त मराठ्यांचा राजा दिल्लीचें तक्तावर बसविण्याचें तेवढें राहिलें होतें. रघुनाथरावानें तर मराठ्यांचा झेंडा अटकेवर नेऊन रोंवला. एकंदरींत बाळाजीचे कारकीर्दीत मराठ्यांची सत्ता कळसास पोहोंचली. ही गोष्ट मुसलमानांस न रुचून त्यांनीं अहमदशहा अबदालीचे सल्ल्यानें मराठ्यांचा सूड उगविण्याची तयारी केली. अबदालीचे पारिपत्य करण्याकरितां अनेक रणधीर सरदार एकत्र करून बाळाजीनें सुमारें दोन लाख फौज सदाशिवरावभाऊचें आधिपत्याखालीं दिल्लीवर रवाना केली. मराठ्यांनीं दिल्ली काबीज करून पानिपतास वेढा दिला, तोंच त्यांचे तळास गिलच्यांचा वेढा पडला. बाहेरील दळणवळण बंद पडून अन्नसामुग्रीचा तुटवडा पडला. यामुळें होईल तें होवो ह्मणून शत्रूवर जाऊन पडल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. प्रथम ता १४ जानेवारी १७६१ रोजीं तिसरा प्रहरपर्यंत मराठ्यांचीच सरशी होती. नंतर पेशव्यांचा मुलगा विश्वासराव पडल्याचे ऐकून सर्व सेनेचा धीर खचला. भाऊसाहेब गर्दीत घुसला, तो पुन्हा दिसला नाहीं. व अशा रीतीनें मराठ्यांचा पुरा मोड झाला. इतिहासांत हें युद्ध अत्यंत महत्वाचें झालें आहे. ज्याचे कोणी लढाईत पडलें नाहीं असें एकहि घर दक्षिणेंत राहिलें नाहीं. या युद्धानें मराठ्यांचा भाग्यकाळ संपला. मुसलमानास सुद्धां या जयापासून कांहीं फायदा झाला नाहीं. मल्हाररावांची फितुरी व भाऊ-

लुटलें. तेव्हां बाजीराव इंग्रजांचे आश्रयास जाऊन त्यांशीं वसई येथें तह केला. मराठ्यांचें स्वातंत्र्य प्रथम याच तहानें नष्ट झालें. बाजीराव स्वभावतः भ्याड व चंचल बुद्धिचा होता. पुष्कळ मराठे सरदारांस वसईचा तह मान्य नसल्यामुळें त्यांच्या संगनमतानें गेलेलें स्वातंत्र्य पुन्हां मिळविण्याचा बाजीरावाचा इरादा होता. परंतु सर्वांस एकत्र जमवून विचार करण्यास अवकाशच मिळाला नाहीं. जो जेथें भेटेल तेथें त्यांस गांठून व त्यांचा मोड करून इंग्रजांनीं आपलें वर्चस्व स्थापिलें. सातारकर छत्रपति प्रतापसिंह याजकडे थोडा मुलूख देऊन बाकीचें राज्य खालसा केलें. बाजीरावास कांहीं नेमणूक देऊन त्यास ब्रम्हावर्तास नेऊन ठेविलें. अशा रीतीनें मध्यवर्ती सत्ता नामशेष झाली तरी शिंदे, होळकर वगैरे मराठेशाहींतील कित्येक घराणीं अद्यापि टिकून आहेत. मराठेशाहीचा अंत होण्यास आपसांतलें विरोध तर खरेंच पण बुडत्या काळांत कर्त्या पुरुषांचा अभाव हेंहि एक जबरदस्त कारण आहे.

युरोपियनांचा हिंदुस्थानांत प्रवेश.

फार प्राचीन कालापासून या देशांतला अनेक तऱ्हेचा माल युरोपांत जात असे. त्यावरून दूर कोठेसा हिंदुस्थान नांवाचा संपन्न देश आहे एवढेंच युरोपियनांस माहीत होतें. तो कसेंहि करून पहावा अशी जिज्ञासा तिकडे उत्पन्न झाली. सन १४९२ त हिंदुस्थानचा शोध करावयास निघालेल्या कोलंबस या जगन्मान्य प्रवाशास अमेरिकाखंड सांपडलें. पुढें १४९८ त पोर्तुगीज लोक जलमार्गानें हिंदुस्थानांत आले. नंतर डच, इंग्रज व फ्रेंच हेंहि हळूहळू इकडे आले. आरंभीं हे लोक किनाऱ्यावर व्यापाराच्या वखारी, नंतर त्याच्या संरक्षणार्थ तट बांधून फौज फांटा ठेवूं लागले. व अशा रीतीनें कांहीं मुलूख त्यांच्या ताब्यांत गेल्यावर व्यापाराच्या निमित्तानें तें आपल्या सत्तेचाहि विस्तार करूं लागले. डच मात्र राज्याच्या भानगडींत पडले नाहींत. बाकी पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रज यांनीं हिंदुस्थानांत राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. त्यांत इंग्रजांस मात्र यश आलें. व्यापाराच्या व राज्याच्या संबधांत ठोकळ मानानें पाहतां निरनिराळ्या युरोपियन राष्ट्रांची हिंदुस्थानचे किनाऱ्यावर साधारणपणें सन १५०० ते १६००, पोर्तुगीज, १६०० ते १७०० डच, १७०० ते १७६० फ्रेंचांची सरशी असून पुढें इंग्रजांची झाली. मोंगल, मराठे व इतर युरोपियन राष्ट्राबरोबर झालेल्या राजकीय घडा-

मोडींत इंग्रजास यशच येत गेलें. हिंदुस्थानांत एकी नाहीं, पगार देईल त्याची नोकरी इमानें इतबारें करण्यास इकडे पाहिजे तितके लोक स्वकीयांविरुद्धहि लढण्यास मिळतात व राजेरजवाड्यांत आपसांत कलहाची परमावधि झाली आहे, अशा प्रकारची बारिक माहिती प्रथमतः इतिहास प्रसिद्ध फ्रेंच मुत्सद्दी डुप्ले यानें प्रसिद्ध केली; व पाठबळ मिळाल्यास हिंदुस्थान तेव्हांच पादाक्रांत करतां येईल असा त्या शाहण्या पुरुषानें तर्क बांधिला. परंतु अंतः कलहामुळें फ्रेंचांस हें काम तडीस नेणें झालें नाहीं. परंतु त्यांच्या अटकळींचा व कल्पनांचा फायदा इंग्रजांनीं मात्र मोठ्या धिमेपणानें घेतला व ते हिंदुस्थानचे धनी झाले.

इंग्रजांच्या राजकीय इतिहासाचा आरंभ आठरावे शतकाचे आरंभीं कर्नाटकांत फ्रेंचांशीं झालेल्या लढायांपासून होतो. यापूर्वीं इंग्रजांची वसाहत म्हणजे मद्रासचा फोर्ट सेंट जार्ज हा किल्लाच काय तो होता. फ्रेंचांची वसाहत पांडेचरीस होती व बरींच वर्षें त्यांच्यांत व्यापारांत स्पर्धा व राजकीय महत्त्वाकांक्षा नव्हती; औरंगजेबाचे मृत्यूनंतर दक्षिणेंत अनेक स्थानिक राज्यें स्वतंत्र झालीं. अशा स्थितींत इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांत युद्ध जुंपलें. तेव्हां साहजीकपणें इकडेहि वसाहतींत लढाई सुरू झाली. यावेळीं डुप्ले हा फ्रेंचांचा गव्हर्नर होता. आपल्याशीं स्पर्धेनें वागणाऱ्या इंग्लिश व्यापाऱ्यांस हांकून लावावें असें त्याच्या मनांत होतें. त्याप्रमाणें त्यानें लाबरदोनेचे हाताखालीं मोठें आरमार देऊन पाठविलें. लाबरदोनेनें मद्रास काबीज केलें. पण युरोपांत तह होऊन त्यांची त्यांस ठाणीं परत मिळालीं. दुसऱ्या युद्धाचें मूळ युरोपांत नसून हिंदुस्थानांतल्या राजकारणांतच होतें. सन १८४८ त निजाम उल्मुल्क मरण पावल्यानंतर त्याच्या मुलामध्यें व त्याचाच आश्रित अर्काटचा नबाब या दोन्ही ठिकाणीं वारसाचे तंटे उपस्थित झाले. याचा फायदा घेऊन हिंदुस्थानांत फ्रेंचांचें साम्राज्य स्थापण्याचा डुप्लेचा बेत होता. फ्रेंचांनी एक बाजू उचलली कीं, इंग्रजांनीं दुसरी घ्यावयाची. प्रत्यक्षपणें हैद्राबाद अगर अर्काटचे नबाबास अधिकारारूढ करणें हें जरी बाह्यतः तंट्याचें कारण असलें तरी अप्रत्यक्षपणें प्रतिस्पर्ध्यास हिंदुस्थानांतून हांकून लावणें हा अंतःस्थ हेतू होता.

इंग्रजी अम्मल

कर्नाटकांतील लढाया (पहिली). १७४४–४८

दुसरी १७४९–५४

या युद्धांत परस्परांच्या व त्यांच्या हस्तकांच्या लहानमोठ्या अनेक झटापटी होऊन एकमेकांचे जयपराजय झाले. फ्रेंचांनीं डुप्लेस परत बोलावून एकदम युद्ध बंद केलें. त्यामुळें डुप्लेचे सर्व बेत फसले. महमदअल्लीस अर्काटची नबाबगिरी दिल्यामुळें इंग्रजाचें वजन वाढलें. तथापि हैद्राबादेस अद्यापि फ्रेंचांचें वर्चस्व होतें. तात्पुरती लढाई बंद झाली तरी त्यांची स्पर्धा सन १७६० च्या वांदिवाशच्या लढाईपर्यंत थांबली नाहीं. या लढाईत फ्रेंचांचा पूर्ण पराजय झाला. तेव्हां तह होऊन फक्त पाँडेचरी फ्रेंचाकडे राहिली व मद्रास इलाख्यांत इंग्रजांची सत्ता कायम झाली.

तिसरी
१७५६–६१

याच सुमारास बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान मरण पावला. व नागपूरकर भोसल्यानीं बंगाल्यांत स्वाऱ्या करून सर्वत्र धुमाकूळ उडविला होता. या मराठ्यांच्या हल्ल्यापासून आपल्या वखारींचा बचाव होण्यासाठीं इंग्लिश कंपनीनें खणलेला खंदक अद्यापि ' मराठा डिच ' या नांवानें प्रसिद्ध आहे. आलिवर्दीखानाचे मागून सुराजउद्दौला हा नबाब झाला. नबाबाचा कोणी अपराधी इंग्लिश वखारींत लपला होता. त्यास नबाब मागत असतां इंग्लिशांनीं न दिल्यामुळें त्यानें मोठ्या फौजेनिशीं कलकत्त्यावर स्वारी केली. तेव्हां पुष्कळ इंग्लिश लोक हुगळीमार्गें जहाजांत बसून पळून गेले. सांपडलेल्या १४६ लोकांस नबाबानें क्रूरपणानें एका अगदीं अरुंद कोठडींत रात्रभर कोंडून ठेवलें. हवा दूषित झाल्यामुळें सकाळीं त्यांतले फक्त २३ जण जिवंत राहिले होते. ह्या प्रकारास कलकत्त्याची अंधार कोठडी म्हणतात.

ही अनर्थाची बातमी मद्रासेस पोहोंचली तेव्हां क्लाइव्ह विलायतेहून परत आला होता. हा फार हुशार, धाडशी व दूरदर्शी होता. फ्रेंच गव्हर्नर, डुप्लेचें धोरण ओळखून हिंदुस्थानांत इंग्रजी राजसत्तेचा पाया घालणारा हाच दूरदर्शी पुरुष होय. क्लाइव्ह ससैन्य कलकत्त्यास येऊन त्यानें नबाबी मिळवून देण्याचें मिषानें नबाबाचा सेनापति मिरजाफर यास वश करून घेतलें. इंग्लिश फौज सुराजउद्दौलावर चालून गेल्यावर उभयतांची लढाई प्लासी येथें झाली व ऐन प्रसंगीं संकेताप्रमाणें मिरजाफर इंग्लिशास येऊन मिळाला.

प्लासीची लढाई
१७५७
क्लाइव्ह

अर्थात सुराजचा पराभव होऊन तो पळत सुटला व वाटेंत मारला गेला. मिरजाफरास नबाब केल्यावर क्लाइव्ह वगैरेस मोठमोठीं बक्षिसें व इंग्लिश कंपनीस चोवीस परगण्यांची जमिनदारी मिळाली. एकट्या क्लाइव्हनेंच तीस लाख रुपये बक्षिस घेतलें. हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्यस्थापनेचा आरंभ दिवस हाच होय. हा प्रथम मिळालेला प्रांत अद्यापि " चोवीस परगणे" म्हणून प्रसिद्ध आहे. इतिहासाचा क्रम बदलून टाकणाऱ्या ज्या कित्येक लढाया जगांत आजवर झाल्या आहेत त्यांत प्लासीच्या लढाईची गणना तज्ज्ञांनीं केली आहे.

द्रव्यलोभामुळें मिरजाफरची नबाबी पुढें कंपनीनें त्याचा धनाढ्य जांवई मिरकासिम यास दिली. याबद्दल त्यानें बरद्वान, मिदनापूर व चितागांग हे प्रांत इंग्रजांस दिले, तथापि इंग्रजांचीं ताबेदारी त्यास आवडेना व जकातीचे तंटे उपस्थित होऊन कासीम, अयोध्येचा वजीर व शहाअलम बादशहा असे तिवर्गांनीं मिळून बंगाल इंग्रजाचे हातून सोडविण्याकरितां स्वारी केली. परंतु बक्सार येथें मेजर मन्रोनें त्यांचा पराभव केला, तेव्हां बंगाल प्रांत परत मिळण्याची मुसलमानांची सर्व आशा खुंटली.

बक्सारची लढाई.
१७६४

संपादिलेल्या हक्काची व मुलखाची व्यवस्था लावण्यासाठीं क्लाइव्हला दुसऱ्यांदा गव्हर्नर नेमून इकडे पाठविण्यांत आलें. येतांच त्यानें अयोध्येचा वजीर व बादशहा शहाअलम यांशीं अलाहबादेस तह केला. त्या अन्वयें बादशहानें सालीना २६ लक्ष रुपये खंडणी घेऊन बंगाल, बहार व ओरिसा या प्रांतांचा सर्व जमाबंदी वसूल जिल्हा दिवाणी म्हणतात तिची सनद कंपनीच्या नांवें करून द्यावी; असें ठरविलें व बंगाल प्रांत कंपनीचे हातीं आला. शहाणपण व कर्तबगारीचे जोरावर कंपनीच्या हातीं तराजू ऐवजीं उत्तर हिंदुस्थानांच्या एका भागाची राज्यसूत्रें देऊन क्लाइव्ह १७६७ त स्वदेशीं गेला व पुढें सात वर्षांनीं मरण पावला. असें म्हणतात कीं, हिंदुस्थानांत केलेल्या अन्यायाच्या विचारांनीं त्याच्या मनाचें स्वास्थ्य नाहींसें होऊन त्यानें आत्महत्या केली.

दिवाणी अधिकार
१७६५

ब्रिटिश साम्राज्याचा पाया घालण्याचें श्रेय ज्याप्रमाणें क्लाइव्हकडे त्याचप्रमाणें तें स्थिर व सुव्यवस्थित करण्याचें कामीं वारन हेस्टिंगचे परिश्रम बरेचसे कारणी-

वारन हेस्टिंग्ज
१७७२ ते ८५

भूत झाले आहेत. वारन हेस्टिंग्ज हा ईस्ट इंडिया कंपनीचे अमलांत पहिला गव्हर्नर जनरल होय. एतद्देशीय राजांकडे तैनाती फौज ठेवून त्यांस कह्यांत आणण्याचा उपक्रम प्रथम यानेंच केला. व त्याचेंच अनुकरण पुढें बऱ्याच इंग्रज मुत्सद्यांनीं केलें. याची कारकीर्द काशीचा राजा चेतसिंग व अयोध्येच्या बेगमा यापासून अन्यायानें पैसा काढण्यासाठीं केलेल्या जुलमाबद्दल प्रसिद्ध आहे. याचे कारकीर्दींत मराठ्यांशीं व हैदरशीं झालेल्या युद्धांत फारसा लभ्यांश झाला नाहीं. तथापि त्याच्या एकंदर तेरा वर्षांच्या कारकीर्दींत बनारस, रोहिलखंड, कर्नाटकाचा कांहीं भाग व मुंबई जवळचीं साष्टी वगैरे बेटें वगैरे मुलूख इंग्रज अमलाखालीं आला. विलायतेस गेल्यावर बेगमांवरील केलेल्या जुलुमासारखीं हेस्टिंग्जचीं अन्यायाचीं कृत्यें कौन्सिलच्या कित्येक उदार मताच्या सभासदांस मान्य नव्हतीं. त्याचे हे अन्याय चव्हाट्यावर आणून बर्क व शेरिडन या विद्वान वक्त्यांनीं हिंदु रयतेचा पुढाकार घेऊन हेस्टिंगवर पार्लमेंटमध्यें अकरा आरोपांची फिर्याद मांडली. तिची चौकशी सात वर्षें चालून तो निर्दोषी ठरला, तथापि त्यामुळें पुढील राज्यकर्त्यांच्या वर्तनास पुष्कळ आळा बसला.

ह्याचे कारकीर्दींत हैसूर येथील तिसरी लढाई व त्यानें वसु ह्या बाबतींत केलेल्या सुधारणा ह्याशिवाय दुसरें कांहीं झालें नाहीं. हैसूरचे गादीवर या वेळीं हैदरचा मुलगा टिपू हा होता. हैदर जसा स्वतःच्या शौर्यानें व धाडसानें यःकश्चित शिपायापासून राज्यपदारूढ झाला, तसाच टिपूहि बापाप्रमाणेंच शूर होता. परंतु कॉर्नवालिसनें निजाम व मराठे त्यांच्या साह्यानें टिपूस जेरसिं आणलें. तेव्हां सन १७९२ त उभयपक्षीं श्रीरंगपट्टण येथें तह झाला. त्यांत आपलें अर्धें राज्य टिपूनें त्रिवर्गास द्यावें असें ठरलें. बंगाल्यांत त्यानें केलेल्या कायम धाऱ्याचे पद्धतीनें त्याचें नांव इतिहासांत अजरामर झालें आहे. जमिनदारी, खेडवारी व रयतवारी अशा त्यानें चालू केलेल्या तीन पद्धतींपैकीं जमीनदारी बंगाल्यांत व रयतवारी मुंबई व मद्रास इलाख्यांत चालू आहे. जमिनदारी म्हणजे एका जमिनीदाराच्या ताब्यांत जितक्या जमिनी असतील तितक्यांचा सारा त्यानें भरावा व त्याची सर्व जबाबदारी एकावर असावी. या पद्धतीनें बंगालचें जमिनदारांचें पुष्कळ कल्याण झालें आहे. तो फार निःपक्षपाती होता. त्याचें मागून सर जॉन शोअर हा ग. जनरल

कॉर्नवालिस
आणि
शोअर
१७८५–९८

झाला. आपल्या स्वार्थास धक्का नाहीं तोपर्यंत आपण दुसऱ्याच्या भानगडींत पडावयाचें नाहीं असें त्याचें धोरण होतें. त्याचप्रमाणें त्याची कारकीर्द शांततेची गेली. तो १७९८ त विलायतेस गेला,

हिंदुस्थानांतलें इंग्रजाचें महत्व कमी केल्याशिवाय त्यांचें युरोपांतलें वर्चस्व कमी व्हावयाचें नाहीं हें ओळखुन नेपोलियननें इकडे टिपू, निजाम वगैरेकडे संधान बांधलें, टिपू तर उघड उघड द्वेष करीत होता. ही परिस्थिती ओळखून वेलस्लीनें निरनिराळ्या राजे रजवाड्यांशीं युक्तीनें तह करून त्यांस आपल्या कह्यांत आणलें. मोगल साम्राज्याची वाताहत होऊन ती सत्ता मराठ्यांकडे अगर निरनिराळ्या स्वतंत्र सुभेदारांकडे अगर प्रबळ होऊं लागलेल्या इंग्रजांकडे जावयाची होती. ती या कारस्थानी पुरुषानें इंग्रजांकडेच आणिली. यानें तैनाती फौजेची पद्धत सर्वत्र अमलांत आणिली. हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य स्थापन होण्यास हीच पद्धत मुख्यतः कारण झाली आहे. याचें इंगित फक्त नाना फडनवीसास समजलें होतें व १७९९ त तो जिवंत असतां इंग्लिशांनीं बोलणें लावल्यावेळीं त्यानें पेशव्यांकडून तिचें अवलंबन करण्याचें अमान्य करविलें होतें. याचे कारकीर्दीत म्हैसूरचे वाघाचा (टिपू) शेवट, मराठ्यांशीं युद्ध, व शेवटीं तंजावर खालसा होऊन इंग्लिशांस पुष्कळ मुलूख मिळाला. याचें खरें कारस्थान मराठ्यांशीं केलेल्या युद्धांत दिसून येतें. मराठे प्रबळ होते एवढेंच नव्हे तर ते आपणांस हिंदुस्थानचें मालक समजूं लागले होते. म्हणून त्यांच्या वाढत्या सत्तेचा नाश करून तीन महिन्यांच्या प्रचंड युद्धानें महाराष्ट्रांत—हिंदुस्थानांत सार्वभौम सत्ता कायम केली. १८०२ च्या वसईच्या तहानें त्यानें मराठ्यांचें स्वातंत्र्य संपुष्टांत आणलें. याचे नंतरचा कॉर्नवालिस लवकरच मरण पावल्यावर सर जॉर्ज बार्लो हा त्याचे जागीं आला.

मार्किस ऑफ वेलस्ली १७९८–१८०५

बार्लोनें चालूं असलेलीं युद्धें एकदम बंद करून तह केलें. ह्याच्या वेळची प्रसिद्ध गोष्ट म्हणजे वेलोर येथील शिपायांचा दंगा (१० जुलई १८०६) ही होय. मिंटोचें धोरण शांतता राखण्याचें होतें. रशिया वायव्येकडून स्वारी करणार अशी वदंता उठल्यामुळें अफगाणिस्तान, इराण व पंजाबच्या रणजितसिंगाचे दरबारीं त्यानें वकील पाठवून तह केले व सरहद्दीचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. मार्किस हेस्टिंग्जची कारकीर्द युद्धांनीं भरलेली आहे. पेंढाऱ्या-

बार्लो, मिंटो व हेस्टिंग्ज १८०५–२२

शीं व मराठ्यांशीं युद्ध करून त्यानें वेलस्लीचें अर्धवट राहिलेलें काम पुरें केलें. शिवाय नेपाळ दरबारशीं दोन युद्धें झालीं. पहिल्या मोहिमेंत इंग्रजांचा सेनापति जनरल गिलेस्पी गोळी लागून पडला व सैन्याची वाताहत झाली. दुसरींत गुरख्यांचा पराभव होऊन उभयपक्षीं तह ठरला. त्यामुळें परस्पर सरहद्द नक्की ठरली जाऊन सिमला, नैनिताल वगैरे हवाशीर ठिकाणें इंग्रजांस मिळालीं. दुसऱ्या बाजीरावाच्या अंगीं धैर्य नव्हतें तथापि वसईच्या तहानें बांधून घेतलेलीं बंधनें ढिलीं करण्याचा त्याचा विचार होता. परंतु नानाचे पश्चात धोरणी मुत्सद्दी कोणीच न राहिल्यामुळें त्यानें उपस्थित केलेलीं कारस्थानें सिद्धीस गेलीं नाहींत. १८१८ च्या अखेरीच्या सामन्यांत बाजीरावास पळ काढावा लागल्यामुळें पेशव्यांचें व पुढें नागपूरचें राज्य इंग्रजांचे हस्तगत झालें. शिवाजीचे एका वंशजास साताऱ्याचे गादीवर बसवून त्याकडे दिलेला थोडासा भाग खेरीज करून बाकीचा सर्व मुलूख इंग्रजांचे हातीं आला. अशा रीतीनें कित्येक नवीन राज्यें कंपनीचे राज्यास जोडून तो १८२३ त स्वदेशीं निघुन गेला,

हेस्टिंग्जच्या वेळेस मराठ्यांचे राज्य इंग्रजांकडे जाऊन बहुतेक हिंदुस्तान ब्रिटिश अमलाखालीं आले होते, अर्थात पुढलीं पन्नास वर्षें राज्याची स्थायिकता व मजबुती यांत गेलीं. इतउत्तरची युद्धें केवळ सरहद्दीसंबंधाची होत. याचे कारकीर्दीत ब्रह्मदेशाशीं युद्ध व भरतपूरचा वेढा या दोन महत्वाच्या गोष्टी घडल्या. याचे कारकीर्दीत सिमला हें गव्हर्नर जनरलचें उन्हाळ्यांत राहण्याचें ठिकाण झालें. लॉर्ड बेंटिंगच्यावेळीं राज्य स्थापनेचें बहुतेक काम संपलें होतें, त्यानें राजेरजवाड्यांचे इंग्रज सरकारशीं संबंध ठरवून टाकले, कुर्ग व काचर हे दोन प्रांत त्यानें ब्रिटिश राज्यांत सामील केलें. याची कारकीर्द त्यानें केलेल्या सतीची बंदी, ठग लोकांचा बंदोबस्त व इंग्रजी शिक्षणाचा आरंभ वगैरे लोकोपयोगी सुधारणांविषयीं प्रसिद्ध आहे. याच्या मागें कांहीं दिवस सर चार्लस मेटकाफ यानें काम पाहिलें पण तेवढ्या थोड्या अवधींत त्यानें दिलेल्या मुद्रण स्वातंत्र्य या महत्वाच्या देणगीमुळें त्याचे नांव चिरस्मरणीय झालें आहे.

लॉर्ड अमहर्स्ट
व
वि. बेंटिंग
१८२३-३५

अफगाण व इराण यांच्या साह्यानें रशिया हिंदुस्थानाकडे डोकावणार अशी दाट बातमी पसरली. व अफगाणिस्तानाच्या राज्याकारभारांतहि त्यां

लार्ड आकलंड
व
एलिनबरो.
१८३९–४४

वेळीं घोंटाळे उत्पन्न झाले होते. अफगाणांनीं दोस्त महंमदखान यांस आपला बादशहा केला होता. ही संधि साधून त्याचा प्रतिस्पर्धी शहासुजाचा पक्ष घेऊन तिकडे आपलें वर्चस्व स्थापण्याच्या विचारानें लॉर्ड आकलंडनें अफगाणिस्थानांत सैन्य पाठवून शहासुजास गादीवर बसविलें व दोस्त महंमदास कैद करून कलकत्यास आणून ठेविलें. ही गोष्ट त्याचा मुलगा अकबरखान व अफगाण लोक यांस न रुचून त्यांनीं बंड उभारलें व त्यांनीं इंग्रजांच्या सर्व फौजेस हांकून लाविलें. परत निघालेल्या सैन्याची वाटेंत गांठून अकबरखानानें निष्ठुरपणें कत्तल केली. १६००० सैन्याची ही हृदयद्रावक हकीकत सांगण्यास डॉ. ब्रायडन नांवाचा एक मनुष्य जिवंत जलालाबादेस येऊन पोहोंचला. या गोष्टिमुळें आकलंडची विलायतेस नाचक्की होऊन त्याचे जागीं लॉर्ड एलिनबरो यांस नेमिलें. यानें पुनः सैन्य पाठवून बंदींत पडलेले लोक सोडवून आणले व दोस्त महंमद यास परत पाठवून तंटा मिटविला. पण यामुळें इंग्रजांचा अफगाणिस्थानाशीं संबंध तुटला. याशिवाय मुख्य गोष्ट सिंधप्रांत इंग्रजी राज्यास जोडला गेला.

महाराज रणजितसिंग मरण पावल्यावर राज्यांत कोणी शास्ता न उरल्यामुळें सशस्त्र शीख सरदारांनीं इंग्रजांबरोबर सामना केला. तो हार्डींजचे कारकीर्दींतलें पाहिले शीख युद्ध (१८४५) या नांवानें इतिहासांत नमूद आहे.

लार्ड हार्डिंज
व
डलहौसी
१८४४-५६

यामुळें सतलज नदीच्या पुर्वेकडील प्रदेश इंग्रजास मिळाला. याचे मागें लॉर्ड डलहौसी हा ग. ज. झाला. याची कारकीर्द "खालसा कारकीर्द" म्हणून प्रसिद्ध आहे. याचें पूर्वी इंग्रजी राज्य बरेंच तुटक होतें. परंतु त्यानें तें बहुतेक सलग केलें. याच्या कारकीर्दीच्या महत्वाचें एक कारण असें कीं, तो स्वदेशीं परत गेल्यावर १८५७ सालीं हिंदुस्थानांत बंड झालें. या बंडाची कारणेंहि त्याच वेळीं घडलीं. शीख व ब्रह्मी युद्धें होऊन पंजाब व दक्षिण ब्रह्मदेश खालसा झाला. खेरीज औरस संततीचे अभावीं दत्तक वारस नामंजुर करून सातारा झांशीं, वारस नाहीं या सबबीवर कर्नाटक, तंजावर, नागपूर आणि राज्यांत अव्यवस्था या सबबीवर अयोध्या प्रांत इत्यादि लहान मोठ्या एतद्देशीय

राजेरजवाड्यांचीं राज्यें त्यानें सपाट्यानें एकसहा खालसा केलीं. दुसऱ्या बाजीरावाची नेमणूक त्याचा मुलगा नानासाहेब यास न दिल्यामुळें चिडून जाऊन नानासाहेब बंडांत सामील झाला. याचे कारकीर्दीत रेल्वे, तारायंत्र व गंगेच्या कालवा हीं सार्वजनिक दृष्ट्या उपयुक्त कामें झालीं; तथापि त्यानें राज्यविस्ताराचे भरीं पडून संस्थानें खालसा करून प्रजेची मनें फारच दुखविली होतीं. याचे अनिष्ट परिणाम ह्मणजे देशांत बंडाळी उत्पन्न झाली व ती सत्तावन सालचे बंड म्हणून प्रसिद्ध आहे.

लॉर्ड कॅनिंग १८५६-६२

कॅनिंग हिंदुस्थानांत आल्यावेळीं डलहौसीच्या खालसा सत्रामुळें उत्तर हिंदुस्थानांत लोकांची मनें अस्वस्थ झालीं होतीं. त्यांतच बंडाचा प्रादुर्भाव होण्याचें एक तात्कालिक कारण असें झालें कीं, नवीन रायफल बंदुकांची काडतुसें डुकराच्या व गाईच्या चरबीनें साफ केलीं अशी खोटी अफवा पसरली व सरकार आपल्यास धर्मभ्रष्ट करणार असा पलटणींतलि हिंदू व मुसलमान शिपायांचा ग्रह होऊन ते अधिकच चेतले ही संधि साधून असंतुष्ट झालेल्या नानासाहेबानें पुढें होऊन बंडाचें निशाण उभारलें. ता ७ मे १८५७ रोजीं बंडास सुरुवात झाली, तें १८५८ अखेर होतें. अयोध्येची बेगम, बरेली व बांदा येथील नवाब, झांशीची राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब, तात्या टोप वगैरे बंडांत सामील झाल्यामुळें बंडास चांगलाच रंग चढला. बंडवाल्यांची प्रथम बरीच सरशी झाली व दिल्ली, आग्रा, ग्वाल्हेरसारखीं महत्वाचीं ठिकाणें त्यांचे हस्तगत झालीं. व त्यांनीं कित्येक इंग्रज पलटणीस कापून काढण्यासारखीं घोर कृत्यें केली. या बंडाचा वणवा दक्षिणेंत पेटून नरगुंद वगैरे ठिकाणीं बंडें झालीं. तरी इंग्रज सरकारानें दोन वर्षांच्या अवधींत बंडाचा मोड करून टाकला. लक्ष्मीबाई ठार झाली. नानासाहेब नेपाळांत पळून गेला. बहादुरशहास पकडून रंगून येथें कैदेंत ठेवण्यांत आलें व जिकडे तिकडे शांतता झाली. याचा परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत एक मोठी राज्यक्रांति झाली. ती ही कीं, ई. इं. कंपनीचे अधिकार काढून घेऊन राज्यसूत्रें महाराणी व्हिक्टोरियानें आपलें हातीं घेतली. महाराणीनें १८५८ त उदार मनाचा जाहिरनामा प्रसिद्ध करून राजे रजवाड्यांस व सामान्य लोकांस थोर आश्वासनें दिलीं व या योगानें बंडाचा उपशम झाला. यावेळीं ग. जनरल यास व्हाँइसराय हा नवीन किताब मिळाला. सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर लॉर्ड कॅनिंग १८६२ त विलायतेस निघून गेला.

बंड संपल्यानंतर जी राज्यव्यवस्था अमलांत आली तीच बहुतेक अद्यापि चालू आहे. महाराणीला हिंदुस्थानच्या

महाराणी व्हिक्टोरिया

लोकांची अतिशय कळकळ वाटत असे. १८७७ त दिल्ली येथें मोठा दरबार भरवून हिंदुस्थानची बादशाहीण हा नवीन किताब तिनें स्वीकारला. ह्या सन१९०१मध्यें निवर्तल्यावर सातवे एडवर्ड हे गादीवर बसले, ते शांतताप्रिय होते म्हणून त्यांस शांतता प्रस्थापित करणारा हें अन्वर्थक नांव मिळालें होतें. यांचे मागून त्यांचे चिरंजीव पांचवे जॉर्ज हे हिंदुस्थानचे बाददशहा झाले आहेत. आपले हे राज्यकर्ते पांच हजार मैल रहात असल्यामुळें येथें त्यांचे जे प्रतिनिधी येतात त्यांच्याच हस्तें या देशाचा बहुतेक राज्यकारभार चालतो म्हणून महाराणीकडे राज्याची सूत्रें गेल्यापासुन आजवर जे राजप्रतिनिधी (व्हाइसरॉय) होऊन गेले त्यांची हकीगत थोडक्यांत खालीं दिली आहे.

नांव कारकीर्द व महत्वाच्या गोष्टी

लॉर्ड एल्जिन १८६२–६३ लॉर्ड एल्जिन लवकरच मरण पावला.

सर जॉन लॉरेन्स १८६३–६९ भुतान व अफगाणिस्थानशीं लढाई. ओरिसांत भयंकर दुष्काळ पडला. मॅजिस्ट्रेट पासून व्हॉइसरॉय सारख्या महत्पदावर चढलेला हा एकच व्हॉइसरॉय होऊन गेला.

लॉर्ड मेयो—१८६९–७२ शेतकी खातें स्थापन केलें, देशांत सडका आगगाडीचे रस्ते व कालवे वाढविले, अंदमान बेटांत एका कैद्यानें त्याचा खून केला.

लॉर्ड नॉर्थब्रुक १८७२–७६ मल्हारराव गायकवाड यांस पदच्युत करण्यांत आले, प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानांत आले. बंगाल प्रांतांत दुष्काळ पडला.

लॉर्ड लिटन १८७६–८० महाराणी व्हिक्टोरियानें हिंदुस्थानची बादशाहीण हें पद धारण केलें; पुणें प्रांतीं वासुदेव बळवंत फडक्याचें बंड, वर्तमान पत्रांचे स्वातंत्र्य नष्ट करणारा कायदा करण्यांत आला.

लॉर्ड रिपन १८८०–८४ अफगाण लढाईचा शेवट, मुद्रण स्वातंत्र्य पुन्हा मिळालें, स्थानिक स्वराज्य देण्यांत आले;म्युनिसिपालिट्यांची स्थापना.आयात मालावरील जकात माफ केली, हा फार लोकप्रिय होऊन गेला.

लॉर्ड डफरीन १८८४–८८ ब्रह्मदेशाशीं शेवटची मोहिम, तेथील थीबा राजास रत्नागिरीस आणून ठेवलें. लेडी डफरिनच्या नांवानें वर्गणी गोळा करून बायकांकरितां दवाखानें घालण्यांत आले. हिंदुस्थानांत राष्ट्रीय सभेची स्थापना झाली.

लॉर्ड लॅन्सडाऊन १८८८–९४ मणीपूरचे बंड. मुंबईचा हिंदु मुसलमानांचा दंगा (१८९३)

लॉर्ड एल्जिन १८९४–९९. १८९६ सालचा भयंकर दुष्काळ, प्लेगचा आजार प्रथम याच सुमारास सुरू झाला. व तो आतां तर देशभर पसरला आहेच.

लॉर्ड कर्झन १८९९–१९०५ युनिव्हर्सिटी, पोलीस प्लेग, व इरिगेशन वगैरे कमिशनें नेमिली. रूसो जपानची लढाई जपानचा जय. १९०१–०२ सालीं लागोपाठ दुष्काळ. बंगालची फाळणी व स्वदेशी चळवळीचा आरंभ.

लॉर्ड मिंटो १९०५–१० प्रिन्स ऑफ वेल्स यांचें हिंदुस्थानांत आगमन वंगभंगामुळें बंगाल्यांत असंतोष. कित्येक ठिकाणीं बॉंबचे अत्याचार. राजद्रोहाचा कायदा करण्यांत आला राजद्रोहाचे सत्र सुरू झालें व लोकमान्य पुढाऱ्यांस शिक्षा- मोर्ले–मिंटो सुधारणा (१९०९) १९०९ चा इंडियन कौन्सिल्स अॅक्ट. या कायद्यामुळें कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांस राज्य कारभारातील सामान्य धोरणाबद्दल नवीन ठराव मांडण्याच्या व मंजुर झालेल्या ठरावावर प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळाला.

लॉर्ड हार्डिंज १९११–१९१६. पंजम जॉर्ज बादशहा हिंदुस्थानांत आले. दिल्लीचा बादशाही दरबार (१९११) बादशहाची देणगी, राजकारभा- राचे धोरणांत कांहीं फरक करण्यांत आला. वंगभंग रद्द झाला. कलकत्ता मोडून दिल्ली ही हिंदुस्थानची राजधानी करण्यांत आली. नूतन राजधानीचे प्रवेश प्रसंगीं व्हाइसरॉयवर कोणी माथेफिरून बॉंब फेकला; तथापि लॉर्ड हार्डिंजनें आपली शांत वृत्ति ढळूं दिली नाहीं हा लोकप्रिय होऊन गेला. युरोपांत महायुद्ध सुरू झालें.

लॉर्ड चेल्म्सफर्ड १९१६–२० प्लेग थोडा कमी झाला तोंच इन्फ्लू- एंझा नांवाचा नवीन सांथीचा रोग देशांत सुरू झाला (१९१८) युरोपांतील

महायुद्धाचा शेवट, राजपद्धतींतील सुधारणा, युद्धयमान राष्ट्रांच्या तहपरिषदेंत तहनाम्यांवर हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून बिकानेरचे महाराजांनीं सही केली. मॉटेग्यु चेल्मसफर्ड रिपोर्टाच्या अन्वयें १९१९ चा रिफॉर्म ॲक्ट अथवा-हिंदी सुधारणांचा कायदा, या कायद्यानें नवीन कौन्सिलें निर्माण झालीं व कांहीं खातीं लोक प्रतिनिधींकडे तोडून दिलीं गेलीं; लोकमताचा थोडा अधिक प्रवेश झाला, लो. टिळक दिवंगत झाले १९२०. महात्मा गांधींनीं सरकारशीं अनत्याचारी असकारिता पुकारिली.

लॉर्ड रीडींग १९२१ मलबारांत मोपल्यांचे बंड. असहकारितेची चळवळ दाबून टाकण्याकरितां दडपशाहीची मोहीम, स्वयंसेवक संस्था बेकायदेशीर ठरविल्या. हजारों राष्ट्रीय सभावाल्यचो तुरुंगांत रवानगी. प्रिन्स ऑफ वेल्सचें हिंदुस्थानांत आगमन. स्वागतावर बहिष्कार. आगमनाचें पहिलेंच दिवशीं मुंबईस दंगा. गुरुकाबाग येथील शीखांचा सत्याग्रह, नाभाच महाराजांस पदच्युत केलें. शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक कमेटी व अकाली दल · या संस्था बेकायदेशीर ठरविल्या. मिठावरील कर वाढविण्यांत आला. दे. बं. दास यांचा मृत्यु. इंदूरचे महाराजांस पदच्युत केलें.

राज्यकारभाराची उत्क्रांति

हिंदुस्थान देशाचा विस्तार व तेथील निरनिराळे मानव वंश लक्षांत घेतां सर्व देश एकछत्री अमलाखालीं आणणें केव्हांहि कठीणच होतें; तथापि तसे प्रयत्न बऱ्याच प्राचीन काळापासून करण्यांत आले आहेत. त्यांतला पहिला प्रयत्न सम्राट अशोकच्या वेळचा होय. त्यानें लोकहितदक्ष असें अंमलदार नेमून सर्व देशभर सुराज्य व्यवस्था केली; पण केवळ स्वतःच्याच हिंमतीवर व तंत्रावर अवलंबून राहिल्यामुळें त्याचे पश्चात ती व्यवस्था टिकली नाहीं. थोड्याच काळांत त्याचे साम्राज्य लयास गेलें. त्याच्या नंतरच्या प्रयत्न म्हणजे मोगल बादशहा अकबराचे वेळचा होय. अकबरानें एकंदर १५ सुभे केले व त्यावर नेमलेल्या अधिकाऱ्यांस मुलकी तसेंच लष्करी अधिकारहि असत. अकबरानें जमीनीची मोजणी करून धारा ठरविला. औरंगजेबाचे हयातीपर्यंत साधारणतः ती व्यवस्था अमलांत राहिली तरी मराठ्यांचा उदय होऊन पुढें विस्तार झाला व त्यांनीं बहुतेक देश आक्रमिला. यद्यपि त्यांचा एकछत्री अम्मल स्थापित झाला नाहीं; तरी मोगल साम्राज्याच्या विनाशाचें बीज याचे हयातीं-

तच पेरलें गेले. मोगल मराठ्यानंतर या देशांत इंग्रजी राज्यसत्ता हळूहळू उदयास आली. अव्वल इंग्रजींत ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल होता. कंपनी व तिचे कामगार यांच्या राज्यकारभाराच्या धोरणांत दूरदर्शीपणा नसल्यामुळें देशांत बंड झालें. सन १८५७ हें बंड ५७ सालचे शिपायाचें बंड म्हणून प्रसिद्ध आहे. या बंडांत ज्यांचीं राज्यें खालसा केलीं अशीं कित्येक घराणीं सामील झालीं होतीं. बंडाचा उपशम झाल्यानंतर पुढील सालीं एक कायदा करण्यांत आला, त्या अन्वयें कंपनीचे हातून राज्य कारभार निघून खुद्द राजसत्तेचा अम्मल चालू झाला. यावेळीं महाराणी व्हिक्टोरिया गादीवर होती. बंडानंतर जिकडे तिकडे स्थिर-स्थावर झाल्यानंतर प्रत्यक्ष युद्ध वगैरे संपलेंच व यापुढें हिंदुस्थान विषयक इंग्लंडचें धोरण काय रहावें याचा खल होऊन राणीनें एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्या अन्वयें राज्यव्यवस्थेची जी पुनर्रचना झाली तीमुळें यापूर्वी येथील गव्हर्नरजनरल व ब्रिटिश प्रधान मंडळ यांचे दरम्यान कोर्ट ऑफ डायरेक्टर्स वगैरे जी परंपरा होती ती नाहींशी होऊन तिचे जागीं सेक्रेटरी ऑफ स्टेट व त्याचे कौंसिल हा एकच जबाबदार अधिकारी झाला.

इंग्रजी राज्यव्यवस्था
इंग्लंडचा ताबा

राणीचे जाहिरनाम्याचा उद्देश सन १८६१ च्या इंडियन कौन्सिलचा ॲक्ट या कायद्यानें सफळ झाला. सदर कायद्यानें कायदे मंडळें अस्तित्वांत आलीं. सन १८९२ च्या कायद्यानें कायदे कौन्सिलांची वाढ करण्यांत आली. त्या योगें कौन्सिलच्या मेंबरांची संख्या वाढविण्यांत आली. या कौन्सिलमध्यें आपले प्रतिनिधी निवडून पाठविण्याचा अधिकार जमीनदार म्युनिसिपालिट्या वगैरेंना मिळाला व अशा प्रतिनिधींना चालू राज्यकारभारातील महत्वाच्या बाबीवर प्रश्न विचारण्याचा व अंदाज पत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार मिळाला. सन १९०९च्या कायद्यानें ज्याला मोर्लेमिंटो सुधारणा ह्मणतात त्याची वाढ करण्यांत आली त्या योगें कायदे कौन्सिलच्या बहुमतानें कायदा पास झाला तरी तो अमलांत आणण्यास सरकार बांधले गेलें नसले तरी सभासदास सार्वजनिक हिताच्या महत्वाच्या गोष्टींवर ठराव आणण्याचा अधिकार मिळाला; तथापि राष्ट्रांत झालेल्या जागृतीनें लोकांचे समाधान झालें नाहीं.त्यांस लोकांच्या खऱ्या खऱ्या आकांक्षा तृप्त करणारे स्वराज्याचे अधिकार पाहिजे होते. दरम्यान युरोपांत महायुद्धाची खळबळ उडाली

व नवीन मनू सुरू झाला. वर्तमानपत्रांचा कायदा राजद्रोहाचा कायदा वगैरेमुळें देशांत असंतोष पसरला. मोर्लेमिंटो सुधारणानुसार चाललेल्या कारभारांत व राज्य-पद्धतींत कांहीं सुधारणा झाल्याखेरीज आपले दुःख हलके होणार नाहीं असें लोकांस वाटूं लागले, या जाणीवेचें दृश्य स्वरूप म्हणजे होमरूललीगची स्थापना (१९१६) झाली. राष्ट्रीय सभा व मुस्लीम लीग या सर्वमान्य संस्थानीं एक मुखानें स्वराज्याची मागणी केली. युद्धकालांत हिंदुस्थानानें केलेली द्रव्यबळ व मनुष्य बळाची मदत लक्षांत घेतां सरकारालाहि राज्यकारभारांत फरक करणें अगत्याचे वाटूं लागले व त्या वेळचे सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. माँटेग्यू यांनीं हिंदुस्थानांत हळूहळू जबाबदार राज्यपद्धति निर्माण करण्याचें पार्लमेंटांत जाहिर अभिवचन (आगस्ट २० सन १९१७) दिलें.

या जाहिर अभिवचनानुसार सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. माँटेग्यू हिंदुस्तानांत आले. व्हॉइसरॉय लॉर्ड चेम्स्फर्ड यांसह मि. माँटेग्यू यांनीं कित्येक प्रमुख ठिकाणांस व संस्थास भेट दिली. निरनिराळ्या वर्गांच्या पुढाऱ्यांचीं मतें ऐकून जो रिपोर्ट पार्लमेंटला सादर केला तो माँटेग्यु चेल्म्स्फर्ड रिपोर्ट होय, व त्याच्या आधारें सन १९१९ चा हिंदी राज्य कारभाराचा कायदा करण्यांत आला. या कायद्यानें अस्तित्वांत आणलेली राज्यपद्धती हल्लीं चालू आहे. या कायद्यानें म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांवरची सरकारी सत्ता काढून घेण्यांत आली व प्रांतिक सरकारचे ताब्यांतलि कांहीं खातीं लोकप्रतिनिधीकडे तोडून देण्यांत आलीं आहेत. अशा सोंपीव खात्याचे हिंदी दिवाण तेवढे कायदे कौन्सिलला जबाबदार आहेत.

ब्रिटिश पार्लमेंट

सन १८५८ ह्मणजे प्रत्यक्ष ब्रिटिश राज्यसत्तेचा ताबा प्रस्थापित झाल्यापासून ज्या सुधारणा अंमलांत आणल्या गेल्या सर्व ब्रिटिश पार्लमेंटच्या मुंजुरीनेच. हिंदुस्थानाविषयक राज्यकारभाराचा अमल चालविणारी सर्वांत वरिष्ठ संस्था ब्रिटिश पार्लमेंट ही होय. गव्हर्नर जनरल व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांची कामें व अधिकार ठरविण्याचा अधिकार पार्लमेंटला आहे, पार्लमेंटच्या मंजुरी खेरीज हिंदुस्थान विषयक कोणताहि महत्वाचा कायदा पास केला जात नाहीं. तथापि पार्लमेंट येथून अर्थातच दूर व तिचे सभासदांस इकडील माहितीहि यथायथाच म्हणून

पार्लमेंटचा वास्तविक ताबा तेवढ्यापुरताच असून बाकी बहुतेक अधिकार व्हॉइसरॉय व स्टेटसेक्रेटरी यांसच आहेत.

सेक्रेटरी ऑफ स्टेट.

सेक्रेटरी ऑफ स्टेट हा पार्लमेंटचा सभासद असून ब्रिटिश प्रधानमंडळापैकीं एक असतो. इंग्लंडच्या राजकीय वातावरणांत लिबरल कॉन्सरवेटिव्ह व मजूर असे तीन प्रबल पक्ष आहेत.सेक्रेटरी ऑफ स्टेटची कारकीर्द आपला पक्ष अधिकारारूढ असेपर्यंत असते, परंतु कौन्सिलला हा पक्षभेद लागू नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यसूत्राचा मुख्य चालक म्हणून सेक्रेटरी ऑफ स्टेट व त्यांचें कौन्सिल यांस आजवर हिंदुस्थानचे तिजोरींतून पगार मिळत होता. हिंदुस्थान विषयक प्रश्नांचे बाबतींत पार्लमेंटनें अधिक लक्ष द्यावें म्हणून नवीन कायद्याप्रमाणें हा खर्च सालिना (५००० पौंड) इंग्लडचे तिजोरींतून घेण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक महत्वाचे बाबतींत गव्हर्नर जनरलला सेक्रेटरी ऑफ स्टेटची अगाऊ मंजुरी मिळवावी लागते. दरसाल हिंदुस्थानचे जमाखर्चाचा खर्डा पार्लमेंटला सादर करण्यांत येतो त्यावेळीं तेथें थोडी बहुत चर्चा होते, या कौन्सिलांत आठ ते बारा सभासद असतात. पैकीं दोन जागा हिंदी सभासदाकरितां आहेत. या सभासदांची मुदत पांच वर्षांची असते. या कौन्सिलला इंडिया कौन्सिल हें नांव असून त्याची बैठक महिन्यातून एकदां होते. इतर सर्व गोष्टीस कौन्सिलचे मताधिक्य लागते तथापि राजकीय व परराष्ट्रीय कारभारांत सेक्रेटरी ऑफ स्टेटला मताधिक्याचें बंधन नसून त्यास पूर्ण मुखत्यारी आहे.

हिंदुस्थान सरकार व्हाइसरॉय

व्हॉइसरॉय अथवा गव्हर्नर जनरल म्हणजे हिंदुस्थानांतला मुख्य अधिकारी अगर राजप्रतिनिधी असून त्यास राजप्रतिनिधीस असावयाचे सर्व महत्वाचे अधिकार असतात. त्याचा सालीना तनखा २५६००० रु. आहे.

गव्हर्नर जनरल व त्याचे कौन्सिल यांची नेमणूक खुद्द बादशाहाकडून होते व तिची मुदत बहुतेक पांच वर्षे असते. गव्हर्नर जनरलचे कौन्सिल दोन प्रकारचें असतें. एक कायदे करणारें व दुसरें त्याचे अम्मल चालविणारें कौन्सिल. गव्हर्नर जनरल व कौन्सिल यांस मिळून हिंदुस्थान सरकार ह्मणतात. या कौन्सिलचे सभासद सरकारनें नेमलेले ते व कमांडर इन चीफ धरून एकंदर आठ अस-

एक्झिक्यूटिव्ह (अम्मल करणारे) कौन्सिल

तात. लॉर्ड मिंटोच्या कारकीर्दीत कौन्सिलची जी वाढ झाली तींत एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचा एक सभासद हिंदी नेमण्यांत यावा असें ठरलें. त्याप्रमाणें मि. सिंह हे या कौन्सिलचे पहिले हिंदी सभासद झाले. या कौन्सिलच्या कामाचे (१) परराष्ट्रासंबंधीं स्वतः व्हॉइसराय कडे (२) फौज फाटा कमांडर इन् चीफ कडे (३) विलायत खातें (४) व्यापार उदीम रेल्वे (५) कायदे कानू (६) वसूल (७) शेतकी व जमीन महसूल (८) शिक्षण व स्थानिक स्वराज्य असें आठ भाग केले असून पहिले दोन खेरीज बाकीचे सहा सभासदाकडे त्यांचीं विशिष्ठ खातीं म्हणून सोपविलेलीं असतात. प्रत्येक सभासद आपल्या खात्यापुरता जबाबदार असतो.

हल्लीं कमींत कमी तीन सभासद हिंदी असावेत असें ठरलें आहे. सभासदांचे वार्षिक वेतन प्रत्येकीं ८०००० रु. आहे. हिंदुस्थान सरकारच्या बैठकी दिल्ली व सिमला अशा दोन ठिकाणीं होतात व त्यांचा प्रवास खर्च सालीना ३८७००० आहे.

कायदे कौन्सिलें ले. असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट

पूर्वी सर्व हिंदुस्थानास लागू असे कायदे करणार वरिष्ट कायदे कौन्सिल ही एकच संस्था होती. सन १९१९च्या कायद्यानें या कौन्सिलांच्या रचनेंत व अंतस्थ कारभारांत बरेच महत्वाचे फेरफार घडवून आणले आहेत. एका वरिष्ठ कायदे कौन्सिलच्या जागीं आतां लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट अशा दोन संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. मध्यवर्ती सरकारकडे असेलेली खातीं व एकंदर हिंदुस्थान विषयक प्रश्न या संबंधीं करावयाचे कायदे या दोन सभा मिळून करतात. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे एकंदर सभासद १४४ पैकीं १०४ लोकनियुक्त व ४० सरकारनियुक्त आहेत. यापैकीं फक्त २६ (कार्यकारी कौन्सिलचे सभासद धरून) सरकारी अधिकारी असतात. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या एकंदर १०४ लोकनियुक्त सभासदांपैकीं मुंबई इलाख्याच्या वांटणीला १६ जागा आहेत. कौन्सिल ऑफ स्टेटचे एकंदर सभासद ६० आहेत. पैकीं ३४ लोकनियुक्त ६ सरकारानियुक्त पण बिगर अधिकारी २० व सरकारी अधिकारी अशी वांटणी आहे. ३४ लोकनियुक्तांत ६ मुंबई इलाख्यातर्फे असतात. प्रांतिक कायदे कौन्सिलच्या सभासदांची

ह्मणून भाग केलें आहेत. तेथील अम्मलदारास ठाणेदार म्हणतात. जिल्ह्याला जसा कलेक्टर तसा तालुक्याला मामलेदार हा अम्मलबजावणी करणारा अम्मलदार असतो. पीकपाण्याचे अंदाज व काळीचा वसूल ही त्याची मुख्य कामें असतात.

१ हिंदुस्थानची राज्य व्यवस्था लोकस्थिती हे पुस्तक पहा. तालुक्याचे खालची पायरी ह्मणजे गांव व खेडीं. पाटील कुलकर्णी हे गांवचे अम्मलदार असतात.

पाटील कुलकर्णी हे वसुलाचे काम करतात. खेरीज पाटलास थोडा पोलिशीचा अधिकार असतो; पूर्वी हिंदुकालांत या देशांत ग्रामपंचायत ही संस्था होती. न्यायाचें काम या संस्थेकडे असे.

गांव व गांवचा कारभार

पाटील हा गांवचा मुख्य व त्याचे मदतीस पांच पंच असत. लहानमोठ्या कज्जांचा निकाल अशा पंचायतीमार्फत होत असे. यामुळें वेळ खर्च व त्रास फारच कमी व न्यायहि चोख मिळे. या पंचायत पद्धतमुळें प्रत्येक गांवहि आपल्या कारभारापुरता स्वतंत्र असे. परंतु ही स्थिती इंग्रजी अमलांत राहिली नाहीं. मद्रास इलाख्यांत मात्र पहिल्या पासूनची पंचायत पद्धत आहे. ती तेवढी कायम राहिली. आतां कायद्यानें पुन्हां ग्रामपंचायतींचें पुनरुज्जीवन होऊं घातले आहे.

जमाखर्च

सन १९२२–२३ सालच्या दुरुस्त अंदाजपत्रकाप्रमाणें हिंदुस्थान सरकारचा त्या सालचा एकंदर वसूल १३३ कोटी २२ लक्ष व खर्च १४२ कोटी ३९ लक्ष होईल असा अंदाज करण्यांत आला होता. त्यांत ९–१६ कोट रुपयांची तूट येत होती. ती भरून काढण्याकरितां अधिक उत्पन्न होईल या अंदाजानें कित्येक कर वाढविण्यांत आले, परंतु तूट यावयाची ती आलीच. याचें कारण कराची अंतिम सीमा ओलांडण्यास कर वाढ करूनहि उत्पन्नांत तूट येते असा अर्थशास्त्राचा नियम आहे, त्यांस हिंदुस्थान सरकारनें धाब्यावर बसाविलें हें होय. पोष्टाचें दर वाढले तरी उत्पन्न वाढले नाहीं हें अलीकडे प्रत्ययास आलेंच आहे. राज्यकारभार चालविण्यास द्रव्य पाहिजे. तें द्रव्य सरकार अगर शासन संस्था कराचें रुपानें गोळा करते, उत्पन्नांपैकीं ठराविक भाग कर म्हणून राजास देण्याची

वहिवाट फार पुरातन कालापासून. प्रजेच्या जिविताचें व मालमत्तेचें संरक्षण करणें राजाचें कर्तव्य आहे व हें करण्यास जो बराच खर्च करावा लागतो तो निभण्याकरितां लोकांवर कर बसाविणें अवश्य होतें. सध्यांच्या शासन संस्थेच्या अनेक बाबींत जमीन–महसूल, रेल्वे, अबकारी, जकात स्टँप, कालवे, मीठ, जंगल, प्राणीवरील कर, अफू टांकसाळ या मुख्य बाबी आहेत, तथापि महत्वाचें उत्पन्न ह्मणजे जमीन महसूल होय. इंग्लंड व दुसऱ्या पुष्कळ देशांत बंगाल्यांत ज्याप्रमाणें जमीनदार आहेत त्याप्रमाणें जमीनीची मालकी खाजगी लोकांकडे म्हणजे जमीनदाराकडे आहे. हे जमीनदार आपल्या जमिनी कुळास भाड्यानें लागवडीस देतात. हिंदुस्थानांत बंगालखेरीज अशी जमिनदारी पद्धत नाहीं, जमिनींची मालकी सर्व इंग्रज सरकारनें आपल्याकडे घेतली आहे; त्यामुळें जमीन महसूल हें उत्पन्नाचें तसेंच राज्यकारभाराचें एक महत्वाचें काम होऊन बसलें आहे. हिंदुकालांत जमिनींचा धारा उत्पन्नाच्या एक द्वादशांश तें एक षष्टांशपर्यंत तोहि धान्याचें रुपानें घ्यावयाचा असे असें मनस्मृतींत सांगितलें आहे. मुसलमानांनीं आपल्याबरोबर लोभ व जबर वसूल गोळा करण्याची पद्धत आणिली, म्हणजे ते उत्पन्नाचा एक तृतीयांश हिस्सा सरकारसारा घेत असत. मोगलांच्या काळचा जमीनधारा पाहतां हल्लींचा वसूल फारच कमी आहे असें म्हटलें पाहिजे. कारण हें प्रमाण सर्वत्र सारखें नसून मध्यहिंदुस्थानांत एक चतुर्थांश, मुंबई व वऱ्हाड वगैरेंत एक सप्तमांश व मद्रासकडे एक दशांश हिस्सा आहे. जमीन लागणीच्या अस्तित्वांत असलेल्या पद्धतींचे दोन प्रकार आहेत. एक जमीनदारी व दुसरी रयतवारी. बहुतेक उत्तर व मध्यहिंदुस्थान आणि बंगाल्यांत पूर्वोक्त व बाकी रयतवारी पद्धति अमलांत आहे. जमीन महसुलाखेरीज प्रत्यक्ष कर वसूल करण्यांत येतो अशांपैकीं मीठ आहे. कराचें प्रमाण दरमणीं २।८।० होतें तें २ रु. व शेवटीं एक रुपया झाला. परंतु पुन्हां लोकमत विरुद्ध असतांहि व्हॉइसरायनीं सर्टिफिकेशनचें जोरावर मिठावरील कर वाढवून दरमणीं २॥८ केला, या कराचें उत्पन्न सालीं सरासरी ११ कोटी ७५ लाख आहे. हिंदुस्थानला दरसाल एकंदरींत जें मीठ लागतें तें संपादण्याचें चार मार्ग आहेत. ते असेः—१ समुद्राच्या पाण्याची वाफ २ मिठाचीं सरोवरें (राजपुताना)३ मिठाच्या खाणी (उत्तर पंजाब) ४ जलमार्गें परकीय आयात.

मीठ तयार करण्याचा हंगाम जानेवारी ते जुलै असतो. व ते तयार करण्याची रीत अतिशय सोपी आहे. पावसाळा सुरू झाला कीं, हा व्यवहार बंद होतो. मालकास दरसाल मिठाच्या खळग्याची जिल्ह्याच्या कलेक्टरची आगाऊ परवानगी घ्यावी लागते. खाडीच्या आसपास एखादी जागा पाहून करावयाचें पहिलें काम म्हणजे आंतूनच एकमेकांत समुद्राचे पाणी खेळेल असे उथळ खळगे तयार करावयाचे,त्यांत पाणी आणून घालून तें बाष्पीभवन होईपर्यंत राहूं द्यावयाचें; हें मिठवण एका खळग्यांतून दुसऱ्यांत जात अखेरीस मोठाले खपले अगर खडे बनतात. हंगाम चांगला साधला तर अशा रीतीनें हंगामांत बारा ते पंधरा वेळ मीठ काढतां येते. परंतु पावसाची फार भिती असते, कारण एकच सर आली तर सर्वच नासून जातें.

मादक पदार्थावरील जो कर वसूल करण्यांत येतो,त्यास अबकारी असें म्हणतात. हें स्वतंत्र खातेंच आहे. यांत दारु, अफू, गांजा, भांग इत्यादि सर्व मादक पदार्थांवर कर आहे. हा कर केवळ विक्रीवर वसुल करावयाचा असतो. कारण सर्व मादक पदार्थ तयार करण्याचा मक्ता सरकारनें आपल्याकडे ठेवलेला आहे. मादक पदार्थ तयार करण्याचें कारखानें देशांत पुष्कळ ठिकाणीं असून तेथें मोहाचीं फुलें वगैरेपासून दारू तयार करण्यांत येतें. अबकारी हें आतां सोंपीव खातें झाल्यामुळें निरनिराळ्या प्रांतांत कराचें प्रमाण निरनिराळे आहे.

आयात निर्गत मालावर जकात आहे. जकात मालाच्या किंमतीवर असते.साधारणपणें आयात मालावर शें. १५ टक्के जकात आहे,नवीन सुधारणा अमलांत आल्यानंतर इतर आयात जकाती बरोबर कापडावरील जकाताहि शे. ११॥ करण्यांत आली आहे. यंत्र सामुग्री वगैरेवर जकातीचे दर कमी आहेत; तर सायकली मोटार गाड्या वगैरे चैनीच्या वस्तूवर शें. ३० टक्के जकात ठेविली आहे. तांदूळ, कापूस, चामडी, चहा, ताग वगैरे खेरीज इतर निर्गत मालावर जकात नाहीं. जकातीचे उत्पन्न सालीं सुमारें ४५ कोटी रुपये आहे.

जकात व प्राप्तीवरील कर

शेतकी खेरीज इतर उत्पन्नांवर असलेल्या जकातीस प्राप्तीवरील कर हें नांव आहे व तो २००० वर उत्पन्न असल्यास दर रुपयास ५ पै ५००० ते १०००० उत्पन्नांवर रुपयास ६ पै प्रमाणें आहे. प्राप्तीवरील कराचे उत्पन्न सुमारें २९ कोटी रु. आहे.

उत्पन्नाच्या मुख्य बाबपैकीं जमीन महसूल, मीठ, जकात, प्रांतांवरील कर वगैरे संबंधीं थोडिशीं माहिती दिली आहे.

इतर बाबी

खेरीज वसुलाची जी दुसरी रेल्वे, कालवे, जंगल स्टँप, पोस्ट वगैरे खातीं आहेत त्याबद्दल उत्पन्न व खर्च हीं दोन्ही जमेस धरणें जरूर आहे. राज्यकारभाराच्या महत्त्वाच्या बाबी-संबंधानें थोडीशी ओळख करण्याचें येथें प्रयोजन नसल्यामुळें इतर प्रत्येक बाबचा जास्त खुलासा करण्यांत आला नाहीं. अधिकारानें दिलेली माहिती त्या त्या स्वतंत्र पुस्तकांत पहावी.

खर्चाच्या बाबी

उत्पन्नाप्रमाणें राज्यकारभाराच्या खर्चाचीहि अनेक खातीं असतात. वसूल करण्याकरितां लागणारा खर्च व त्या त्या खात्यांचा लष्करी खर्च पगार वगैरे बाबी या सदरांत येतात. हिंदुस्थान सरकारचा कारभार उधळेपणाचा आहे अशी ओरड आज कित्येक दिवसांची आहे. याचे प्रत्यंतर म्हणजे बजेटांत साले-साल तूट येणें हें होय. याचें कारण कर देणारांचा पैसा त्यांस परत मिळण्याचें तत्त्व पाळलें जात नाहीं हें होय. खर्चखातीं मोठी बाब म्हणजे लष्करी खर्च होय. वरिष्ट सरकारचा अजमासें निम्मा वसूल यावरच खर्च होतो. सन १९२४–२५ चे अंदाजपत्रकांत लष्करी खर्च ६५ कोटि रुपये दाख-विला असून प्रत्यक्ष खर्च त्याचेंहि वर गेला. म्हणजे एकंदर वसूलांपैकीं शें ७० एका लष्करी खात्याकडे खर्च होतो. हेंच प्रत्यक्ष इंग्लंड शें. ४५तर जपान शें. ४९ या प्रमाणांत करतें. इतका जबर लष्करी खर्च जगांतल्या कोणत्याच देशांत नाहीं. याचें कारण हा खर्च हिंदुस्थानचे गरजांवर नसून इंग्लंडमधील साम्राज्य–सत्ता-वाद्यांच्या तंत्रावर आहे.

इतर बाबी

लष्करी खर्चाखेरीज मुलकी खर्च म्हणजे निरनिराळीं खातीं व त्यांतील सनदी नोकरांचे पगार पेन्शन वगैरे. हा खर्च सुमारें १० कोटि रुपये आहे. त्यांपैकीं फक्त ६ कोटीला लेजिस्ले-टिव्ह असेंब्लीची मंजुरी लागते. बाकीची रक्कम म्हणजे गव्हर्नर व्हॉइसरॉय वगैरे बड्या अधिकाऱ्यांचे तनखे वगैरे बाबतींत असेंब्लीचे तोंडाला अद्यापि कुलूप ठेवलेले आहे. पाटबंधारे, आगगाड्या, दुष्काळी कामें लढाया वगैरे बाबत झालेल्या कर्जावरील व्याज विलायतेतील खर्च, इत्यादि अनेक बाबी आहेत.

राज्यकारभाराचे बहुधा दोन भाग असतात, एक मुलकी व दुसरा लष्करी. राज्याची बळकटी फौजेवर अवलंबून असते, हें राजनीतीचें एक तत्त्व आहे व तें खरेंहि आहे. प्रत्यक्ष लढाईचें वेळीं लष्कर व शांततेचे वेळीं साधारण दंगाधोपा बंदोबस्त वगैरेस पोलीसची आवश्यकता असते. बाकी हत्याराच्या कायद्यामुळें शांतता राखण्यास साहजिकच मदत झाली आहे. हिंदुस्थानांतील फौजेचे एकंदर चार भाग करण्यांत आले असून त्या चारी भागाची मिळून सुमारे २५०००० खडी फौज आहे, त्यापैकीं ८१००० गोरी फौज आहे

पोलीस व लष्कर

खरीज लष्करी शिक्षण मिळालेले व जरूर तेव्हां बोलवतां येईल अशा व्हॉलंटीयरसंची संख्या ३६००० आहे. इंपीरीयल सर्व्हिस म्हणजे लष्करी नोकरींतून पेन्शन घेऊन मोकळे झालेले पण जरूर तेव्हां बोलवतां येईल अशी ३६००० फौज आहे. शिवाय नवीन कायद्याप्रमाणें लवकरच प्रांतिक स्वयंसेवक सैन्य उभारण्यांत येणार आहे. त्यांत आतांपर्यंत मज्जाव असलेल्या कित्येक नागरिकांचा समावेश करण्यांत येणार आहे. हिंदुस्थानांतला लष्करचा मुख्य अधिकारी म्हणजे कमान्डर इन् चीफ. हा व्हॉइसरॉयच्या अनुमतीनें कारभार पहातो. सैन्यांतल्या अधिकाराच्या जागा बहुतेक युरोपियनांच्या हातीं आहेत. लष्करी खात्याकडे सालाचा खर्च कोटीवर आहे. बेकायदेशीर वर्तन करणारांस न्यायासनासमोर आणणें, गुन्ह्याचा तपास करणें, वगैरे एकंदरींत जीवित व वित्त यांच्या सुरक्षिततेकरितां पोलिस असून त्यांचे शहर पोलीस, ग्रामपोलीस (शेतसनदी) व रेल्वे पोलीस असे तीन प्रकार आहेत. हिंदुस्थानांत एकंदर पोलीस (गुप्त पोलीस धरून) १६००० असून शेत सनदी नौकरांची संख्या सुमारें ७००००० आहे.

हल्लीं इंग्रजी अंमलांत न्यायकोर्टें स्थापित झालीं असून बहुतेक दरएक जिल्ह्याला कोर्ट असते. ह्यावर अपील हायकोर्ट असते. हिंदुस्थानांत मुंबई

न्यायखातें

मद्रास, कलकत्ता, अलाहाबाद व पाटणा अशीं पांच हायकोर्टें आहेत. प्रचलित न्याय पद्धतीचा पाया सन १८६१ च्या इंडियन हायकोर्टस् ॲक्ट पास झाल्यावर घातला गेला. हायकोर्टाचा निकाल कायमचा असतो. तथापि अत्यंत महत्वाच्या अगर राजकीय खटल्यांची सुनावणी अपील मंजुर झाल्यास विलायतेंत प्रिव्ही कौन्सिलपुढें होते. खालपासून वरपर्यंतच्या कोर्टांत न्याय मिळ-

ण्याचें कामीं कायद्याचा व त्यांत योजिलेल्या शब्दांचा नुसता कीस पाडण्यांत येतो, त्यामुळें न्याय होतो. परंतु वेळ, खर्च व त्रास किती होतो हें निदान दिवाणी दाव्याचा अनुभव ज्यांस आला असेल त्यांस तरी सांगावयास नकोच. आपसांत तडजोड करण्याची आवड फारशी प्रादुर्भूत झाली नसल्यामुळें कोर्टाचा न्याय पहारा पडला तरी परवडला अशीच समाजाची प्रवृत्ति अद्यापि अधिक आहे. सामाजिक बाबतींत हिंदूस हिंदु-धर्मशास्त्र व मुसलमानांस त्यांचे कुराण व इतर वेळीं अस्तित्वांत असलेली इंग्रजी कायदेकानू याच्या अनुरोधानें कज्जांची चौकशी होते.

प्राचीन काळीं या देशांत ग्रामपंचायत ही संस्था अस्तित्वांत होती. गांवांतील प्रत्येक जातीपैकीं वजनदार कुटुंबांतून एक इसम जातीतर्फे निवडून घेतला जाई; यांस पंच म्हणत. अशा कमींत-कमी पांच पंच असलेल्या संस्थेस पंचायत ही संज्ञा होती. पंचायतप्रमाणें प्रत्येक गांवचे पाटील कुलकर्णी व रामोशी हे स्वतःच गांव-

स्थानिक स्वराज्य (ग्राम पंचायत)

कामगार असत. वसूल करून राजास पाठविणें व पचायतीचे अनुमतीनें वादाचा निकाल करणें हें पाटलाचें काम असे. कुळकर्णी हा कुळाची खातीं व त्याजकडील सरकार बाकी याचा हिशेब ठेवीत असे. रामोशी हा पोलिसेचे काम करी. हे हल्लींहि आहेत. परंतु ते सरकारी नौकर आहेत. व त्यांस ठराविक वेतन मिळतें. इंग्रजी अंमलांत पंचायती नामशेष झाल्या, तथापि पुन्हां या गोष्टीस चालना मिळाली असून निरनिराळ्या प्रांतांत नवीन कायद्यान्वयें पंचायती स्थापन झाल्या आहेत. सन १९२३ अखेर मुंबई—इलाख्यांत एकंदर ३०० पंचायती होत्या. घरपट्टीसारखें पंचयतीच्या अधिकारांतील कर, प्रांतिक सरकार व लोकल-बोर्ड यांचेकडील मदत हें या संस्थांचें उत्पन्न होय.

इंग्रजी राज्यकारभाराचें एक नवीन अंग ह्मणजे ज्यास स्थानिक स्वराज्य ह्मणण्यांत येतें, त्या म्युनिसिपालिटी व लोकलबोर्ड या संस्था अलिकडे अस्तित्वांत आल्या आहेत. स्थानिक स्वराज्याच्या पाया मूळ लार्ड रिपन यांनीं १८८३ त घातला. यांस हिंदुस्थानाविषयीं फार सहानुभूति असे. प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणाला अगर ५०० वस्तीवरच्या मोठ्या शहराला म्युनिसिपालिटी

म्युसिसिपालिटी व लोकलबोर्ड

असते. आजला हिंदुस्थानांत (इंग्रजी) एकंदर सुमारें ७३९ म्युनिसिपालिट्या

आहेत. म्युनिसिपालिटींत निम्याहून अधिक लोकनियुक्त सभासद असतात; व अध्यक्ष बहुतेक लोकनियुक्त असतो. म्युनिसिपालिटींत उमेदवार निवडून देण्याच्या हक्क म्युनिसिपल हद्दींत राहाणाराला आहे, परंतु तो इसम नियमान्वयें ठरविलेलें घरभाडें अगर कर देणारा असला पाहिजे. म्युनिसिपालिटीचीं मुख्य कामें म्हटलीं म्हणजे पाणी पुरवठा, रस्ते सुधराई व साफ राखणें, व दिवाबत्ती, शाळा व दवाखानें उघडणें हीं होत. पाणीपट्टी वगैरे कर आणि टोल वगैरे जकाती यांचे उत्पन्नांतून म्युनिसिपालिटी या सर्व व्यवस्था करते. म्युनिसिपल कमेटींतील सभासद व अध्यक्ष यांत विविधता आहे. कारणें यांची संख्या अधिकार व कार्यक्षेत्र यांत कमी अधिक फरक असतो. मुंबई व कलकत्ता या फार मोठ्या शहरांत म्युनिसिपालिटी ऐवजीं कार्पोरेशन ही मोठी संस्था असते. मुंबई कार्पोरेशनमध्यें एकंदर १०६ सभासद असून त्यापैकीं, ७६ लोकनियुक्त आहे. मुंबई कार्पोरेशनचे उत्पन्न सालिना २७९ लक्ष आहे.

लोकल–बोर्ड

शहराकरितां म्युनिसिपालिट्या आहेत, त्याप्रमाणें खेडगांवांची व्यवस्था पाहण्याकरितां लोकल–बोर्ड ही संस्था आहे. प्रत्येक जिल्ह्यांत व तालुक्यांत जिल्हा व तालुका लोकलबोर्डें आहेत. आसाम खेरीज. हिंदुस्थानांत २१९ जिल्हा लोकलबोर्डें ५४३ तालुका लोकलबोर्ड व खेड्याचें गट ८०० आहेत, नवीन कायद्यान्वयें ह्या संस्था सोंपीव खात्याकडे आल्यामुळें त्यांची सुधारणा झपाट्यानें होत आहे. बऱ्याच बोर्डांना लोकनियुक्त सभासद निवडण्याचा हक्क देण्यांत आला आहे. गांवाला चावडी, धर्मशाळा अगर सार्वजनिकोपयोगी विहीर बांधणें इत्यादि अनेक लोकोपयोगी कामें लोकलबोर्डाकडे असतात. व तीं सर्व जमीन साऱ्याबरोबर दर रुपयामागें एक आणा लोकल फंड म्हणून जो घेण्यांत येतो त्यांतून करण्यांत येतो.

शिक्षण

शिक्षणाचें काम–विशेषतः उच्च शिक्षण, हल्लींचे अमलांत बहुतेक सरकारचे हातीं आहे. खेरिज सरकारची मदत घेऊन त्यांच्याच देखरेखीखालीं चालणाऱ्या खासगी शिक्षण संस्थांचीहि या कामीं बरीच मदत होते. इतिहासाचा कोणताहि काळ घेतला तरी या देशांत शिक्षणाची कांहीं तरी पद्धत होतीच. येवढेंच नव्हे तर उच्च शिक्षण देणारी

नालंदा व तक्षशिला येथें मोठीं विश्वविद्यालयें होतीं. देव नागरी लिपी केव्हां अस्तित्वांत आली याचा पुरावा इतिहासाला अगम्य आहे. शिलालेख ताम्रपट व ताडपत्रावरील हस्तलेख यांवरून दिसून येतें कीं, या देशांत लेखनकला प्राचीनकालापासून लोकांस अवगत होती.

ब्राह्मण जातीनें प्रथम मुखोद्गत व नंतर हातानें लिहून अति प्राचीन काळापासून वाङ्मयाची जोपासना केली आहे. इतिहास लिहिण्याची सुरवात प्रथम मुसलमानांनीं सुरू केली. निरनिराळ्या सर्व राजसत्तेखालीं देश-भाषांचे शिक्षण प्रत्येक मोठ्या गांवीं निदान उच्च वर्गांतल्या मुलांस दिलें जात असे. प्रस्तुत इंग्रजी शिक्षण पद्धतीचा आरंभ लॉर्ड वुइल्यम् बेंटिंगचे कारकिर्दीत त्यावेळचे कौन्सिलचे मेंबर लॉर्ड मेकॉले यांचे सूचनेवरून झाला. हल्लीं असलेली विश्वविद्यालयें केवळ परीक्षक मंडळें असून त्यांस कला कायदा व वैद्यक वगैरेंत पदव्या देण्याचा अधिकार आहे. शिक्षण ज्या त्या मातृभाषेंतून दिलें जावें अशा विषयीं खटपट होऊन अनेक खासगी शिक्षणसंस्थाहि निघाल्या, व राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न बंगालचे फाळणी नंतर प्रामुख्याने पुढें आला. असहकारिते-च्या चळवळीमुळें या प्रश्नास पुनः जी चालना मिळाली त्यायोगें अनेक खासगी संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. व गुजराथ, पुणें, पंजाब, कलकत्ता, आंध्र वगैरे ठिकाणीं राष्ट्रीय विश्वविद्यालयें आहेत. सन १९२१ अखेर देशांतील शिक्षण संस्थाचे आंकडे खालील कोष्टकांत दिलें आहेत.

१ शिक्षणसंस्थांची संख्या	विद्यार्थ्यांची संख्या
आर्ट कॉलेजेस १५४	४६७३७
धंदे शि. कॉलेजेस ६६	१२९०३
हायस्कुलें ८८१६	१२३७६५६
प्राथमिक शिक्षण १५८७९२	६२९९२३६
विशिष्ट शिक्षण ३९४६	१२६७५८
खासगी शिक्षण संस्था ३३२९९	५९२६७५

इंडियन सायक्लोपीडिया यावरून.

शिक्षण विषयाशीं मुद्रणकलेचा अगदीं निकट संबंध आहे. प्राचीन कालीं मुद्रणकलेच्या अभावीं हल्लींइतकें वाङ्मय स्वस्त व सुलभप्राप्त नव्हतें हें खरें, तथापि त्या काळचे बुद्धिमान लोक दीर्घोद्योगानें हस्तलिखित ग्रंथसंग्रह करीत असत. हिंदी वाङ्मयाची विविधता व विस्तार अजमावणें सोपें काम नाहीं. कारण त्याची जोपासना व वाढ कमींतकमी ४०० वर्षांपासूनची आहे. बंगालचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ सर जगदीशचंद्र बोस हे आपल्या वनस्पति शास्त्रांतलि शोधांस केवळ प्राचनि वाङ्मयाच्या अभ्यासानें स्फूर्ति मिळाली असें म्हणतात. रामायण महाभारत व भगवद्गीता वगैरे सारखे राष्ट्रीय ग्रंथ तर ह्या ज्ञानाचा अखंड खजिना होत. नालंद येथील विद्यापीठांत रत्नोदधि नांवाचे नऊ मजली ग्रंथसंग्रहालय होतें. हुएनत्संगानें इकडून ग्रंथांची ६५७ पुडकीं नेलीं व तीं वाहून नेण्यास २० घोडे लागले. एवढी ग्रंथसमृद्धि अफाट होती. मुद्रणकलेच्या प्रगतिमुळें वाङ्मयाच्या वृद्धीस पुष्कळच मदत झाली आहे. आजला सरासरी १०००० पुस्तकें दरसाल प्रसिद्ध होतात. हल्लींच्या काळीं वाङ्मयाची ही अभिवृद्धि छापखान्याचे द्वारां वर्तमानपत्रें व पुस्तकें या दोन अंगांनीं होते. हिंदुस्थानांत पाहिलें इंग्रजी वर्तमान पत्र हिकेंज जर्नल नांवाचे सन १७८० त कलकत्यास निघाले. देशी भाषेतील पहिले वर्तमानपत्र गदाधर भट्टाचार्य या गृहस्थानें बंगालींत सन १८१६ त काढले. निरनिराळ्या लिपींचे छापखान्याचे खिळे पाडण्याचे काम प्रथम मिशनऱ्यांनीं केलें. व त्यांनीं "दिग्दर्शन" नांवाचे पहिलें मासिक सन १८१८ त रामपुरास काढिले होते, हिंदुलोकांच्या स्वभावधर्मास अनुसरून वर्तमान पत्रें बहुतेक परमार्थ विषयाला वाहिलेलीं असत. ही स्थिति सन १८५७ पर्यंत टिकली. पण पुढें हें स्वरूप पालटून राजकिय विषयांच्या चर्चांचे वर्तमान पत्रें हें एक प्रमुख अंग बनलें. अलिकडे तर त्यांस लोकमतीनदर्शक व देशाचे निरोप होत असें मानण्यांत येतें. हल्लीं सुमारें तीन हजारावर वर्तमान पत्रें व नियत कालिकें प्रसिद्ध होतात.

वाङ्मय व मुद्रण कला

आर्यांच्या आगमनापूर्वी हिंदुस्थानांत दक्षिणेतल्या द्रविडांखेरीज बहुतेक रानटी लोकांची व तीहि विरळ अशी वस्ती होती. त्यांच्यांत धर्माचें उन्नत स्वरूप नव्हतें. आर्यांनीं आपल्या वसाहती केल्यानंतर ज्या सुधारणा रूढ केल्या त्यांत त्यांचा वैदिक धर्म व संस्कृत भाषा ही प्रमुख होय.

धर्म

कालांतरानें वैदिक धर्माचा विस्तार होऊन वैदिक धर्म हा हिंदुस्थानचा राष्ट्रीयधर्म बनला. पुढें बुद्धानें अहिंसा धर्माचाच पुरस्कार करणारा व वास्तविक वैदिक धर्माचाच एक पोटभाग असा बौद्धधर्म उपदेशिला. धर्माच्या दृष्टीनें पहातां जगांत हिंदुस्थान हा एक अनुपमेय असा देश आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. फिरत्या बौद्ध भिक्षूंच्या आटोकाट परिश्रमानें बौद्ध धर्माची देशांत व परदेशांत बरीच वाढ झाली. बौद्ध धर्म हा राजाश्रिय झाला परंतु त्याचें हें यश टिकलें नाहीं. कुमारिल भट्ट व शंकराचार्य यांसारख्या विद्वान आर्यांनीं बौद्ध धर्माचें खंडण करून वैदिक धर्माची पुन्हां स्थापना केली. यापुढील आपत्ति मात्र बल व त्तर होती. मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊन त्यांची राजसत्ता झाल्यानंतर आपल्या स्वभावधर्मास अनुसरून तरवारीच्या जोरावर त्यांनीं सक्तीनें मुसलमान करण्याचा सपाटा चालविला " मारून मुटकून मुसलमान " ही म्हण तेव्हांपासूनच मराठींत रूढ झाली आहे. मध्यंतरीं मराठ्यांचा उदय झाल्यावर त्यांस आळा बसला ही गोष्ट खरी. परंतु भ्रष्ट लोकांस पुन्हां पुनीत करून घेणें वैदिक अगर हिंदुधर्मांत (हिंदु हें नांव मुसलमानांनीं दिलें आहे) निषिद्ध मानलें असल्यामुळें वैदिक धर्माचा संकोच झाला तो कायमचाच. इस्लाम व झरथुस्ट अथवा पारशी धर्म ह्यांचा प्रवेश हिंदुस्थानांत ख्रिस्ती शकाच्या आठव्या शतकांत झाला. १६ व्या शतकांत शीख पंथ निघाला. ह्या प्रमाणें जगांतल्या प्रमुख अशा आठापैकीं पांच धर्मांचें जन्मस्थान हा हिंदुस्थान देश होऊन राहिला आहे. धर्म, सांप्रदाय, उपासना—भेद यांत असलेली विविधता हिंदुस्थानाखेरीज जगांत इतरत्र क्वचितच आढळेल. प्रस्तुत काळीं धर्मांतराची अशा प्रकारची सक्ती नाहीं. तथापि मिशनऱ्यांच्या दीर्घ प्रयत्नानें, अपरिमित द्रव्यबलानें अगर विश्वबंधुत्वाच्या खोट्या कल्पनेनें कित्येकांस त्यांनीं आपलेसें करून टाकलें आहे. इस्लाम व ख्रिस्ती संस्कृतींच्या

उघड व प्रच्छन्न हल्ल्यामुळें वैदिक धर्माचा दिवसेंदिवस होत असलेला संकोच पाहून त्यावर तोड म्हणून पंजाबांत आर्यसमाज उत्पन्न झाला असून त्यानें आतांपर्यंत बरेच काम केलें आहे. व स्वामी विवेकानंदासारख्या महात्म्यानीं तर नव्या जगांतल्या (अमेरिका) कित्येक स्त्री पुरुषास अनुयायी बनविलें. वैदिक धर्म अत्यंत उदात्त आहे. त्याचे उदात्तत्त्व ह्या एकाच गोष्टींत भरले आहे कीं, तो धर्मांतराची सक्त मनाई करतो. इतकेंच नव्हे तर ज्याला त्याला स्वधर्मांतच मोक्षप्राप्ति होईल असें प्रतिपादितो, पंजाबांत आर्य समाज हिंदुमिशनरी सोसायटी व ठिकठिकाणच्या हिंदू सभा ह्यांनीं इतर संस्कृतीकडून होणाऱ्या आघातास तोंड देण्याचे व्रत स्वीकारून अनेक पतितांस पावन करून घेण्यांत आले आहे. सामुदायिक शुद्धि करण्याचा प्रश्न मात्र फक्त आर्य समाजानें सोडविला आहे. अशा रीतीनें पुनरागतास प्रवेश मिळवून देऊन विधर्मी संस्कृतीस पहिला व जोराचा धक्का देण्याचें श्रेय स्वामी दयानंदानीं स्थापिलेल्या आर्य समाजाचें आहे. भिन्नभिन्न धर्ममतें प्रचलित असलेल्या ह्या देशांत धर्म हा एक राष्ट्रीयत्वास पोषक होईल कीं नाहीं हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. धार्मिक विषय त्या त्या समाजापुरता स्वतंत्र असला तरी लोकव्यवहार व राजकारणांतल्या समाज परिस्थितीमुळें एक राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न होण्याला धर्म आड येणार नाहीं हें खास.

रानटी अवस्थेंत शिकार वगैरे नंतर कंदमुळांवर मनुष्य आपली उपजिविका करी. कालांतरानें आसपास उगवणारें तृणांकुर व धान्य वगैरे पाहून त्यांचे संवर्धन करण्याकडे म्हणजे शेतीकडे प्रथम लक्ष लागलें असावें.

शेतकी. जगांत अतिशय प्राचीन ग्रंथ जो ऋग्वेद त्यांत कृषि—शेती संबंधानें " हे आमचे नांगराचे फाळ जमीन उत्तम प्रकारें नांगरोत, त्याचप्रमाणें नांगर ओढण्याऱ्या बैलांना शेतकरी आनंदानें हाकोत, आणि शेतीला उपयुक्त अशा प्रकारची सुखकर पर्जन्यवृष्टि होवो, शुनीसार देवता आम्हांस सुख प्राप्त करून देवोत ". (मं. ४ सू. ५७ ऋ ह्या. को. वि. ११ वा) अशा प्रकारची वाक्यें आढळतात.

यावरून शेती हा धंदा प्राचीन काळापासूनचा महत्वाचा आहे. म्हणूनच उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ट नौकरी अशी आपल्यांत जुनी म्हण

आहे. व अद्यापिहि शेतकी हा हिंदुस्थानांतील लोकांचा मुख्य अंश आहे. शेतकीवर उपजीविका करणारांची संख्या शे. ८० एवढी मोठी आहे. सरकारी वसुलाचा जमीनमहसुल हाच मुख्य आधारस्तंभ असल्यामुळें रयत अथवा शेतकरी हा राज्य घटनेचा एक मुख्य अंश आहे. गांवकऱ्यांत (खेडेगांव) इतर पुष्कळांचा समावेश होतो परंतु त्या सर्वांचे अस्तित्वच मुळीं शेतकऱ्यांच्या हिताकरितां असून त्यांची उपजिविकाहि गांवच्या जमीनीच्या उत्पन्नावर चालते. शहरांत देखील उदीम धंदा करणारे व कारागीर यांच्या स्वतःच्या जमिनी असून आपल्या कुटुंबाच्या निर्वाहापुरतें त्यांस जमिनीचें उत्पन्न येतें. प्रत्यक्ष शेतकाम करणाऱ्या खेरीज अप्रत्यक्षपणें शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या ही फार मोठी आहे. यावरून हिंदुस्थान म्हणजे कृषीवलांचा देश आहे यांत शंका नाहीं.

शेतीच्या विविध पद्धति

निरनिराळ्या प्रांतांत शेती करण्याच्या अनेक तऱ्हा आहेत. शेतीचा व्यासंग बहुतेक सर्वत्र सारखाच आढळून येतो. परंतु पिढ्यानपिढ्या आलेल्या अनुभवानें शेतकऱ्यांना ऋतुमानानुरूप आपली साधी रीत उपयोगांत आणण्याचे जरूर तें ज्ञान स्वभावतःच आहे. बंगालच्या दलदली, कर्नाटकच्या रुक्ष माळ जमिनी, दक्षिणेतली काळी, पंजाबच्या चिकणाऊ जमिनी आणि सिंध व राजपुतान्याचा वालुकामय प्रदेश या ठिकाणीं निरनिराळ्या विशिष्ट प्रकारानें शेती करावी लागते. प्रत्येक बाबतींत शास्त्रीय शिक्षण नसलें तरी जमिनीच्या मगदुरास अनुसरून उत्तम पीक तयार करण्याची कला हिंदी शेतकऱ्यांस माहीत आहे. शेतांत जातांना जो तो आपल्या खांद्यावर नांगर घेऊन जातो, त्या त्याच्या हलक्या नांगरानें जमीन खोल नांगरली जात नाहीं ही उणीव ते दोनतीनदां नांगर मारून भरून काढतात. अर्थात अखेरीस एकूण एक जमिनीचा बुकणा करून टाकतात. पाटस्थळाची जरुर आहे त्या ठिकाणीं लोकांनीं आपल्या करामतीनें साधनें उपलब्ध करून ठेविलीं आहेत. सिंधमधील पुराच्या पाण्याचे कालवे पंजाब व दक्षिणेतल्या विहिरी व कर्नाटकांतली तळीं यावर सरकारी कालव्याखालील जमिनीपेक्षां पुष्कळच अधिक जमीन भिजते. खताचा उपयोग विशेषतः उंची

पिकास सार्वजनिक आहे. खताचा मुबलक उपयोग न करण्याचें कारण अज्ञान नसून सामर्थ्याचा अभाव अगर दारिद्र्य हें होय.

अर्वाचीन शास्त्रीय पद्धतीवर शेतकी शिक्षणाची एक दोन कॉलेजें देशांत स्थापन झालीं आहेत, त्यांत शेतकीचे प्रयोग करण्यांत येतात, तथापि देशाच्या विस्तारा-

पिकांची आळी पाळी

च्या मनानें पाहतां तीं कांहींच नाहींत. अर्थात शास्त्रीय पद्धतीनें शेती करण्याचा उपक्रम अद्यापि फारसा झाला नाहीं. पिकांची आळी पाळी हें एक लागवडीचे तत्त्व म्हणून मानण्यांत आलेलें नाहीं, परंतु वहिवाटींत आहे. त्याच जमिनीपासून लागोपाठ हंगामांत घेतलेले पीक पुन्हां घेतां येत नाहीं व पडजमिनीपासूनचा काय फायदा आहे हें सर्वांसच माहित आहे. सन १९१४–१५ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानांत एकंदर २६ कोटि १० लक्ष एकर जमीन लागवडीखालीं होती.१

हिंदुस्थानच्या कृषि सृष्टींत तांदुळाचा उल्लेख अज्ञात कालापासून शेत-कीच्या पैदासींत विशेषत्त्वानें करण्यांत आला आहे. साधारणपणें अजमास

तांदुळ

असा आहे कीं, एकंदर लोकसंख्येच्या एक तृतियांशावर लोक तांदुळ खाणारे आहेत. मोठ्या नद्यांच्या मखला चिंचोळा प्रदेश व समुद्र किना-ऱ्याची कोंकण पट्टी यांत तांदुळ विशेषतः पिकतो. उदाहरणार्थ, बंगाल, ओरिसा कृष्णा, गोदावरी व कावेरी यांच्या दरम्यानचा प्रदेश या खेरीज इतरत्र तांदुळ फारसा पिकत नाहीं. या पिकांचे प्रमाण मद्रास भागांत शें. ३३, मुंबई शें. १०, पंजाबांत तर शें. ५ एकर जमीनींत तांदुळ पिकतो. प्रांतभेदानें पिकाच्या रिती निरानिराळ्या असून तेथील ऋतुमानाप्रमाणें हंगामांतहि वैचित्र्य आहे. बंगाल्यांत प्रमुख असे दोन हंगाम असून खेरीज सालांतून मध्यंतरीं कांहीं असतात. तिकडे हें पीकहि मनममुराद म्हणजे सरासरी एकरी पंधरा मण (बंगाली) तांदुळ (सडीक) उत्पन्न होतो. व त्यांच्या जातीहि तिकडे अनेक-विध आहेत. विशेषतः रंगपूर जिल्ह्यांत तर तांदुळाचे कमींतकमी दोनशें पंचाणव प्रकार अगर जाती आहेत.

गहूं थोडाबहुत सर्वत्र पिकतो, परंतु उघड बोलावयाचें म्हणजे असे

---

१ फॅमिन कमिशनचा रिपोर्ट पान ८१ (१८८०)

कीं, तांदुळ पिकतो तेथें गहू जोरांत येत नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांत तर बहुतेक नाहींच. मनस्वी गहू पिकणारा प्रदेश म्हणजे पंजाब व संयुक्त प्रांत होय. तेथें गव्हाचे क्षेत्र सरासरी शें. ५७ आहे. मुंबई इलाख्यांत गव्हाचे मान अगदीं कमी आहे. तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें तर सबंध ग्रेट ब्रिटन मधील गव्हाचें क्षेत्र हिंदुस्थानांतल्या एका प्रांताच्या–पंजाबा–पेक्षां निम्म्याहून कमी आहे. उत्तर हिंदुस्थानांत गव्हाला रब्बीचे पीक समजतात व तें हिंवाळा अखेर येतें. गंगा व यमुना यांचे दरम्यानच्या कालव्यांच्या समृद्धीमुळें इतर खाद्य धान्याच्या जागीं गव्हाची पुष्कळच वाढ झाली आहे.

एकंदरींत सबंध देश घेतला तर असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, देशांतलें मुख्य खाद्य धान्य तांदूळ अगर गहू हें नसून बाजरी हें आहे. विशेष

ज्वारी, बाजरी वगैरे

तांदूळ पिकणारा भाग सोडून दिला तर दक्षिणेस मद्रास पासून उत्तरेस निदान राजपुतान्यापर्यंत ज्वारी बाजरींच्या अनेक जाती दुसऱ्या कोणत्याहि पिकापेक्षां अधिक पिकतात. म्हैसूर भागांत रागी म्हणजे नाचणी सर्वांत अधिक पिकते. ज्वारीचा कडबा हा गुरांचा मुख्य चारा आहे.

तेल निघते त्या धान्यास गळितांचीं धान्यें म्हणतात. येथून युरोपखंडास

गळितांचीं धान्यें

निर्यात होणाऱ्या मालांत गळितांचीं धान्यें हें एक महत्त्वाचे अंग आहे. जवस, भुईमुग, तीळ, राई, करडी, कारळें, एरंडी, खसखस, मोहरी, आंबाडा व सरकी हीं अकरा गळितांचीं मुख्य धान्यें आहेत. हें देशाचे सर्व भागांत एक महत्वाचे पीक आहे. कारण तेलाची गरज सार्वत्रिक आहे.

खेरीज करंज, निंब, मोहा वगैरे झाडांच्या बीजापासून तेल काढतात. दरवर्षी सुमारें वीस कोटी पंचाहत्तर लक्ष किंमतीची तेलें काढतात. त्यापैकीं एकतृतीयांश माल निर्गत होतो. व तो मुख्यत्वें बंगाल्यांत खाण्याकडे, अंगाला लावायाला व दिवाबत्तीकडे. खेरीज अनेक पदार्थांत व रंगाचे कामीं तेलाची गरज लागते. हीं धान्यें व तेलें संयुक्तप्रांत येथून व तीळ विशेषतः मद्रासकडून परदेशीं जातो. गळितांच्या धान्यांत, जवसाचा विशेष उपयोग म्हणजे त्याच्या झाडाच्या तंतूपासून तापता म्हणून जें वस्त्र आहे तें होतें.

लागण केलेल्या फळांत अंबा, केळें, अननस, डाळिंब, पेरु, फणस, सिताफळ, चकोत्रा, अंजीर, कालिंगड व लिंबू वगैरेच्या विविध जाती प्रमुख आहेत. मुंबई, मुलतान व गोव्याकडील आंबे, नागपूरची संत्री व मद्रासचे पेरु नामांकितपणा विषयीं प्रसिद्ध आहेत. साधारण प्रत्येक बागेंत अगर मळ्यांत भाजीपाला लावतात. परंतु त्याचें उत्पन्न शहरांचे आसपास फार मोठ्या प्रमाणावर करतात. भाजीपाल्यांत प्रमुख ह्मणजे वांगीं, बटाटें, कोबी, नवलकोल, कांदे, गाजरें, मुळें, मटकीच्या शेंगा, भोपळें व वाळके हीं होत. पैकीं बटाटे, व कोबी यांची लागण अलीकडली (१८३०) आहे. बटाट्याचे पीक महाबळेश्वर व निलगिरी सारख्या डोंगरी प्रदेशांत बेसुमार येते.

फळफळावळ व भाजीपाला.

मसाल्याच्या जिनसांत रुचकर सुगंधी औषधी व कांहीं केवळ रंगविणारीं अशा पुष्कळ द्रव्याचा अंतर्भाव होतो. त्यांत हळद मिरची यांचा नंबर पहिला लागतो. यामुळें त्यांची लागवड सार्वत्रिक होते. तथापि हिंग, मिरीं, धणें, जिरे, लवंगा, सुंठ, जायफळ कंकोळ, तमालपत्र व दालचिनी हीं मुख्य मसाल्याचीं द्रव्यें आहेत. हिंग हा एका झाडाचा चीक असून तीं झाडें विशेषतः इराण व अफगाणिस्तानांत आहेत. मिरीं दालचिनी, लवंगा, वेलदोडे म्हैसूर व त्रावणकोरकडे पश्चिम घाटांत आणि नेपाळांत, आणि दालचिनी सिंहलद्वीपांत पिकते. लवंगा ह्या झाडाच्या फुललेल्या कळ्या होत. वेलदोडे जमिनींत मुळास लागतात. दालचिनी ही झाडाची अंतरसाल असते. केशराचे झाड इराण, काश्मीर व चीन देशांत होते. झाडाच्या फुलाला जे केशर असतात तेंच केशर होय. विड्याच्या पानांची लागवड देशांत पुष्कळ ठिकाणीं होते. व ह्याला सावधगिरी घ्यावी लागते हें खरें, पण उत्पन्नहि तसेंच फायदेशीर असते. सुपारीचे पीक बंगालच्या दलदलींत व मुंबईकडील कोकणपट्टींत येतें. सुपारी खेरीज नारळी वगैरे ताड कोकणपट्टीला विपूल असून ताडाचा गुळहि करतात. व एक प्रकारचे मद्यहि तयार होतें.

मसाल्याच्या जिनसा निरनिराळे ताड.

साखर, ऊस व ताड ह्या दोन्हींपासून करतात. पण त्याची एकंदर निपज स्थानिक गरज भागविण्यासच मुळीं पुरेशीं नाहीं. मग निर्गतीचा प्रश्नच नाहीं. यामुळें लाखों रुपयांची साखर परदेशाहून येते. उत्तम प्रकारचा व मोठ्या प्रमाणावर ऊस संयुक्त प्रांतांत पिकतो. ऊसाला लागवड पुष्कळ लागते. पण फायदाहि त्या प्रमाणांत मोठा असतो.

साखर

सन १९१४–१५ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानांत एकंदर २६ कोटि १० लक्ष एकर जमीन लागवडीखालीं होती. ती पैकीं शेंकडा दहा गव्हाखालीं, शें. तीस तांदुळाखालीं व शें. अडतीस इतर धान्यें या खालीं होती.

शेतांचें क्षेत्र

सर्व साधारण शेतकरी वर्ग अद्यापि जुन्या पद्धतीलाच चिकटून आहे. त्यांस पुरेसा पैसा अगर जरूर तें अर्वाचीन शास्त्रीय शिक्षण नाहीं. यामुळें त्याला किफायत फारशी होत नाहीं. देशांत उच्च शिक्षण (शेतकी) देण्याकरितां शेतकी कॉलेजें निरनिराळ्या ठिकठिकाणीं आहेत तीं:— १ पुणें २ नागपूर ३ कोईमतूर ४ कानपूर ५ साबूर व ६ लायलपूर हीं होत. खेरीज देशीभाषेंतून शेतकी शिक्षण देण्यासाठीं प्रत्येक प्रांतांत शाळा काढिलेल्या आहेत.

शेतकी शिक्षण

शेतकीच्या पैदासपैकीं जो माल परदेशीं रवाना होतो, त्यांत कापूस अग्रशर आहे. देशांतल्या देशांत पुरण्याइतका कापूस ह्या देशांत प्राचीन कालापासून पिकत असे. हल्लीं कापसाच्या निर्गतीची जी वाढ झाली आहे ती अमेरिकन युद्धापासून होय. हें युद्ध चार वर्षें चाललें होते. सन १८६४ त तह होईपर्यंत कापसाचे क्षेत्र कल्पनेबाहेर वाढून प्रसंगवधान ठेवून हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांनीं ह्या वेळेस आपला फायदा करून घेतला. कापूस पिकण्याचीं मुख्य ठिकाणें म्हणजे:—गुजराथ, काठेवाड, मध्यप्रांत, वऱ्हाड व दक्षिण महाराष्ट्र हीं होत. सर्वांत वऱ्हाडांतला कापूस उत्तम असतो. व त्यांतील कापसास उमरावती व हिंगणघाटी अशीं नांवें पडलीं आहेत. हिंदुस्थानांत कापसाचे कापड यंत्रसामुग्रीनें विणण्याची कला सन १८१८ सालीं

कापूस

कलकत्ता येथें निघाली. व वाफेनें चालणारी गिरणी मुंबईत सन १८१७ त सुरू झाली. अश्वलायन श्रौतसूत्रांत कापसाच्या वस्त्राबद्दल उल्लेख आहे. यावरून हिंदुस्थानांत फार प्राचीन कालापासून कापसाचा उपयोग माहीत आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं.

हल्लीं कापसाच्या लागवडीचे क्षेत्र विशेष पसरल्यामुळें देशांतील एकंदर कापसाच्या लागवडीचें क्षेत्र व सुताच्या कापड विणण्याच्या गिरण्या यांची सारखींच वाढ होत आली आहे. हिंदुस्थानांत सन १९१८ व १९१९ सालीं यांत्रिक शक्तीनें चालणाऱ्या गिरण्या एकंदर २६४ होत्या. सुत काढणें व कापड विणणें ह्या खेरीज कापडाच्या व्यापारानें दुसरें कित्येक धंदे जगांत आणलें आहेत. ते धंदे ह्मणजे सरकी काढणें व बाहेर देशीं पाठविण्याच्या सोईचें दाबांत घालून गठ्ठे बांधणें हे होत. आज मित्तीला अशा प्रकारचे लहान-सान कारखानें देशांत सर्वत्र लहानमोठ्या ठिकाणीं अनेक आहेत.

कापसाचे खालीं तंतुमय पीक ह्मणजे सूत काढून कापड विणतां येण्यासारखें म्हणजे तागाचे आहे. परंतु याची लागवड फक्त बंगाल्यांत होते. तागाच्या गिरण्यांचा धंदा तिकडे मोठ्या प्रमाणावर आहे. याला जमीन साधारण रेताड लागते. तागाची लागवड साधारणपणें एप्रिलमध्यें होऊन ऑगष्टमध्यें काढतां येतें. काढल्यावर अंबाडी प्रमाणें पाण्यांत भिजू घालून तो सोलून काढतात. तागाचा वाक लांब मऊ व रेशमाप्रमाणें दिसतो. तागाचा व्यापार तिकडे बहुतेक देशी व्यापाऱ्यांच्या हातांतच आहे. तागाचे कापड होते व परदेशींहि हा माल पुष्कळ रवाना होतो,

ताग व नळि

नीळ पूर्वीपासून या देशांत पुष्कळ पिकत असे. परंतु ई. इं. कंपनीच्या अमदानींत जो धक्का बसला त्या सरशीं निळाची लागवड कमी झाली ती कायमचीच. हल्लीं नीळ बहुतेक बंगाल व बहार या प्रांतांत पिकते.

अफू खसखसीच्या झाडापासून होते. ही विशेषतः माळव्यांत शिंदे होळकर यांच्या राज्यांत व गंगा किनारीं पाटणा व बक्सार जवळ पिकते. माळव्यांत व या संस्थानांत अफूची लागवड करण्यास मोकळीक आहे. पण ब्रिटिश हद्दींत मनाई आहे. हिंदुस्थानांतली अफू बहुतेक चीनमध्यें खपते, परंतु

अलीकडे त्यांच्यांत जागृति झाल्यापासून हे व्यसन कमी करण्याचा त्यांनीं सपाटा चालविला आहे. यामुळें हिंदुस्थानचा हा व्यापार अलीकडे बसत चालला आहे.

मादक पदार्थ
अफू व तंबाखू

खसखसीला फूल आल्यावर पहिलें काम या कळ्या खुडून काढणें. या पाकळ्या पुढें अफूवर झांकण्यास उपयोगी पडतात. नंतर प्रथम संध्याकाळीं बोंडाला कासण्या मारून ठेवतात. व दुसरें दिवशीं त्यांतून रस खरवडून काढतात. व मग त्याचे गोळे बनवून वाळल्यावर बाहेर देशीं पाठवतात. पण ते वाळण्यास साधारणपणें दोन तीन महिने लागतात. तंबाखू तर हिंदुस्थानांत जमीन व हवामान हितकर असल्यामुळें प्रत्येक जिल्ह्यांत पिकते. त्यांत विशेषतः बंगाल्यांत रंगपूर व टिरहुट, मुंबई इलाख्यांत केरा, मद्रासकडे कोइमतूर व मदुरा जिल्ह्यांत अतोनात पिकते. मदुरेच्या तंबाखूचे त्रिचनापल्लीस नामांकित चिरूट होतात. त्यास त्रिचनापल्ली चिरूट असें म्हणतात. या चिरूटांची युरोपियनांसहि चटक लागली आहे.

चहा व कॉफी हे पदार्थ मूळचे परदेशी आहेत. निदान कॉफी (बुंद) मात्र खास. आसामांत जीं चहाची झाडें विपुल आहेत व कधीं कधीं त्यांची वाढ मोठ्या झाडाएवढी होते या अगर अशाच दुसऱ्या लक्षणावरून असाम हें चहाचें मूळस्थान असलें पाहिजे व तेथून ऐतिहासिक कालापूर्वीं तें चिनांत नेण्यांत आलें असावें. असामांत चहाच्या रोप्यांचा शोध प्रथम

चहा व कॉफी.

मि. ब्रूस यांस लागला. व त्यानें बी व रोपें तिकडून आणलें. चहाची लागवड करण्यांत प्रथम सरकारनेंच मनावर घेतलें, व चिनांतून त्यांतील तज्ज्ञ आणवून प्रयोग करण्यांत आले, तेव्हांपासून चहाची लागवड वाढत गेली. आज मित्तीला आसाम म्हणजे चहाचें माहेरघर असून मोठमोठ्या प्रमाणावर उभारलेल्या चहाच्या कंपन्या व त्यांच्या मालकीचे हजारों मळे आहेत. हे मूळ व त्यांत गुंतवलेलें भांडवल व कंपन्या सर्व युरोपियनांच्या मालकीच्या आहेत. आसाम खेरीज दार्जिलिंग कुमाऊं व गर्वाल जिल्ह्यांत आणि निलगिरीवर चहा पिकतो. पैदासीपैकीं बराच माल अमेरिका वगैरे परदेशीं जातो. बुंद अगर कॉफीच्या लागवडीचें क्षेत्र काय तें दक्षिण हिंदुस्थान आहे. पश्चिम

घाटांत कानडा ते त्रावणकोर म्हणजे बहुतेक कुर्ग व म्हैसूर संस्थान व निलगिरी यावर बुंद पिकतो. चहा प्रमाणें बुंदाच्या लागवडीची खटपट युरोपियनांनीं केलेली नाहीं. अद्यापि देखील ती एतद्देशीयांच्या हातीं आहे. बुंद इकडे आणण्याचें श्रेय बाबा बुंदन या मुसलमान यात्रेकरूकडे आहे. यानें हें बी अरबस्तानांतून १५६० चे सुमारास आणलें व म्हैसूर हद्दींत त्यानें प्रथम ज्या डोंगरावर लावलें त्यास अद्यापि बाबा बुंदनची टेकडी असें म्हणतात. परदेशीं जाण्यास बुंद बहुतेक मद्रासेहून जातो. कॉफी व चहा हीं येथें हिंदुस्थानांत नवीन आहेत. कॉफीपेक्षां चहा इकडील हवेस हानिकर आहे. तथापि देशांत चहापान आजला अमर्यादित झालें आहे.

कोयनेल हें ज्वरहारक औषध तर सर्वत्रांस माहित आहे. पोष्टांत या औषधाची पैशाला एक पुडी देण्याची तजवीज सरकारनें केली आहे. तापावर

कोयनेलची झाडें

हें औषध रामबाण आहे. सिंकोना नांवाच्या वनस्पतीच्या सालींचें हें औषध तयार करतात. ही वनस्पती मूळ दक्षिण अमेरिकेंतून (१८६०) इकडे आणण्याचें श्रेय मि. क्लेमंट्स नांवाच्या गृहस्थाकडे आहे, सिंकोनाच्या लागवडीचे मुख्य ठाणें निलगिरिवर असून तेथें कित्येक सरकारी व खाजगी लोकांचे मळेहि आहेत. यांतहि कमीअधिक गुणावह अशा विविध जाती आहेत. निलगिरी या मध्यवर्ती ठिकाणापासून सिंकोनाचा प्रसार पळनी डोंगर, त्रावणकोर व म्हैसूर हीं संस्थानें, बाबा बुंदन टेकडी, कुर्गमधील मरकारा शहराजवळ झाला असून तेथें त्याच्या विस्तीर्ण बागा आहेत. महाबळेश्वरलाहि याची थोडीबहुत लागवड झाली आहे. परंतु निलगिरीहूनहि कित्येक उजव्या आहेत. इंग्रजी औषधांत किनाईन इतकें दुसरें लोकप्रिय औषध नाहीं. या बागांतून उत्पन्न होणाऱ्या औषधी द्रव्यांचा सरकारी वैद्यक खात्याकडे उपयोग होऊन खेरीज तीं बाहेरहि रवाना होतात.

रेशमाचें माहेरघर म्हणजे चीन, जपान वगैरे देश होत. कारण येथून रेशमाचा पुरवठा चारी खंडास होतो. ई. इं. कंपनीचे अमदानींत बंगाल्यांत व टिपू सुलतानानें म्हैसुरास रेशमाची उत्पत्ती वाढविण्याकडे बरेंच लक्ष दिल्याचें दिसून येतें. हिंदुस्थानांत तुतीच्या झाडाचे लागवडीचें सर्वांत मुख्य ठिकाण म्हणजे बंगाल प्रांत. हल्लीं तुतीची लागवड मुख्यत्वें राजशाही व बर्द्वान,

माळवा, मुर्शिदाबाद व मिदिनापूर या जिल्ह्यांत होते. इतर पिकांत व तुतींत फरक असा आहे कीं, तुतीच्या पानांचा हंगाम कित्येक वर्षं पर्यंत बारामाही असतो. रेशमाचे किडे हीं पानें खाऊन जगतात. अस्सल रेशमी किड्यांखरीज साधारण रेशमी किड्यांच्या अनेक जाती हिंदुस्थानांत विपुल आहेत. आसामांत ' तसर ' नांवाचें रेशीम किड्यांपासून काढतात, हे किडे मध्यप्रांतांत व मुंबई इलाख्यांत डोंगरी भागांतहि आढळतात.

रेशीम.

देशांत बहुतेक भागांत विवक्षित जंगली झाडांवर लाखेचे कृमी विपुल आढळतात. प्राचीन कालापासून कित्येक जंगली जाती ती गोळा करून तिचे रंगण दिलेल्या अनेक वस्तु तयार करतात. छोटा नागपूर व आसाम वगैरे डोंगरी प्रदेशांत लाख पुष्कळ मिळते. लाख म्हणजे कीटकांचा मल असतो. हे कीटक विशेषतः कुसुम, पळस व पिंपळ यांच्या फांद्यांभोंवतीं मल घालतात.

लाख

हिंदुस्थानांतील शेतींत, व शेतीच्या पद्धतीवर ब्याच मोठ्या अंशाची उपजिविका असल्यामुळें शास्त्रीय सुधारणा करण्याकडे अलीकडे सरकारचें लक्ष वेधलें आहे. निरनिराळ्या भागांत शेतकी कॉलेजें व त्या लागत नमुन्यांची शेतें स्थापन झालीं असून त्यांत सप्रयोग शिक्षण देण्याची व्यवस्था आहे. अशीं शेतें पुण्यानजीक मांजरी, मद्रासजवळ सैदापेठ व बहार प्रांतांत पुसा वगैरे ठिकाणीं आहेत. तेथें तेवढ्याच क्षेत्रांत पीक कसें अधिक काढतां येईल याचे शास्त्रीय पद्धतीनें प्रयोग करून पाहण्यांत येतात. पुण्यास शेतकी मासिक निघतें, त्यांत या संबंधाची वेळोवेळीं चर्चा येते.

नमुन्या दाखल शेतें.

शेती सुधारण्याला पहिली अडचण म्हणजे जनावरांची कमतरता व त्यांचा अशक्तपणा होय. अलीकडे पर्जन्याचें मान कमी कमी होत असून देशांत माणसांना अन्न व जनावरांना चारा दुर्मिळ अतएव महाग होत चालला आहे. यासंबंधानें एका सरकारी अधिकाऱ्याचा अभिप्राय असा आहे कीं, शेकडों जनावरांना दरसाल सहा आठवडे उपासमारीनें काढावे लागतात. मेहनत करणाऱ्या बैलास घालून चारा संपला म्हणजे शेतकऱ्यास बाकीच्या गुरांस झाडाचीं पानें तर कुठें गवताचीं मुळें घालून

शेती सुधारण्याला तीन अडचणी. पहिली जनावरांची वाण

कसें बसें जीव जगविण्या पलीकडे कांहीं करतां येत नाहीं. साल खडतर असलें तर गुरें पटापट मरून जातात. मागून पाऊस पडून नवीन आलेले गड्डे झाडपाला अगर हिरवळ बुभुक्षितेमुळें गुरें अधिक खातात व त्यामुळें रोग होऊन त्या पैकीं कोणत्यातरी प्रकारास हजारों जनावरें बळी पडतात. शेतकऱ्यांचीं सर्व इस्टेट म्हणजे खंदे बैल. ते असले तरच शेती. पण त्यांची तर संख्या कमी होत चालली आहे. दुर्दैव दुसरें काय ?

दुसरी अडचण खताची. गुरांढोरां पासून पुष्कळ खत मिळतें. पण गुरांचा संहार अधिकाधिक होत असल्यामुळें त्यांचें मलमूत्रादि खतहि दुर्मिळ झालें आहे.

खताचा अभाव

व पूर्वींचीं मोठींमोठीं जंगलेंहि नाहींशीं झाल्यामुळें जळाऊ लाकडांच्या अभावीं गुरांचें जें थोडे बहुत शेण मिळतें तेंहि लोकांस सरपणाचे कामीं उपयोगांत आणणें भाग झालें आहे. अशा स्थितींत शेतीला निकृष्टावस्था आल्यास नवल नाहीं. चाऱ्याची व खताची ही अडचण लक्षांत येऊन सिंध व पंजाबांत सरकारनें कालव्याचें पाणी, चारा उत्पन्न करण्यास शेतकऱ्यांस सवलतीनें देण्याचा उपक्रम केला आहे. तो सार्वत्रिक झाल्यास बराच उपयोग होईल.

पाण्याची कमतरता ही तिसरी अडचण. मि. कर्ड या अधिकाऱ्याचें असें मत आहे कीं, लागवड केलेल्या जमिनीच्या फक्त एक तृतीयांश भागाला

पाण्याची कमतरता

जरी पाटाचें पाणी मिळालें तरी हिंदुस्थानाला भयंकर दुष्काळालाहि तोंड देतां येईल. शेतकऱ्याच्या वाढत्या दारिद्र्याचा उपशम करण्यास कालव्या खेरीज तरणोपाय नाहीं. पंजाब संयुक्तप्रांत, सिंध व मद्रासकडे कालव्यांची बरीच वाढ झाली असून तिकडची कालव्याखालील जमीन सुप्रसिद्ध आहे. हिंदुस्थान सरकारचें लक्ष कालव्यापेक्षां रेल्वेकडे अधिक आहे. परंतु वास्तविक रेल्वेपेक्षां कालव्याचीच गरज अधिक आहे.

सर्व चतुष्पाद जनावरांत गाय व बैल हे प्राचीन कालापासून माणसाळलेले तसेच उपयोगी प्राणी होत. वैदिक

गोधन अथवा गुरेंढोरें.

वाङ्मयांत अनेक प्रसंगीं गोधनाचा व तिजपासून होणारें दूध तूप वगैरे जिन्नस यासंबधानें उल्लेख आले आहेत.

'हे दिव्य धेनूनों रोड झालेल्या मनुष्यास तुम्ही पुष्ट करतां आणि ज्यांच्या तोंडावर अगदीं कळा नाहीं त्यांना तजेलदार करून सोडतां. तुमचा स्वर मंगलकारक आहे. तर तुम्ही आमचें घर मंगलमय करा.'

(ऋ. ६–२६–८ ज्ञा. को. १२)

हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यामुळें व आउताचे बैल हें मुख्य शेतकीचें साधन असल्यामुळें या देशांत गुरांचें महत्त्व अधिक आहे. बैल चांगले तर शेती चांगली; सिंध व पंजाबच्या कांहीं भागाखेरीज सर्व हिंदुस्थानांत सश्रृंग जनावरेंच कायती जमीन नांगरटीस उपयोगांत आणतात. उष्ण हवा-मान, कुरणांची कमतरता तर कांहीं अंशीं गुरांची निवड करून चांगली अवलाद निपजविण्याचा अभाव या गोष्टीमुळें एकंदरींत देशांत गुरांची स्थिती कांहीं चांगली नाहीं. लागवडीची वाढ होऊन पड जमीनी कमी कमी झाल्यामुळें मूक प्राण्यांचें जीवित कष्टतर झालें आहे. तथापि कांहीं ठिकाणीं चांगली जनावरें आहेत. हिंदुस्थानांत प्रमुख व प्रसिद्ध अशा बैलांच्या जाती म्हणजे नेलोरी, मद्रास इलाख्यांत अमृतमहाल–म्हैसूर भागांत, माळवी–सात पुड्यांत, सोरटी काठेवाडांत, गौळाऊ मध्यप्रांतांत, व खिलारी सातारा प्रांती या होत. पंजाब व गुजराथचें खिप्पाड व देखणे बैल रेताड जमीनीतून मोठी ओझीं वाहून नेण्यास चांगले असतात.

गाई व बैल या नंतर म्हैस व रेडे हीहि उपयुक्त जनावरें आहेत. दलदलीच्या प्रदेशांत गुरें बहुतेक खराब असतात. त्यामुळें तेथें ह्यांची जागा रेड्या-

रेडे व उंट

ह्यशींनीं पटकावलेली असते. सिंधुनदीचे किनारीं व राजपुतान्याच्या वालुकामय प्रदेशांत सर्व शेतकी कामास बैलांचे ऐवजीं ऊंट लावतात. पंजाबांत उंटाची गणती सरासरी दोन लाख आहे म्हणतात.

वैदिक वाङमयांत घोड्यासंबंधीं ते विविध रंगाचे व जातीचे असून त्यांचा रथाकडे उपयोग होत असे, असें वर्णन आढळतें, व लगाम, चाबूक वगैरेस शब्दहि आहेत. राजसूय यज्ञासारख्या प्रसंगीं घोड्यांच्या शर्यतीहि होत असत. मराठ्यांच्या अंमलांत भीमथडी घोडयांची जात अतिशय चपळ म्हणून प्रसिद्ध होती. इंग्रजी झाल्यापासून लष्करी कामाकडे घोड्यांची गरज कमी

झाल्यामुळें चांगल्या अवलादीची निगा राहिली नाहीं. पूर्वी सैन्याची मजल सर्व घोड्यावर व्हावयाची. हल्लींप्रमाणें रेल्वे नव्हती. यामुळें एकेका दिवसांत पंन्नास कोसांची मजल मारणारे खंबीर घोडे व स्वार त्यावेळीं असत.

घोडे

हल्लीं ऐपतीच्या अभावीं घोडा पाळणेंहि होत नाहीं. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, पटाईत घोडेस्वार दुर्मिळ झाले आहेत. मद्रास व बंगालकडे तर चांगली अवलाद नाहींच, मुंबई इलाख्यांत दक्षिणी; (१) व काठेवाडी (२) या दोन जाती आहेत. निपज चांगली होण्यास सर्वत्र वळू ठेवले असून इंग्रजी लष्करास घोड्यांचा पुरवठा पंजाबांतून होतो. तिकडे खेचरांचीहि निपज करण्यांत येते. रावळपिंडी वगैरे ठिकाणीं घोड्यांचे फार मोठे बाज़ार भरतात. घोड्याच्या शुभाशुभ लक्षणासंबंधीं संस्कृत ग्रंथांत अनेक वर्णनें आहेत. व या प्राण्यासंबंधीं अश्वशास्त्र अथवा शालीहोत्र म्हणून एक स्वतंत्र शास्त्रच आहे.

चतुष्पाद जनावरांत हत्ती हा एक अजस्त्र प्राणी आहे. याची वस्ती मुख्यत्वें हिंदुस्थानच्या पूर्व सरहद्दीवरील ब्रह्मपुत्रा व बारक यांचे दरम्यानच्या

हत्ती

डोंगरी प्रदेशांत व पश्चिम घाटांत म्हैसूर व कुर्ग प्रांतांत आहे. रानटी हत्ती पकडण्याचें काम सरकारचें असून तें त्यांच्याच देखरेखीखालीं करावें लागते. कुर्ग भागांत हत्ती पुष्कळ असून तिकडे जंगली लाकडांचे प्रचंड ओंडे आणण्याचें काम त्यांजकडून करवून घेतात.

अव्वल इंग्रजींत लागवडीचें क्षेत्र वाढविण्याकडेच सरकारची वृत्ति अधिक असल्यामुळें पुष्कळ जंगलें तोडून काढण्यांत आलीं, यामुळें झाडी कमी झाली. परंतु लोक संख्येची वाढ व रेल्वे मार्ग यामुळें जळणाची, कमतरता

जंगल

भासूं लागली. तसे जंगलाचें संरक्षण करण्याचा प्रश्न पुढें आला. सृष्टि निर्मित संपत्तीचे महत्त्व लक्षांत घेऊन फॉरेस्टचा कायदा (१८६५) करण्यांत आला, तेव्हांपासून जंगलखातें हें एक राज्यकारभाराचें अंग बनलें.

१ दक्षिणी घोड्यांत भिमथडी, गंगथडी व माणदेशी असे तीन प्रकार आहेत.

२ काठेवाडी घोड्याच्या मुख्य २८ जाती आहेत.

वनस्पती शास्त्रदृष्ट्या जमीन पर्जन्य व हवामान यांच्या निरनिराळ्या स्थिती-प्रमाणें जंगलाचे निरनिराळे वर्ग करतां येतील. हिंदुस्थानच्या जंगलांतल्या वृक्षांचा राजा म्हणजे साग असून तो जहाजें बांधण्यास विलायती सिंदूर वृक्षा-इतकाच उपयोगीं आहे. सागाचें माहेरघर म्हणजे पश्चिम घांट, कोचीन व त्रावणकोर होय. हिमालयाच्या उतरणी वरील प्रदेश देवदार, सिंदूर वृक्ष व तांबडा बोर यांनीं व्यापिलेला आहे. विविध वृक्ष समुदायाबरोबर पश्चिम घाट म्हैसूर व कानडा भागांत वेलदोडा व बहूमोल चंदनाचें लाकूड पैदा होतें. जंगलापासून प्रत्यक्ष व अपत्यक्ष असें दोन उपयोग आहेत. फळ, फूल, साल व डिंक मिळतो हा एक, व झाडीमुळें हवेंत आर्द्रता येते हा एक, त्यामुळें पाऊस पुष्कळ पडतो. जेथें झाडी अधिक तेथें पर्जन्याची उणीव सहसा येत नाहीं.

पर्जन्य अनियमित व अस्थिर असतो अशा क्रांतीवृत्तांतल्या देशांत पाटस्थळ अथवा कालव्यासारख्या कृत्रिम साधनांनीं पाणी अडवून त्याचा कृषीस उपयोग करण्याची विशेष जरूर असते. पर्जन्याचा तुटवडा झाला कीं,

पाटस्थळ

कोरडवाळू जमीनीच्या शेतकऱ्याला कांहीं आशा रहात नाहीं. परंतु तेंच कालव्या खालच्या जमिनींतून त्याच सालीं विपुल धान्य काढतां येऊन दुष्काळाला तोंड देतां येतें. अशा प्रकारचे पाण्याचे खजिनें पूर्वीं असत, त्यांतून पाण्याचा मूल्यवान सांठा हिंदु लोक धार्मिक व दीर्घदर्शी आस्थेनें करून ठेवीत.

पाटस्थळाची सुकरता, पाण्याचा पुरवठा आणि जमिनीची सपाटी या-वर अवलंबून असते. ही सुकरता सिंधमध्यें विशेष असल्यामुळें कालव्यांची अभिवृद्धी तेथल्या सारखी देशांत दुसऱ्या कोणत्याच भागांत झाली नाहीं.

पाटस्थळाचें क्षेत्र
सिंध

सिंधप्रांत सर्वस्वीं सिंधुनदाच्या महापुरावर अव-लंबून आहे. सिंधमध्यें पावसाचें मान सरासरी दहा इंच आहे. जमीन रेताड व खराब आहे. सिंधुनद आपल्या दोन्ही तीरामधून वहात नसून तो विस्तीर्ण प्रदेशावर स्वेच्छेनें संचार करतो. सिंधुचा महापूर म्हणजे अनावर जलौघ असून तो पुष्कळ वेळा चांगलें व वाईटहि तितकेंच करतें. तिकडे कालव्याचे दोन

प्रकार म्हणजे एक पूर आल्यावेळीं भरून वाहणारे व धरण घातलेले सतत वाहणारें असें आहेत. पहिले बहुतेक पूर्वींच्या सत्ताधाऱ्यांचे अगर स्वतः शेतकऱ्यांचे कृत्य असून दुसरें इंग्रजी अमदानींतलें आहेत. सिंधमधील अनेक लहान मोठ्या कालव्यांत धार, नारा व सक्कर हे प्रमुख आहेत.

तुलना केली तर मुंबई इलाख्यांत कालव्याचा प्रसार फारच कमी आहे.

मुंबई

कोंकण पट्टीला पर्जन्यातिशयामुळें लहान लहान खाड्या तुडुंब जलमय होऊन जातात. त्यामुळें भाताचें पीक मुबलक येतें. कृत्रिम साधनांची अवश्यकता राहात नाहीं. बाकीचे भागांत पाण्याची उणीव नेहमींच जाणवते. तथापि हल्लीं गोदावरी व नीरा नदींचे कालवे तसेच सक्करजवळ मोठें धरणाचें काम चालू आहे, तें पुरें झालें म्हणजे त्या त्या ठिकाणच्या शेतीस पुष्कळ उपयोग होईल.

हिमालयांतून निघणाऱ्या असंख्य जलप्रवाहापासून पाण्याचा पुरवठा पंजाबाला अमूप होतो. पंजाबांत सरकारनें बांधलेलें वेस्टर्न जमना कॅनॉल, बारी

पंजाब
व
संयुक्त प्रांत

दुआब व सरहिंद हे तीन मोठे कालवे होत. यांचें पाणी दूर प्रदेशांत नेण्यांत आल्यामुळें त्यावर अतोनात गहूं पिकतो. ह्मणूनच पंजाब गव्हाचें आगर झालें आहे. तसाच संयुक्त प्रांत कालव्यांनीं समृद्ध असून हिंदुस्थानांत ह्मणण्यासारखा ऊंस तिकडेच पिकतो. गंगा यमुनांचे कालवे काढण्याचे कामीं झालेले परिश्रम व शिल्पकलेची अपूर्व चतुरता पराकाष्ठेची झाली आहे. यमुनेचा एक कालवा मोगलांचे वेळचा असून त्याचा प्रचंड विस्तार व गंगेचे मोठे कालवे इंग्रज सरकारनें बांधलेले आहेत.

बंगाल्यांत पाटस्थळाची गरज नाहीं. गंगा व ब्रम्हपुत्रा यांचे कांठचा प्रदेश व समुद्र किनारा यांत अवर्षणापेक्षां महापुराची भीति अधिक असते.

बंगाल व
मद्रास

यामुळें कालव्याची जागा तिकडे बंधारें अगर धरण यांनीं पटकाविली आहे, अशीं धरणें इकडे ठिकठिकाणीं आहेत. मलबार खेरीज मद्रास इलाख्यांत पुरेसा पाऊस पडत नाहीं. उद्योगी लोकांनीं प्राचीनकाळापासून नद्या तळीं वगैरेस धरण घालून त्यांचे लांबवर

नहर काढून नेले आहेत. अलीकडे गोदा, कृष्णा व कावेरी या तिन्ही महानद्यांच्या मुखाजवळच्या प्रदेशांत त्यांजपासून काढलेल्या कालव्यांचे तर जाळेंच पसरलेलें आहे. बिझवाडा नजीकच्या कृष्णेचा कालवा पहाण्यासारखा असून त्याचे आसपास अपरिमित तांदुळ पिकतो व तो देशांतल्या बहुतेक बाजार पेठेंत बिझवाडा तांदुळ म्हणून प्रसिद्ध आहे.

दैवी आपत्तीस तोंड देणें केव्हांहि मानवी शक्तीच्या आटोक्याबाहेरचे आहे हें खरें; तथापि प्राणिमात्रांच्या जीवनास्तव शक्य तितका परिहार करण्याचा प्रयत्न करणें हें मनुष्य समाजाचें अगर त्यांच्या शास्त्यांचे कर्तव्य आहे. दुष्काळाची इतर कांहीं कारणें असलीं तरी पर्जन्याचा अभाव हें मुख्य आहे. हिंदुस्थान हा कृषिवलांचा देश आहे, हें मागें सांगण्यांत आलें आहेच. यामुळें पावसानें डोळे वटारलें कीं, लोकांची विशेषतः रोजमुऱ्यावर निर्वाह करणारांची स्थिती अत्यंत कष्टप्रद होऊन गांवोगांव भटकण्याची वेळ येते. पर्जन्याच्या अनियमितपणामुळें कृत्रिम साधनांनीं जलसंचय करून कालव्याच्या योगानें त्याचा शेतीकडे विनियोग करणें जरूर झालें आहे. अर्वाचीन काळीं नमूद असलेला पहिला भयंकर असा दुर्गा देवीचा दुष्काळ (१३९८–१४०७) होय. हा महाराष्ट्रांत बारा वर्षे पडला होता. अलिकडच्या काळांत तर साधारणपणें दोन तीन सालें तरी दुष्काळाची जातात. त्यांत सर्व देशभर दुष्काळ म्हणजे १८७६–७७ चा. या दोन वर्षांत पावसाचा थेंब पडला नाहीं. त्यांतच पुढील सालीं आलेल्या पिकांचा उदरांनीं फडशा उडविला. त्या सालाला लोक पुढें "उंदीर साल" असें ह्मणूं लागले.

दैवी आपत्ती

दुष्काळ

सन १८९६ सालीं दुष्काळ होताच. त्यांत आणखी प्लेग उद्भवला. या दोन आपत्तींनीं आजतागायत देश त्रासून गेला आहे. प्लेगोबाला बळी दिला गेला नाहीं असें एक देखील घर मिळणार नाहीं. अलीकडे सालोसाल बाजार भाव तेजीचा रहातो याचें एक कारण असें झालें आहे कीं, धान्य व कच्चा माल इकडून परदेशीं जाऊन त्याचे तिकडे अनेक पदार्थ तयार होऊन इकडे येतात. मोठमोठ्या युरोपियन कंपन्यांनीं धान्याच्या

प्लेग

निर्गतीचा धंदा फार मोठ्या प्रमाणावर चालविला असल्यामुळें इकडे धान्याची टंचाई येते. यास उपाय म्हणजे ही निर्गत कमी करून किकठिकाणीं धान्याची कोठारें स्थापिली पाहिजेत. अशा प्रकरचा प्रयत्न वॉरन हेस्टिंग्ज हा गव्हर्नर जनरल असतांना करण्यांत आला होता. त्यावेळचे एक प्रचंड कोठार आजमित्तीला पाटणा शहरांत आहे. दुसरा उपाय म्हणजे शेतीसारा घेण्याची चलनी नाण्याची पद्धत बदलून तो धान्याचा रूपानें घेण्याची तजवीज सरकारकडून झाली पाहिजे. एरव्हीं गत्यंतर नाहीं.

दळण वळणाच्या साधनांचे चार वर्ग करतां येतील ते असें:—

१ रेल्वे मार्ग २ सडका ३ नद्या व ४ कालवें.

दळवळणांची साधनें अंतर्गत दळवळण रेल्वे

सन १८५३ च्यापूर्वी रेल्वे नव्हती, ती बांधण्याची योजना मूळ लॉर्ड डलहौसीच्या कारकीर्दींत झाली. इंग्रजी अमलांत इतर अनेक गोष्टीप्रमाणें याहि बाबतींत पाहिला मान मुंबईस मिळून पहिली गाडी १८५३ त मुंबई तें ठाण्यापर्यंत चालू झाली. तेव्हांपासून आजवर सारखा रेल्वेचा प्रसार झाल्यामुळें देशाच्या सर्व भागांत रेल्वेचें जाळें पसरलेलें असून त्या योगानें सर्व मोठीं शहरें आणि लष्करी ठाणीं जोडलीं गेलीं आहेत. हिंदुस्थानांतल्या रेल्वेचे सामान्यतः दोन वर्ग आहेत. एक हमी दिलेल्या कंपन्यांनीं बांधलेल्या व दुसरा देशी संस्थानांच्या खर्चानें बांधलेल्या होत. पहिल्या सर्व मोठ्या रेल्वे पहिल्या वर्गांतल्या व मागाहून झालेल्या त्यांच्या शाखा बहुतेक दुसऱ्या वर्गांतल्या आहेत. लहान मोठ्या मिळून आजला देशांत १०४ रेल्वे असून त्यांची एकंदर लांबी ३७००० मैल आहे. (१) रेल्वे रस्ता तयार करण्यास (बांधण्यास) दर मैलीं सरासरी खर्च जवळ जवळ दीड लाख रुपये येतो. तथापि या सर्व रेलवे अद्यापि प्राथमिक अवस्थेंतच आहेत. म्हणजे ज्यांचेकडून उत्पन्नाचा बराच मोठा भाग मिळतो, त्या सर्वसामान्य अशा तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या सुखसोईकडे लक्ष दिलें जात नाहीं. विलायतेंत भांडवल उभारून स्थापिलेल्या कंपन्याकडेच सर्व कारभार व सत्ता असल्यामुळें व ज्यांचे कडून रेल्वे कंपन्यास वस्तुतः अधिक फायदा

---

१ इंडियन सायक्लोपीडिआ

होतो अशांचा—देशांतील सर्व साधारण जनतेचा—ताबा रेल्वेचे अंतर्गत कारभारावर मुळींच नसल्यामुळें कंपन्याकडून चालविली गेलेली रेल्वेची व्यवस्था देशांत फारशी समाधानकारक झाली नाहीं. या मुळेंच रेल्वेंत हिंदी लोकांस वरिष्ट जागांवर आजवर मज्जाव होता. कंपन्यांचा कारभार उधळेपणानें चालला आहे, असा गवगवा झाल्यामुळें मुदत संपतांच त्या त्या रेल्वे सरकारनें आपल्या ताब्यांत घेण्याचें ठरविलें व आतां पर्यंत अशा एक दोन मोठ्या रेल्वे सरकारव्यवस्थेंखालीं आल्या आहेत. व आतां कोठें हिंदीकरणास सुरुवात झाली आहे.

मोठमोठ्या रेल्वे व त्यांचे अनेक लघुतर धागे देशांत सर्वत्र पसरल्यामुळें आतां बैल गाडीच्या सडकाचे सापेक्ष महत्त्व साहजिकच कमी झालें आहे. सैन्याची हालचाल रेल्वेनें त्वरित होत असल्यामुळें पूर्वीचें सैन्य कुच करण्याचें रहदारी रस्ते रद्द झाले आहेत. कलकत्याहून वायव्य

सडका बैलगाडी.

सरहद्दीला जाऊन भिडणारा मोठा लष्करी रस्ता मूळ अफगाण बादशहा शीरशहा यानें आंखलेला असून तो अव्वल इंग्रजींत पूर्ण करण्यांत आला. मुंबईहून गाडीचा रस्ता बोर घाटांतून सुरू करण्यांत आल्याचें जें स्मारक उभारण्यांत आलें आहे, तें आज एकांतवासांत पडून आहे. तशाच एखाद्या विलक्षण जिज्ञासू प्रवाशाखेरीज ते कोणी पहावयास जात नाहीं. रेल्वेनें विस्तीर्ण नद्या व भयंकर दलदली पूल घालून ओलांडले आहेत. घाटांची मेढ कोट असलेल्या रांगेवर उंच नागमोडी वळणानें व गंगातटाकच्या स्थलांतर होणाऱ्या जमिनीवर भक्कम धरण घालुन रेल्वेनें आपला मार्ग काढला आहे. रेल्वे रस्त्यांचे महत्त्व अशा रीतीनें स्थापित झालें आहे. तथापि सडकांचे महत्त्व नाहीं असें नाहीं. महत्त्वाच्या दृष्टीनें त्या दुय्यम दर्जाच्या असल्या तरी सुधारणांची वाढ ज्यावर अवलंबून आहे त्या स्थानिक दळण वळणाच्या नियमिततेचे बाबतींत त्यांचें महत्त्व अधिक आहे. दळणवणाच्या सोयीची लोकहिताचीं हीं कामें अलीकडील असून त्यांचें श्रेय ब्रिटिश राज्याकडे आहे. बहुतेक सर्वत्र खडी घालून अगर दक्षिण बंगालप्रमाणें जेथें कोणताच दगड मिळत नाहीं तेथें विटांचा उपयोग करून सडक दुरुस्त बनविल्या आहेत. हिंदुस्थानांत एकंदर

खडी घातलेले व बिन खडीचे मिळून सुमारें दोन लाख मैल रस्ते आहेत. मुख्य मुख्य रस्ते सरकारचे ताब्यांत असून व बाकीचे स्थानिक म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्ड यांच्याकडे आहेत.

नद्या

अंतर्गत प्रदेशांतून नौका गमन बहुतेक काय तें गंगा, ब्रम्हपुत्रा व सिंधू यांतूनच तेवढें करतां येतें. प्राचीनकाळापासून अंतर्गत प्रदेशांतील पैदास समुद्र किनाऱ्यास आणण्याचीं हीं प्रमुख साधनें होतीं. गोदावरी व नर्मदेस पाणी बरेंच असतें. तथापि पात्र खडकाळ असल्यामुळें प्रवाह स्थिर नसतो. रेल्वेमुळें नदीमार्गें दळण वळण कमी झाले असेल, तथापि गंगा किनारींच या नदींतून नौका गमनाची पूर्ण वाढ झाली आहे. तेथल्या लोकांस जलस्थलवासीच म्हणतां येईल. म्हणजे ते अर्धे जमिनीवर व अर्धे पाण्यांत राहणारे आहेत, कारण पावसाळ्यांत तिकडे जलमार्गें गांवांस जातां येते. व प्रत्येक कुटुंबांत स्वतःची बोट असते. बंगाल्यांत ही सोय असल्यामुळें तिकडे ठिकठिकाणाहून मालाची आयात निर्यात व व्यापार नदीमार्गें चालतो. बंगाल्यांत पूर्वेकडील जिल्ह्यांत बोटींची शर्यत म्हणजे लोकांची एक हौसेची जलक्रीडा आहे. हा खेळ मोठ्या ईर्ष्येनें व चुरशीनें चालतो. कित्येक ठिकाणीं संध्याकाळीं दीपोत्सव करून बोटीची मिरवणूक काढतात.

हिंदुस्थानांतल्या कृत्रिम जलौघाचे साधारणपणें दोन वर्ग करतां येतील एक नौका गमनाकरितां व दुसरा प्रथम पाटस्थळाकरितां बांधण्यास आलेला.

गलबतें चालण्याजोगें कालवें

पहिल्या वर्गापैकीं महत्वाची उदाहरणें दक्षिणेंत आढळतात. मलबार व कारोमांडल या दोन्हीं किनाऱ्याला समुद्र व घाट यांचे दरम्यान जी सखल जमिनींची पट्टी आहे, तींत समुद्र किनाऱ्याशीं समांतर अशा अंतर्गत प्रदेशांतून कालवा बांधण्यास लागणारें स्वाभाविक सौकर्य विशेष आहे, त्यामुळें तशा सोयीचें कालवे अगर जलमार्ग अंतर्गत भागांत चोहोंकडे दूरवर फिरविलें आहेत. उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांतील पाटस्थळाकरितां बांधण्यांत आलेले मोठमोठ्या नद्यांचे प्रचंड कालवे नौका गमनासहि उपयोगी होतील असेच बांधले असून त्यांतून बोटी चालतात.

अतिप्राचीन कालापासून हिंदुस्थानचा व्यापार व दळण वळण जगाच्या निरनिराळ्या भागाशीं करून ह्या काळच्या हिंदवासियांनी विस्तीर्ण समुद्र किनारा व सृष्ट संपत्तीपेक्षां आपल्या बुद्धी वैभवानें आशियांतील इतर देशांत हिंदुस्थानचें नांव पुढें आणलें होते. युरोपखंडाशींहि देवघेव चालू असे. भाषाशास्त्रावरून हें सिद्ध होतें कीं, सालोमनच्या व्यापारी गलबतांची मौल्यवान बारदानें मलबार किन्याऱ्याहून आणलेलीं असत. अमेरिका शोधणाऱ्या कोलंबसाची व भूशलाकेची प्रदक्षिणा करणाऱ्या डिगामाची हिंदुस्थानच्या व्यापारांत भागीदार होण्याची इच्छा होती. मसाल्याचे पदार्थ सुती व रेशमी कापड, सोनें, रुपें, तांबें वगैरे बहुमोल जिनसांचा मोह साहसी युरोपियनांचें इकडे आगमन होण्यास कारण झाला. पूर्व व पश्चिम यांमधील प्रवास हल्लीं प्रमाणें पंधरावीस दिवसांचा व सुखकर नसून त्यावेळीं जवळ जवळ बारा महिनें लागून शिवाय त्रासाचा होता. इकडे येण्यास त्यांनीं केलेलें साहस यशस्वी होत गेलें तसतसें खुल्या व्यापारी तत्वामुळें व्यापार त्यांचें हातीं गेला. एतद्देशीय राज्यें जशजशीं अंतःकलहानें विलयास गेलीं तशतशीं त्यांची व्यापारांत सरशीं होऊन परदेशीं होणारा बहुतेक सर्व व्यापार युरोपियनांचे हातीं गेला.

व्यापार उदीम

मोगलांचे कारकीर्दीत परदेशासीं मोठा व्यापार असा नव्हता म्हटलें तरी चालेल. त्यांच्या राजधान्या देशाच्या मध्यभागांत होत्या व समुद्र कांठीं नाक्याची ठिकाणेंहि लष्करी दृष्ट्या उपयुक्त अशीं बसाविलीं असत. पण व्यापारी दृष्ट्या फारसें लक्ष दिलें जात नसे. यामुळें त्यांना दरबारी व छावणीचें स्वरूप आलें. अर्थात अमीर उमरावांच्या वाड्याभोवतीं त्यांच्या विलासाच्या जिनसा बनविणारें कारागीर थोडेबहुत रहात, पण लहर लागून एखाद्या बादशहानें अगर सुभेदारानें तें शहर सोडलें तर केवळ विणकरासारखा कारागीर वर्ग मागें राही. डाक्याची अप्रतिम मलमल व मुर्शिदाबादचे मऊ व रेशमी कापड एका वेळीं तीं शहरें बंगालच्या राजधान्या होत्या या गोष्टीची अद्यापि देखील साक्ष देतात. मोठमोठे कारखानें सहकारी तत्त्वावर चालविण्याची कल्पना त्यावेळीं अस्तित्वांत नव्हती. सर्व धंदे बहुतक घरगुती व विशिष्ट जातींकडून चालविलें जात.

मोगलांच्या वेळचा दर्यावरील व्यापार

ब्रिटिश राज्याचे जे पहिले पहिले परिणाम घडून आले त्यापैकींच मोठमोठीं व्यापाराचीं केंद्रे स्थापित झालीं हें होय. ब्रिटिश राज्याचा उगमच या देशांत मूळ व्यापारापासून झाला. अर्थात त्यावेळच्या ई. इं. कंपनीचें लक्ष व्यापाराकडे विशेष होतें. हें उघड आहे. पोर्तुगीज, डच, व फ्रेंच हीं दुसरी युरोपियन राष्ट्रें इंग्रजांशीं व्यापारी व जेते या दोन्ही नात्यानें स्पर्धा करीत व क्रमाक्रमानें सर्वांनींच मोठमोठीं बंदरें स्थापण्याचा प्रयत्न केला. त्या सर्वांची एका वेळची भरभराटीची ठाणीं आजला ओसाड खेडीं आहेत. एखादा राजवाडा बांधण्याइतकें व्यापाराचें केंद्र बनविणें सोपें नाहीं हें खरें; तथापि व्यापारी चढाओढींत व त्यानंतरच्या राजकीय स्पर्धेत यदृच्छेनें इतर युरोपियन राष्ट्रें लयास जाऊन इंग्रजांचें अधिपत्य स्थापित झालें. आजवर देशांत जीं प्रचंड साम्राज्यें व राजवंश होऊन गेले त्यांचा एक विशेष दृष्टोत्पत्तीस येतो तो असा कीं, हिंदुलोक देवालय बांधणारे, मुसलमान विलासी राजवाडे व मशिदी बांधणारे तर मराठे गड व किल्ले बांधणारे होते. पोर्तुगीजांचें सर्वस्व प्रार्थना मंदिरें उभारण्यांत होतें. परंतु ब्रिटिशांची ख्याती विशाल अशीं व्यापारी शहरें बसविण्यांत आहे. उदाहरणार्थ कलकत्ता व मुंबई हीं होत.

इंग्रजी अंमलांत व्यापारी शहरांची वाढ

हिंदुस्थानच्या एकंदर व्यापाराचे वर्गीकरण चार सदराखालीं करतां येईल ते असेः—१ समुद्र मार्गे परदेशाशीं २ किनाऱ्या किनाऱ्यानें ३ सरहद्दवरील मुख्यत्वें पर्वतश्रेणीमधून ४ अंतर्गत प्रदेशांतील.

व्यापार, व्यापाराचे वर्गीकरण

इतर देशाचे मानानें हिंदुस्थानचा तिन्ही बाजूचा प्रचंड समुद्र किनारा लक्षांत घेतां मोठीं बंदरें थोडीं आहेत. बंगाल व संयुक्त प्रांत यांतील व्यापाराचा सर्व मक्ता कलकत्ता बंदरानें घेतला आहे. पश्चिम हिंदुस्थान, गुजराथ, मध्यप्रांत व वऱ्हाड येथलि पैदाशीच्या निर्गतीचे द्वार काय ते एक मुंबईच आहे. सिंधला कराची व ब्रह्मदेशाला रंगून हीं चारच मोठीं बंदरें आहेत. हीं बंदरें अंतर्गत दळण वळणाची अंत्य-ठिकाणें समजलीं असून सर्व मुख्य रेल्वे मार्गांचा शेवट तेथें होतो. परदेशाशीं होणाऱ्या एकंदर व्यापारांत प्रत्येकीं शेकडा ४० इतका तर मुंबई व कलकत्ता येथूनच होतो. बाकी शें. २० इतर बंदरांत मिळून होतो.

परदेशीं होणारा व्यापार

प्राचीन कालापासून तत्कालीन ज्ञात जगाच्या निरनिराळ्या उतार पेठेस येथून माल जात असे. व हिंदुस्थानची जहाजें तद्देशीय किनाऱ्यास लागत, ही गोष्ट आतां सप्रमाण सिद्ध झाली आहे १, या संबंधीचे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष पुरावे श्रीयुत मुकर्जी यांनी अलीकडे प्रसिद्ध केलेल्या आपल्या ग्रंथांत साधार दिले आहेत. भोज नरपती कृत ' युक्ति कल्पतरू ' ग्रंथांत जहाजें कोणत्या लांकडाची कशी व कोणत्या प्रमाणानें बांधावीं याचें पद्धतशीर वर्णन आहे. सांची येथील बौद्धस्तूप व अजिंठा, पुरी येथील जहाजांची जीं चित्रें आहेत त्यावरून नौकानयन विद्येची इकडे परिणति झाली होती हें दिसून येते. मुसलमानांचे राज्य हिंदुस्थानांत होईपर्यंत बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावरील लोक सीलोन जावा सुमात्रा व चीन येथपर्यंत जात. सौराष्ट्रांतील लोक इराणांकडील मुख्य शहरीं वसाहत करून आपला धर्म सांभाळून रहात, असे चिनी प्रवासी हुएनत्संग यानें लिहून ठेवलें आहे. या देशाच्या संपन्नतेची कीर्ती ऐकून साहसी युरोपियन लोक एकामागून एक इकडे कसे आले, त्यांची व्यापारांत चढाओढ लागून तिचेंच पर्यवसान पुढें राज्य स्थापनेंत कसें झालें, अठराव्या शतकांत युरोपांत झालेली भौतिक सुधारणा व तीमुळें तयार झालेल्या यंत्रसामुग्रीमुळें इकडे कोणते धंदे कसे बसत गेले आणि युरोपियनांच्या आगमनानंतरच्या काळांत खुल्या व्यापारी तत्त्वामुळें देशाच्या व्यापारांत एकंदरींत प्रगति अगर क्रांति कोणती झाली याचें सांगोपांग विवेचन करण्याचें या ठिकाणीं प्रयोजन नाहीं. साधारण माहितीसाठीं प्रस्तुत परदेशाशीं होणाऱ्या व्यापारांचे आयात निर्गतीचे आंकडे खालीं दिले आहेत त्यावरून कळून येईल.

आयात

१ खाद्यपेयें, तंबाखू वगैरे ५० कोटि ६३ लक्ष
२ कच्ची द्रव्यें धान्ये वगैरे २२ " १ "
३ तयार जिनसा (यांत्रिक साधनांनी बनविलेल्या) १८९ कोटि ४७ लक्ष
४ किरकोळ (वरील वर्गीकरणांत समावेश न झालेल्या) ४ " ३२ "

एकूण आयात २६६—४३

१ प्रो. राधामुकुंद मुकर्जी यांचा आर्य नौकानयनाचा इतिहास पहा.

हिंदुस्थानचा परदेशाशीं होणारा व्यापार सन १९२१—२२

निर्गत

१ खाद्य पेयें तंबाखू वगैरे	५३ कोटि	६१ लक्ष
२ कच्चीं द्रव्यें धान्य वगैरे	१०९ "	७३ "
३ तयार जिनसा	६१ "	६७ "
४ किरकोळ (वरील वर्गीकरणांत नसलेला)	४ कोटी	६४ लक्ष

एकण निर्गत कोटि २२९—५५ लक्ष

परदेशांशीं होणारा व्यापाराचा कुल मक्ता मुख्य चार बंदरांनीं घेतला आहे हें वर सांगितलेंच आहे. परंतु याखेरीज द्वीपकल्पाच्या दोन्ही बाजूच्या किनाऱ्याला देशी गलबतांची नुसती भीड लागलेली असते. किनाऱ्या किनाऱ्यानें होणारा बराच व्यापार त्यांनीं आपले हातीं ठेवला आहे. कच्छ व खंबायतचे आखात, मलबार किनारा कन्याकुमारी जवळील बेटें दक्षिणेंतलें कित्येक जिल्हे यांतील बरेचसे रहिवासी उपजत खलासी असून नौकागमनास अवश्यक असे धाडस व कौशल्य याबद्दल ते प्रसिद्ध आहेत. बंगाल्यांत मात्र किनाऱ्यावरील व्यापार व दळणवळण बहुतेक ब्रिटिश आगबोटींतून होतो.

किनाऱ्यानें होणारा व्यापार

परदेशाशीं होतो ह्या पेक्षां देशांतल्या देशांत होणारा व्यापार साहजिक अधिक असणारच. माल बोटींत चढवण्याचा धंदा युरोपियानांनीं आपले हातीं ठेवला असून निर्यातीपैकीं कपाशी गळिताचीं धान्यें गहू वगैरे महत्वाचा माल गोळा करण्याचा कांहीं भागहि ह्यानींच आक्रमिला आहे. परंतु मालाचा प्रसार व गिऱ्हाइकाच्या गरजेप्रमाणे त्याची जुळवाजुळव करण्याचे काम एतद्देशीयांच्या गरजा व चालरीतीशीं परिचित अशांचकडे राहाणार हें उघड आहे. मनूनें वर्णिलेल्या वैश्य जातीचे स्वतंत्र अस्तित्व आजला क्वचितच आहे. परंतु त्यांची जागा निरानिराळ्या उत्साही वर्गांनीं घेतली आहे. पश्चिम हिंदुस्थानांत मारवाडी पारशी व गुजराथी, दक्षिणेंत लिंगायत, मद्रासकडे चेटी कोमटी तर पंजाबांत खत्री हे वर्ग व्यापारांत पुढें आहेत, तथापि देशाच्या सर्व कानाकोपऱ्यांत देखील आसामा पलीकडील ब्रम्हपुत्रा नदाच्या खोऱ्यांत व चिनाकडील अशात सरहद्दीपर्यंत व्यापारी

देशांतला अंतर्गत व्यापार

वेषानें जर कोणती जात पसरली असेल तर ती मारवाडी होय, या वर्गाचा व्यापारी बाणा प्रशंसनीय आहे.

स्थानिक व्यापार

शहरच्या पेठेंत खेडें गांवांत बाजारी अगर जत्रेच्या वेळीं जी खरेदी विक्री होते तीस स्थानिक व्यापार ह्मणतात. ब्रिटिश राज्यांत रेल्वे व सडका या दळणवळणाच्या साधनांमुळें व्यापाराच्या या सर्व शाखांची प्रगती झाली आहे. निदान शहरांत तरी लागेल तो जिन्नस मिळणें सुलभ झालें आहे. दळणवळणाच्या या सुलभतेचा एक फायदा असा कीं, सर्व भागांत सर्वत्र सारखेपणा राहतो. दुसरा असा कीं, दुर्भिक्ष झाल्याठिकाणीं देखील लोकांच्या निर्वाहाची अडचण होत नाहीं. प्राचीन काळीं अर्थात हें शक्य नसे. पूर्वीची ही स्थिति यांत्रिक कलेंत झालेल्या प्रगतीमुळें आतां राहिली नाहीं. प्राचीन शहरें ज्या कालानें आज ओस पाडली आहेत त्यांच्या जागीं त्याच कालगतीनें पूर्वी नसलेलीं कित्येक ठिकाणें महत्वास चढलीं आहेत. उदाहरणार्थ, मुंबई, कलकत्ता, कराची हीं होत.

कला हुन्नर अथवा कारागिरि

कलाकौशल्याविषयीं हिंदुस्थानची ख्याती प्राचीन काळापासूनची आहे.आजला भरभराटलेलीं पाश्चिमात्य राष्ट्रें अगदीं रानटी स्थितींत होतीं त्या वेळीं कलाकौशल्याचे येथें पूर्ण विकास झाला होता.व असें बहु-मोल व अप्रतिम पदार्थ येथून तिकडे नेण्यांत येत असत.ही गोष्ट इतिहासज्ञांस अवगत आहेच. परंतु गेल्या तीन शतकांत पाश्चात्यांनीं भौतिक शास्त्रांत नवे नवे शोध लावून सृष्टीच्या पंचमहाभूतांस मानवी शक्तीचे कह्यांत आणण्याचे कामीं जी अननुभूतपूर्व बुद्धि-मत्ता प्रगट केली व निरनिराळीं यांत्रिक साधनें उपलब्ध करून अर्थशास्त्र दृष्ट्या जगांत जी क्रांती घडवून आणली ती खरोखर अपूर्व आहे. हल्लींच्या त्यांच्या वैभवाचें एक कारण त्यांची यांत्रिक सुधारणा होय. "चक्रनेमिक्रमेण" या न्या-यानें हिंदुस्थान मागें पडून पाश्चात्य राष्ट्रांनीं यांत्रिक साधनानें अनेक उद्योग धंदे व कलाहुन्नर अस्तित्वांत आणले आहेत हें खरें, परंतु हस्तकौशल्य लागतें अशा कारागिरींत हिंदुस्थान अजून हार गेलें नाहीं. आजला देखील केवळ हस्तकौशल्य घेतलें तर कोणत्याहि पाश्चात्य राष्ट्राची तें बरोबरी करूं शकेल, हिंदू समाज व्यवस्थेची घटनाच अशी आहे कीं, विणकर, कुंभार, लोहार या सारख्या कलेचीं कामें गांवोगांव चालतात.पूर्वकालीं देशांतल्या निरनिराळ्या राजदर-

ण्यांच्या प्रतिष्ठा व थाटामाटाच्या विविध पद्धती पासून मनुष्यांच्या सुखसोयीच्या पुष्कळ कलांचा उदय झाला असून त्यांची थोडी बहूत करामत अद्यापि गतवैभव राजधान्यांच्या (दिल्ली, आग्रा व बऱ्हाणपूर) ठिकाणीं पहावयास सांपडतें. परंतु त्या कारागिरीची मोठ्या प्रमाणावर वाढ अगर तींत अधिक सुधारणेची भर पडेनाशी झाली. त्या अवधींत पाश्चात्य राष्ट्रांनीं आपल्या दीर्घ प्रयत्नांनीं उद्योगधंद्यांत मानवी इतिहासांत अपूर्व अशी भराभर क्रांती घडवून आणली. परिस्थितीच्या लाटा मानवी कायद्यापेक्षां कठोरतर असून त्या मुळेंच हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यास असह्य हेलकावे बसल्यामुळें कारागिरास धंदा सोडून नांगर हातीं घेणें भाग झालें. व कित्येक किरकोळ धंदे बुडालेहि. परंतु गेल्या पचवीस वर्षांत विशेषतः स्वदेशीयांचा उदय झाल्या पासून ही स्थिती पालटली असून कापड (सुती व रेशमी) साखर, कांच वगैरेचे कारखानें व गिरण्या आणि सुधारलेले हातमाग ठिकठिकाणीं स्थापित झालें असून त्यांतून पुष्कळ प्रकारचा नवीन माल पैदा होऊं लागला आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचे म्हणजे खेड्यातील घरगुती असलेले साधे व किरकोळ धंदे होत, हिंदुच्या ग्राम व्यवस्थेची रचना अनुवंशिक जातितत्वा-

देशी उद्योग धंदे.

इतकीच श्रमविभागावर झालेली आहे. लोहार, कुंभार विणकर व कासार हे सर्व समाजाचे अभिन्न असे अवयव. तसेंच ते आपल्या घराण्याच्या धंद्याचे वारसदारहि आहेत. एक पक्षीं त्यांच्या मालाला ठराविक गिऱ्हाइक असते. दुसरे असें कीं, त्यांना जे कोणी कामास लावतील त्यांस त्यांचे कडून काम चांगले होईल अशी खात्री असते. साधी रहाणी व सतत काम यांचा मेळ बसल्यामुळें काम चांगले व प्रामाणिकपणानें होतें.

कापड विणणें हा हिंदुस्थानांतला एक पुरातनचा धंदा आहे. लोंकर व कातडी सोडलीं, तर हा धंदा इंग्लंडांत सुरू होऊन तीन शतकें झालीं आहेत.

सुती कापड.

परंतु हिंदुस्थानांत तो महाभारताचे काळापासून अस्तित्वांत आहे. नाजूक वीण, रंगाचा पक्केपणा व नमुन्याची ढब या बाबतींत अद्यापि देखील हिंदुस्थान सर्व जगांत वरचा नंबर पटकावील. परंतु ब्रिटिश राज्य स्थापन होऊन मँचेस्टरचा उदय झाल्यानंतर तेथील कापडाशीं स्वस्ताईचे बाबतींत बरोबरी करणें

अशक्य झालें. अलीकडे दहा वीस वर्षांत इकडेहि गिरण्यांची पुष्कळ वाढ झाली असून मुंबई, अहमदाबाद नागपूर व सोलापूर वगैरें ठिकाणीं बरीच मोठी लोकसंख्या गिरणी कामगारांची झाली आहे. व त्यांतून हजारो गठे माल तयार होऊन देशांत व चीन, जपानांत खपत आहे. यांत्रिक साह्यानें निघणाऱ्या कापडा खेरीज या धंद्याची दुसरी शाखा ह्मणजे हातमाग होत. या यंत्र प्रधान युगांत परिस्थितीनुरूप मोठ्या प्रमाणावर कापड निघणाऱ्या गिरण्या बऱ्याच झाल्या आहेत. जरी हातमागांनीं आपलें अस्तित्व अद्यापि टिकवलें आहे तथापि हातमागावरील हस्त कौशल्य बहुतेक लुप्त होत चाललें आहे. डाक्याची सुप्रसिद्ध मलमल आतां बहुतेक नामशेष झाली आहेच. जी थोडीबहुत तयार करण्यांत येते ती पूर्वी इतकी उंची निघत नाहीं. मलमल तयार करण्याचें कामीं लोक तिकडे निरनिराळी १२६ हत्यारें अगर यंत्रें उपयोगांत आणतात. मद्रासकडे मच्छलीपट्टण, मुंबई इलाख्यांतील अमदाबाद, सुरत व भडोच हीं चिटाविषयीं प्रसिद्ध आहेत. पुणें, नाशिक, धारवाड वगैरे ठिकाणीं सूत रंगवून लुगडीं तयार करतात. येवला तर कद, पितांबर वगैरे उंची वस्त्रांविषयीं प्रसिद्ध आहे.

रेशमी कापड

सुती प्रमाणें रेशमी अगर गर्भ रेशमी विणकाम सामान्यपणें सर्वत्र असलें तरी आसाम व बंगाल खेरिज कोठेंही रेशिम मात्र पैदा होत नाहीं. यामुळें बरेंचसें कच्चे रेशीम विशेषतः मुंबईस चिनांतून येतें. सुती बरोबर तुलना केली तर रेशमी विणकामास खेड्या पेक्षां शहरचा धंदा म्हणतां येईल. नक्षीदार रेशमी कापड पंजाब व सिंधमध्यें अनेक शहरीं व आग्रा, दक्षिण हैद्राबाद तंजावर, त्रिचनापल्ली येथें तयार होतें. काशी अमदाबाद व त्रिचनापल्ली येथें किनखाप चांगलें तयार होते. पारशी व गुजराथी बायका वापरतात त्या ठशाच्या रेशमी साड्या सुरेतस विणतात. अलीकडे मुंबई व पुण्यास रेशमी कापडाच्या गिरण्या निघाल्या असून तेथलि पुष्कळसा माल देशांत व विशेषतः ब्रम्हदेशांत खपतो.

कापडाची मूळ जमीन सुती, रेशमी, लोंकरी अगर कातडी कशाचीहि असली तरी त्यावर नक्षी काढतां येतें. ती अगर कशिदा मागांवरच विणतात अगर मागाहून हातानें सुइनें विणतात. हें काम काश्मीर पंजाब व सिंधमध्यें चांगले होतें; काश्मीरच्या प्रसिद्ध शाली पश्मीना नांवाच्या मऊ लोंकरीच्या

करतात. ती लोंकर हिमालयांत आढळणाऱ्या एका जातीच्या बकऱ्या पासून मिळते. या जातीचे शालीचे बकरे तिकडे विपुल आहेत. मलमलीवर वेलबुट्टी पाटणा, डाका व दिल्ली येथें आणि कातडविर नक्षी गुजरायेंत होते. दक्षिणेंत गुलबुर्गा औरंगाबाद वगैरे ऐतिहासिक महत्वाच्या ठिकाणीं मखमली व जरीची नक्षी करून चांदवे इत्तीची झूल वगैरें करतात. सुवर्णाप्रमाणें रत्नजडित नक्षीही करण्यांत येते. बडोद्याचे माजी महाराज मल्हारराव गायकवाड यांचे आज्ञेवरून तयार केलेल्या शालीचें वर्णन डॉ. बर्डवुड पुढील प्रमाणें करतात. "ती संपूर्ण मोतीं व मोलवान रत्नाची" बनविली असून तिस एकंदर खर्च एक कोटि रुपये आला होता म्हणतात.

कशिदा अगर वेलबुट्टी व नक्षी

सतरंज्या व गालिचे यांत फरक असा कीं, सतरंज्या सुताच्या व गालिचे लोंकरीचे करतात. सतरज्या बंगाल्यांत व उत्तर हिंदुस्थानांत चांगल्या करतात. सतरंजीचें विणकरींतलें एक विशिष्ट लक्षण म्हणजे तींत विविध रंगांच्या पट्टया पाडलेल्या असतात. गालीच्याची कला मूळची इराण-तुर्कस्थानची आहे, व येथें ते अद्यापि उत्तर हिंदुस्थानांत तयार होतात. ही कला मूळ मुसलमानांनीं इकडे आणिली असें म्हणतात. हिंदुस्थानांत तयार होणार गालिचे इंग्लंडांत बरेच लोकप्रिय झाले आहेत. गालिचाची कारागिरी म्हणजे मूळच्या उभ्या ताण्यांच्या मध्यें लोंकर मुरडवण्याची असते. या धंद्याची पूर्वापार ठिकाणें काश्मीर, पंजाब व सिंध प्रांतांत असून खेरीज आग्रा, जबलपूर व दक्षिणेंत वरंगळ, मलबार व मच्छलीपट्टण हीं ठिकाणें आहेत. मखमली गालिचे काशी व मुर्शिदाबादेस व रेशमी तंजावर व सालेम येथें तयार करतात. १८५१ सालच्या प्रदर्शनास आंध्रांची जुनी राजधानी जी वरंगळ येथून आलेल्या उत्कृष्ट गालिचास पहिल्या प्रतीचें बक्षिस मिळालें. खेरीज लाहोर, जबलपुर, काशी, बंगलोर व गुलबुर्गा येथील तुरुंगांत मोठ्या प्रमाणावर तयार होणाऱ्या सतरंज्या व गालिचे या दोन्ही जिनसांचा इंग्लंड व इतर परदेशांत पुष्कळ खप होतो.

सतरंज्या व गालिचे.

सोनें रुपें व जवाहीर हीं त्यांचा वर्ण व स्वाभाविक किंमत या गुणामुळें पूर्वीपासून दागिन्यांचें एक साधन होऊन राहिली आहेत. दागिन्यांची हौस

अशिक्षित अगर सुशिक्षित या सर्वांस सारखीच असते व ती बनविण्याचें ज्ञान मनुष्यानें कधींच संपादन केलें आहे. दागिन्यांच्या कलेचा उगम मूळ झुबकेदार गवत अगर पान यांचें अनुकरणांत आहे; त्याची परंपरेनें वाढ झाली आहे.व निरनिराळे मानव वंश देशांत कालें करून वसत गेल्यामुळें त्यांच्या भिन्न चालीरीति व आवड यांस अनुसरून या कलेंत विविधता रूढ झाली आहे. कलेच्या दृष्टीनें जडताचें काम कटक, त्रिचनापल्ली व काश्मीरकडे उत्कृष्ट होतें. दक्षिण हिंदुस्थानांत " स्वामी " ह्मणून एक आवडता दागिना आहे. या अलंकारांत मुख्यतः देवतांच्या प्रतिमा ठशानें उमटविलेल्या असतात. सोनारकाम सर्वत्र चालत असलें तरी विशिष्ट ठिकाणींच तें विविध तऱ्हेचें व सुबक होतें. सोनें व रुपें यांपासून जर करतात व जर करण्याची ही कृती सुवर्णकार इतक्या कुशलतेनें करतात कीं, साधारण एक रुपया भाराचें रुप्याचा जर ८०० वार लांबीचा होतो. तो मागांत घालून विणण्यापूर्वी प्रायः रेशमाला गुंडाळतात; जरीचें कापड हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं होतें. जयपूर व दक्षिण हैद्राबाद येथें मलमलीवर जरीचें काम ठशानें करितात. राजेरजवाड्यांखेरीज बहुमोल रत्नें व जवाहीर वापरणारा धनिक वर्ग आजला हिंदुस्थानांत फारसा अस्तित्वांत नाहींच तेव्हां त्यांचें ज्ञान व उपयोग अर्थात् सार्वत्रिक नाहीं. त्यासंबंधी माहिती नावार पणें राजघराण्यांच्या पदरच्या कारागिरांसच तेवढी असते.

सोनार काम आणि जडताचें व जवाहीर काम

खेड्यांत लोहाराचें मुख्य काम अर्थात् गांवकऱ्यांस शेतकीचीं आउतें करून देणें हें असतें. परंतु मोठ्या शहरीं पेट्या, पंचपात्री, मोटा वगैरे लहानमोठें अनेक प्रकारचें सामान तयार करतात. हत्यारें, तारकहि आहेत व मारकहि आहेत; तथापि तीं तयार करणें केव्हांहि एक सात्विक धंदा आहे व तो या देशांत एकाकाळीं कळसास पोंचला होता. परिस्थितीनुरूप हल्लीं हा धंदा फार कमी प्रमाणावर व कांहीं ठिकाणींच आहे. तलवारीच्या पात्याला केव्हां केव्हां धारेला करवतीसारखे दांत पाडलेले असतात. तोड्याच्या बंदुका व इतर दारूगोळ्याचीं हत्यारें पंजाब व सिंध प्रांतांत कित्येक ठिकाणीं, बंगाल्यांत मोंगीरला, मद्रासकडे विजयानगरम् येथें तयार

लोखंडी सामान.

करतात. जाळीदार चिलखतें काश्मीर राजपुतांना व कच्छ इकडे होतात. मुंबई इलाख्यांत अहमदनगर भांड्याच्या टोंकाविषयीं प्रसिद्ध आहे.

पुरातन पद्धतीनें ह्मणजे ज्यांत हस्त लाघव विशेष अशा धंद्या खेरीज देशांत सध्यां चालू काळास अनुसरून यांत्रिक साधनानें चालविलेले कारखानें अनेक आहेत. त्यांत कापसाच्या व सुताच्या गिरण्या मुख्य होत. पहिली गिरण मुंबईस १८५२ सालीं सुरू झाली. आजला अशा मोठ्या प्रमाणावर चालणारे कारखाने अगर गिरण्या देशांत सूत व कापड मिळून२६५आहेत,तागाच्या गिरण्या ७३,लोकरी कापडाच्या ६ व कागदाच्या एकंदर ७ गिरण्या सांप्रत चालू आहेत. हिंदुस्थानातल्या गिरण्या बहुतेक समाईक भांडवलावर उभारलेल्या आहेत; मुंबईच्या गिरण्यांतून निघणारें सूत व कापड चीन व जपान या देशांत खपतें. मुंबईला कापसाच्या तशा बंगाल्यांत तागाच्या गिरण्या आहेत. ताग विणून त्याची पोती तयार करण्याचें कापड करणें हा उत्तर बंगाल्यातला विशेषतः पूर्णिया व दिनाजपूर जिल्ह्यांतील एक हातमागाचा स्थानिक धंदा आहे. हातमागावर तसेच गिरण्यांतून लागेल त्या कामीं अधिक आकाराची पोतीं तयार करतात व तीं हिंदुस्थानांत तर काय परंतु इंग्लंड ऑस्ट्रेलिया वगैरे देशांत पुष्कळ खपतात. बंगाल खेरीज इतरत्र ताग चांगला पिकत नाहीं.

पाश्चात्य धर्तीवरील उद्योग धंदे कापसाच्या गिरण्यां

धातुकाम

धातूंवर नकशीकाम व कुसर याचें ज्ञान हिंदुस्थानांत फार जुनें आहे. अशोक (ख्रि.पू. २५०) कालीं दगडी खोदकाम उत्कृष्ट होई. दिल्लीचा चंद्रगुप्ताच्या वेळचा प्रसिद्ध लोहस्तंभ व धार येथील 'गंग तेल्याची लाट' हा प्रचंड स्तंभ ही अवाढव्य कारागिरी इतक्या प्राचीन काळीं लोखंडीकाम इतक्या पूर्णावस्थेंत होत होते याची साक्ष देतात. पोलाद करण्याचीहि कला हिंदुस्थानांत माहीत होती. तरवारी वगैरे हत्यारें पूर्वी येथून बाहेर देशीं जात असत. पोलादावरील नक्षी कामाची व हत्याराचा प्रसिद्धी असे. हल्लीं थोडी बहुत ही कला राजपुतान्यांत आहे.

---

१ आंकडे सन १९१८–१९ सालचे आहेत.

लोहाराप्रमाणें खेडगांवचा कासारहि घरगुती उपयोगाकरितां आवश्यक तीं भांडीं तयार करतो. या सर्व भांड्यांत लोटा अगर तांब्या मुख्य आहे. ह्मणजे त्याची रचना सर्वांत प्रथम झाली आहे. तांबें पितळेचें कामांत काशीचा पहिला मान असून, तेथें केवळ भांडींच नव्हे तर या धातूंच्या प्रचंड मूर्तीहि तयार होतात. दक्षिण हिंदुस्थानांत मदुरा व तंजावर व पश्चिम भागांत अहमदाबाद, पुणें व नाशिक हीं या संबंधीं प्रसिद्ध आहेत. खुद्द मुंबईस देखील घडीव काम पुष्कळ होतें. शेंकडो देवालयांत असलेल्या हजारों घंटा आपल्या शुद्ध व गंभीर स्वराबद्दल प्रसिद्ध आहेत. पुष्कळ भागांत कासाराच्या धंद्याच्या विशिष्ट अशा निरनिराळ्या पद्धती रूढ आहेत.

तांबें व पितळ काम.

कोष्ट्याच्या मागानंतर प्राचीन सुधारणेचें दुसरें एक विशिष्ट चिन्ह ह्मणजे कुंभाराचें चाक होय. कुंभार हा अज्ञातकालापासून हिंदुजाति मंडळाचा एक महत्वाचा सभासद आहे. लहान मडक्यापासून मोठ्या रांजणापर्यंत कुंभारकाम खेडोंखेडीं होतें. तथापि कलेच्या दृष्टीनें सुधारणा झाली असा हिंदुस्थानांतला मुख्य प्रांत ह्मणजे सिंधप्रांत आहे. सिंधमध्यें हें काम दोन प्रकारचें होतें. एक मातीची भांडीं व दुसरीं कौलें. या दोन्ही प्रकारांत रंग चकाकी सारखीच असते. हा धंदा या भागांत मूळ मुसलमानांनीं सुरू केला असें म्हणतात. सिंधचा हा माल हैद्राबाद, कराची वगैरे ठिकाणीं तयार करतात. पंजाबांत लाहोर व मुलतानला कुंभारकाम होतें. मदुरेचीं मातीचीं भांडी देखील ऐटदार घाट व रंगाची मातबरी यामुळें नांवांजलेली आहेत. मंगलोरी कौलें (मंगलोर पहा) तर हिंदुस्थानांत आजला प्रसिद्ध असून देशांतल्या बऱ्याच भागांतील लहानमोठे बंगले व इमारती यांनीं सुशोभित झालेल्या आहेत.

कुंभार काम

बौद्धांचे जे स्तूप वगैरे प्राचीन अवशेष आहेत, त्यांवरून दगडाचें खोदकाम ही हिंदुस्थानांतली अति प्राचीन कला आहे. दगडाचा उपयोग बांधकामाकडे करणारे बुद्ध भिक्षूच जगांत पहिले होत. अजिंठा वेरूळची लेणींहि पाहिलीं म्हणजे त्यांनीं शिल्पकलेंत किती प्राविण्य संपादिलें होतें हें दिसून येतें. खेरीज हिंदुस्थानांत अशी कितीएक देवालयें आहेत कीं, तेथें वर्षांतून

खोदकाम

विविक्षित महिन्यांस विविक्षित तिथीस सूर्यप्रकाश देवाच्या मुखावर पडावा. ही रचनाचातुर्याची खुबी खरोखर चमत्कृतिजन्य व मार्मिकतेची आहे. अशाप्रकारचें अप्रातिम नक्षी काम असलेलीं अप्रातिम देवालयें विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत (मदुरा, तंजावर) पुष्कळ आहेत.

दगडाप्रमाणें लांकडावरहि कोरीव काम करतां येतें. गुजराथेंतील शहरांत व जिथें लांकडी घरें आहेत तेथें महादरवाजावर सुंदर नक्षी कोरलेली असते. असलें जुनें काम क्वचित नाशिकासहि अद्याप पहावयास मिळतें. या कारागिरीला उत्तम लांकूड म्हणजे शिसवी, फणस व चंदनाचें होय. चंदन पश्चिम घाटांत विपुल आहे. विशेष कोरीव कामाला शिसवी आणि साध्या व उपयुक्ततेच्या कामाला फणसाचें लांकूड उपयोगी आहे.

लांकडी कोरीव काम

सुरत व अमदाबादेस लांकडी कोरीव काम चांगलें होतें. टेबलें, खुर्च्यासारख्या उपयुक्ततेच्या दृष्टीनें लांकडी काम पुष्कळ वाढलें असलें तरी पूर्वीची कलाकुसरीचीं कामें क्वचित होतात. लांकडी रंगीत सामान गोकाक व सांवतवाडीस तयार होतें. हस्तिदंती व हरिणाच्या शिंगावरील कोरीव काम याबद्दल अमृतसर काशी, मुर्शिदाबाद, विजगापट्टम व त्रावणकोर हीं ठिकाणें प्रसिद्ध असून येथें बायकांच्या ककणापासून पालखीपर्यंत लहानमोठ्या सर्व जिनसा मागितल्यास मिळतात. मनुष्याच्या आकाराचे विशिष्ट मनुष्य जातीचें स्वरूपसादृश्य व पेहराव यांची बरोबर ओळख पटेल असे मातीचे पुतळे बंगाल्यांत कृष्णनगर लखनौ व पुणें येथें तयार करतात. याची प्रचीती निरनिराळ्या प्रदर्शनांत जगांचे निदर्शनास आली आहे[1].

हस्तिदंती काम.

६४ कलांच्या यादींत कांचेचा समावेश करण्यांत आलेला नाहीं. तथापि ख्रिस्ती शकापूर्वी आठशे वर्षे हिंदुस्थानांत कांच कला होती. यजुर्वेदांत कांचेचे दागिने स्त्रिया घालीत असा उल्लेख आहे, यावरून पुरातन काळापासून कांच आपल्या लोकांस माहित होती. सुधारलेला कांच कारखाना प्रथम पंजाबांत १८७० त निघाला. आजला हिंदुस्थानांत एकंदर आठ

कांच

१ पुण्याच्या एका कारागिराच्या अशा मातीच्या पुतळ्यावरून तयार केलेलें " सोळासंस्कार " हे फोटो मासिक मनोरंजन १९१२ चे एका अंकांत दिलें आले आहेत. ते या कारागिरीची चांगली साक्ष देतात.

नऊ कांचचे कारखानें आहेत. त्यांत तळेगांव येथील पैसाफंड कांचशाळा व औंध संस्थानातील ओगलेवाडीचा कारखाना हे प्रमुख आहेत. तळेगांवाचे कारखान्यांत कांच कामाचें प्रत्यक्ष शिक्षणही दिले जाते.

शिक्षणाचा प्रसार व साक्षरतेची वाढ यामुळें कागदाचा खपच एकंदरीत इतका वाढला आहे कीं त्याचा पुरवठा होणेंच कठीण झाले आहे. प्राचीन

कागद

काळीं भूर्ज पत्रांवर व ताडपत्रावर लिहीत असत. व अशा रीतीचे जुनें लेख तंजावर व नेपाळांतील ग्रंथसंग्रहालयांत अद्यापि अनेक आहेत. पूर्वी जुन्नर, दौलताबाद, वगैरे ठिकाणीं हात कामानें कागद तयार करण्याचे कारखानें होते. व तो जुन्नरी कागद या नांवानें प्रसिद्ध असे. आजला कागदाच्या गिरण्या हिंदुस्थानांत नऊ आहेत.[1] तथापि परदेशांतूनही होणारी कागदाची आयात फार मोठी आहे.

आसामांतील चहाचे मळे, निलगिरीवरील कॉफी व सिंकोनाच्या बागा व त्या त्या पदार्थांचा बाजारांत पाठविण्यासारखा तयार माल बनाविण्याचे कारखानें बहुतेक परकीयांचेंच हातीं आहेत. मॅंगनीज मीठ दगडी कोळसा व लोखंड यांच्या खाणींत हिंदी लोकांचा रिघाव आलीकडे थोडा झाला आहे. लोखंड व पोलादाचे कारखान्याबाबत प. वा. टाटाचा धाडसी प्रयत्न जगजाहिरच आहे. या औद्योगिक क्षेत्रास जमशेदपूर हे नांव देऊन टाटांचे एक चिरस्मरणीय स्मारकच करण्यांत आले आहे हें प्रसिद्धच आहे. औद्यौगिक दृष्ट्या रेशीम, साखर, कातडी कमावणें नीळ वगैरे अनेक महत्वाचे धंदे आहेत. कातडी कमावणें व त्याचे निरनिराळे जिन्नस तयार करण्याचे मोठ्या प्रमाणावरील कारखाने फक्त कानपुरास आहेत. जर्मनीचा कृत्रिम नळीचा रंग बाजारांत येऊं लागल्यामुळें हिंदुस्थानांतील नळीची धान्यें वगैरे कच्चा माल परदेशीं जाऊन तिकडे त्यांच्या तेलांचें रूपांतर होऊन व्हारनिस पॉलिश वगैरे कामास उपयोगी पडणारे जिन्नस बनून इकडे येतात. हे सर्व इकडे तयार होणें सांपत्तिक दृष्ट्या अतिशय जरूर आहे. परंतु सरकारच्या खुल्या व्यापाराच्या तत्वाच्या धोरणामुळें इकडील उद्योग धंद्यास फारसें उत्तेजन मिळत नाहीं.

---

१ ज्ञा. को. वि. १० पा. २३०

विस्तीर्ण क्षेत्रफळ व निरनिराळ्या प्रकारची भू रचना यामुळें हिंदुस्थान देश विविध व विपुल खनिज संपत्तीनें समृद्ध आहे. ती आपलीशी करण्याचे उद्योगी इंग्रजांनीं प्रथम मनावर घेतलें. प्रथम थोडे बहुत श्रम व पैसा वायां गेला तरी निरनिराळ्या खाणी सांपडून विपुल संपत्ती मिळूं लागली, तेव्हां हा

खाणी
व
खनिज संपत्ती

खाणींचा धंदा यशस्वी होत गेला. मॅंगनीज, मीठ, दगडी कोळसा, सोनें, हिरें वगैरेंच्या खाणीं देशांत निरनिराळ्या भागांत आहेत. सोन्याच्या खाणी महत्वाच्या म्हणजे म्हैसूर संस्थानांतील कोलार येथील, हिरे पन्ना संस्थानांत विंध्याद्रीचे पट्टयांत, मीठ पंजाबातील डोंगरांत व अभ्रकाच्या खाणी विशेषतः बंगाल बिहार आणि ओरिसा प्रांतांत आहेत.

अशोधित धातूची शुद्धता व ती बनविण्याची प्राचीनता यांत हिंदुस्थानांतल्या लोखंडाच्या ठेवीचा बहुतेक जगांत पहिला नंबर येईल. उत्तरेस

लोखंड

आसामापासून दक्षिणेस मद्रासेपर्यंत जेथें जेथें डोंगर आहेत त्या सर्व भागांत लोखंड सांपडतें व कमी अधिक प्रमाणानें शुद्धहि करण्यांत येतें. धातू शुद्ध करण्याच्या ज्या पद्धती आहेत त्या सर्वत्र सारख्याच असून पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या आहेत. लोखंडाचे कारखान्यास अमर्याद जळण लागतें. अलीकडे दगडी कोळशाचा या कामीं उपयोग होऊं लागला आहे. लोखंडाचे कारखान्यास अगदीं पहिली अडचण म्हणजे अशोधित धातू प्रवाह व जळण हीं जीं मूलतत्वें तीं पुरेशी व भरपूर लागत असली पाहिजेत हें होय. आजपर्यंत हिंदुस्थानांत लोखंड तयार करण्याचे कारखानें मोठ्या प्रमाणावर नव्हते. तसे एकदोन प्रचंड कारखाने प्रसिद्ध टाटा कंपनीनें ओरिसा व मध्यप्रांतांत काढले असून तेथील माल आतां परदेशींही खपूं लागला आहे.

दगडी कोळशाचा शोध हिंदुस्थांनांत प्रथम १७७४ त लागून पहिली युरोपियनांची खाण राणीगंज येथें १८२० त चालू झाली. बंगाल, असाम, मध्यप्रांत व निजामचें राज्य यांतहि खाणी आहेत. एकंदर खाणी सुमारें ३०० त्यापैकीं २८० फक्त बंगाल्यांत आहेत. या सर्व खाणींतून दरसाल सरासरी दोन कोटी टन कोळसा निघतो. त्यापैकीं बराच आगगाड्या व गिरण्या यांत

खपतो व थोडासा परदेशीं जातो. दगडी कोळशाची वास्तविक किंमत तो रेल्वेनें पेठेंत आणतां आल्याखेरीज होत नाहीं. कोळशास लागणारा पैसाच काय तो रेल्वे चालविण्यास होणारा खर्च निश्चित करण्याकामीं एक प्रधान घटक द्रव्य आहे.

दगडी कोळसा

इकडील कोळशांत राखेचें प्रमाण अधिक ह्मणजे शें. ६ असतें असें तज्ञांचें मत आहे. राणीगंजच्या खाणीचें क्षेत्र सरासरी ५०० चौ. मैल असून उंच उंच धुराड्यांनीं गजबजून गेलेल्या त्या कृष्णवर्ण प्रदेशांत कित्येक युरोपियन व देशी कंपन्या या खाणी चालवितात. खाणीतला मजूर वर्ग बहुधा संताळ व बावरी जातीचा असून सोशिकपणा तर स्वभावतःच त्याचे अंगीं अगदीं खिळलेला आहे.

मीठ

मीठ हा पदार्थ जीवनास विशेषतः शाकाहारी लोकांस अत्यंत आवश्यक आहे. मांसाशन निषिद्ध नाहीं अशा लोकांचे देखील नित्याचें खाद्य साधेच असतें. मीठ हिंदुस्थानांत तीन मार्गांनीं उत्पन्न होतें. (१) समुद्राच्या पाण्याचें बाष्पीभवन होऊन (दोन्ही बाजूच्या समुद्र किनाऱ्याला) (२) क्षार सरोवर, (उदाहरणार्थ राजपुतान्यांतलें सांबर सरोवर) (३) डोंगरांतल्या मिठाच्या खाणी (पंजाबांत आहेत) या तिसऱ्या मार्गानें जें मीठ मिळतें तेवढ्यामुळेंच त्यास खनिज पदार्थ म्हणतां येईल. पंजाबांतली ही क्षार डोंगरांची रांग झेलम व शाहापूर जिल्ह्यांतून जाते. या मिठाची मुख्य खाण झेलम जिल्ह्यांत केवरा येथें असून तीस लॉर्ड मेयोचें नांव दिलेलें आहे, गुजराथेंत खारेघोडे येथें विहिरींतून मीठ काढतात त्यांस वैडागरी मीठ म्हणतात. वऱ्हाडांत लोणा तलावांतहि मीठ निघतें. या सर्व प्रकारांनीं देशांत खंडोगणती उत्पन्न होणाऱ्या मिठाखेरीज कलकत्ता बंदरांत विलायती मीठहि थोडें बहुत येतें.

सृष्टिनिर्मित सोरमिठाच्या पुरवठ्याचा मक्ता बहुतेक हिंदुस्थानकडेच आहे; कारण बंदुकीची दारू बनविण्याकरितां युरोपला त्यावर बरेंच अवलंबून रहावें लागतें. हें मीठ कित्येक भागांत मुख्यत्वें गंगा तटकाला जमिनीच्या पृष्ठभागावर पांढऱ्या फुलाप्रमाणें इतर क्षार पदार्थांबरोबर सर्वत्र पडतें. हें तयार करण्याची पद्धत साधी असून हा धंदा बहुतेक नुनियानामक विशिष्ट जातीच्या लोकांच्या हातीं आहे. तथापि मिठाच्या बाबींतल्या अलिकडील कायद्याच्या अडचणीमुळें या धंद्याचा ऱ्हास होऊं लागला आहे. सोरमीठ तयार करण्याचा हंगाम हिंवाळ्यांत व तें अतिशय पाऊस

सोरा किंवा सोरमीठ

झालो म्हणजे जमिनीवर जें क्षार दृग्गोचर होतात त्यावरून ओळखावें लागतें. ती माती गोळा करून एका भांड्यांत घालून त्यांतून पाणी गाळतात व तो खार उकळून त्यांत चांगलें मीठ मिसळलें म्हणजे सोरमीठ तयार होतें. याच्या खासगी विक्रीस सरकारी मनाई आहे. सोरमीठ गाळण्याचें व शुद्ध करण्याचें नुसत्या एका टिरहुट जिल्ह्यांत शेंकडों कारखानें आहेत. सोरमीठ मुख्यत्वें बहार-मधील टिरहुट, सारण वगैरे जिल्ह्यांतून व थोडेंबहुत संयुक्त प्रांतांतून परदेशीं जातें.

या देशांत विशेषतः म्हैसुराकडे खडकांत सोनें फार प्राचीन काळापासून सांपडत असून परदेशांत जात आहे. जुन्या भट्ट्यांचे जे अवशेष दिसून येतात त्यावरून एका अज्ञात कालीं हें काम मोठ्या प्रमाणावर चालत असावें असें दिसतें. पूर्वींच्या खाणीं डोंगर प्रदेशांत अद्यापि कित्येक ठिकाणीं आढळतात. अलीकडे दक्षिण हिंदुस्थानांतील कांच मण्याच्या भूरचनेचें ऑस्ट्रेलियाच्या सुवर्णप्रसव अशा कांचमण्याच्या खडकांशीं बरेंच साम्य दिसून आल्यावरून तीं पासून सोनें काढण्याकडे शोधकांचें लक्ष वेधलें. या मुख्य जागा अगर खाणी निलगिरी जिल्ह्यांतील वायानाड तालुक्यांत व म्हैसूर संस्थानांतील कोलार जिल्ह्यांत आहेत. हल्लीं गदग जवळ कुबुलायत कट्टी, रायचूरनजीक हट्टी व म्हैसूर संस्थानांतल्या कोलारच्या एकंदर सोन्याच्या खाणी चालू आहेत. देशांत कित्येक नद्यांच्या प्रवाहांतहि सोन्याचें कण सांपडतात, कोलारच्या खाणींतून १९२० सालीं साडेतीन कोटीचें सोनें धुऊन काढलें. पूर्वी खोल खणतां येत नसल्यामुळें त्यांचें उत्पन्न फारसें नसे, परंतु हल्लीं यांत्रिक साधनानें वाटेल तितकें खोल खणणें सुकर झालें आहे. कोलारच्या खाणींतील यंत्रें तेथून १०० मैलांवर कावेरीच्या सागर नांवाच्या धबधब्याच्या साह्यानें वीज तयार करून तिच्या शक्तीनें चालवितात. कोलारच्या खाणींची पहाणी सरकारनें प्रथम १८७९ त एका आस्ट्रेलियन तज्ज्ञाकडून करविली व त्या सर्व खाणी अद्यापि युरोपियन कंपन्यांच्या मालकीच्याच आहेत, त्यांजकडून हैसूरला स्वामित्वादाखल सालीना १५ लाख रुपये मिळतात. हें कारखाने इतके अवाढव्य आहेत कीं, त्यांनीं आपल्या कामकरी लोकांचें बाउरिंगपेठ नांवाचे एक प्रचंड शहर बसविलें आहे. खाणींतील मातीचा तेथें एवढा ढीग पडला आहे कीं, तो मनुष्यकृत एक पर्वतच झाला आहे.

व्यवहारांत देवघेवीला चलन अगर नाणें अवश्यक आहे म्हणून त्याची उत्पत्तीहि तितकीच जुनी आहे; सोन्याचें नाणें या देशांत फार प्राचीन कालापासून होतें. महाभारत व रामायण कालांत निष्क नांवाचें सोन्याचें नाणें होतें. भास्कराचार्यांच्या लीलावती ग्रंथांत नाण्याचें कोष्टकच दिलें आहे. त्यावरून नाण्यांचा प्रचार सार्वत्रिक होता असें दिसून येतें. नाण्यांचा व इतिहासाचा निकट संबंध असतो म्हणून एका विनोदी इंग्रज लेखकानें त्यांना राष्ट्राचे इतिहासकार असें म्हटलें आहे. कारण तीं त्या त्या कालाचा औद्योगिक, सांपत्तिक, कलाकौशल्य विषयक इतिहास सांगतात. शिवाजी महाराजांचें वेळेपर्यंत देखील सोन्याचीच नाणीं असत, कारण राज्याभिषेकानंतर शिवाजीनें आपली सुवर्णतुला केली ती लक्ष होन भरली २. तथापि पुढील कालांत रुपये (रुप्याचें नाणें) हेच व्यवहारातलें नाणें सर्रास चालू झालें. परंतु रुपें ही धातु हिंदुस्थानांत कोठेंच सांपडत नाहीं. इंग्रजी अम्मलापूर्वी हिंदुस्थानांत एकंदर ९९४ प्रकारची नाणीं प्रचारांत होतीं. त्यांचे प्रकार होन, मोहरा, रुपये व पैसे असे असून तीं ज्यांनीं व ज्या टांकसाळींत पाडली त्यावरून त्यांस बादशाही जयपुरी, नारायणपेठी वगैरे नांवें ३ होतीं. पूर्वी सोन्याचेंच नाणें असें; अलीकडच्या सुधारलेल्या काळांत सोनें रुपें निकल वगैरे धातू व नोटा हें कागदी नाणेंहि चालू लागलें आहे.

नाणें.

हिंदुस्थानांतल्या इतर धातूंत तांबें, शिसें व कथील यांचा समावेश होतो. तांबें पुष्कळ ठिकाणीं सांपडतें. फार प्राचीन काळापासून उपयोगांत आणलेली धातू म्हणजे तांबें होय. तांब्याच्या मोठ्या व मातब्बर खाणी दार्जिलींग ते कुमान पर्यंतच्या हिमालयाच्या खालच्या रांगांत आहेत. खाणींचे कारागीर बहुतेक नेपाळी असून, त्या दूर डोंगरांत असल्यामुळें युरोपियन भांडवलाचा तेथें शिरकाव नाहीं. सोडून दिलेल्या ठिकाणावरून असें दिसतें कीं, ह्या खाणी पुष्कळ वर्षांपासून माहीत होत्या एवढेंच नाहीं तर चालतहि होत्या. अशोधित धातू काढ-

इतर धातू (तांबें)

२ केळूसरकरकृत शिवाजीचें चरित्र

३ निरनिराळ्या नाण्यांचे प्रकार, नांवें, वगैरे माहितीसाठीं मासिक मनोरंजन सप्टेंबर १९१४ चा अंक पहा.

त्यानंतर ती ठेंचणें, धुणें व बितळविणें या क्रिया तेथेंच जाग्यावर होतात. छोटा नागपूर प्रांतांत सिंगभूम जिल्ह्यांतहि तांबें सांपडतें व एकवार चालविलेल्या खाणीचे ओसाड खळगे या भागांत पुष्कळ आहेत.

शिसें व कथील

शिसें व कथील पंजाबच्या सरहद्दीवरील हिमालयांत सांपडतें. पंजाबातल्या कांहीं डोंगरी संस्थानांत व म्हैसूर भागांत ॲंटिमनी धातु सांपडतो. याचा सुरमा करतात. तो डोळ्यास लावतात,हा धातु छापण्याचे टाईप करण्यास फार लागतो.

घासलेट

घासलेट तेल आसामांत व पंजाबांत थोडें बहुत व विशेषतः ब्रम्हदेशांत पैदा होतें. ब्रम्हदेशांत इरावती नदीचे कांठीं घासलेट तेलाच्या शेंकडो विहिरी असून त्यांतून तळांतून सारखे तेलाचें बुडबुडे येतात व दरसाल हजारो टन् तेल निघतें. या विहीरीची खोली सरासरी २५० फूट असतें.

दगड

मध्य प्रदेश व साधारणपणें डोंगर असलेल्या भागांत इमारतीचे उपयोगी दगड विपुल असून त्याचा त्या कामीं अज्ञात कालापासून उपयोग होत आहे. उत्कृष्ट तऱ्हेच्या दगडांत पुढील प्रकारांचा समावेश करतां येईल, तें असेः—महाराष्ट्रांत शहाबादी नांवाचा दगड, अगऱ्याच्या सुप्रसिद्ध ऐतिहासिक इमारती ज्याच्या बांधल्या आहेत ते राजपुतान्यांतले तांबूस संगमरवरी दगड, दक्षिणेंतील काळा व दक्षिण हिंदुस्थानांतील ग्रॅनिट नांवाचा दगड हे प्रमुख आहेत; दगडी पाटी करतात त्या मऊ दगडाच्या खाणी कित्येक ठिकाणीं आहेत. ओरिसा व छोटा नागपूर प्रांतांतल्या डोंगरांत एक प्रकारचा ठिसूळ दगड असतो, त्याची घरगुती दगड्या वगैरे सारखी भांडीं व इतर जिनसा करतात. काठेवाडांत पोरबंदर जवळ एका पांढऱ्या दगडाच्या खाणी आहेत. खाणींतून दगड काढतांना पडलेल्या चुरापासून सिमेंट करण्याचें कारखाने अलीकडे कित्येक ठिकाणीं निघाले आहे.

मौल्यवान रत्नें.

मौल्यवान रत्नांच्या खाणी म्हणण्यासारख्या विपुल नसल्या तरी त्या नाहींत असें नाहीं. गोवळकोंडा हें नांव आतां केवळ वाङ्मयांत चिरस्थायी झालें आहे हें खरें, परंतु एकेवेळीं तें सुप्रसिद्ध हिरे व त्याला पैलू पाडणारांचें माहेरघर होतें. मध्य प्रांतांतील महानदी कांठचे संब-

ळपूर हें शहर एकावेळीं हिऱ्याविषयीं प्रसिद्ध होतें. आजला पद्धतशीर धंदा या दृष्टीनें देशांत हिऱ्याची खाण कोठें चालली असेल तर ती बुंदेलखंडांत पन्ना संस्थानांत आहे. तेथें दर साल लाखों रुपये किंमतीचे हिरे सांपडतात.

स्वाती नक्षत्रावर सूर्य असतां समुद्रांतल्या शिंपलांत पावसाचे थेंब पडून मोत्यें बनतात. असा पूर्वींचा समज आहे. परंतु तीं शिंपलांत राहणाऱ्या एका कालव जातीच्या जिवाच्या अंगांतील रसानें बनतात असें अर्वाचीन शोधकांनीं ठरविलें आहे. हिंदुस्थानांत खंबायताचें आखात, दक्षिणेंत मदुरा नजिकच्या समुद्र किनाऱ्यास तिनेवली जवळ व मानारचें आखात या ठिकाणीं मोतीं काढितात. खेरीज सिलोन व इराणी आखातातूनहि त्यांची आयात होते. मोतीं काढतात त्या जागा सरकारचे ताब्यांत आहेत. हंगामांत पाणबुडे तळाशीं जाऊन शिंपलें गोळा करून आणतात. आणलेल्या शिंपलाचे चार भाग करून त्यापैकीं एक भाग पाणबुड्यास मेहनतीबद्दल मिळतो व बाकीचे सरकार घेतें. व नंतर त्यांची लिलांवानें विक्री करण्यांत येतें.

मोतीं.

हिंदुस्थानासारख्या ऊष्ण कटिबंधांतील देशांत पर्जन्यावरच जीवनांचीं साधनें अवलंबून असतात. यामुळें पर्जन्य, उल्का वायु इत्यादि आकाशस्थ चमत्कारांचें उद्घाटन होणें महत्वाचें असतें. वारे कोणीकडून व कसें वाहतात त्यांची गती किती आहे या संबंधाची निरीक्षण स्थलें देशांत अनेक ठिकाणीं स्थापन झालीं असून तें सरकारी खातेंच झालें आहे. या निरीक्षणावरून पावसाचा आरंभ कधीं होईल व तो किती पडेल याचा अंदाज बांधतां येतो. अशीं निरीक्षण स्थलें देशांत एकंदर शें दीडशेंवर आहेत. वेगळाल्या ठिकाणचें व त्यांत होणारें स्थित्यंतर याची माहिती गोळा करून ती सिमला, मुंबई व कलकत्ता येथें रोजीं दोनप्रहरचे आंत प्रसिद्ध करण्यांत येतें. जमिनीप्रमाणे समुद्रांतून येणाऱ्या गलबतांवरहि हवामानाची नोंद ठेवण्यांत येतें. व त्यायोगानें वादळ अगर तुफान होण्याचें लक्षण दिसल्यास दर्यावर्दी लोकांस अगाऊ सूचना देण्यास सुलभ जाते. अवचित महापुरानें फोंफावणाऱ्या कित्येक नद्यांच्या उगमस्थानीं अशा प्रकारची तजवीज ठेवून अपारीमित वृष्टि झाल्यास पुढील शहरांत कळविण्यांत येतें. ही तजवीज नर्मदा, तापीचे उगमापाशीं व दक्षिणेंत कृष्णा

शास्त्र

नदीवर कृष्णा स्टेशनवरहि असून तेथें पुलाखालीं पाणी किती आहे हें तारायंत्रानें विझवाड्यास कळविण्यांत येतें. यामुळें तें पाणी पुढें जाण्यास जो अवकाश लागतो त्या अवधींत आपत्ती टाळण्याचेंकामीं या माहितीचा उपयोग होतो.

पर्जन्यवृष्टी.

पर्जन्याचें मान देशांत निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळें आहे. साधारणतः देशापेक्षां घांटांत व कोंकणपट्टीला पर्जन्यवृष्टी पुष्कळच अधिक होतें. हिंदुस्थानांत किंबहुना सर्व जगांत अतीशय वृष्टीमुळें नांवाजलेलें ठिकाण म्हणजे आसामांत चेरापुंजी होय. येथें दरसाल सरासरी ६०० इंच पाऊस पडतो. एकसालीं (१८६१) तर तो ८०५ इंच झाला. तथापि पावसाचीहि कृपा सर्वत्र सारखी नाहीं. सिंध प्रांतांत पर्जन्याचें मान फार अल्प (सालीं सारे पांच सात इंच) आहे. महाराष्ट्रांत नगर, सोलापूर, विजापूर हे जिल्हे अवर्षणाविषयीं प्रसिद्ध आहेत. सिंधमधील जमीन बहुतेक सिंधु नदीच्या कालव्यावर पिकतें. निरनिराळ्या भागांत डोंगराळ अगर झाडी असलेल्या प्रदेशांत होणारा जास्तींत जास्ती पाऊस (उदाहणार्थ मुंबई इलाख्यांत महाबळेश्वर, माथेरान) व निर्वृक्ष भागांत (उदाहरणार्थ नगर, विजापूर हे जिल्हे) होणारा कमींत कमी पर्जन्य यांचे सरासरी प्रमाण साधारणपणें मुंबई व बंगाल्यांत सालीना ६७ व मद्रास इलाख्यांत ४४ इंच व संयुक्त प्रांत ४० इंच, असें निघेल.

सस्तन प्राणि जाति
रानटी जनावरें
सिंह, वाघ, हत्ती,
लांडगे वगैरे

हिंस्त्रपशू अगर रानटी जनावरें म्हणजे सिंह, वाघ, चित्ता लांडगा, अस्वल कोल्हा, गेंडा, रानडुकर हीं होत. यांची वस्ती डोंगराळ प्रदेशांतील जंगलांचे मानानें कमी अधिक सर्वत्र आहे. मृगराज सिंहांची संख्या मात्र कमी झाली असून ते आतां फक्त काठेवाडच्या जंगलांत आहेत. त्यांस आयाळ नसतें. या बिन आयाळी सिंहाची गणना एका निराळ्या वर्गांतच करावी कीं, कसें याबद्दल सृष्टिशास्त्रज्ञांत एकमत नाहीं. वाघ हिमालयापासून सुंदरबनच्या दलदलीपर्यंत सर्वच भागांत आढळत असला तरी जंगलाची तोड व शिकाऱ्यांची चैन यामुळें तोहि आतां क्वचित आढळतो. चित्ता ही वाघाचीच एक जात आहे. लांडगे व कोल्हे जंगलांत क्वचित पण उघड्या प्रदेशांत सर्वत्र अतिशय आहेत. लांडग्याची धाड विशेषतः मेंढीवर असतें,

तिबेटाकडील हिमालयांत पांढरा, तांबडा व काळा असे तीन प्रकारचे लांडगे आढळतात. अस्वल बराच विरळा. हत्ती हिंदुस्थानांत बहुतेक सर्व भागांत असत. तथापि आतां तो फक्त म्हैसूर, कुर्ग व त्रावणकोर कडील जंगलें व ओरिसांत मिळतो. तिकडे हत्ती पकडण्याची तऱ्हा म्हणजे एक खळगा करून तो वर गवतानें झांकतात व हत्तीला हुसकून नेऊन त्यांत पाडतात व कांहीं दिवस उपाशीं ठेऊन माणसाळलेल्या हत्तीकडून माणसाळवितात. सरकारी परवान्या-खेरीज हत्ती पकडतां येत नाहीं व तसा हत्तीविषयीं विशेष कायदा करण्यांत आला आहे. त्यामुळें बिगर परवाना हत्ती धरतां येणें आतां शक्य नाहीं. गेंड्या-च्या चार जाती आहेत; पैकीं दोनलि एक शिंग असते, तर दुसऱ्या दोनांला दोन शिंगें असतात. ब्रम्हपुत्रा नदीच्या खोऱ्यांत व सुंदरबनांत हीं जनावरें आढ-ळतात. रानडुकर हा प्राणी शिकार करण्यास फार त्वेषजनक म्हणून जगांत प्रसिद्ध आहे. तसाच शेतकऱ्यासही तो मोठा घातक शत्रू असतो, कारण तो पिकांची नासाडी करण्यांत कोणत्याहि प्राण्यापेक्षां कांकणभर अधिक आहे. रान गाढव सिंधप्रांतांत व कच्छमधील वालुकामय अरण्यांत असून सहसा ते मनुष्या-जवळ यावयास धजत नाहींत, नीलगाई उत्तर हिंदुस्थानांत व गुजराथेंत असून त्यांच्यांत हरिणीप्रमाणें फक्त नरालाच काळा निळा रंग असतो. हरिण, बकरें वगैरे व माणसाळलेल्या जनावरांच्या तर अनेक जाती आहेत हें सांगावयास नकोच.

पशुप्रमाणें पक्षांतहि देशांत स्थूलमानानें पुष्कळ विविधता असून त्यांची साधारण मोजदाद करणेंहि आंवाक्याबाहेरचें आहे. पक्षांत सौंदर्य व मोहकपणा-बद्दल प्रसिद्ध म्हणजे पोपटाची जात आहे. हिंसक पक्षांत गिधाडें व बहिरीससाणा वगैरे येतात, हिंदुस्थानांत सर्वांत लोकप्रिय म्हणजे पोपट व मैना हे दोन पक्षी होत. कारण त्यांस पिंजऱ्यांत ठेऊन " विठ्ठल विठ्ठल " अगर अशाप्रकारचे कित्येक शब्द म्हणावयास शिकवितां येतें. व ते तीं चटकन ध्यानांत धरतात. पहाटेच्या प्रहरीं पक्षांचा तो मंजूळ व कर्णमधुर ध्वनि साहजिक आनंददायक असतो.

पक्षी

पशुपक्षांखेरीज सरपटणारे विषारी प्राणी, लहान मोठे कीटक व जलचर अगर जलचरांतलि लक्षावधि जाती यांच्या संख्येची गणतीहि करणें मनुष्याच्या

शक्तीबाहेरचें आहे. तें एक चित्रगुप्तच करूं जाणें. तथापि आमच्या प्राचीन वेदवेत्या व आत्मज्ञानानें परमेश्वराचें विराटस्वरूप जाणणाऱ्या थोर पूर्वजांनीं ती संख्या ८४ लक्ष कल्पिली आहे. या गोष्टीस आज शतकानुशतकें होऊन गेलीं व भौतिक शास्त्रांत इतकी प्रगती झाली तरी प्राणिमात्राविषयींचें हें ज्ञान मनुष्यास पूर्णपणें आकलन झालेलें नाहीं. नुसत्या संख्येचीच अद्यापि प्रचिती नाहीं तर त्या सर्वच प्राणिमात्रांचें गुणधर्म व उपयोग ज्ञानअर्थात् लांबच.

नेपाळचे संपूर्ण स्वातंत्र्य हिंदुस्थान सरकारनें नुकतेंच मान्य केलें आहे. नेपाळ खेरीज सर्व देशी संस्थानें इंग्रज सरकारचीं अंकित आहेत. त्या त्या संस्थानशीं झालेल्या तहनाम्याप्रमाणें इंग्रज सरकारचा संबंध राहतो. या देशी संस्थानचे आकारमान उत्पन्न वगैरेंत बरीच विविधता आहे. अर्थात त्या मानानें त्यांचे अधिकारांतहि फरक आहे. तथापि अंतर्गत कारभारांत बऱ्याच बाबतींत मुखत्यारी आहे. स्वतःचे कायदे करणें, नाणीं पाडणें, कर बसाविणें जमीन धारा वगैरे गोष्टींत कित्येकांस स्वतंत्रता आहे. तथापि इंग्रज सरकारची हुकमत चालते अशा कित्येक बाबी आहेत. त्यांतील कांहीं येणें प्रमाणें:—

देशी संस्थानें

१ संस्थानची वांटणी न करणें.

२ योग्य वारस गादीवर येणें.

३ आपसांत इतर संस्थानशीं अगर इतर परकीय सत्तेशीं संबंध राखणें.

४ ठरीव संख्येपेक्षां अधिक सैन्य ठेवणें अगर तटबंदी करणें.

५ परराष्ट्रीय लोकांस इंग्रज सरकारचे परवानगी वांचून आपले हद्दींत न राहूं देणें वगैरे वगैरे.

देशांत लहान मोठीं एकंदर सुमारें ७०० संस्थानें आहेत. त्यांचे तीन वर्ग आहेत ते येणें प्रमाणें:—

पहिला वर्ग—हैद्रबाद, म्हैसूर, बडोदा, काश्मीर, यांचा संबध हिंदुस्थान सरकारशीं रहातो.

दुसरा वर्ग—यांत एकंदर १६८ संस्थानें आहेत त्यांचे तीन भाग:—

सेंट्रल इंडिया एजन्सी—ग्वालेर, इंदूर, भोपाळ, रेवा, वगैरे १४८

राजपुताना एजन्सी-जोधपूर, बिकानेर, जयपूर, उदेपूर, भरतपूर व कोटा वगैरे २०

तिसरा वर्ग—यांत बाकीची सारीं येतात व ती प्रांतिक सरकारचें हुकमतीखालीं आहेत. त्यांची प्रांतवार वांटणी खालील प्रमाणें:—

बंगाल इलाखा	एकंदर संस्थानें	३०
संयुक्तप्रांत	,,	२
मुंबई इलाखा	,,	३४४
मद्रास	,,	५
पंजाब	,,	३४

या सर्व देशी संस्थानांचे एकंदर क्षेत्रफळ ७, ११. ३२ चौ. मै. अथवा एकंदर हिंदुस्थानचे क्षेत्रफळाशीं शे. ३९ या प्रमाणांत आहे. संस्थानिक मूळच्या "दोस्त" या संज्ञेपासून ढळले असून आतां केवळ अंकित व नामधारी राजे राहिले आहेत. व वऱ्हाडच्या बाबतींत निजाम सरकारास लॉर्ड रीडींग यांजकडून उत्तरादाखल आलेला खलिता संस्थानिकांचा दर्जा व बडेजाव यांजवर चांगलाच प्रकाश पाडणारा आहे. म्हैसूर त्रावणकोर व औंध वगैरे कांहीं संस्थानिकांनीं आपल्या रियासतींतील शिक्षण व औद्योगिक सुधारणा अगर आपला कारभार दिवसेंदिवस लोकमतानुवर्ति करण्याचे धोरण थोडेबहुत अमलांत आणून प्रजेच्या आकांक्षा सिद्धीस नेण्याचे कामीं दाखविलेला आदर वगळतां बाकीचे प्रायः प्रजाहिताकडे डोळेझांकच करतात हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. संस्थानी मुलुखांतील प्रजेची स्थिती आजला तरी निदान स्पृहणीय नाहीं हें खास.

क्षेत्रफळ व लोकसंख्या

हिंदुस्थान हा फार प्रचंड देश आहे, तो जर्मनीच्या सात पट जपानच्या अकरा पट, व ब्रिटिश बेटांच्या पंधरा पट मोठा आहे. हिंदुस्थानचे एकंदर क्षेत्रफळ १८०५३३२ चौ. मैल असून त्या पैकीं ७११३२ चौ. मै. देशी संस्थानिकांचे ताब्यांत आहे. देशाची दक्षिणोत्तर लांबी २००० मैल व व पूर्व पश्चिम रुंदी १९०० मैल आहे. सन १९२१ च्या खानसुमारी प्रमाणें एकंदर लोकसंख्या ३१ कोटी ८९ लक्ष ४२ हजार आहे. देशाचे लहान मोठ चवदा प्रांत खेरीज देशी संस्थानें असे विभाग असून त्यापैकीं प्रमुख भागांचे क्षेत्रफळ व लोकसंख्या येणें प्रमाणें:-

इंग्रजी मुलुख

	प्रांताचे नांव	क्षेत्रफळ (हजार चौ. मैल.)	लोकसंख्या लक्ष
१	मुंबई	१२३	१९३
२	बंगाल	७६	४६७
३	मद्रास	१४२	४२३
४	संयुक्त प्रांत	१०६	४५४
५	पंजाब	१००	२०७
६	बहार व ओरिसा	८३	३४०
७	मध्यप्रांत व वऱ्हाड	१००	१३९
८	आसाम	५३	७६
९	ब्रह्मदेश	२३३	
१०	दिल्ली	५	४
११	वायव्य सरदद्दीवरील प्रांत	१३	२२
१२	अजमीर मारवाडा	२॥	५
१३	कुर्ग	१॥	१॥
१४	अंदमान व निकोबार बेटें	३	पंचवीस हजार

संस्थानें

हैदराबाद	८३	१२५
म्हैसूर	२९	६०
काश्मीर	८४	३३
ग्वालेर	२६	३२
बडोदे	८	२१
पंजाबांतील संस्थानें	३८	४४
वा. सरहद्दीवरील ,,	२५	२८
संयुक्त प्रांतातील ,,	६	११
बहार ओरिसा ,,	२८	४०
बंगाल मधील ,,	५	२९

आसाम	,,	८	४
राजपुतान्यातील	,,	१२९	२८
मध्य हिंदुस्थांनातील	,,	५२	६०
मध्यप्रांतातील	,,	३१	२१
मुंबई इलाख्यांतील	,,	६३	७४
मद्रास इलख्यातलि	,,	२१	५५

परकी वसाहती

फ्रेंच	२००	उपलब्ध नाहीं.
पोर्तुगीज	११००	६ लक्ष

स्वतंत्र संस्थानें

नेपाळ	५५	५६ लक्ष
भूतान	२०	२॥ लक्ष

वाचनालयें अथवा ग्रंथसंग्रह

ग्रंथ संग्रहाची प्रवृत्ति भारतीयांत प्राचीन काळापासूनच आहे. विद्वान राज्यकर्ते बहुमूल्य रत्नाप्रमाणें ग्रंथाचा संग्रह करीत. कित्येक हस्तलिखित ग्रंथांचे शेवटीं "भग्न पृष्टि कटिग्रीवा बद्धमुष्टिरधोमुखम् कष्टेन लिखितं ग्रंथम् यत्नेन परिपालयेत्" अशी केलेली विनंति व मुद्रणकलेमुळें सांप्रत झालेल्या सौकर्याचा अभाव ही लक्षांत घेतां त्यावेळचा प्रचंड ग्रंथसंग्रह पाहिला म्हणजे पूर्वकालच्या लोकांचे अभिनंदन केल्याखेरीज राहवत नाहीं. जयपूर, उदेपूर, काश्मीर, बिकानेर वगैरे संस्थानचा ग्रंथसंग्रह असाच अनेक दुर्मिळ ग्रंथांनी समृद्ध आहे. कारण त्या त्या काळच्या विद्यासेवक नृपतींनीं त्यांत भर टाकिली आहे. नेपाळची दरबार लायब्ररी व तंजावरचे सरस्वती भांडारम् या दोन ठिकाणीं तर अति प्राचीन (भूर्जपत्रावरील देखील) ग्रंथसंग्रह आहे. नुसत्या तंजावरच्या सरस्वती भांडारांत १४००० वर हस्तलिखित ग्रंथ असून ते सर्व तपासून त्याची विषयवार यादीहि मद्रासचे विद्वान डॉ. बर्नेल यानीं केली आहे. सध्यां देशांत मोठ्या प्रमाणावरचा ग्रंथसंग्रह साधारणपणें पुढील प्रमाणें आहे.

संस्थेचे नांव	ग्रंथांची संख्या
इंपीरीयल लायब्ररी कलकत्ता,	२०००००
इंडियन सरक्युलेटिंग लायब्ररी	५००००
मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई	१००००
पब्लिक लायब्ररी, लखनौ	१४०००
बडोदा सेंट्रल लायब्ररी	२००००

खेरीज बडोदा राज्यांत गायकवाड सरकारनें सन १९१२ पासून फिरतीं वाचनालयें स्थापिलीं असून त्या करितां त्या संस्थानांत एक स्वतंत्र खातेंच आहे. व असा प्रयत्न हिंदुस्थानांत पहिलाच आहे, व तो बराच यशस्वी झाला आहे.

हिंदुस्थानांत दहा हजारावर वस्ती असलेली शहरें सुमारें २३१३ व खेडीं एकंदर ६८५६२२ आहेत. एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ८९ वस्ती खेड्यांत

खेडीं

अगर लहान गांवांत आहे. ह्मणजे हिंदुस्थानची वस्ती प्रायः खेड्यांतच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पूर्वकाळीं हीं खेडीं आपल्या पुरतीं स्वतंत्र असत, गांवाच्या मध्यावर एखादें देवालय असून भोंवती निरनिराळ्या कारागीर वर्गाची वस्ती असे. ख्रिस्ती शकापूर्वीच हिंदुस्थानांत गांवगाड्यांत ग्रामपंचायत दर गांवागणिक असे व जो तो गांव स्वतःच्या गरजा स्वतःच भागविण्यास समर्थ असे, त्यामुळें मध्यवर्ति सत्तेबद्दल झाला तरी गांवाच्या सुखस्वास्थ्यांत फारसा बिघाड होत नसे. पूर्वीच्या ग्रामसंस्थांचे आतां पुन्हा पुनरुज्जीवन होत आहे.

हिंदुस्थानांत ज्यांची स्वतंत्र लिपी नाहीं अशा सुद्धां एकंदर २२० भाषा

भाषा

प्रचलित आहेत. त्यांत हिंदी, उर्दू, बंगाली, मराठी, गुजराथी, पंजाबी, सिंधी, तामिळी, व कानडी या प्रमुख होत व त्या थोड्या बहुत प्रमाणांत (त्या त्या प्रांताची विशिष्ट भाषा सोडली तरी) सर्वत्र चालतात.

पूर्वकाळीं हल्लींसारखी टपालाची सार्वत्रिक व्यवस्था नव्हती. मराठ्यांचे

टपाल व तारागृहें

वेळीं सांडणीस्वार असत. व कित्येक मोठमोठ्या सावकारी पेढ्यांचे जासूद दूरदेशीं जात असत. हल्लींच्या टपाल व्यवस्थेचा पाया मूळ १७६६ त लॉर्ड क्लाईव्हचे वेळीं घातला गेला व त्याची परिणति सन १८५४ त होऊन पोष्टाचे स्वतंत्र खातेंच निर्माण करण्यांत आलें. सन १९२१–२२ सालीं हिंदुस्थानांत एकंदर

१९५५७ पोष्ट ऑफीसें होतीं. तारगृहें (ऑफीस) अदमासें १०००० आहेत. इंग्रजी पोष्टाचीं तिकीटेंच प्रायः सर्वत्र चालतात. तथापि कित्येक संस्थानांत अद्यापि नाणीं व पोष्ट ऑफीसें स्वतःची असून त्यांची तिकीटें चालतात दातिया संस्थानच्या तिकीटावर गणेशाची मूर्ती असतें. जयपूर संस्थान सूर्यवंशी म्हणवितें, म्हणून तेथील तिकीटांवर उच्चैःश्रवासह सूर्याचा रथ असतो. परशुरामानें मलबारची जमीन समुद्रांतून वर काढिली याचे दर्शक म्हणून त्रावणकोरचा शंख असतो. हैदराबादच्या निजामचा अर्धचंद्र असतो.

अखिल भारतीय संस्था राष्ट्रीय सभा

हल्लीं देशांत हिंदु–मुसलमान, ब्राह्मण–ब्राम्हणेतर वाद वगैरे ज्ञातिनिष्ट चळवळीस ऊत आला आहे. तथापि विशिष्ट मर्यादेनंतर या चळवळी विराम पावतील व एक-राष्ट्रीयत्वाचे विचार पुन्हा खेळूं लागतील अशी आशा करण्यास हरकत नाहीं. लिंग भेद स्त्रीपुरुष वयस्क व तरुण वगैरे स्वाभाविक भेद, निसर्गसिद्ध म्हणजे प्रांतभेद भाषाभेद तसेंच भारतीयांच्या जयिष्णु तशाच सहिष्णु स्वभावधर्मामुळें कालांतरानें परिणत पाव-लेले धर्मभेद धार्मिक समजुती, पंथभेद व तदनुषंगिक सामाजिक विषमता इतक्या सहज व कृत्रिम मतभेदांचे खडक वगळून प्रचलित मनूंत एकराष्ट्रीयत्वाची कल्पना उदित होऊन स्थापिली गेलेली अखिल भारतीय प्रातिनिधिक संस्था ह्मणजे राष्ट्रीय सभा होय, सर्व देशाच्या सामान्य हिताची चर्चा करणारी एखादी मध्यवर्ती संस्था असावी अशा विचाराचा उगम त्या वेळच्या (१८८५ च्या सुमारास) लोकधुरीणांमध्यें होऊन त्या दिशेनें प्रयत्न सुरू झाला. व राष्ट्रीय सभा स्थापन करण्यांत आली. त्याचें बरेचसें श्रेय प. वा. ह्यूम साहेब यांस आहे. त्यांनींच या कामीं बराच पुढाकार घेतला होता. राष्ट्रीय सभा स्थापन होऊन आतां ४० वर्षे झालीं असून तिचे मार्फत झालेली लोकहिताचीं कामें प्रसिद्धच आहेत. पहिली राष्ट्रीय सभा पुण्यास पटकीचा आजार सुरू झाल्यामुळें मुंबईस सन १८८५ च्या डिसेंबरांत भरविण्यांत आली. प्रथम प्रथम राष्ट्रीय सभेचे धोरण अर्थात् अर्ज विनंत्या वगैरे स्वरूपाचे होते. त्याचा विकास होत होत आतां " सर्व कायदेशीर व शांततेच्या मार्गांनीं स्वराज्य संपादन करणें हें राष्ट्रीय सभेचे ध्येय " मानण्यांत आले असून सर्व देशांत वजनदार संस्था म्हणजे राष्ट्रीय

सभा हीच आहे व तिच्या आतापर्यंत झालेल्या बैठकी व त्या त्या वेळचे अध्यक्ष खालील प्रमाणें आहेत.

बैठक	साल	स्थळ	अध्यक्ष
१	१८८५	मुंबई	मि. उमेशचंद्र बानर्जी
२	१८८६	कलकत्ता	मि. दादाभाई नौरोजी
३	१८८७	मद्रास	,, बद्रुद्दीन तय्यबजी
४	१८८८	अलाहाबाद	,, जॉर्ज यूल
५	१८८९	मुंबई	,, सर वुइल्यम वेडरबर्न
६	१८९०	कलकत्ता	मि. फेरोजशहा मेथा
७	१८९१	नागपूर	,, पी. आनंदाचार्लो
८	१८९२	अलाहाबाद	,, उमेशचंद्र बानर्जी
९	१८९३	लाहोर	,, दादाभाई नौरोजी
१०	१८९४	मद्रास	,, अलफ्रेड वेब
११	१८९५	पुणें	,, सुरेंद्रनाथ बानर्जी
१२	१८९६	कलकत्ता	,, रहिमतुल्ला सयामी
१३	१८९७	उमरावती	,, सी. शंकरन् नायर
१४	१८९८	मद्रास	,, ए. एम्. बोस
१५	१८९९	लखनौ	मि. रमेशचंद्र दत्त
१६	१९००	लाहोर	,, चंदावरकर
१७	१९०१	कलकत्ता	,, वाच्छा
१८	१९०२	अमदाबाद	,, सुरेंद्रनाथ बानर्जी
१९	१९०३	मद्रास	,, लाल मोहन घोस
२०	१९०४	मुंबई	,, सर हेन्री कॉटन
२१	१९०५	बनारस	मि. गो. कृ. गोखले
२२	१९०६	कलकत्ता	मि. दादाभाई नौरोजी
२३	१९०७	सुरत	डॉ. राषबिहारी घोस
२४	१९०८	मद्रास	डॉ. राषबिहारी घोस
२५	१९०९	लाहोर	पं. मदन मोहन मालवीय

२६	१९१०	अलाहाबाद	सर वुइल्यम वेडरबर्न
२७	१९११	कलकत्ता	पं. बिशन नरायण धार
२८	१९१२	बांकीपूर	मि. मुधोळकर
२९	१९१३	कराची	,, नबाब सय्यद महंमद
३०	१९१४	मद्रास	,, भूपेंद्रनाथ बसू
३१	१९१५	मुंबई	सर सत्येंद्रप्रसंन्न सिंह
३२	१९१६	लखनौ	अंबिकाचरण मुजूमदार
३३	१९१७	कलकत्ता	मिसेस् ॲनी बिझांट
३४	१९१८	मुंबई	मि. सय्यद हसन इमाम
	१९१८	दिल्ली	पं. मदन मोहन मालवीय
३५	१९१९	अमृतसर	पं. मोतीलाल नेहरू
३६	१९२०	कलकत्ता	मि. लाला लजपतराय
	१९२०	नागपूर	,, विजय राघवाचारियर
३७	१९२१	अहमदाबाद	,, हकीम अजमलखान
३८	१९२२	गया	,, बाबू चित्तरंजन दास
३९	१९२३	दिल्ली	,, अबुल कलम अझाद
	१९२३	कोकोनाडा	,, मौ. महंमद अली
४०	१९२४	बेळगांव	,, महात्मा गांधी
४१	१९२५	कानपूर	सौ. सरोजिनी नायडू

भारत वर्ष

भाग दुसरा

अक्कलकोटः—मुंबई इलाख्यांतील एक संस्थानचें ठिकाण. या संस्थानांत एकंदर १०३ गांवें आहेत. रेल्वे स्टेशन अक्कलकोटरोड, तेथून अक्कलकोट सात मैल आहे. येथील अधिपति सातारच्या छत्रपतींच्या घराण्यापैकीं भोंसले हे आहेत. येथें राजवाडा, वाड्यांतील आर्मरी हॉल, स्वामी महाराजांचा मठ, वडाखालच्या पादुका, बाळप्पा महाराजांचा मठ, हीं ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. स्वामी महाराज हे एक सत्पुरुष सुमारें ४० वर्षांपूर्वी होऊन गेले. या सत्पुरुषाचे अनेक चमत्कार " अक्कलकोट स्वामी महाराजांचें चरित्र " या पुस्तकांत पहावे. स्वामीदर्शनास लोक हजारों कोसांवरून येतात, येथलि संस्थानिक फत्तेसिंग राजे भोंसले यांस इ.स, १९२३ सालीं शस्त्रक्रियेसाठीं पुण्यास सासून इस्पितळांत गेल्या वेळीं पोटांत विषारी द्रव्य जाऊन अपमृत्यू आला. हल्लींचे संस्थानिक अज्ञान आहेत.

अजंठा डोंगर—सह्याद्रीपैकीं हा डोंगर नाशिक जिल्ह्यांतील मनमाड जवळून सुरूं होत असून तो पूर्वेकडे सुमारें५०मैल पसरला आहे. सरासरी उंची सुमारें चार हजार फूट. मनमाडच्या दक्षिणेस पुन्हां हा डोंगर लागतो, कासारी येथील खिंडीपासून सुमारें ५० मैलपर्यंत ईशान्येकडे पसरला आहे. या डोंगरांत जिकडे तिकडे किल्ले आहेत. सुप्रसिद्ध अजंठा लेणीं हीं बौद्धाची कोरीव लेणीं निजामचें राज्यांत आहेत.

अजंठा लेणीं:—अजिंठ्याची सुप्रसिद्ध लेणीं या डोगरांच्या एका मुख्य खिंडींमध्यें आहेत. यास जाण्याकरितां पाचोरा—जामनेर लाइन वरील पहूर स्टेशनवर उतरावें लागते, तेथून अजिंठा गांव १५ मैल आहे. गांवांपासून लेण्यापर्यंत सुमारें ४ मैल डोंगर ओलांडावा लागतो. येथें एकंदर २९ लेणीं असून त्यापैकीं एक दोन अर्धवट आहेत. हीं सर्व इ० स० पूर्वी २०० वर्षे निरानिराळ्या काळीं खोदलीं गेलीं असावीं. बहुतेक सर्व लेण्यामध्यें चित्रें रंगविलेलीं आहेत. त्यावरून हिंदुस्थानांतील

लोकसमाजाची राहणी चांगली समजतें, 'ही चित्रें अप्रतिम असून इतकीं भावना-दर्शक चित्रें जगांत क्वचितच आढळतील' असें ग्रिफित यांचें म्हणणें आहे. (ज्ञा. को. वि. ६)

अजमीर भौतिक स्वरूपः—या जिल्ह्याचें विशिष्ट लक्षण म्हणजे अरवली पर्वतापैकीं निरनिराळ्या डोंगरांतून निघालेले लहान मोठे ओहोळ धरण बांधून अडविले आहेत.हीं एकंदर तळीं सुमारें ४२० असून त्याचे पाण्यावर जिल्ह्यांतील बरीच शेती पिकते. खेरीज स्वाभाविक जलसंचयाचीं अशीं चार ठिकाणें असून त्यांत पुष्कर हे पवित्र तीर्थ प्रसिद्ध आहे. खारी,सरस्वती व साबरमती या लहान नद्या खेरिज महत्वाची अशी कोणतीहि नदी नाहीं. राजपुतान्यांतील इतर भागाप्रमाणें पाण्याच्या अभावीं शेती समाधानकारक नाहीं. इतिहासः—दिल्लीच्या तुवर घराण्यांतील राजा अनंगपाळ यानें आपली मुलगी अजमीरच्या चव्हाण राजास दिली. या शरीरसंबंधाचें आपत्य म्हणजे पृथ्वीराज चव्हाण यासच आपले पश्चात अनंगपाळानें गादीचा वारस केल्यामुळें हीं दोन्ही घराणीं एकत्र झालीं. पृथ्वीराज हाच शेवटचा हिंदु सार्वभौम राजा होऊन गेला. याचेच वेळीं मुसलमानांची पहिली धाड आली; परंतु सर्व रजपुतांच्या साह्यानें पृथ्वीराजानें शाहाबुद्दीन घोरीचा पराभव करून त्यास हांकून दिलें. परंतु दुसऱ्या खेपेस आपसांतल्या दुहीमुळें त्यास यश न घेतां तो ठार झाला. व मुसलमानांचा पाय कायमचा रोंवला गेला. शहरः—राजपुताना गॅझेटियरमध्यें पहिला चोहान राजा अज यानें इ. स. १४५त स्थापिलें असा उल्लेख आहे. हें शहर प्राचीन असून इतिहास-प्रसिद्ध आहे. दंतकथेवरून पाहतां तें इ. स. १५५ चे सुमारास वसाविलें असल्याची माहिती लागते. शहर तारागड नांवाच्या डोंगराच्या उतरणिवर वसलें असून माथ्यावर त्याच नांवाचा उंच व मजबूत, असा किल्ला आहे. शहरा भोंवतीं तट असून त्यास अतिशय उंच व मजबूत पांच दरवाजे आहेत. पश्चिमेच्या बाजूस सुंदर कृत्रिम सरोवर आहे. त्यास अनसागर असें म्हणतात. येथें पहाण्यासारखीं जीं ठिकाणें आहेत त्यांत खाजासाहेबाचा दर्गा हें एक आहे. या अवलियानें आपल्या हयातींत अनेक चमत्कार केलें असें म्हणतात. येथील उरूस आगष्ट महिन्यांत भरतो. " अधइद्दनिको झोंपडी " दौलतबाग व राजपुतान्यांतील राजकुमाराप्रीत्यर्थ असलेल्या मेयो कॉलेजची भव्य इमारत वगैरे

दुसरीं ठिकाणेंहि प्रेक्षणीय आहेत. पुष्कर हें पवित्र स्थान अजमीरहून ७ मैलांवर आहे. राजपुताना स्टेट रेल्वे १८७५ त सुरू झाल्यापासून अजमीरच्या स्थानिक व्यापाराची बरीच प्रगति झाली आहे.

अजयगड—मध्य हिंदुस्थानांतील एक संस्थान. येथील संस्थानिक राजा छत्रसालचा वंशज असून बुंदेले रजपूत आहे. संस्थानची राजधानी अजयगड. खेडीं ४८८ आहेत. ह्या संस्थानांत केन व बैरमा ह्या नद्या वाहतात. हें संस्थान विंध्य पर्वताच्या खोऱ्यांत असल्यामुळें व्यापार विशेष नाहीं. संस्थानांत बंदुका तलवारी वगैरे तयार होतात. कांहीं ठिकाणीं हिरे सांपडतात.

शहरालगत केदार पर्वत नांवाचे डोंगरावर बुंदेलखंडांतील जे आठ प्रख्यात कोट आहेत त्यापैकीं एक असा मजबूत किल्ला आहे. डोंगरावर सागवान व तेंडूची झाडें बरींच आहेत.

आणिगिरिः—धारवाड जिल्ह्यांतील नवलगुंद तालुक्यांपैकीं ७००० वस्तीचा एक गांव. तेथें अमृतेश्वराचे एक देवालय आहे. ते जखनाचार्यानें बांधलें असें म्हणतात. जखनाचार्य हा जैन होता. देवळांतील भिंतीवर पुराणांतील चित्रें खोदलेलीं असून कांहीं शिलालेखहि आहेत. फ्लिटच्या " कानडी राजघराणीं " ग्रंथावरून कलचुरीचा राजा बिज्जाल होयसल वंशीय राजा वीर बल्लाळ वगैरे घराण्यांची निरनिराळ्या काळीं हीं राजधानी होती असें दिसतें.

अदवानी—बल्लारी जिल्ह्यांत हा एक भरभराटीचा तालुका व स्टेशन आहे. हें शहर मूळ इ. स. पूर्वी १२०० वर्षे या सालीं बिदरचा राजा भीमसिंह याच्या कारकीर्दीत चंद्रसेन यानें वसाविलें. कालगतीनें निरनिराळ्या राजसत्तेखालीं याचीं अनेक स्थित्यंतरें झालीं असलीं तरी सध्यां मद्रासकडील हें एक चांगलें व्यापारी शहर आहे. येथें सुती व रेशमी कापड चांगलें तयार होतें. किल्ला पडीक आहे, तथापि सुमारें अर्ध्या चढणीवर स्वच्छ पिण्याचे एक सुंदर तळें आहे. अदवानी व आसपासचा कृष्णा आणि तुंगभद्रा यांचे दरम्यानचा प्रदेश सुपीक आहे. अदवानी हें ह्या प्रांतांतलि कापसाच्या व्यापाराचे केंद्रस्थान आहे. गठे बांधण्याचे व सरकी काढण्याचे अनेक कारखानें आहेत. सतरंज्या येथें बऱ्याच होतात व त्याची बरीच प्रसिद्धी आहे.

अनागोंदीः—हें शहर तुंगभद्रेच्या उत्तर तीरावर विजयानगर शहरच्या समोर वसलें होतें. हल्लीं येथें पुरातन कालचीं अनेक देवळें आहेत. वालीची किष्किंधा नगरी येथेंच होती असें म्हणतात. रामायणांत वर्णिलेले पंपा सरोवर येथून दोन मैलावर आहे. अनागोंदीच्या एका राजानें पंढरपूरची विठोबाची मूर्ती अनागोंदीस नेली होती व भानुदासानें ती परत आणली अशी आख्यायिका प्रसिद्धच आहे.

अबूचा पहाडः—हा पहाड रजपुताना माळवा रेल्वेच्या अबूरोड स्टेशनापासून सतरा मैल आहे. हें एक उत्कृष्ट हवाशीर ठिकाण राजपुतान्यांतील सिरोही संस्थानांत आहे. अबूरोडहून टांगे, गाड्या वगैरे मिळतात. हा अरवली पर्वताचा एक भाग आहे असें समजण्यांत येतें. तथापि समुद्रांत एखादें बेट असते त्याप्रमाणें अरवली रांगेपासून अगदीं तुटक असा हा उंच सुळका आहे. याची लांबी १२ मैल रुंदी सुमारें ३ आहे. या पहाडाचे सर्वांत उंच शिखर गुरुशिखर हें समुद्र सपाटीपासून ५६५० फूट उंच आहे. पहाडाच्या एका विस्तीर्ण डोंगरमाथ्यावर मखी तलाव नांवाचा सुंदर तलाव आहे. अबूचा पहाड हें एक जैनांचें पवित्र स्थान आहे. मूळचे नांव अरबूद असून तेराव्या शतकांत अबूचे नजिकचा भाग चंद्रावतीचे परमारवंशीय राजाकडे होता. चंद्रावतीचा कांहीं अवशेष म्हणजे पडकीं देवळें वगैरे अबूच्या आग्नेयेस आहेत. डोंगराच्या मध्यावर जैनांचीं पांच देवालयें असून त्यांत ऋषभनाथ हें सर्वांत मोठें आहे. जैनांच्या चोवीस तीर्थंकरांत हे पहिले होत. हें प्रचंड व उत्कृष्ट देवालय बांधण्यास एकंदर चौदा वर्षें लागून १८ कोट रुपये खर्च झाले असें म्हणतात. देवालय बांधण्यास ही जागा अनिलवाडा येथील बनलशहा या जैन लक्षाधीशानें खरेदी केली. देवळासमोर हें स्थापन करणाऱ्याचा घोड्यावर स्वार असलेला पुतळा आहे. ऋषभनाथ खेरीज नेमिनाथ व आदिनाथ हीं दोन सुंदर देवालयें असून त्यांचे बांधकाम पांढऱ्या संगमरवरी दगडाचें केलें असून तें काम फारच अप्रतिम आहे. देवालयावरील शिलालेखांत आदिनाथाचे देवालय विमलशानें संवत १०८८ त बांधिलें असा उल्लेख आहे. देवालयांत निरनिराळ्या ठिकाणीं अनेक संस्कृत शिलालेख असून त्यांत दिलेल्या मित्ती कालनिर्णयास फार उपयोगी पडतात. तीवरून असें दिसून येतें कीं, येथील बहुतेक देवालयें गुजाराथच्या वाघेला घराण्याचा मूळ पुरुष जो वीरधवल याच्या

पदरीं मुख्य प्रधान असलेल्या वस्तुपाळ आणि तेजपाळ या बंधुद्वयांनीं बांधिलीं आहेत. ह्या पहाडावरील आणखी प्रेक्षणीय स्थळें–दिलवारा येथलि नामांकित जैन मंदिरें, अरबुद देवी, अचलगड, रावतमाश्रव, भृगूचा आश्रम वगैरे आश्रम व कडे तुटून झालेल्या भयंकर दऱ्यांतून तपस्वी महंत ह्यांच्या गुंफा वगैरे आहेत. ह्या पहाडावर दरवर्षी ६० इंच पाऊस पडतो. झाडी भयंकर आहे.

अमरकंटकः—हा पर्वत मध्य प्रांतांतलि रेवा संस्थानांत आहे. नर्मदेचा उगम याच ठिकाणीं आहे. समुद्राच्या सपाटीपासून या पर्वताची उंची ३४९३ फूट आहे.. अमरकंटक ही मेघदूत आणि रघुवंश या सुप्रसिद्ध काव्यांचा कर्ता कविकुलगुरू कालिदास याची जन्मभूमी आहे. अमरकंटकावर अमरनाथाचें देवालय व नर्मदा, सोन, आणि झोहिला या तीन्ही नद्यांचे उगम आहेत, व ते एकाच ठिकाणापासून होतात. प्रत्येकीचा प्रवाह निराळा होतो त्या ठिकाणचा देखावा फार मनोहर आहे. यात्रेकरूंना पर्वतावर रहाण्याच्या सोयी म्हणजे कपिलधारा मांडव, गुलबकावलीचा राजवाडा व मार्कंडेयाचें देवालय हीं ठिकाणें होत. महाशिवरात्रीला मोठी यात्रा असते. ग्रहणाचे वेळींहि स्नानास हजारों लोक येतात. पर्वतावर पांच कुंडें आहेत. तेथेंच नर्मदा उगम पावली असल्यामुळें हें स्थान फारच रम्य व पवित्र आहे. या ठिकाणास बेंगाल नागपूरच्या पेंद्रारोड स्टेशनावरून जावें लागतें, बैलगड्या व तट्टें मिळतात. गाड्यांतून पायथ्यापर्यंत व नंतर घोड्यावर व डोलींतून टेंकडीवर जावें लागतें. यात्रेकरूंना धर्मशाळा आहे.

अमृतसरः—पंजाबांत हें एक जिल्ह्याचें ठिकाण रावी आणि बियास या दोन प्राचीन नद्यामधील प्रदेशावर आहे. या प्रदेशास बारी दुआब असें म्हणतात. बहुतेक जमीन चांगली पिकाऊ आहे. खनिज पदार्थ मात्र इकडे कोणताच आढळत नाहीं. अमृतसरची विशेषतः हिवाळ्यांतील हवा आरोग्यवर्धक असते. इतिहासः—ह्या जिल्ह्यांत ५ मोठीं गांवें व १०४२ खेडीं आहेत. भाषा पंजाबी बोलतात. शीखांचा उदय होण्यापूर्वीचा इतिहास उपलब्ध नाहीं. शीख पंथाचा उत्पादक नानक याचे पासून चौथा शिष्य रामदास यानें अमृतसर शहराचा मूळ पाया घातला. मोगलांचा असह्य जुलुम होऊन जनतेंत विचार जाग्रति झाली त्यावेळीं या नविन पंथाच्या प्रवर्तकांनीं प्रसंगीं राजदंडहि धारण केला व शीखसत्ता स्थापिली. पुढें सर्व पंजाबाबरोबर अमृतसरहि खालसा झालें.

अमृतसर–हें पंजाबांतील दिल्लीच्या खालोखाल सधन व दाट लोकवस्तीचें शहर व शखिाचें पवित्र स्थान लाहोरहून ३२ मैल आहे. येथील प्रेक्षणीय मुख्य ठिकाण सोन्याचें देवालय हें आहे. याला शखि लोक दरबारसाहेब असें म्हणतात, तें स. १५८६ त बांधलें आहे. देवालय एका मोठ्या तळ्यांत असून संगमरवरी दगडानें बांधलेलें आहे. मंडपास महाराज रणजितसिंह यांनीं अपरमित द्रव्य खर्चून सुवर्णाचा मुलामा केल्यामुळें त्यास सोन्याचें देऊळ असें म्हणतात. येथें शखिांचें धर्मग्रंथ फा काळजीपूर्वक राखलेले आहेत. देवळाचे आंतील भागाचें बहुतेक शिल्प काम शखिांनीं जहांगीर बादशहाच्या थडग्यावरून आणलें आहे असें म्हणतात. दिवाळीस यात्रा भरतें त्यावेळेस पंजाबच्या सर्व भागांतून लोक येतात. टॉऊन हॉल, हालबार जार हीं दुसरीं ठिकाणें आहेत. अमृतसर हें तिबेटी बकऱ्याच्या लोकरींपासून तयार होणाऱ्या शालीविषयीं व सतरंज्याबद्दल प्रसिद्ध आहे. पारीस येथलि प्रदर्शनांत-या कौशल्याबद्दल सोन्याचें पदक मिळाल्यामुळें लाखो रुपयांच्या शाली युरोप खंडांत दरसाल खपतात. रेशमी, लोकरी व जरीकाठी कलाबतू काम मुख्यत्वें येथें तयार होतें. लाला संतरामाची हिंदूंची व महमदशहाची मुसलमानाची अशा दोन्ही धर्मशाळा हाल बाजारांत आहेत.

अयोध्याः—हें प्राचीन शहर संयुक्त प्रांतांत शरयू अथवा गोग्रा नदीचे कांठीं आहे. जुनें शहर बहुतेक नामशेष झालेलें आहे. कांहीं जुनें अवशेष अद्यापि आहेत. कोशल देशची व राजा रामचंद्राची राजधानी असल्याविषयीं याची पुराणांतरीं प्रसिद्धीच आहे. राजा विक्रमादित्यानें (इ. स. पूर्वी ५७ वर्षे) येथील बऱ्याच प्राचीन देवालयाची दागदुजी केली असें म्हणतात. रामकोट म्हणजे पूर्वीचा किल्ला व राजवाडा, नागेश्वरनाथाचे देवालय, मणिपर्वत हीं जुनीं ठिकाणें पहाण्यासारखीं आहेत. खेरीज जन्मस्थान, स्वर्गद्वार हीं दुसरीं ठिकाणें आणि नव्या वस्तींत मानसिंगाचें देवालय व हनुमान गढी हीं पाहण्यासारखीं आहेत. रामनवमीची यात्रा फार मोठी भरते. बौद्ध धर्माचा उत्पादक गौतमबुद्ध याची हीं जन्मभूमी होय. सातव्या शतकांत आलेला चिनी प्रवासी हुएनत्संग हा अयोध्येभर ब्राम्हण वस्तींत त्यावेळीं बुद्धाचे वीस विहार व त्यांतून सुमारें ३००० बुद्ध भिक्षु रहात असल्याविषयीं आपल्या प्रवास वर्णनांत लिहितो. स्टेशनहून शहर ३ मैल आहे.

अरण:—हा गांव श्री मिरजकरांच्या मोडलिंब तालुक्यांत मोडतो. मोडलिंब वार्शी लाइट रेल्वेचे स्टेशन आहे. येथें सांवता माळी ह्यांची समाधि आहे.

अरवली पर्वत:—राजपुताना व अजमीर ह्या भागांत ईशान्य दिशेस पसरलेला पर्वत असून लांबी ३०० मैल आहे. रुंदी ६ते ६० मैल पर्यंत आहे.

विष्णुपुराणांत वर्णिलेला पारिपात्र हाच अरवली डोंगर असें विद्वानांनीं ठरविलें आहे.

अलमोरा—हिमालयाच्या पायथ्याशीं कुमान जिल्ह्याचें हें एक मुख्य ठाणें व हवाशीर ठिकाण समुद्र सपाटीपासून ५४९९ फूट उंच आहे. अधुनिक साधू स्वामी विवेकानंद यांचें हें एक प्रिय निवासस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांचा येथें आश्रमहि आहे. त्यांनीं काढलेलें प्रबुद्ध भारत मासिक आलमोऱ्यासच निघतें.

अलवार—हें एक राजपुतान्यांत संस्थान आहे. राजधानीचें ठिकाण अलवार हें असून राजपुताना माळवा रेल्वेचे स्टेशन आहे. अलवार संस्थानांत खेडीं व शहरें मिळून १६२ आहेत. येथील प्रेक्षणीय इमारती ह्मटल्या म्हणजे राजा बन्नेसिंग यानें बांधलेला राजवाडा, राजा बखतावरसिंग ह्याची छत्री ह्या होत. येथें मिठापासून कांच तयार करून त्याच्या बांगड्या व बाटल्या तयार करितात. संस्थानचें एक वर्कशॉप आहे.

अलकनंदा—वायव्य प्रांतांत गऱ्हवाल जिल्ह्यांत ही एक मोठी नदी आहे. हिचा उगम बर्फाच्छादित हिमनगापासून होतो. भारतवर्षांतील पवित्र नद्यामध्यें हिची गणना आहे. जेथें जेथें हिच्या अनेक शाखांचा संगम झाला आहे ती सर्व ठिकाणें भाविक यात्रेकरूंस पवित्र व पुण्यप्रद आहेत. धवली व सरस्वती ह्या मिळून झालेल्या प्रवाहाला अलकनंदा हें नांव आहे. हिला नंदाकिनी मंदाकिनी वगैरे नद्या मिळतात. देवप्रयागास अलकनंदा व भागीरथी यांचा संगम होतो. जरी प्रवाह व आकार यांत भागीरथीपेक्षां अलकनंदा विशेष महत्वाची असली तरी भागीरथीसच मुख्य प्रवाह मानला आहे. हिचे काठीं श्रीनगर हा एकच मोठा गांव आहे. या नदींत सोन्याचे कण सांपडतात. पण ते फारच अल्प प्रमाणांत असल्यामुळें विशेष शोध कोणाकडून केला जात नाहीं.

अलाहाबाद (प्रयाग):—संयुक्त प्रांताचें हें मुख्य शहर व आर्यांचें अतिपुरातन क्षेत्र. गंगा, यमुना व सरस्वती या त्रिवेणी संगमावर आहे. महाभारत-

कालीं या भागास वारणावत अशी संज्ञा होती. त्रिवेणी संगम स्टेशनहून चार मैलावर आहे. संगामानंतर पात्राची रुंदी तीन मैल झाली आहे. संगमावरच किल्ला आहे. हा अकबर बादशहानें सन १५७५ त बांधला आहे. किल्ल्यांत बौद्ध सम्राट अशोक यानें इ. स. पूर्वी २४० वे वर्षीं उभारलेला एक जयस्तंभ आहे. त्याची उंची ३० फूट आहे. त्यावर अनेक लेख कोरलेले आहेत. अशोकानंतर दुसऱ्या शतकांत समुद्रगुप्त यानें आपल्या विजयाची व मोगल बादशहा जहांगीर तक्तानशनि झाल्याची हकीकतहि त्यावर कोरिली आहे. जहांगीरचा लेख फारशींत आहे. सरस्वती नदी अंतर्वाहिनी आहे अशी समजूत आहे. संगमाचा असा कांहीं चमत्कार आहे कीं, किल्ल्याच्या कोपऱ्याशीं जेथें संगम होतो तेथें एकाद्या आंखलेल्या रेघेप्रमाणें रेघ दिसत असून यमुनेचें पाणी काळसर व भागीरथीचें पाणी अगदीं पांढरें स्वच्छ दिसतें, हाच या ठिकाणचा विशेष चमत्कार आहे.सक्षौर सचैल स्नान कोणत्याहि तीर्थावर अवश्यच आहे. पण सौभाग्यवती स्त्रियांस या ठिकाणीं वेणीदान द्यावें लागतें. हा समारंभ या ठिकाणीं फार थाटाचा होतो व तो पुण्यप्रदहि समजला जातो. गंगेचें विस्तीर्ण पात्र, शुभ्र जलौघ व असमंतांतील रम्य वनश्री अवलोकन केल्यानंतर सृष्टि देवतेचें मनोहर स्वरुप डोळ्यांसमोर उभें राहतें. किल्ल्यांत जयस्तंभाजवळच भुयारांत एक देऊळ आहे. त्यांत अनेक ऋषींच्या व तपस्व्यांच्या प्रचंड पाषाण मूर्ती आहेत. येथील अक्षयवटाविषयींची कथा अशी आहे कीं, बुंधा प्रयागास, शाखा काशीस व पल्लव गयेस आहेत. त्याप्रमाणें येथें फक्त बुंधा असून वर अदृश्य आहे. माघमेळा व कुंभमेळा या दोन मोठ्या यात्रा दरसाल प्रयागास भरतात. सरासरी तीन लाख लोक जमतात. स्टेशनचे बाहेर बिहारीलाल कुंजीलाल यांची धर्मशाळा आहे. स्टेशनवरील खुषरू बाग, शहरांतील वेणीमाधवाचें स्थान व इतर इमारती व यमुनेचा पूल हीं प्रेक्षणीय आहेत. पुलाची लांबी ३२३५ फूट असून तो बांधण्यास ४५ लाख रुपये लागले म्हणतात. अलाहाबादची वस्ती सरासरी पावणेदोन लाख आहे. या जिल्ह्यांत नऊ तहशिलें तेरा गांवें व एकंदर खेडीं ३४७३ आहेत. शहरास पाणी पुरवठा उत्तम आहे. हें शहर संयुक्त प्रांतांतलि केंद्र असल्यामुळें येथें अनेक शिक्षणसंस्था आहेत. व हिंदी भाषेंतील अनेक नियतकालिकें प्रसिद्ध होतात.

अहमदनगरः—अहमदनगर हें एक जिल्ह्याचे ठिकाण आहे. भूगोल विषयक मुख्य (भौतिक स्वरूप) लक्षण म्हणजे सह्याद्रीची एक मोठी रांग व तिच्या

लहान शाखा या जिल्ह्यांतून जातात. कळसूबाईचा डोंगर म्हणून सह्याद्रीचा जो भाग आहे त्यावर पट्टा किल्ला व हरिश्चंद्रगड असे दोन मराठ्यांचे किल्ले आहेत. प्रवरा, मुळा व सीना या नद्या सह्याद्रीपासून निघून या जिल्ह्यांतून वाहात जाऊन अनुक्रमें गोदावरी व भीमा यांस मिळतात. कोणतेहि खनिज पदार्थ या भागांत आढळत नाहींत. उत्तरभाग खेरीज बाकींची जमीन हलकी व रेताड आहे. अर्थात पीकपाणी कमीच. नगर जिल्ह्यांत बहुतेक पाण्याचा दुष्काळ आहे. यामुळें शेतकऱ्यांची स्थिती बरीच हलाखीची आहे. हें निवारण्यासाठीं विसापूर स्टेशन नजीक सरकार एक विस्तीर्ण तलाव बांधीत आहे. इतिहासः—अहमदनगर हे शहर ब्राम्हणी राज्यांतील एक सुभेदार अहमद निजामशा यानें मूळच्या बिनगर नामक शहराच्या जागेवर १४९४ त वसविलें. ब्राम्हणी राज्य बुडाल्यानंतर हा आपल्यास स्वतंत्र म्हणवून घेऊं लागला. अहमदनगर ही त्यानें आपली राजधानी केली. अकबराचा मुलगा वेढा देऊन बसला असतां चांदबिबी या शूर अबलेनें १५९५ त वेढा उठवून शहराचें रक्षण केलें. उद्योगधंदेः—नगर जिल्ह्यांत मुख्यतः हातमागावरील लुगडीं व पागोटीं आणि तांब्यापितळेचीं भांडीं करणें हाच धंदा आहे. सूत मुंबईहून येतें. शहरः—नगर हें मुंबई इलाख्यांतील एक लष्करी ठिकाण आहे. किल्ला शहराचे पूर्वेस अर्ध्या मैलांवर असून तो आजमितीला दुरुस्त आहे. त्यांत पलटणी असतात. नगरास व जवळपास पाहण्यासारखीं अनेक ठिकाणें आहेत. भर उन्हाळ्यांत अतिशय थंड असें एक ठिकाण (एक दरी) येथून १४ मैलांवर आहे. हें शहर स्टेशनपासून ३ मैल आहे. तेथून ६ मैलांवर एका टेकडीवर सलाबतखानाची एक कबर आहे. हें पूर्वी मुसलमान राजांचें एक राजधानीचें शहर होतें, त्या वेळच्या जुन्या मशी दींत हल्लीं सर्व सरकारी कचेऱ्या आहेत. शहरांतल्या विहिरींचें पाणी अगदीं खारें व मचूळ आहे. शहरांत प्रवाशाकरितां दोन धर्मशाळा आहेत.

या जिल्ह्यांत डोंगरांतील कोरींव देऊळें व किल्ले बरेंच आहेत. नगरच्या उत्तरेस डोंगर गांव टेकड्यावर माजरसुंबा नांवाचा किल्ला पुरातन काळीं वाल्मिक ऋषीचें निवासस्थान होता असें म्हणतात. या जिल्ह्याचे अकरा तालुके आणि शहरें व खेडीं मिळून १३४५ आहेत.

अहमदाबादः—गुजराथेंत एक जिल्ह्याचे ठिकाण आहे. या जिल्ह्याचें विशिष्ठ भौतिकस्वरूप लक्षण कायतें साबरमती नदी होय. हिची एकंदर लांबी सुमारें २०० मैल असून तिचें पाण्यावर भिजण्याऱ्या जमिनीचें क्षेत्रफळ सुमारें १०००० चौरस मैल आहे. पश्चिमेखेरीज जिल्ह्याच्या सर्व भागांत पाणी खारट असल्यामुळें शेतीस निरुपयोगी आहे. विरमगांव तालुक्यांत दगडाची एक खाण आहे. तींत पाषाण शिला मिळतात. या खेरीज दुसरे खनिज पदार्थ आढळत नाहींत. या जिल्ह्यांत जंगलें नाहींत. लोकरीतिः—इकडे कडवा कुणबी म्हणून एक कुणब्याची जात आहे. त्यांच्यांत एक चमत्कारिक विवाहपद्धति प्रचालित आहे, ती अशी कीं, योग्य वर मिळत नाहीं अशा वेळीं कधीं कधीं फुलांच्या झेल्याबरोबर यथाविधि लग्न लावून नंतर तीं फुलें विहिरींत टाकतात व मग पुनर्विवाहास मोकळीक झाली असें समजून त्या वधूस पाटाचा नवरा करून देतात, गुजराथच्या दुसऱ्या कोणत्याहि भागापेक्षां अहमदाबादच्या विशेष हाच कीं, येथें अनेक व्यापारी संस्था आहेत. या संस्थांचे उद्देश असे असतात कीं, परस्परांतली चढओढ नियामित करणें व इतर कारागिराशीं वाद उपस्थित झाल्यास संस्थेचें हित पाहणें. अशा प्रकारचे प्रत्येक व्यापारी व कारागिर यांचे इकडे संघ आहेत. व्यापार व उद्योगधंदेः—अहमदाबादेस कापडाच्या अनेक गिरण्या असून त्यांतून निघणारा तलम सुती अमदाबादी धोतरजोडा प्रसिद्धच आहे. सुती, रेशमी व जरतारी कामाविषयीं अमदाबादेची प्रख्याती आहे. रेशीम चीन, बंगाल, वगैरेकडून येते. यांत्रिक कारखान्याखेरीज हातमागहि बरेच चालतात. मातीचीं भांडीं कौलें खेळण्याच्या वस्तूहि इकडे चांगल्या तयार होतात. कागदाचे कारखानेंहि आहेत. त्यांतील कागद काठेवाड, कच्छ व असपासचीं इतर संस्थानें यांतच बहुतेक खपतो. शहरः—अमदाबाद हें गुजराथेंतील प्रमुख शहरांपैकीं एक नमुनेदार व कारागिरांचें एक शहर साबरमतीचे काठीं आहे. हें शहर अहमदशहानें सन १३१४ त वसविलें आहे. शहरांत व आसपास पुष्कळ मशिदी व जुनीं थडगीं आहेत. त्यांत जुम्मा मशीद ह्मणून जी आहे ती हिंदुस्थानांतील एक प्रेक्षणीय व अतीशय सुंदर अशी आहे. राणी सिप्रीची मशीद दर जगांतील एक अनुपमेय इमारत आहे. हिला अमदाबादचें रत्न असें म्हणतात, व ती गुजराथचा बादशाहा सुल-

तान महमद बेगम याच्या पत्नीनें बांधिली आहे. हैबतखानची मशीद म्हणजे हिंदु व मुसलमान शिल्पकामाचें एक मिश्र प्रदर्शनच आहे. शहराबाहेर दादाहरीरची विहीर शाहीबाग, शहाअलम, सरखित वगैरे प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. सरखित येथील कृत्रिम सरोवर मनोहर आहे. खेरीज अहमदशाहा, अचत बिबी, सिद्दी सय्यद वगैरे मशिदी व कित्येक बादशाहांचीं थडगीं, माता भवानीची विहीर व तीन दरवाजा वगैरे अनेक ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. येथें जैन देवालयें सुमारें १२० वर आहेत. कमीतकमी दर वर्षास या ठिकाणीं २४ जत्रा भरतात. अमदाबादेस शहराबाहेर एक मैलांवर "कांकरिया" नांवाचें कृत्रिम असें मोठें सरोवर आहे. अमदाबादची अलिकडची प्रसिद्धी कापसाच्या गिरण्यामुळें आहे. पहिली गिरणी १८६१ मध्यें सुरू झाली. हल्लीं पन्नासावर कापसाच्या गिरण्या आहेत. तसेंच, लोखंडाचें, काड्याच्या पेट्याचे, साबणांचे, वगैरे अनेक धंदे व कारखानें येथें आहेत. शिवाय गुजराथचे हे केंद्र असल्यामुळें गुजराथी लोकांचे वाङ्मय-वादी व शिक्षण विषयक अशा अनेक संस्था येथें आहेत.

अभिमन्यूः—ठाणेश्वराच्या आग्नेयेस पांच मैलांवर एक मोठी टेंकडी आहे. तिचें प्राचीन नांव अभिमन्यूची टेंकटी असें होतें. द्रोणाचार्यांनीं अभिमन्यूस मारण्याकरितां चक्रव्युह रचिला तो येथेंच. अभिमन्यूचेंच रूपांतर होऊन अमीन असें नांव झालें आहे. या गांवीं बहुतेक ब्राम्हणवस्ती असून ते गौड जातीचे आहेत. कश्यपाची स्त्री अदितीचें तप फळास येऊन तीस येथेंच पुत्र झाला, याचे दर्शक अदितीचें व सूर्याचें अशीं दोन देवालयें या टेंकटाविर आहेत. सूर्यकुंड नांवाचें एक तळें आहे. पुत्रप्राप्तीसाठीं पिंपळाला प्रदक्षिणा घालण्याचा जसा इकडे प्रघात आहे, तसाच या टेंकटीवर पुत्रप्राप्तीच्या इच्छेनें कित्येक स्त्रिया दर रविवारीं अदितीच्या दर्शनास जातात.

अशिरगडः—मध्यप्रांतांत खांडव्याच्या नैऋत्येस २९ मैलांवर हा एक प्रचंड व मजबूत किल्ला आहे. उत्तर व दक्षिण हिंदुस्थान या मधील लष्करी दृष्ट्या हें एक महत्त्वाचें नाकें आहे. हा सातपुड्याच्या एका तुटक भागावर असून पायथ्यापासूनची उंची ८५० फूट आहे. किल्ल्याची पूर्व पश्चिम अधिकतम लांबी ११०० व दक्षिणोत्तर ६०० यार्ड रुंदी आहे. किल्ल्याच प्रत्येक कडे शें सव्वाशें फूटापर्यंत खोल खालवर तुटल्यामुळें किल्ला दुर्भेद्य आहे.

किल्ल्यावर पाणी विपुल आहे, फेरिस्ता म्हणतो, हा किल्ला अषा अहिर नांवाच्या धनगरानें इसवी सन १३७० मध्यें बांधिला. दिल्लीच्या बादशाहानंतर हा किल्ला मराठ्यांकडे आला. नाना फडणविसाचें कारकीर्दींत जो किल्ला आपल्यास मिळावा म्हणून महादजीची खटपट होती तो हाच. यानंतर बरेच दिवस हा गड शिंद्याकडे होता. यांवर हल्लीं कांहीं इंग्रजी पलटणी असतात.या किल्ल्यांत औरंगजेबच्या वेळे-पासूनच्या अनेक जुन्या ओतीव सुंदर व प्रचंड तोफा आहेत. त्याकडे पाहिलें असतां पूर्वींची कारागिरी व कर्तबगारी कालचक्राच्या वक्रगतीमुळें व प्रस्तुतची त्याची हीन परिस्थिती यामुळें कोणाहि सूक्ष्म निरीक्षकांस सखेदाश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाहीं. अशीरगडास जवळचें स्टेशन चंदना हें येथून ७ मैलांवर आहे.

आळंदी:—हें क्षेत्र पुण्याच्या उत्तरेस १३ मैलांवर आहे. महाराष्ट्रांतील पंढरपुरा खालोखाल आळंदीचें माहात्म्य आहे. येथें श्री ज्ञानेश्वर महाराजांची समाधी आहे. समाधीची इमारत निरनिराळ्या मराठे सरदारानीं निरनिराळ्या वेळीं बांधली आहे. समाधीपुढील सभामंडप चिरेबंदी व मजबूत आहे. मंडपाचे बाजूस असलेलें 'अजानवृक्ष' नांवाचें झाड श्रीज्ञानेश्वराचे काठीपासून उत्पन्न झालें असल्याचे सांगतात. महाराष्ट्र संतमंडळाच्या ठिकठिकाणीं ज्या समाधि आहेत त्यांत आळंदी हें एक प्रमुख आहे. आळंदीस इंद्रायणी नदी आहे. ज्ञानेश्वराचें दर्शन व इंद्रायणीचें स्नान झाल्यावर कोणाहि भाविकाला समाधान वाटल्याखेरीज राहात नाहीं. ज्ञानदेवांनीं भिंत चालविलेली व वाघावर बसून आलेले चांगदेव शरण आलेले वगैरे ठिकाणें, गोऱ्या कुंभाराचें देऊळ, नृसिंहसरस्वतीस्वामींनीं महाराजाप्रीत्यर्थ तयार केलेला रथ, सोन्याचा पिंपळ व अजान वृक्ष हीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. अजानवृक्षाचीं पिकलेलीं पानें खाल्लीं म्हणजे पोटदुखी रहाते असें तेथील लोक सांगतात, व त्याविषयीं त्यांचा बराच आदर आहे. आळंदी गांवाचें उत्पन्न सुमारें १२०० रुपये असून तो ज्ञानोबाला इनाम आहे.

आग्रा:—संयुक्त प्रांतांत हें जिल्ह्याचें ठिकाण आहे. या जिल्ह्याचा बराचसा भाग (भौतिक स्वरूप) यमुना व चंबला यांचे दरम्यान असल्यामुळें जमीन अगदीं सुपीक आहे. ऊंस इकडे अतोनात पिकतो. संयुक्त प्रांताइतका ऊंस हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठेंच पिकत नाहीं. व्यापार, इतिहास वगैरे संबंधांत या जिल्ह्याचें सर्वस्व शहरांतच अंतर्भूत होत असल्यामुळें तीं तीं सदरें निराळीं न देतां शहरा खालींच त्यांचा निर्देश करण्यांत आला आहे.

शहरः—हें सुंदर शहर यमुनेच्या कांठीं आहे. येथून दिल्ली १३९ मैल आहे. आग्रा शहर अकबरानें १५६६ त वसविलें असून त्याचे वेळीं व पश्चात कांहीं काल हें राजधानीचें ठिकाण होतें. मोगल इतिहासांतील राजकीय संबंधांत हें शहर प्रमुख व येथील अनेक प्रेक्षणीय शिल्प कामें अवर्णनीय असल्या-मुळें कोणाहि प्रवाशास व शोधकांस तें ठिकाण पाहिल्यावर आनंद व मनोरंजन यांचा लाभ झाल्याखेरीज रहात नाहीं. आग्र्याचा ताजमहाल जगप्रसिद्ध आहे. ही इमारत शहाजहान बादशहानें आपल्या मुमताझ या राणीचे स्मरणार्थ बांधिली. ही सर्व इमारत जयपूरच्या संगमरवरी पाषाणाची असून आंतील भाग गोमेद इत्यादि मौल्यवान दगडावरील चित्र विचित्र व कुशल कारागिरीनें सजविलेला असल्यामुळें अत्यंत शोभिवंत आहे. एकच रंगाचा शुभ्र दगड वापरल्यामुळें येणारी क्लिष्टता, माळा, पट इत्यादिकांतून मधून मधून पिवळा तांबडा, निळा इत्यादि अनेकविध रंगाचा संगमरवरी दगड वापरून आणलेली विविधता व बाह्य भागचा वळणशुद्धपणा या बाबतींत जगांतल्या सर्व इमारतींत ताजमहाल अग्रेसर आहे. येथें बादशाहा शहाजहान व राणी मुमताज यांचीं थडगीं असून ती मोंगल साम्राज्याच्या भरभराटीची साक्ष पटविणारी अशी एक वस्तु आहे. आग्र्याच्या किल्ल्यांत मच्छी बावन, शिशमहाल आणि मोतीमशीद हीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. मच्छी बावन ही एक पूर्वींची दरबारची जागा आहे. या दरबार ठिकाणाच्या नदीकडल्या आंगास एक संगमरवरी व दुसरें काळ्या मऊ दगडाचें अशीं दोन सिंहासनें असून यांचें नकशीकाम अप्रतीम आहे. शहराबाहेर जुम्मामशीद व शहाजहानाचा सासरा इमाद उद्दौला याची कबर हीं पाहाण्यासारखीं आहेत. आग्र्याहून पांच मैलांवर सिकंदर येथें अकबराची कबर आहे. व संगमरवरी दगडावरील खोदकाम, नकशीकाम या बाबतींत आग्रा शहर प्रसिद्ध आहे. जरीकाठी कलाबूत व हिंदुस्थानी जोडे येथें होतात. साखरेची पैदास या प्रांतांत मुबलक होतें. फत्तेपूर, सिक्री व बद्रोली नांवाच्या डोंगरांतील खाणींतून सांपडणारे घडीव दगडहि येथून बाहेर प्रदेशीं रवाना होतात. आग्रा पाहण्यास जाणारांनीं आग्राफोर्ट स्टेशनवर उतरावें. आग्रा शहरची वस्ती १८५४४९ आहे. ई. आय, जी. आय. पी. व. बी. बी. सी. आय. या तीन मोठ्या रेल्वे येथें येऊन मिळत असल्यामुळें येथून निरनि-राळ्या दिशेनें देशाच्या चारी भागांत जातां येतें.

आलेप्पीः—त्रावणकोर संस्थानांतील महत्वाचें बंदर समुद्रकिनारीं कोचीनच्या दक्षिणेस ३३ मैलांवर आहे. शहर मुख्यतः समुद्र आणि धरणाच्या पाण्याचें जें एक अफाट तळें आहे. त्याच्या काठास असलेलीं विस्तीर्ण भाताचीं शेतें यामध्यें वसलेलें आहे विविध प्रकारचा भाजीपाला, बुंद, वेलदोडा, अलें,मिरें, नारळ, इत्यादि जिनसा येथून बाहेर जातात. येथें शेंकडों बोटी व जहाजें आहेत' जहाजांना नांगर टाकण्यास हें एक सोईचें ठिकाण आहे. जरी जहाजांना संरक्षक अशी भूशलाका या बंदराला नाहीं तरी तरंगते असें एक बेट आहे. यामुळें समुद्र कितीहि खळवला तरी नांगरवाड्यांतील जहाजांस भीति नसते. येथील दीपस्तंभावरील फिरता दिवा समुद्रांत १८ मैलपर्यंत दिसतो. समुद्र किनाऱ्यावरचा माल वखारीस नेण्यास हत्तीची ट्रामवे, राजवाडा व जकातकचेऱ्या प्रेक्षणीय आहेत. आलेप्पी मद्रासहून ३६६ मैल आहे.

इंदूरः—हें मध्य हिंदुस्थान अगर माळव्यांतलें एक प्रमुख संस्थान (भौतिक स्वरूप) असून क्षेत्रफळ ८०७५ चौ. मैल आहे. उत्तर भाग चंबळा व तीस मिळणाऱ्या नद्या आणि दक्षिण भागाची जमीन नर्मदेच्या पाण्यानें भिजते. नर्मदा उंच उंच डगरी मधून जात असल्यामुळें पाणी खोल आहे.इकडील जमीन सुपीक आहे. गहूं, ऊंस व कापूस हीं मुख्यत्वें पिकतात. तथापि अफूच्या वाढीस ही जमीन अत्युत्कृष्ठ ठरली असल्यामुळें सर्वत्र अफूची लागवड पुष्कळ होते. माळव्यासारखी अफू हिंदुस्थानांत दुसरीकडे पिकत नाहीं.विंध्य व सातपुड्याचा कांहीं भाग या संस्थानांतून जातो.हे दोन्ही पर्वत भिल्लोकांची अनादि कालापासूनची वास्तव्य ठिकाणें आहेत.यामुळें भिल्ल व गोंड यांची वस्ती इकडे पुष्कळ आहे.इंदुरांस भिल्लांची एक स्वतंत्र फौज आहे. इतिहासः—मराठी रियासतींत शिंदे होळकर या दोन नांवांत जादू आहे तिची एक अधिष्टात्री देवता म्हणजे मल्हारराव होळकर हा या संस्थानचा मूळ पुरुष.होळकरांचें मूळ ठिकाण होळ हा गांव निरा नदीचे काठीं आहे. पहिले बाजीराव गुणांचे चहाते असल्यामुळें मल्हारराव होळकर आपल्या असाधारण शौर्यानें सेनापतित्वाच्या थोर पदाला चढले. या घराण्यांतलें दुसरें अमोलिक रत्न म्हणजे अहिल्याबाई होळकर. जात्या स्त्री होऊन तिनें त्या वेळच्या धामधुमच्या काळांत आपलें राज्य भरभराटीनें चालविलें. साध्वी अहिल्याबाईचो दानशूरता, धर्मशाळा

विहिरीं वगैरेच्या रूपानें हिंदुस्थानांतल्या प्रत्येक लहान मोठ्या क्षेत्रीं लोकप्रसिद्धच आहे. शहरः—इंदूर हीं होळकरांची राजधानी कान नदीचे कांठीं असून ती अहिल्याबाईनीं वसविली आहे. शहरांत होळकर सरकाचा भव्य वाडा, उष्ण काळांतलें महाराजाचें वसतिस्थान, पशुसंग्रह असलेला लालबाग नांवाचा बगीचा, वाचनालय, टांकसाळ हीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. राजकुमार कॉलेजांत माळ्व्यांतील राजकुमारांस शिक्षण देण्यांत येतें.शहर स्टेशनालगत अगदीं जवळच आहे. इंदूर संस्थानची खांडव्याहून इंदुरास रेलवेची शाखा आहे.

उज्जनी:—हें शहर व स्टेशन ग्वालेर संस्थानांत क्षिप्रानदीच्या उजव्या तीरावर आहे. शहरच्या प्राचीनतेचा बहुतेक ऱ्हास झाला तरी अद्यापि उज्जयिनी हें मोठ्या वस्तींचें व भरभराटीचें व्यापाराचें ठिकाण आहे. हें पूर्वी शिंद्याचें माळवा प्रांतांचें राजधानीचे शहर होतें; परंतु सन १८१० त दौलतराव शिंद्यानें ग्वालेर ही आपली राजधानी केली. येथला मुख्य व्यापार म्हणजे अफूचा आहे. अफू येथून मुख्यत्वेंकरून बाहेर जाते. उज्जयिनी हें एक पुरातन पवित्र क्षेत्र आहे. कारण, आयोध्या मथुरा माया काशी कांची आवंतिका ॥ पुरी द्वारावती श्चैवसप्तैते मोक्षदायिकाः ॥ ह्या श्लोकांत वर्णिलेल्या सात पवित्र स्थानांत उज्जयिनची गणना आहे. खेरीज हिंदु भूगोलशास्त्रकारांनीं हिंदुस्थानची मध्य रेषा येथून जाते असें ठरविलें आहे.हा या ठिकाणचा विशेष आहे. बुद्धधर्मी सार्वभौम राजा अशोकचा प्रतिनिधीहि येथें राहत असें असे म्हणतात. तथापि इतिहासांत ती राजा विक्रमाची राजधानी म्हणूनच प्रसिद्ध आहे. मोंगलांचा ऱ्हास झाल्यानंतर तें शिंदे सरकाराकडे आलें. येथें शिंद्याचा एक राजवाडा असून त्याजवळची जुनी वेस राजा विक्रमाच्या वेळची आहे असें म्हणतात. शहरच्या दाक्षिण टोकाला जयपूरच्या राजा सवाई जयसिंगनें बांधलेली वेधशाळा आहे. काशी मथुरेप्रमाणें येथूनहि या विद्वान राजरत्नानें घेतलेले वेध सर्वमान्य आहेत. नव्या शहराभोंवतीं दाट राईचीं व बगीच्यांची गर्दी असून जुनें ठिकाण तेथून एक मैलावर आहे. शास्त्रें, विद्या, ललितकला, व धर्म यांचे उज्जयिनी पूर्वकाळीं माहेरघर होतें.कालाला अनुसरून तिला हल्लींचें स्वरूप आलें आहे.त्याचें एक आधुनिक कवीनें पुढील वर्णन केलें आहे—गेली उज्जयिनी ॥ तिच्या धरितसे नांवास

जी लोकिया । आहे सांप्रत उज्जनी नगर तें राज्यांत शिंद्याचीया । आहे नांव परंतु वैभव दिसें कोठें न ते त्यापरी ॥ ॥ ० ० ०

बा. बा. ख

उपमेरू—हिमालयाच्या उत्तरेकडील जो भाग आग्नेयेकडे पसरला आहे त्या उंच प्रदेशाला हें नांव आहे. या पर्वताच्या एका उंच शिखराला हेमश्रृंग असें म्हणतात. हेमशृंगाच्या उत्तरेस बिंदु सरोवर असून दाक्षिणेस निषध नांवाच्या डोंगराची ओळ आहे.

उमरेड—मध्य प्रांतांत नागपूर जिल्ह्यांत नागपूरहून २८ मैलांवर हा एक चांगला व्यापारी गांव अंब्रनदी तीरावर आहे. आसपासच्या आंबराईमुळें गांव टुमदार दिसतो. या ठिकाणीं जंगल होतें, तें त्या वेळचा जमीनदार बखतबुलंद यानें मुनाजी पंडित यांस इनाम दिल्यानंतर त्यानें उमरेड गांव सतराव्या शतकांत वसाविलें आहे. बखतबुलंदचा वंशज अद्यापि येथील देशपांडे आहे. १७७५ त माधवजी भोसल्यानें बांधलेल्या तलावाच्या फक्त दोन बाजू तेवढ्या राहिल्या आहेत. यांच्या वेळेपासून या गांवची कापडाच्या विणकामाबद्दल अतिशय प्रसिद्धी आहे. सर्वमान्य नागपुरी धोतरजोडा (रेशीमकांठीं) ह्मणजे खुद्द नागपूर नसून या गांवचा होय. नाममहात्म्यामुळें नागपूर हें गांव पुढें आलें आहे इतकेंच. एक इंच तें दीड फूट रुंदीचे रेशीमकाठी कापड येथें तयार होंते.तो सर्वत्र उपयोगांत आणला जात असल्यामुळें येथें त्याबद्दल विशेष सांगण्याचें प्रयोजन नाहीं. गांवच्या दोन्ही बाजूस दोन तलाव असून खरीज अनेक विहिरी असल्यामुळें पाण्याची चांगली सोय आहे.

उदेपूरः—भौतिकस्वरुप, उदेपूर अथवा मेवाड हें संस्थान राजपुतान्यांत आहे. संस्थानची लांबरुंदी अनुक्रमें १५० व १३० मैल व क्षेत्रफळ ११६१४ चौ. मैल आहे. उदेपूरचे आरवली डोंगर मुख्यत्वें ग्रॅनिट नांवाचे दगडाचे आहेत. कोठें स्लेटीचा दगड सांपडतो; सखल जमिनींत आढळणारा धातु ह्मणजे फक्त शिसें व लोखंड. उदेपुराहून चोवीस मैलांवर जावर येथें जस्ताच्या खाणी असून चितोड नजीक तांबें सांपडतें. मुख्य नदी बनस असून सरोवरें व तलाव तर किती तरी आहेत. त्यांत यंत्रशास्त्रदृष्ट्या अत्यंत रमणीय अस। कंकरोली अथवा राजनगर येथें असून त्याचें क्षेत्रफळ १२ चौ. मैल व धरणाची

उंची ४० फूट आहे. इकडील मुख्य रहिवाशी भिल्ल असून हा समाज बहुधा कोणाची सत्ता न मानणारा तुटक व स्वतंत्रपणें राहतो. इतिहासः—उदेपूर घराणें सूर्यवंशाची वडील शाखा असल्यामुळें हिंदुस्थानांतल्या सर्व रजपूत घराण्यांत म.नानें व दर्जानें श्रेष्ठ आहे. उदेपूरचा स्थापक कनकसेन हा परंपरेनें श्रीरामचंद्राच्या वंशांत जन्मला असून त्यानें उदेपूरची स्थापना सन १४४ त केली. मुसलमानांस अत्यंत साहसानें व अखेर पर्यंत अडथळा उदेपूर इतका हिंदुस्थानांतल्या दुसऱ्या कोणत्याहि राजघराण्यानें केला नाहीं. या घराण्याचा जाज्वल्य अभिमान हा आहे कीं, कशाहि बिकट परिस्थितीशीं तोंड देणें भाग पडलें व अनिवार संकटें आलीं तरी त्यांनीं आपली मुलगी कोणाहि मुसलमान बादशाहास दिली नाहीं. उदेपूरचें घराणें शिसोदिया या अस्सल क्षत्रिय वंशाचें आहे. उदेपूरच्या पराक्रमी पुरुषांची हकीगत जिज्ञासूनीं कर्नल टॉडच्या ग्रंथांत पहावी..अकबराचे वेळीं मोंगल सैन्यानें उदेपुरास ग्रासून टाकिलें होतें. राणा उदेसिंहाचे हातून चितोड गेल्यावर त्यानें उदेपूर ही नवीन राजधानी केली, तथापि त्याचा महाप्रतापी पुत्र महाराणा प्रतापसिंह यानें आपला बाणा न सोडतां अखेरीस गतवैभव सर्व पुनः मिळविलें. या कारकिर्दीत झालेले अनेक युद्धप्रसंग चितोडमधील भयंकर जोहार—युद्धकथा नेहमींच रम्य असतात. त्याप्रमाणें ते सर्व प्रसंग हिंदुमात्रास अत्यंत रमणीय प्रगतिपर व भावी उन्नतीस मार्गदर्शक असे आहेत. (लोकहितवादीकृत राजस्थानचा इतिहास पहा.) उदेपूरनें ज्यांनीं मोंगल बादशहाला मुली दिल्या त्यांशीं शरीरसंबंध करण्याचें नाकारलें तें अर्थातच त्यांस झोंबलें, व पुढें असें ठरलें कीं, विवाह कर्तव्य असल्यास उदेपूरच्या कन्येच्या पोटीं होईल त्या पुत्रासच (वडील मुलगा असला तरी) गादी मिळावी यामुळें पुढें रजपुतांत कलहाचें चांगलेंच बिजारोपण झालें व त्यावेळच्या धूर्त मराठ्यांनीं आपला फायदा कुशलतेनें करून घेतला.

या संस्थानांत एकंदर १७ जिल्हे आणि खेडीं व शहरें मिळून ६०४४ आहेत. संस्थानांत तरवारी, कट्यार, हस्तीदंती बांगड्या व चामडी बुधलें चांगली तयार होतात. शहर—उदेपूर शहर एका सुंदर व विस्तीर्ण तलावाच्या काठीं वसल्यामुळें व आसमंतातल्या अरवली पर्वतावरील रम्य वनश्रीमुळें येथली निसर्ग शोभा अवर्णनीय असल्यामुळें काश्मीर प्रमाणें उदेपूर हें एक अतिशय रमणीय ठिकाण

आहे. येथला राजप्रासाद व जगन्नाथाचें देवालय, रजपूत सरदारांचे वाडे व थडगीं व नारिंगी वगैरेचीं उद्यानें व कारंजे यामुळें जगांत हें एक उत्कृष्ट प्रेक्षणीय ठिकाण आहे. शहरची वस्ती पन्नास हजारावर आहे. राजवाडा सर्व संगमरवरी दगडानीं बांधिला असून तिहेरी कमानीवर उभारलेली नुस्ती गच्चीच इतकी विस्तीर्ण आहे कीं, महाराजांची सर्व शिबंदी (२०,०००) तीवर उभी राहूं शकते. १ पाचोला नांवाच्या तलावाच्या मध्यभागीं जगमंदिर व जगनिवास या नांवाचें वाडे राणा जगसिंह यानें बांधिलें आहेत. शहरापासून तीन मैलांवर अहर नांवाच्या खेड्यांत महासती नांवाचें ठिकाण आहे. तेथें आजवर झालेले राजपुरुष व स्त्रिया यांचीं थडगीं व सती स्त्रियांची स्मारकें असून तीं सर्व आपापल्यापरी उत्कृष्ट आहेत. त्यांत राणा उमरसिंहचें स्मारक अगदीं लोकोत्तर आहे. उदेपुरचें उत्तरेस बारा मैलांवर एकलिंगजी म्हणून महादेवाचें स्थान आहे. येथील लिंगास चार मुखें आहेत. समोर पितळेचा नंदी व जवळच सुंदर तीर्थ आहे. देवाळयास चोवीस गांवांच्या जहागिरी खेरीज जमिनी आहेत. एकलिंगजी जवळील तलावहि रमणीय असून त्याकांठीं बरीच मोठीं देवालयें आहेत. " चित्तकका चबुतरा " म्हणजे राणा प्रतापसिंगाचा चित्तक नांवाचा आवडता घोडा होता, त्याचें हें थडगें उदेपूर संस्थानांत जारोळ गांवांजवळ आहे.

उडपीः—रोप्यपीठं कुमाराद्रिः कुंभ काशी ध्वजेश्वरः। क्रोड गोकर्ण मूकांबा सप्तैते मोक्षदायकाः ॥ १ ॥ या सप्त संख्येपैकींच उडपी हें एक वैष्णव संप्रदायाचें पवित्र क्षेत्र दक्षिण कानडा जिल्ह्यांत असून तालुक्याचा गांव आहे. परशुरामानें समुद्राचा जो भूभाग घेतला त्याचाच हा भाग आहे, येथल्या राजानें यज्ञसमयीं रौप्य पीठावर परशुरामाची स्थापना केली त्यावरून रजतपठि असें नांव पडलें. क्षेत्रनायक अनंतेश्वर (परशुराम) असून मंदिरांतच मध्वमत प्रवर्तक आचार्य असतात. अनंतेश्वरासमीप चंद्रमौलीश्वराचें मंदिर आहे. कृष्ण मंदिर आद्यमध्वाचार्यांनीं स्थापिलेलें आहे. त्यास कृष्ण व बलरामाच्या मूर्ती एका वैश्याच्या समुद्रांत तुफानांत सांपडलेल्या एका नावेंतलि गोपिचंदनाचें ढिगांत सांपडल्या अशी कथा आहे. मध्वाचार्यांनीं आपल्या अष्ट ब्रम्हचारी शिष्यांचे आठ मठ स्थापिले. परंपरेनें ब्रम्हचर्यांतच संन्यास देऊन आचार्यपदारूढ करण्याचा क्रम या मठांत अव्याहत चालू

१. कर्नल टॉडचा राजस्थानचा इतिहास पहा.

आहे. त्यांची सर्व व्यवस्था पाळीपाळीनें मठांच्या आचार्यांकडे असते व ती प्रत्येकांची दोन वर्षांनीं येतें. प्रत्येक मठाला वेगळाल्या जहागिरी असून त्यांचा लवाजमा मोठा असतो. मकर संक्रांतीस दरसाल मोठा उत्सव होतो, तें समयीं हजारों पात्रांचें अन्नसंतर्पण होतें. उत्सवांत रथाची मिरवणूक व नौकेंतून चंद्र-सरोवरांतील जलक्रीडा व दीपोत्सव अत्यंत प्रेक्षणीय असतो.

उमरावती भौतिकस्वरूपः—हें एक पुरातन ठिकाण व वऱ्हाडचें मुख्य शहर व जिल्ह्याचें ठिकाण आहे, जमीन अगदीं सपाट व अतिशय सुपीक आहे. पूर्णा व वर्धा या दोन नद्या या जिल्ह्यांतून वाहतात. मुख्य पीक म्हणजे कपाशी. वऱ्हाड प्रांतासारखा कापूस सर्व हिंदुस्थानांत इतरत्र क्वचित पिकतो. गहूं जवस हीं देखील विपुल पिकतात. या प्रांतांत पर्जन्यकाळीं गारांची वृष्टि होऊन पुष्कळ वेळां पिकांस बरेंच नुकसान पोंचतें. इतिहासः—वऱ्हाड म्हणजे मुळचे विदर्भ राजा भीमकाची राजधानी येथेंच होती. भीमककन्या रुक्मिणीचे स्वयंवराप्रीत्यर्थ जे वऱ्हाडी आले होते त्यांतील कांहींनीं इकडे वसाहत केल्यामुळें या प्रांतास पुढें वऱ्हाड अशी संज्ञा प्राप्त झाली. मुसलमानांचा पाहिला प्रवेश अल्लाउद्दीन खिलजीच्या वेळीं झाला. परवां परवांपर्यंत वऱ्हाडावर निजामचें स्वामित्व होतें. शहरः—वऱ्हाडांतील हें सुप्रसिद्ध व संपन्न शहर आहे. शहरास २० ते २५ फूट उंचीची तटबंदी असून तिला एकंदर पांच दरवाजे आहेत, हा तट पेंढारी लोकांपासून रयतेस उपद्रव होऊं नये म्हणून हैद्राबाद निजामांनीं बांधला असें म्हणतात. येथिल अंबेचें देवालय नामांकित आहे. वाङ्‌निश्चय होण्यापूर्वी श्रीकृष्णांनीं रुक्मिणीचे देवालयांतून हरण केलें अशी कथा आहे. देवालय ज्या दरवाज्याजवळ आहे त्यांस अंबा दरवजा असे म्हणतात. देवीचे ध्यान इतकें भव्य आहे कीं, दर्शन झाल्यावर मनुष्य अगदीं चाकित होऊन जातो. देवीला लाखों रुपयाचे अलंकार असून शहरांतील घरें अजमासें ४०० देवीचे नावें आहेत व शिवाय जमिनी वगैरे उत्पन्न रगड आहे. येथील जुन्या शिखराचा जीर्णोद्धार मन्याबाई वारकरी या बाईनें शके १७९६ त केला आहे. कापसाच्या पैदासीबद्दल वऱ्हाड आतां प्रसिद्धच आहे. येथें कापसांच्या अनेक गिरण्या आहेत.

उरुचाः—हें बुंदेलखंडांतील एक संस्थान झांशीच्या दक्षिणेस आहे. संस्थानचें क्षेत्रफळ सुमारें २००० चौरस मैल आहे. दोन मुख्य शहरें म्हणजे

टेहरी हीं हल्लींची, व उरुचा ही जुनी राजधानी हीं आहेत. टेहरीस टिकमगड जो किल्ला आहे त्यावरून संस्थानालाहि टिकमगड असें म्हणतात. संस्थानांत कांहीं सुंदर तळीं आहेत. तीं सर्व राजघराण्यांच्या पूर्वजांनीं बांधिलेलीं आहेत. उरूचा हें सर्वांत जुनें व सर्वांत वरच्या दर्जाचें संस्थान असून पेशव्यांचे अंकित झालें नाहीं असें हें एकच, तथापि मराठ्यांनीं पुढें झांशी वगैरे कांहीं भाग काबिज केला होता. उरूचाची वस्ती बिटवा नदीच्या दोहोंकडेस वसली असून किल्ल्यांत एक जुना राजवाडा व बादशहा जहांगीर करितां राजा वीरसिंगदेवानें उभारलेल्या त्या वेळचा प्रासाद हीं दोन प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. गांव स्टेशनाहून ५ मैल आहे.

ह्या इलाख्यांत एकंदर ७६३ खेडीं असून भाषा सर्वत्र बुंदेलखंडी चालते.

ओंकार मांधाताः—हें नर्मदेकांठीं पवित्र स्थान मध्यप्रांतांतील निमाड जिल्ह्यांत राजपुताना माळवा रेल्वे मोरटक्का स्टेशनहून सात मैल आहे. मांधाता हें बेट नर्मदेमधील एक बेट असून तें ओंकारेश्वर व अमरेश्वर या दोन पुरातन देवस्थानामुळें प्रसिद्ध आहे. स्कंदपुराणांतील नर्मदा खंडांत या बेटाचे वैडुर्यमणिपर्वत असें वर्णन आढळतें. पण सूर्यवंशीय राजा मांधात्री यानें यज्ञ केल्यापासून मांधाता हें नवीन नांव पडलें. खेरीज सिद्धेश्वर महादेव व गौरीसोमनाथ हीं दोन प्राचीन देवालयें आहेत. बेटावरील सर्व देवस्थानें शैवांची असलीं तरी नदीच्या उत्तर तीरावर वैष्णवांचीं व जैनांचीं अनेक देवालयें आहेत. नर्मदा दुभंगते त्याच्या वरच्या बाजूस विष्णूच्या व त्याच्या निरनिराळ्या अवताराच्या मूर्ती आहेत. रावणनाला या ठिकाणीं असलेला १८फूट ६ इंच लांबीचा दशभुज पुतळा आहे. त्यास कोणी रावण म्हणतात. पण ती भयानक स्वरुपी कालीची प्रतिमा असावी. देवस्थानजवळच्या टेकड्या व मांधाता बेट यावर पुरातन वस्तीच्या पुष्कळ खाणाखुणा आढळून येतात. यावरून या प्रदेशावर एका काळीं दाट लोकवस्ती असावी असें अनुमान आहे. देवस्थानचें स्वामित्व ज्याकडे आहे त्यास मांधाताचा राजा म्हणतात. तें घराणें व देवाचे सेवेकरी एवढींच कायतीं हल्लीं वस्ती आहे. ओंकारेश्वराची यात्रा कार्तिक पौर्णिमेस भरते. भविष्यपुराणांत असें सांगितलें आहे कीं, कलियुगाचीं पांच हजार वर्षे भरलीं तेव्हां (१८९५) गंगेचें महात्म्य कमी झालें पण नर्मदेचें आहे तसेंच आहे, व तें सतत राहणार. अर्वाचीन श्रीमानांनीं बांध-

लेलीं देवालयें देखील प्रेक्षणीय आहेत. मांधाता बेटावर धर्मशाळा आहे. मोरटक्का हें स्टेशन खांडव्याहून जवळ आहे.

औरंगाबादः—निजामचे राज्यांतील एक सुभा व गोदावरी रेल्वेचें स्टेशन दुधना नदीचें काठीं आहे. शहर स्टेशनहून तीन मैल आहे. शहराभोंवतीं सहा मैल दगडी तट आहे. बारा फुटाचें दरवाज्यांतून आंत गेल्यावर " भडकल " नांवाचा दरवाजा लागतो. भडकलचे डावे बाजूस औरंगजेबचें राहण्याचें ठिकाण आहे. त्यास किल्लेअटक असें ह्मणतात. हत्तीहौद वगैरे मोठे हौद आहेत. मोगलांच्या वेळच्या अनेक जुन्या इमारतीचे अवशेष असून बेगमपुऱ्यांत बिबीचा मुकाबरा ही औरंगजेबच्या मुलीची मशीद प्रेक्षणीय आहे. हें शहर मूळ मलिकंबरनें बसविलें असून त्याचे वेळचा पाण्याचा नळ, पवनचक्की, छावणींतील सरकारी बाग हीं पाहण्यासारखीं आहेत.

औंधः—सातारा जिल्ह्यांतील एक संस्थानचें ठिकाण. संस्थानाचें घराणें देशस्थ शुक्लयजुर्वेदी आहे. क्षेत्रफळ ५०१ चौ. मैल असून वसूल सुमारें चार लाख आहे. हल्लींचे संस्थानिक हे विद्वान, उत्तम चित्रकार असून प्रजाहितदक्ष आहेत. व त्यांचें उद्योगधंद्याकडे फार लक्ष आहे. किर्लोस्कर बंधुंचा शेतकीच्या औताचा व ओगले कंपनीचा कांचसामानाचा असे दोन मोठे कारखानें ह्यांत आहेत. खेरीज खुद्द औन्धास एक रसायन प्रयोगशाळा आहे. या राज्यांत ३२ ग्रामपंचायती आहेत. त्यांना दिवाणी, व फौजदारी अधिकार आहेत. सन १९२३ सालीं पंचायतीनीं दिलेल्या अपीलावर एकहि अपील आलें नाहीं म्हणतात. औंधास श्रीमंतांचा राजवाडा व प्रतिनिधी घराण्याच्या कुलदेवतेचें (भवानी) सुंदर देऊळ प्रेक्षणीय आहेत.

कच्छः—हें संस्थान काठेवाडचे उत्तरेस आहे. कच्छचें रण म्हणून जी क्षार (खारट) जमीन आहे. ती सोडून संस्थानचे क्षेत्रफळ अदमासें ६५०० चौरस मैल आहे. राजधानीचें शहर भूज येथेंच संस्थानचे अधिपती रहात असून त्यांना " राव " अशी पदवी आहे. इतर भागापासून असलेल्या तुटकपणामुळें इकडील लोकांचा विशिष्ट स्वभाव, चमत्कारिक भाषा व आपल्या राजाविषयीं व्यक्तिशः असलेली अतुल राजनिष्ठा हीं पाहतां कच्छी लोकांचे वैशिष्ट्य राष्ट्रीय, स्पृहणीय तसेंच मननीय आहे. प्रदेश जरी ओसाड, खडकाळ व वृक्ष आहे.

त्याच्या डोंगराच्या रांगामुळें व त्याच्या निमूळत्या सुळक्यामुळें एकंदर देखाव्यांत बरेंच वैचित्र्य दिसून येतें. एखादी शाश्वत नदी या प्रदेशांत नाहीं. पर्जन्यकाळीं मात्र निरनिराळे प्रवाह उद्‌भुत होऊन कच्छचे आखातास येऊन मिळतात. या संस्थानचें विशिष्ट भौतिक स्वरूप म्हणजे कच्छचे रण अथवा पडीत रान हें होय. या रणांची व्याप्ति अदमासें नऊ हजार चौरस मैल आहे. हें रण मूळ समुद्राच्या खाडीचें जें पात्र होतें त्याचें कांहीं स्वाभाविक कंपामुळें बनलें असावें असें अनुमान आहे. या रणाचा सर्व पृष्ठभाग बहुधा मिठानें अच्छादलेला असतो. तुरळक एखाद्या बेटावरील खुरट गवताखेरीज या रणांत कोणतीहि वनस्पती उगवत नाहीं. भटकणारें पक्षी अगर रानटी गाढवांचें कळप या खेरीज दुसरा सजीव प्राणी या प्रदेशांत आढळत नाहीं. हें रण ओलांडण्यास फक्त आक्टोबर अखेर बहुधा सुलभ असतें. या विस्तीर्ण खारट पडीत रानाचें विशेष लक्षण व डोंगराच्या पायथ्याशीं कठीण काळ्या पाषाणाचा होणारा स्फोट यावरून ही ज्वालामुखीची क्रिया कच्छ संस्थानांत प्राचीन काळीं विशेष जोरांत होती असें दिसतें. सांप्रत ज्वालामुखीचा स्फोट होत नाहीं तरी भूकंपाचे वरचेवर धके बसतात त्यावरून हा प्रदेश म्हणजे भूगर्भांतील प्रबल शक्तीचें एक केंद्र आहे. जगतीतलावर ह्या रणासारखें दुसरें रण नाहीं. मृगजळाचे हें रण तर माहेरघर आहे. भूगर्भिक परिस्थितीचा विचार करतां रणाचे मालकी विषयीं जमीन व समुद्र यांचा दावा चालू आहे. परंतु वहिवाटीचा हक्क सांगून जमीन जिंकील असें म्हणतात. सन १८१९ मधील धक्का फार भयंकर होता, त्यामुळें सरकारी वाड्यासुद्धां एकंदर सात हजार घरें जमीनदोस्त झालीं. लोखंड आणि दगडी कोळसा हीं खानिज द्रव्यें सांपडतात. पूर्वी तुरटीहि पुष्कळ तयार होत असे, पण चिनी तुरटीच्या चढाओढीमुळें हा व्यापार अलीकडे मंदावला आहे. कच्छी आणि गुजराथी या प्रमुख भाषा आहेत. तथापि लिहिण्याची भाषा गुजराथी, येथले प्रमुख रहिवाशी जरेदार रजपूत असून कच्छचे राव याच जातीचे आहेत. गहू आळशी वगैरें धान्य हें मुख्य पीक आहे. कच्छी घोडे व उंट हे तर सर्व प्रसिद्धच आहेत. येथलि अधिपतीला महाराज मिर्झा महाराव श्रीखेंगरजी अशी पदवी असून त्यास सत्रा तोफांची सलामी आहे. या संस्थानांत आठ जिल्हे, आठ मोठीं शहरें व एकंदर लहानशी खेडीं ९६७ आहेत.

कनोज:—हें प्राचीन शहर संयुक्त प्रांतांत फरुकाबाद जिल्ह्यांत काली नदीच्या काठीं आहे. प्राचीनकाळीं आर्य स्वराज्याचें राजधानीचें शहर होतें. नंद वंशाचा उच्छेद करून कपटनीति प्रवीण चाणक्यानें मौर्य वंशास राजपद मिळवून दिलें. चंद्रगुप्त हा पहिला सम्राट होय. या घराण्याचे कारकीर्दीत हें राज्य व शहर भरभराटीस आलें होतें. जुन्या शहराचे अवशेष आसपास पुष्कळ आढळतात, त्यांत राजा अजयपाळ याची समाधि होय. ही लोहारचा राजा जयपाळ यानें बांधिली आहे. खेरीज जुम्मा मशीद हें शहरांत एक पाहण्यासारखें ठिकाण आहे. खालच्या बंगाल्यांत ब्राह्मणधर्माचा प्रसार मूळ येथूनच झाला. देशांत विशेषतः बंगाल्यांत कनोजी (कायस्थ) ह्मणून जे ब्राम्हण आहेत त्यांचे पूर्वज मूळचे कनोजचे राहिवाशी होते. हें शहर एकेकाळीं आर्य सुधारणेचें माहेरघरच होतें. शहराजवळच जो उंचवट भाग आहे तेथें काकपूर नांवाचे शहर होतें, हल्लीं तेथें दोन देवळें आहेत. एक क्षीरेश्वर महादेव व दुसरें द्रोणपुत्र अश्वत्थामाचे देवळाची त्या प्रांतीं पुष्कळ प्रसिद्धी आहे. अत्तर व सुगंधी पदार्थाविषयीं कनोज सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. कनोज बी. बी. सी. आयचें स्टेशन कानपूरहून ४९ मैल आहे.

कनारक:—ओरिसा प्रांतांतील पुरी जिल्ह्यांत हें एक हल्लीं जीर्ण देवस्थान बंगालचे उपसागराचे किनाऱ्यास पुरीहून १९ मैलांवर असून तें वैष्णवमतास अनुसरून असलेल्या सौर पंथाचें म्हणजे सूर्योपासकांचें एक उत्कृष्ठ स्मृतिचिन्ह आहे. तें तेराव्या शतकांत बांधलें असल्याचा दाखला मिळतो. हल्लीं जरी पडीत आहे व बाहेरली भिंत तर नामशेष होऊन गेली आहे; तथापि आहे तें सुंदर आहे. सुंदर स्त्रीनिदर्शक अशा वनदेवता, सजीवाप्रमाणें गुडघे टेकलेले हत्ती व वीर पुरुष यांचे निरनिराळ्या आकाराचे व विलक्षण असे या देवालयावरील पुतळें अवलोकिलें म्हणजे प्राचीनकाळीं हिंदु शिल्पकला निसर्गाशीं कशीं तादात्म्य पावलीं होती हें पहावयास मिळतें. कालाच्या निर्घृणतेपेक्षां सौंदर्यच त्यांच्या नाशास अधिक कारणीभूत झालें आहे. व यामुळेंच इंग्रज प्राचीन वस्तूंसंशोधकांस मोह पडून त्याचा कांहीं भाग त्यांनीं कलकत्याच्या पदार्थ संग्रहालयांत नेऊन ठेवला आहे.

कनखल:—हें गांव हरिद्वारपासून एक मैलावर गंगा तटाकीं आहे. वस्ती बहुतेक हरिद्वार येथलि देवस्थानचे पुजारी वगैरे ब्राम्हणांची आहे. दक्षेश्वर म्हणून

जें देवालय आहे त्याची पौराणिक कथा अशी आहे कीं, दक्षप्रजापतीनें या ठिकाणीं यज्ञ केला. त्यांत शिवास हविर्भाग मिळाला नाहीं म्हणून शिवानें यज्ञाचा विध्वंस केला व दक्षकन्या पार्वतीनें अग्निकाष्ठ घेतलें. येथें जें तीर्थ आहे त्याचें " स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते " असें माहात्म्य आहे. हरिद्वारास जाणारे कनखलास जाऊन आल्याशिवास रहात नाहींत. जवळच्या टेकडीवर महादेवाचा त्रिशूळ आहे. तो कोणी व केव्हां येथें ठेवला व कशाचा केला आहे याचा मागमूस लागत नाहीं. गंगातटाकची निसर्गशोभा अर्थात अनुपम आहे, हें सांगावयास नकोच.

कबीर वड:—भडोच जवळ नर्मदेंत एक बेट आहे. बेटावर एक विशाल वटवृक्ष आहे. त्यास कबीर वड म्हणतात. नर्मदेच्या महापुरानें या वटवृक्षाचा पुष्कळ भाग वाहून गेला आहे. तरी सांप्रत जेवढा भाग शेष राहिला आहे, त्याच्या खोडापैकीं मुख्य मुख्य घेऊन त्यांचा घेर काढला तर २००० फुटापेक्षां अधिक आहे. ह्याला मोठालीं खोडें ३५० आहेत. लहान तर ३००० हून अधिक आहेत. व ह्या प्रत्येकांस नव्या नव्या फुटलेल्या पारंब्या लोंबतातच. एकदां ७००० लष्कर या वृक्षाखालीं कैक दिवस तळ देऊन राहिलें होतें. इतक्यांस ही जागा पुरून उरली होती. या स्वयंभू शीत मंडपाखालीं पुष्कळ शिकारी उतरतात. या एका राक्षसी वृक्षावर मोर, बदकें बुलबुल व हजारों जातींचीं माकडें कळप करून राहतात. कित्येक चैनी शिकारी त्याच्या छायेखालीं राहून तेथल्याच गरीब प्राण्यांची शिकार करतात. वटवृक्ष तांबड्या भडक सुंदर रंगांनीं गजबजून गेल्या वेळीं तेथील शोभा अवर्णनीय दिसते. एका इंग्रज कवीनें या वृक्षावर एक काव्य केलें आहे. वडाखालीं एक देवीचें देवालय असून तेथें वर्षातून एक मोठी यात्रा भरते.

कराची:—हा सिंध प्रांतांतला एक मोठा जिल्हा मुख्य शहर व महत्वाचे व्यापारी बंदर आहे. शिवाय लष्करचें ठाणें आहे. मुंबईहून कराचीस बोटी आठवड्यांतून तीन वेळां सुटतात. मेलबोटीनें कराचीस पोहोंचण्यास ३८ तास लागतात. ही वस्ती व येथला प्रचंड व्यापार सर्व अलिकडला म्हणजे इंग्रजी अमलांतील आहे. बंदर जवळ येऊं लागले म्हणजे प्रथम दृगोचर होणारी वस्तू म्हणजे मनोराची भूशलाका व त्यावरील दीपगृह होय. या दपिस्तंभाचा प्रकाश आकाश

निरभ्र असल्यास सभोंवतीं १७ मैल दिसतो. व बंदरावरील इमारतींखेरीज एक किल्ला असून तो १७९७ त बांधलेला आहे. आखाताच्या दुसऱ्या बाजूस केमारी हें बेट असून तेथें उतारू व माल उतरण्याचे सोयीचे एकंदर तीन धक्के आहेत. हें बेट व शहर यांतील अंतर तीन मैल असून नेपियर घाटाचे बाजूनें जो रस्ता नेला आहे त्यामुळें तें शहर व मुख्य भूप्रदेश यांस जोडलें गेलें आहे. प्रचंड व्यापार, रमणीय बंदर व अनेकविध भरभराटीस आलेल्या संस्था व मंडळें हीं इंग्रजी संपन्नतेचीं निदर्शक आहेत. सर्वसाधारणपणें पंजाब व सिंध प्रांतांत त्याप्रमाणें कराचीसहि मुसलमान लोकसंख्या मोठी म्हणजे हिंदूंच्या जवळजवळ दुपटीनें आहे. मुसलमानी व इंग्रजी प्रार्थनामंदिरें अर्थात् त्या मानानें अधिक आहेत. मुंबईच्या खालोखाल मोठें बंदर म्हणजे कराची असून येथली आयातनिर्गत त्या मानानें बरीच आहे. फ्रियर हॉल, अफगाण सराय नांवाची कारवान लोकांकरितां असलेली धर्मशाळा, सदरकोर्ट वगैरे इमारती काय त्या मुख्य आहेत. शहरांत निरनिराळ्या पेढ्या (बँक) चेंबर ऑफ कामर्स हें व्यापारी मंडळ व अनेक कारखाने असून त्या त्या इमारती पाहण्याजोग्या आहेत. पावसाचें प्रमाण सरासरी ७ इंच असून कराचीची हवा आरोग्यास हितकर आहे.

कऱ्हाड:—हा सातारा जिल्ह्यांतील तालुक्याचा गांव व सदर्न मराठा रेल्वेचें स्टेशन आहे. येथें कृष्णा व कोयना या दोन नद्यांचा संगम आहे. या संगमाचा विशेष चमत्कार असा आहे कीं, या दोन नद्या एकमेकींस अगदीं समोरासमोर येऊन मिळाल्या आहेत. ज्याप्रमाणें समोरासमोर दोघी भगिनी येऊन मोठ्या प्रेमानें आलिंगन देतात त्याप्रमाणें या दोन नद्यांचा अगदीं एका सरळ रेषेंत संगम झालेला आहे. नंतर तो प्रवाह पूर्वेकडे चालला आहे. म्हणून यास "प्रीतिसंगम" असें म्हणतात. असा संगम पृथ्वीवर कोठेंहि नाहीं. पावसाळ्यांत जेव्हां महापूर येतात अशा वेळीं प्रदेश कित्येक मैलपर्यंत अगदीं जलमय होऊन जातो. त्यावेळीं सृष्टिदेवतेचें भयानक स्वरूप दृग्गोचर होतें. कृष्णाबाईस सुंदर घाट असून घाटावर श्रीकृष्णाबाईचें देवालय आहे. संगमावरच श्री. पंतप्रतिनिधी यांचा भुईकोट किल्ला आहे. येथें एक विहीर आहे. तीस "नकट्या रावळ्याची विहीर" म्हणतात. संगम स्टेशनहून ३ मैलांवर आहे. संगमावर श्री. पंतप्रतिनिधी संस्थान औंध यांची एक धर्मार्थ नाव नेहमीं चालत असते. येथून जवळच खोडशी येथें

कृष्णेस धरण बांधलें असून त्यांच्या पाटाचें पाणी कृष्णेच्या पलीकडून अलीकडे नळानें कऱ्हाडास आणिलें आहे. कऱ्हाड येथील मनोरे पाहण्यासारखे आहेत. कऱ्हाडास स्वदेशी आगपेट्यांचा कारखाना असून माल चांगला तयार होतो. कऱ्हाडाला पुण्यावरून जावें लागतें.

कर्णप्रयागः—हा गांव संयुक्त प्रांतांतील गर्वाल जिल्ह्यांत पिंदार आणि अलकनंदा यांच्या संगमावर आहे. हिमालयाचे वाटेंत हें एक तीर्थ आहे. येथील उमेचें जें मुख्य देऊळ आहे तें आद्य शंकराचार्यांनीं पुनः बांधलें आहे असें म्हणतात. पिंदार नदीवर लोखंडी लोंबता पूल आहे. कर्णप्रयागास हरिद्वाराहून जाणें चांगलें, कारण तट्टें वगैरे मिळतात. येथें धर्मशाळा आहे.

कर्नूलः—भौतिक स्वरूपः—मद्रास इलाख्यांत हें एक जिल्ह्याचें ठिकाण आहे. नलमलाय व यल्लमलाय या दोन पर्वतांच्या रांगा या जिल्ह्यांत एका समांतर रेषेंतून जातात. या रांगांतील खिंडींत धरण घालून पाणी अडवून शेतीस उपयोग करून घेतला आहे. यापैकीं सकुंबमूचा सुंदर तलाव असून त्याचा घेर १५ चौरस मैल आहे. मुख्य नद्या तुंगभद्रा व कृष्णा खेरीज भवनाशी ही नदी संगमेश्वरम् येथें कृष्णेस मिळते. संगमेश्वरम् येथें चक्रतीर्थम् म्हणून तीर्थ असून तेथें नदीस भोंवरा आहे. कर्नूलकडे जो पांढरा दगड मिळतो, त्याचा शिलाछापाकडे चांगला उपयोग होतो. इतिहासः—पूर्वी वरंगळच्या (तेलंगणच्या) राज्यांत कर्नूलचा समावेश होत होता. कर्नूलचा राजा नरसिंहराव हा विजयनगरास दत्तक गेल्यामुळें तें विजयनगराखालीं आलें. मोंगलानंतर इंग्रजी होण्याच्या अगोदर हा भाग हैदराकडेहि थोडे दिवस होता. शहरः—कर्नूल, तुंगभद्रा व हिंद्री यांच्या संगमावर आहे. किल्ल्यांतील नबाबाचा राजवाडा, अब्दुलवहाबेची मशीद, विजयनगरचे राजाचा कारंजा हीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. कर्नूलचा मुख्य धंदा हातमागावर कापड विणणें. येथील बाजारास सूत विकावयाला आलें म्हणजे त्याविषयीं असा एक सक्त नियम आहे कीं, असावें तितके धागे बरोबर नसल्यास लोक तें सूत विसकटून टाकतात. यामुळें लबाडी करण्यास सहसा कोणी धजत नाहीं. हा प्रामाणिकपणा अगर सचोटी इतर ठिकाणचे व्यापाऱ्यांस अनुकरणीय आहे.

कलकत्ताः—हें बंगाल इलाख्याचें मुख्य शहर हुगळी नदीचे कांठीं आहे. या शहरची भरभराट सर्व इंग्रजी अमलांतली असून वस्ती एकंदर १०८००००

आहे. कलकत्ता हें नांव मूळच्या कालीकाटा या नांवाचें जें खेडें या ठिकाणीं होतें त्यावरून पडलें आहे. शहरची वस्ती नदीच्या दोन्ही तरिला कित्येक मैल पसरली असून शहरचे दोन्ही भाग म्हणजे कलकत्ता व हवरा हे तरत्या (नौका) पुलानें जोडले आहेत. येथें कालीचें देवालय आहे. तें मात्र फार जुनें आहे. देवी चतुर्भुज असून ध्यान उग्र आहे. मूर्ती उभी असून एक पाय मांडीवर व दुसरा आपल्या पतीच्या म्हणजे महादेवाच्या छातीवर आहे. याजबद्दलची अशी कथा आहे कीं, शत्रूचा संहार केल्यावर विजयाच्या आनंदातिशयानें देवीनें नर्तन सुरू केलें, तें इतकें कीं, सर्व पृथ्वी डळमळूं लागली, तेव्हां सर्व देवांची प्रार्थना ऐकून महादेवानें तिला स्तब्ध होण्यास सांगितलें. परंतु देवीला पतीचें देखील भान राहिलें नाहीं. पण जेव्हां पतीच्या वक्षस्थलावरच आपला चरणप्रहार होत आहे असें देवीला दिसलें, तेव्हां भयचकित होऊन देवीनें आपली जिव्हा बाहेर काढली तें ध्यान अद्यापि तसेंच आहे. खेरीज बद्रीदासाचें जैनांचें देवालय देखील उत्कृष्ट व बघण्यासारखें आहे. फोर्ट वुइल्यम नांवाचा येथें एक किल्ला आहे. कलकत्ता हें एक रमणीय शहर आहे. शहरांतल्या अनेक भव्य व सुंदर इमारती प्रेक्षकांचें मन रिझवून सोडतात. सरकारी टांकसाळ, पदार्थ-संग्रहालय, वनस्पतीसंग्रहाच्या बागा हीं दुसरीं पाहण्यासारखीं ठिकाणें आहेत. या बागेंत एक प्रचंड वटवृक्ष आहे. तो सुमारें १४२ वर्षांचा जुना असून एकदां या एका झाडाखालींच सगळया सैन्याचा तळ पडला होता असें म्हणतात ! कलकत्त्याहून ३ मैलांवर " भुईकैलास " म्हणून महादेवाचें एक लिंग आहे. कलकत्ता हें व्यापाराचेहि चांगलें भरभराटीचें ठिकाण असून चीन, जपान वगैरे पूर्वेकडील देशांच्या व्यापाऱ्यांची एक मुख्य पेठ आहे म्हटलें तरी चालेल. गार्डन रीच म्हणून एक कलकत्त्याचा जो भाग आहे त्यांत पेनिनशुलर आणि ओरियेंटल नॅव्हिगेशन वगैरे जहाजवाल्या कंपन्यांचीं व दर्यावर्दी व्यापाऱ्यांचीं मोठमोठीं हपीसें आहेत. डाक गलबतांनीं युरोपास जाणारे प्रवासी येथून जहाजांत बसतात. नदी किनाऱ्यावरील अयोध्येच्या माजी नबाबांचे भव्य व प्रचंड वाडे व इतर युरोपियनांचे बंगले मुख्यतः या भागांत आहेत. इंग्रजांची सत्ता स्थापित होण्याचे वेळीं नबाब सुराज उद्दवला यानें १४६ इंग्रजांस कोंडलेल्या कोठडी—जीस ब्लॉकहोल म्हणतात—चे जागीं हल्लीं जनरल पोष्ट ऑफिस असून

इतिहासजिज्ञासूस तें ऐतिहासिक ठिकाण पाहण्यासारखें आहे. बंगाली, हिंदी, उदिदा इंग्रजी व उर्दू वगैरे एकंदर ५७ भाषा आहेत त्या चालतात.

कलिंजर:—हें ठिकाण व येथील प्रसिद्ध डोंगरी किल्ला संयुक्त प्रांतांतलि बांदा जिल्ह्यांत बांद्याहून ३३ मैलांवर आहे. कलिंजर हा बुंदेलखंडांतला एक अतिशय जुनाट किल्ला चंदेल रजपुत घराण्याचा मूळ पुरुष चंद्रवर्मा याचे हातचा असून हल्लीं जरी पडीक आहे तथापि तेथें असलेले जुने अवशेष त्याच्या प्राचीन वैभवाची चांगलीच साक्ष देतात. मोंगल इतिहासांत अनेक युद्धचमत्कार या किल्ल्यानें पाहिले आहेत. अकबराच्या कारकीर्दीत त्याचा जिवलग प्रधान बिरबल यांजकडे ही जहागीर होती. कलिंजरचें महात्म्य महाभारतांत निवेदिलेंच आहे. शहरास सात दरवाजे आहेत. कोटतीर्थ, मृगधारा, नलिकंठाचें देऊळ हीं ठिकाणें पाहण्यासारखींच आहेत. मृगधारा हें नांव पडण्याचें कारण, या ठिकाणीं सात हरणांस मारलेलें आहे. हे सात हरींण ऋषिशिष्य असून कांहीं शापामुळें त्यांना हारिणाचा जन्म आला होता. येथें मरण पावल्यावर पुढें ते कुरुक्षेत्रीं पुनरपि ब्राह्मण जन्मास आले असें म्हणतात. कलिंजरास मुसलमानांच्या पुष्कळ मशिदी आहेत. बंडानंतर इंग्रज सरकारनें तटाचा बराच भाग पाडून टाकला आहे. तथापि तटाचे सात दरवाजे व निरनिराळीं देवालयें यावर असलेल्या भिन्नभिन्न काळच्या शिलालेखांमुळें प्राचीन-वस्तु-संशोधकांस हें ठिकाण महत्त्वाचें आहे. कलिंजर हें झांशी माणिकपूर शाखेवरील बादोसा स्टेशनहून १८ मैल आहे.

कानपूर:—**सामान्य वर्णन**:—संयुक्त प्रांतांत हें एक जिल्ह्याचें ठिकाण आहे. शेतकी व लोकवस्ती यांची पूर्ण वाढ जेथें झाली आहे अशा जिल्ह्यांत कानपूरची प्रमुखत्वें गणना होते. कापूस, धान्य, नळि वगैरे कृषिजन्य कच्च्या मालाची पैदास या जिल्ह्यांत पुष्कळ होते. अयोध्या रोहिलखंड भागांतील मालाची ही एक मुख्य उतार पेठ आहे. **इतिहास**:—१८५७ च्या बंडाच्या धामधुमींत या शहरच्या परिस्थितीस स्थानिक इतिहासापेक्षां साम्राज्यविषयक स्वरूपच अधिक आलें होतें. बाजीरावची नेमणूक त्यांचे दत्तक चिरंजीव नाना-साहेब यांस न मिळाल्यामुळें ते बंडांत सामील झाले. या कारणानें ती धामधूम कांहीं काल बरीच जोरावली होती. नानासाहेबांनीं त्वेषाचे आवेशांत कांहीं इंग्रज बायकामुलांची कत्तल केली. वगैरे हकिकतीमुळेंच कानपूरची प्रसिद्धी आहे.

शहरः—हें संयुक्त प्रांतांतलें चौथ्या नंबरचें शहर व लष्करचें एक मोठें ठिकाण व पांच रेल्वेचें जंक्शन स्टेशन आहे. ५७ सालच्या बंडांतील कत्तल झाली तो घाट, प्रेतें ज्या विहिरीत टाकलीं ती विहीर, हीं ऐतिहासिक ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. विहिरीवर स्मारक म्हणून संगमरवरी पुतळा उभारला आहे. व त्या-भोंवतीं सुंदर बगीच्या आहे. कानपूर शहर अलीकडे वाढलें असून जुनें ·ठिकाण येथून तीन मैलांवर गंगेच्या काठीं आहे. हिंदुस्थानांतील इतर ऐतिहासिक ठिकाणांप्रमाणें जुनें शिल्प काम येथें नसलें तरी व्यापारी दृष्ट्या कानपूर हें प्रेक्षणीय शहर आहे. कापसाच्या व लोंकरीच्या गिरण्या, साखर, ब्रश व कातड्याचे जिन्नस तयार करण्याचे अनेक कारखानें यांनीं हें शहर अगदीं गजबजून गेलें आहे. लोकरी वस्त्रें व कातड्याचे जिन्नस हाच कानपूरचा मुख्य व्यापार आहे.कानपुरी बूटांचीं सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्धी आहे. युरोपियनांची वस्ती येथें अधिक असून त्यांच्या पुष्कळ इमारती व मोठीं मोठीं दुकानें ·पाहण्यासारखीं आहेत. शहरांत एकंदर तीन मोठ्या धर्मशाळा आहेत.

कारवारः—(उत्तर कानडा) जिल्ह्याचें सामान्य वर्णनः—मुंबई इलाख्यांतील थेट दक्षिणेकडील उत्तर कानडा जिल्ह्याचें हें मुख्य ठिकाण आहे.समुद्राकिनारा सोडून आंत गेल्यावर प्रवाशास अंब्याचीं व नारळाचीं झाडें गजबजलेलीं व हिरवीगार शेतें दृग्गोचार होतात. काली, शरावती वगैरे मुख्य नद्या आहेत. इरावतींचा सुप्रसिद्ध गिरसाप्पाचा धबधबा होनावरचे उत्तेरस सुमारें ३५ मैल असून त्या ठिकाणीं नदी ८२५ फूट उंचावरून उडी घेतें. कारवारचें विशिष्ट लक्षण म्हणजे साग वगैरे इमारती लाकडाचें जंगलांची विपुलता, गिरसापा व पतकाळ येथलि जैन देवालयें व मिरजान व सदाशिवगड हें प्राचीन किल्ले गोकर्ण व वनवासी हीं पुरातन क्षेत्रें हीं प्रेक्षणयि ठिकाणें या जिल्ह्यांत आहेत. किनाऱ्याला कुमटा, होनावर वगैरे महत्वाचीं बंदरें आहेत. सन १६६५ त ईस्ट इंडिया कंपनीची वखार कारवारला होती. तीवर शिवाजीनें पट्टी बसविलेली होती. मुंबई व कोचीन यांच्या दर्म्यान कारवार हेंच बारा महिनेहि बिनधोक असें बंदर आहे. समुद्रांत " ऑइस्टर रॉक्स " म्हणून जी बेटें आहेत तीवरील दीप गृहांतील दिवा २५ मैलपर्यंत दिसतो. कारवारास आंबराई व आकाशबेल यांची दाट राई लागून गेली असल्यामुळें प्रवाशास सूर्यकिरणांचा प्रखर ताप मुळींच· होत नाहीं. नारळ, वेलदोडा व मसाल्याचे पदार्थ हीं कारवारचीं धनोत्पादक द्रव्यें असून हा

माल पुष्कळ बाहेरदेशीं जातो. कारवारास कोरीव व नकशी काम फार चांगलें होतें. कारवारच्या कारागिरांनीं चंदन व टेंबुर्णीच्या लांकडावरील आपली उत्कृष्ट कारागिरी युरोपच्या निरनिराळ्या प्रदर्शनांत जगाच्या नजरेस आणली आहे. कारवाराला मिठागरेंहि आहेत. कारवार गोंव्याहून ५० मैल आहे.

कार्लीः—हें स्टेशन पुणें सोडल्यानंतर लागतें. समानार्थक नांवाचा घोटाळा होऊं लागल्यामुळें स्टेशनचें नांव बदलून अलिकडे मळवली असें ठेविलें आहे. कार्ल्याचीं सुप्रसिद्ध लेणीं स्टेशनहून तीन मैल आहेत. सडक चांगली आहे. डोंगराच्या पायथ्याशीं स्वतः चढण्याचें श्रम न घेणारास वाहून नेणारे लोक बसलेले असतात. डोलींतून वर जाण्यास माणसीं एक रुपाया लागतो. माथ्यावर गेल्यावर द्वाराशीं श्रीएकवीरा भवानीचें देवालय लागतें. समोरचा लेण्यांचा मुख्य भाग म्हणजे सभामंडप आहे. खांबापासून वरील सर्व काम कोरीव आहे. मध्यभागीं एक उच्चासन असून त्यावर एक लांकडी छत्री आहे. कमानींच्या एका बाजूला व दुसरा सिंहस्तंभ नांवाच्या खांबावर असे दोन शिलालेख असून ते अद्यापि पूर्ण आहेत, त्यांत असा उल्लेख आहे कीं, हीं लेणीं महाराजा भूती अथवा देवभूती याच्या वेळचीं आहेत. पुराण ग्रंथावरून पाहतां हा राजा इ. पूर्वी ७८ या वर्षीं होऊन गेला. मंडपाला दोन्ही बाजूला पंधरा विशाल खांब असून त्याच्या दोन्ही बाजूला दोन दालनें आहेत. या खांबावरील गुडघे टेकलेल्या हत्तींचीं जोडी व त्यावरील बहुधा पुरुष प्रकृतीची जोडी वगैरेचें शिल्पकाम प्रेक्षणीय आहे. सभामंडपाचा वरचा आकार कमानीसारखा दोन्ही बाजूस उतरता असून त्यावर लांकडी काम केलेलें आहे व तें इमारतीच्या समकालीनचेंच असावें. कधीं काळीं त्यांत कांहीं नवें जुनें केलें असल्यास मूळ कारागिरीची अगदीं हुबेहुब व बेमालूम प्रतिकृती एवढेंच फार तर म्हणतां येईल. मंडपाचा वरचा भाग उघडा ठेवून गाभाऱ्यांतील विहीरी अथवा स्थंडिल अगर मुख्य वस्तूवर उजेड पाडण्याची या शिल्पकामांतली पद्धत अगदीं पूर्णतेस गेली आहे. हा उघडा भाग घोड्याच्या टापाच्या आकाराचा असून त्यांतून मध्यभागीं असलेले उच्चासन व वरील लांकडी छत्री वगैरे लेण्यांतील इच्छित भागावर प्रकाश पडतो. हें विशिष्ट लक्षण बहुधा या प्रकारच्या सर्वत्र लेण्यांत आढळतें, लेण्यांच्या कालसंबंधानें हिंदुस्थानच्या शिल्पकलेच्या इतिहासावर परिश्रम केलेले

फर्ग्युसन साहेब आपल्या ग्रंथांत " इमारती बांधण्याकडे दगड उपयोगांत आल्यानंतर थोड्याच काळांत हीं लेणीं कोरलीं असावीं " असें म्हणतात. स्टेशनजवळच सुप्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा याचा चित्रांचा छापखाना जरूर पाहण्याजोगा आहे. येथून एक मैलावर भोज लेणी म्हणून जुनीं लेणी वर असून लोहगड व विसापूर हे मराठ्यांचे सुप्रसिद्ध किल्ले आहेत.

कावेरीः—ही दक्षिण हिंदुस्थानांतील मोठी नदी पुरातन पवित्रपणा, मनोहर सृष्टिसौंदर्य व पाट बंधाऱ्यास लागणारी उपयुक्तता या तिन्ही दृष्टींनीं सारखीच सुप्रसिद्ध आहे. कुर्ग प्रांतांत उगम पावून म्हैसूर संस्थानांत व तंजावर जिल्ह्यांतून वहात जाऊन दोन मुखांनीं बंगालचे उपसागरास मिळते. एकंदर लांबी ४७५ मैल असून हिचे पाण्यावर तीस चाळीस हजार चौरस मैल जमीन भिजते. हिला दक्षिणगंगा असें म्हणतात, व हिचा प्रवाह फार पवित्र गणला जातो. स्कंद व अग्नेय पुराण यांत अशी कथा आहे कीं, ब्रह्मदेवानें आपली कन्या लोपामुद्रा हिचा प्रतिपाळ करण्यास कावेर मुनीपाशीं दिली. तेव्हां पालनकर्त्या पित्यास मोक्षप्राप्ति व्हावी या हेतूनें तिनें नदीस्वरूप धारण केलें व तिला कावेरी अशी संज्ञा प्राप्त झाली. भागीरथी देखील दरवर्षी सहस्रशः मलिन जनांच्या स्नानजन्य घडलेल्या सांसर्गिक दोषपरिहारार्थ तळ कावेरी म्हणजे उगमापाशीं अंतरवाहिनी होऊन गुप्तपणें येतें असें म्हणतात. तळ कावेरी व भागमंडळ म्हणजे जेथें पहिली नदी येऊन मिळते तेथें प्राचीन देवालयें आहेत व तेथें अश्विनांत मोठी यात्रा भरते. हिचे प्रवाहांत खडक बराच आहे. म्हैसूर संस्थानांत शेतकीप्रीत्यर्थ एकंदर बारा पाटबंधारे बांधून हिचा प्रवाह आडविला आहे. त्यांत मडदकट्टी हा ७२ मैल लांबीचा कालवा महत्त्वाचा आहे. याच भागांत श्रीरंगपट्टम व शिवसमुद्रम् हीं दोन बेटें आहेत. शिवसमुद्रम् बेटास वळसा घातल्यानंतरच सुप्रसिद्ध कावेरीचा धबधबा आपल्या अद्भुत सौंदर्यामुळें प्रवाशाचें चित्त तत्काळ हरण करतो. या ठिकाणीं नदीचे दोन प्रवाह होऊन ते निरनिराळ्या मार्गांनीं वाहतात; परंतु त्यांस सुमारें दोनशे मैलपर्यंत सारखी उतरण लागल्यामुळें धबधबे व लहान मोठे धोत उत्पन्न होतात. सर्व रमणीय देखावा म्हैसूरच्या एका नागरिकाच्या औदार्यामुळें प्रेक्षकास सुगम झाला आहे. कारण, या गृहस्थानें हें बेट दोन्ही प्रवाहाचे ऐलतीरास जोडण्याचे हेतूनें दोन दगडी भव्य पूल बांधले आहेत. म्हैसूर

संस्थानांत हेमावती, सुवर्णावती, लक्ष्मणतीर्थ इत्यादि नद्या मिळतात. इरोड येथें मद्रास रेलवेचा १५३६ फूट लांबीचा कावेरीवरील विस्तीर्ण लोखंडी पूल प्रेक्षणीय आहे. श्रीरंगचे आसपास ऐतिहासिक कालापूर्वींच्या हिंदू राजांनीं इ. स. च्या चौथ्या शतकांत बांधलेलें धरण अद्यापि उत्कृष्ट व मजबूत आहे. नवीन धरण बांधतांना इंग्रजी इंजीनियरांस हा जुना नमुना फार उपयोगी पडला असें म्हणतात.

काठेवाड (सौराष्ट्र) हें द्वीपकल्प म्हणजे गुजराथचाच एक भाग असून त्याची लांबी रुंदी अनुक्रमें २२० व १६५ मैल आहे. प्राचीनकाळीं हा भाग सौराष्ट्र या नांवानें संबोधिला जात असे. हल्लीं देखील साधारणपणें ब्राम्हणांत हेंच नांव प्रचलीत आहे. इ० स० च्या तेराव्या शतकांत कच्छमधील काठी नांवाच्या लोकांनीं हा प्रदेश व्यापिला होता.

मराठ्यांचा या भागाशीं प्रथम संबंध आला तेव्हां हेच लोक सत्ताधारी होते. यामुळें मराठा सरदारांनीं या सर्वच प्रांताला काठेवाड हें व्यापक नांव दिलें. यांत लहान मोठीं मिळून एकंदर १८८ संस्थानें असून त्यांतलीं तेरा खंडणी न देणारीं, ९६ इंग्रज सरकारास व ७० मराठ्यांचे प्रतिनिधी म्हणून बडोद्याचे गायकवाड सरकारास खंडणी देतात. काठेवाडाचे झालवाड, हाला, सोरठ व गोहिलवाड असे चार प्रांत अगर जिल्हे आहेत.

काठेवाडांतल्या सर्व संस्थानांत भावनगर अग्रेसर आहे. अशोकानंतर कनोजच्या मौर्य वंशांतील गुप्तराजे सेनापती नेमून आपला राज्यशकट चालवीत. हे सेनापती पुढें स्वतंत्र होऊन त्यांनीं वल्लभीनगर ही आपली राजधानी केली ही भावनगरापासून अठरा मैल होती.

प्रख्यात चिनी प्रवासी हुएनसंग हा दुसरा ध्रुवसेण याच्या दरबारीं वल्लभी नगरास आला होता. तें नगर कसें लयाला गेलें याबद्दल पुरावा नाहीं. परंतु मुसलमानांच्या स्वाऱ्यानंतर अन्हिलवाडा हें राजधानीचें ठिकाण झालें. मोगल, मराठे व इंग्रज यांची सार्वभौम सत्ता स्थापित झाली तरी आजमितीला काठेवाडांत जीं सर्व संस्थानें आहेत त्यांवरून या राजघराण्यांनीं केव्हांच स्वत्व जाऊं दिलें नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे. हा प्रांत चांगला संपन्न आहे. मुंबई बंदरांतून परदेशाला जो कापूस जातो त्याचा सहावा हिस्सा तर फक्त काठेवाड

पुरवितो, असा एकाचा अदमास आहे.अर्थशास्त्रदृष्ट्या भौतिक सुधारणा करण्याचे कामीं भावनगरनें पुढारीपण घेतलें असून स्वतःच्या खर्चानें जबाबदारीवर रेलवे बांधली असें हिंदुस्थानांत भावनगर हेंच पाहिलें संस्थान होय. अशोकाचा शिलालेख, बुद्धाचे विहार व लेणीं, जैनांचीं देवालयें वगैरे प्राचीन अवशेष काठेवाडांत पुष्कळ असून त्याची सविस्तर हकीकत सरकारी आर्किऑलॉजिकल खात्याचे अधिकारी मि. जेम्स बर्गेस यांनीं आपल्या अहवालांत सादर केली आहे. काठेवाडांत घोड्याची पैदास व निगा चांगली असल्यामुळें " काठेवाडी घोडा " म्हणजे उंच धिप्पाड आणि देखणा व उमदा घोडा ही गोष्ट सर्व विश्रुत आहे.

काटमांडुः—हिंदुस्थानांत स्वतंत्र संस्थान असलेल्या नेपाळची ही राजधानी विष्णूमती व वादमती या दोन नद्यांचे संगमावर असून वस्ती विष्णूमतीच्या पूर्व तीराला आहे. शहरांत दोन ते चार मजली कौलारु हवेल्या असून निरनिराळ्या भागांत फरसबंदी अगर वटिबंदी केलेल्या प्रशस्त व उघड्या जागा आहेत. तेथें सकाळचे प्रहरीं निरनिराळीं फुलेंफळें व भाजीपाला यांचा मोठा बाजार भरतो. त्या वेळीं खरेदी विक्रीस जमणारा लोकसमुदाय प्रातःकाळच्या रमणीय देखाव्यांत अधिकच भर घालतो. शहरची रचना फारशी व्यवस्थित नसली तथापि ती देवीचे तलवारी सारखी आहे, असा तिकडे समज आहे. डॉ०राईट हे इंग्रज गृहस्थ नेपाळचा इतिहास, या आपल्या ग्रंथांत खाटमांडूचे वर्णन पुढील आशयाचे करितात. " शहराच्या मध्यभागीं महाराजांचा प्रचंड राजप्रासाद असून त्या समोरच्या चौकांत पुष्कळ सुंदर देवालयें आहेत. ह्या इमारती कित्येक मजली असून त्यावरील खोदकाम व मुलामा शोभिवंत आहे. आंतील मंडपाच्या छतास तांबें अगर पितळ या धातूचा मुलामा दिला असून प्रत्येक मजल्याच्या वळचणींतून अगणित घंटा लटकावल्या आहेत. त्या सर्वांचा एक समयावच्छेदेकरून निघणारीं कर्णमधुर ध्वनि भाविकांस तल्लीन करून सोडतो. देवालयाच्या महाद्वाराशीं बहुधा सिंहाचें दोन प्रचंड पुतळे असून त्यांचे आयाळ एकाद्या प्रत्यक्ष सिंव्हाप्रमाणें दिसतें.

राजवाड्याच्या उत्तर भागाजवळ तेलजु हें देवस्थान आहे तें इ. स. १५४९ त राजा महेन्द्रमल यानें बांधलें असें म्हणतात. त्या नजिक दोनशे यार्डांवर कोट म्हणून अर्धवट यूरोपियन धर्तीवर असलेली इमारत आहे. हें ठिकाण १८४६ त

जी प्रमुख पुढाऱ्यांची कत्तल झाली व जीमुळें माजी दिवाण सर जंगबहादुर यांची सत्ता दृढ झाली तीमुळें प्रसिद्ध आहे. शहरचे रस्ते अरुंद आहेत. देवालयांची मात्र जिकडे तिकडे गर्दी आहे. शहराबाहेर राणी पुखरी म्हणून तळें असून मध्यावर एक देऊळ आहे. तळ्यावर तें बांधणारा राजा प्रतापमल्ल याचा सपत्नीक पुतळा असलेला प्रचंड दगडी हत्ती आहे. तुडीखेल हें प्रशस्त कवायतीचें मैदान असून सैन्याची रोज तेथें कवाईत होत असते. या मैदानाच्या पश्चिमेस दरेरा म्हणून दिवाण भीमसेन थापा यानें उभारलेला स्तंभ अडीचशें फुट उंच आहे जवळच तोफखाना, युद्धसाहित्य सांठविलेल्या वखारी व तोफा ओतविण्याचा कारखाना व बादमतीचे कांठीं सर जंगबहादुर यांच्या वाड्याची इमारत हीं ठिकाणें प्रेक्षणीय आहेत. नेपाळ दरबारचा इंग्रज सरकारचा वकील (रेसिडेंट) खाटमांडूस राहतो.

काशीः—हे अति पवित्र क्षेत्र व भरतखंडांतील अति प्राचीन शहरापैकीं एक शहर संयुक्त प्रांतांत भागीरथीचे कांठीं आहे. आर्यांच्या संस्कृतीचे विद्यांचे व तत्वज्ञानाचे माहेरघर म्हणून काशीची प्रसिद्धी प्राचीन काळापासून आहे. वैदिक व बौद्ध हे दोन्ही धर्म येथूनच प्रसार पावले. राजा देवोदासानें हें काशी शहर वसविलें अशी दंतकथा प्रचलित आहे. वारणा व काशी या दोन नद्यांचे दरम्यान शहर वसल्यामुळें वाराणशी असे दुसरेहि नांव आहे. काशीविश्वेश्वराचें देवालय जमिनीवर नसून महादेवाच्या त्रिशूळावर बांधलें आहे असें सांगतात. गंगा नदी सर्वत्र पवित्र असली तरी काशीस तिचे महत्व अधिक आहे. पंचक्रोशींत मृत्यू आला असतां स्वर्गप्राप्ती होते अशी समजुत आहे. काशीचे अखिल माहात्म्य काशीखंड पुराणांत वर्णिलेंच आहे. येथें जीं अनेक देवालयें आहेत त्यांत विश्वेश्वर, भैरवनाथ आणि दुर्गा हीं प्रमुख आहेत. श्रीविश्वेश्वर हें येथील मुख्य दैवत होय. मानमंदिर म्हणून जी वेधशाळा आहे तेथून विश्वेश्वराचे देवालय जवळ आहे. विश्वेश्वराचे समोर अन्नपूर्णेचें देवालय आहे. आजमितीस काशींत सुमारें १५०० देवालयें आहेत. व ४० हून अधिक घाट आहेत, त्यांत काशीसंगम, दशाश्वमेध, मणिकर्णिका घाट, पंचगंगा घाट आणि वारणा संगम हे मुख्य आहेत. तीर्थांत मणिकर्णिका, पिशाच्चमोचन, अग्निकुंड हीं प्रसिद्ध आहेत. ज्ञानवापी, अमृतकुंड, नागकुंड, हीं दुसरीं तीर्थें आहेत. या तीर्थांत स्नान केल्यापासून मनुष्य

अनेक आध्यात्मिक व आधिभौतिक व्याधिपासून मुक्त होतो. नवीन इमारतीपैकीं विजयागरम्रावानें बांधलेला टाऊनहाल, दवाखाना, आंधळ्याकरितां राजा काळीशंकर यांनीं बांधलेला अनाथाश्रम, सेंट्रल हिंदू कॉलेज व सरकारी कचेऱ्या या पाहण्यासारख्या आहेत. काशी स्टेशनावर धर्मशाळा आहे. मनुष्य जन्मास आल्यावर एकदां तरी काशी यात्रा करावी एवढें काशीचें माहात्म्य आहे. कौदेवी म्हणून प्रख्यात देऊळ आहे. हिला गंगेतून होडीनें जावें लागते. यामुळें गंगेतून काशीची अपूर्व शोभा दिसते. काशीस गंगा धनुराकार आहे यामुळें सर्व शहराची शोभा कौदेवीला जातांना दिसते म्हणून तिचें माहात्म्य मोठें असावें, बाकी देऊळ लहान आहे. देवीला कवडचि वहावयाची असा संप्रदाय आहे. हिचें दर्शन घेतल्याशिवाय यात्रा सफल होत नाहीं म्हणतात. रेशमी कापड, स्फाटिक, रुद्राक्ष हीं चांगली मिळतात.

कुडलगांः—म्हैसूर संस्थानांत सिमोगापासून चार कोशावर तुंगभद्रेच्या संगमावर आहे. यासच शृंगेरी असें म्हणतात. आद्य शंकराचार्य यांचा प्रसिद्ध शृंगेरी मठ येथेंच आहे, खेरीज माधव, व अद्वैत इत्यादि पंथाचे येथें मठ असल्यामुळें या स्थानास क्षेत्रत्व प्राप्त झालें आहे,

कोल्हापूरः—दक्षिण महाराष्ट्र संस्थानापैकीं एक मराठी संस्थान. क्षेत्रफळ सुमारें तीन हजार चौरस मैल आहे. हें राजधानीचे शहर असून पुरातन पवित्र क्षेत्र आहे. कोल्हापुरास श्री क्षेत्र करवीर असें म्हणतात. तेथें एक लक्ष्मीचे देवालय आहे. कोल्हापुरास देवीचे दर्शनाकरितां लोक फार लांबून येतात. कोल्हापूरापासून ५ मैलावर जोतीबाचा डोंगर आहे. येथें जोतीबा अथवा केदारलिंग हे महादेवाचे स्थान आहे, जोतीबा हे शिंदे सरकारचे कुल दैवत आहे. या डोंगरावर चैत्र महिन्यांत यात्रा भरते. शहरांत टाऊन हॉल, महाराजांचा नवीन बांधलेला वाडा, दवाखाना ह्या इमारती पहाण्यासारख्या आहेत. सुती, लोंकरी कापड, मातीचीं भांडी सुगंधी सामान व खोटे दागिने वगैरे जिनसा तयार होतात. कोल्हापूरास देवीचे स्थान असल्यामुळें त्यास क्षेत्र असें म्हणतात.

या संस्थानाखालीं विशाळगड, बावडा वगैरे किल्ले व सात जहागिरी आहेत. येथील महाराजांस २१ तोफांच्या सलामीचा मान आहे.

खडक वासलें:—पुण्याहून ११ मैलावर एक खेडें आहे. येथें मुठा नदीस बांधलेला एक तलाव आहे. पुणें शहरास पाण्याचा पुरवठा याच तलावापासून होतो, तलावाची लांबी ११ मैल व रुंदी सुमारें पाऊण मैल आहे. कांठाचा प्रदेश अगदीं निर्जन असून तेथें पक्षीहि आढळत नाहींत. या तलावापासून दोन कालवे काढले आहेत.

खडकी:—पुण्याहून ४ मैलावर मुंबई इलाख्यांतील प्रमुख लष्करी ठिकाण. येथें तोफखाना व पलटणी इत्यादि व दारूगोळा तयार करण्याचे कारखाने आहेत.

खांडवा:—मध्यप्रांतांतील निमाड जिल्ह्यांतील मुख्य ठिकाण व पुराणप्रसिद्ध शहर आहे. येथें उत्तर हिंदुस्थानांतून व प्राचीन हिंदुस्थानांतून दक्षिणेकडे जाण्याचे रस्ते मिळाले असल्याकारणानें या ठिकाणाला पूर्वी पासूनच महत्व आहे. शहरांत चार मोठे तलाव असून त्यांना घाट बांधले आहेत. खांडवा ही बाजाराची मोठी पेठ आहे. शिवाय येथें गोण्याची मोठी वखार आहे. शहरास पाण्याचा पुरवठा चार मैलावर मोह घाटाचा तलाव आहे, तेथून होतो.

खुलदाबाद:—हैदराबाद संस्थानांतील औरंगाबाद जिल्ह्यापैकीं एक तालुक्याचे ठिकाण. येथें औरंगजेब, हैदराबाद संस्थानचा मुळ संस्थापक अलकजाहा दातानशाहा इत्यादि अनेक ऐतिहासिक पुरुषांची थडगीं आहेत. नजीकच्या पठारावर भद्रवंती या जुन्या शहराचे कांहीं अवशेष अद्यापि पाहावयास मिळतात.

गया:—बहार प्रांतातलि एक जिल्ह्याचे शहर तसेंच एक पवित्र क्षेत्र. कलकत्याहून ३९४ मैलांवर फलगू नदीचे कांठीं आहे. फलगूनदी शापामुळें येथें पालथी वहाते. म्हणजे वर प्रवाहांत पाणी नसले तरी जरा वाळू बाजूला केली कीं, पाणी झिरपूं लागते. गया जिल्ह्यांत अनेक पवित्र ठिकाणें भरलेलीं आहेत, शहराचे गया व साहेब गंज असे दोन भाग आहेत. गंजांत व्यापारी वगैरे व गयेंत जुनी वस्ती आहे. काशी यात्रा करावयाची म्हणजे प्रयाग काशी व गया हीं तीन तीर्थें करावयाचीं. त्यासच त्रिस्थळी याला म्हणतात. त्यापैकीं गयेस विष्णुपदाचे देवालय आहे त्यावर पिंडदान हा गयेस मुख्य विधि झाला म्हणजे पितरांना स्वर्ग प्राप्ती झाली असें मानतात. विष्णुपदाचे विस्तीर्ण देवालय अहल्याबाई होळकर यांनीं बांधिलें आहे. गयेहून सहा मैलांवर बुद्धगया हें बौद्धांचे पवित्र स्थान आहे, कारण शक्य मुनि अथवा गौतमबुद्धाचे कांहीं काल निवास स्थान

होते. बुद्ध ध्यानस्थ बसे तो वृक्ष व अशोकच्या राज प्रासादाचे अवशेष वगैरे प्रेक्षणीय स्थानें आहेत. गयेस पितळेचीं भांडीं व काळ्या पाषाणाचे कांहीं अलंकार चांगले तयार होतात.

गंगोत्रीः—गंगोत्री हे गंगेचे उगमस्थान हरिद्वारहून १५५ मैल आहे. तेथें जाण्यास सुमारें १५ दिवस लागतात. हरिद्वारहून चार मैल गेले म्हणजे एक गंगोत्रीस व दुसरा ऋषिकेषास असे दोन रस्ते फुटतात. ऋषिकेष हरिद्वारहून वीस मैलावर असून तेथें कुब्जाम्रक हें तीर्थ व चार उन्हाळीं आहेत. येथें सदावर्तें धर्मशाळा आहेत. थोड्या अंतरावर गंगेवर झुलता पूल आहे, त्यास लक्ष्मण झोला म्हणतात. त्याची लांबी ७००० हात व रुंदी एक हातभर आहे. गंगेचा खरा उगम गंगोत्रीच्यावर १२ मैलावर एका दुर्गम व बर्फाच्छादित गुहेपासून होतो. यात्रेकरू लोक गंगोत्रीसच उगम मानतात. पहाडावर श्रीशंकराचार्यांनीं शिवलिंग व गंगा यांच्या मूर्ती एक देवालयांत स्थापिल्या आहेत. गंगा मंदिरांत गंगा यमुना सरस्वती यांच्या मूर्ती डावे बाजूस भगीरथ व उजवीकडे शंकराचार्य यांच्या मूर्ती आहेत. वैशाखांत अक्षय तृतीयेस गंगाद्वार उघडतात, व कार्तिकी पौर्णिमा झाल्यावर बंद करतात. नंतर तेथें कोणी रहात नाहीं. खालीं १४ मैलावर मार्कंडयाचें स्थान आहे, तेथें पंडे लोक मूर्ती घेऊन येऊन राहतात.

गंगाः—भव्य व विस्तीर्ण प्रवाह, प्रेक्षणीय सृष्टिसौंदर्य, हिमवत् शुभ्र व प्रचंड जलौघ, लांबीरुंदी, आकार व खोली आणि गंभीर पात्र, प्राचीनत्व, धर्मग्रंथांतून वर्णिलेलें महात्म्य, पाण्याचे ठिकाणीं असलेला पवित्रपणा व गुण इत्यादि कोणत्याहि दृष्टीनें जगांतील सर्व नद्यांत अधिक श्रेष्ठ गंगा नदी असल्यामुळें आर्यांनीं तिला अत्यंत वंद्य मानिली आहे. पाण्याची विपुलता कालव्याच्या योगानें होणारा कृषिस उपयोग व मोठमोठ्या जहाजांमहि सुकर असा जलमार्ग या दृष्टीनें पाहतां धार्मिक तर काय पण शेतकी, व्यापार व राजकीय दृष्ट्याहि हिची उपयुक्तता अधिकच आहे अर्थात आर्यांनी दिलेला मान व मानिलेलें पावित्र्य यथार्थ आहे व या बाबतींत पृथ्वीच्या पृष्ठभागावरील कोणतीहि मोठी नदी गंगा नदीची बरोबरी करूं शकत नाहीं.

ही भरतखंडातील सर्वांत मोठी नदी हिमालयांत गढवाल संस्थानांत गंगोत्रीपासून १२ मैलावर गोमुख नांवाचे धनुष्याकार तीर्थ आहे तेथें उगम पाऊन बंगाल-

चे उपसागरास मिळते. हिची एकंदर लांबी १५५७ मैल आहे. प्रवाहास प्रथम भागीरथी हें नांव असून तो गंगोत्रीच्या वरच्या बाजूस हिमालयाच्या पायथ्याशीं एका हिमविवरांतून निघतो. लवकरच देवप्रयागास जान्हवी व अलकनंदा मिळाल्यावर गंगा हें नांव प्राप्त होतें. प्रयागास यमुना नंतर गोग्रा, गोमती इत्यादि नद्या मिळतात. ही सर्व संगमस्थानें सारखींच पवित्र आहेत. तथापि प्रयागाचें महात्म्य अधिक आहे. उगमापासून मुखापर्यंतचा प्रत्येक चरण म्हणजे एक पवित्र ठिकाण आहे, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतल्या दुसऱ्या मोठ्या व पवित्र नद्याहि हिच्या गुतसान्निध्यामुळेंच पवित्र झाल्या आहेत असें मानलेलें आहे. कपिल मुनींच्या शापानें दग्ध झालेल्या सगरपुत्रांचा व एकंदर पूर्वजांचा आणि तेणेंकरून सर्व जगाचा उद्धार करण्याकरितां राजा भगीरथानें हिला आपल्या घोर तपोबलानें स्वर्गातून भूलोकावर आणिली वगैरे वर्णन रामायणांत आहे. भूगोलवेत्यांनीं निर्णीत केल्याप्रमाणें सिंधू व ब्रम्हपुत्रा यांची लांबी अधिक असली तरी कृषी व नौकानयनदृष्ट्या हिची उपयुक्तता अधिक आहे. बहार प्रांतांत शोण व गंडकी मिळाल्यानंतर प्रवाहास अनेक शाखा फुटतात. मुख्य प्रवाहास पद्मा अशी संज्ञा मिळते. नंतर गोलंडा गांवापाशीं ब्रम्हपुत्रा नदीचा मुख्य प्रवाह जामुना हा येऊन मिळतो. हा प्रचंड संगम झाल्यावर या जलौघास खाडीचें स्वरूप येतें व त्या खाडीस मेघना हें नांव आहे. गंगा ज्या हुगळी वगैरे अनेक मुखांनीं समुद्रास मिळते त्यांत मेघना ही फार मोठी खाडी आहे. मेघना व हुगळी या दोन मुखांमधील प्रदेश म्हणजे हिंदुस्थानांतील अत्यंत सुपीक असा भाग आहे.

समुद्राच्या जवळचा जो पडित भाग आहे त्यास सुंदरवन असें म्हणतात. हें नांव तेथें उगवणाऱ्या सुंदरी नांवाच्या झाडांवरून पडलें आहे. कानपूर, अलाहाबाद, बनारस व पाटणा या सारखीं महत्वाची उतारपेठ असलेलीं मोठीं शहरें हिचे कांठीं असून मालाची ने आण गंगेप्रमाणें नदी मार्गें जगांत इतरत्र क्वचितच होत असेल. गंगोत्रीच्या वर दहा मैलावर अगदीं उगमापाशीं पात्र सारें २७ फूट रुंद व १५ इंच खोल असून मुखाशीं पात्राची रुंदी २० मैल आहे. उन्हाळ्यांत देखील प्रवाहाची रुंदी दोन सव्वादोन मैल असते. एकदां पूर आला म्हणजे तो सुमारें ४० दिवस पर्यंत टिकतो. हिचे पात्रांत हा एक विशिष्ट धर्म आहे कीं, त्यांत नेहमीं स्थलांतर होत असते. अठराव्या शतकाच्या आरंभीं प्रवाह

राजमहाल शहरालगत होता तो हल्लीं शहर सोडून ७ मैलांवर आहे. यामुळें प्रदेशाच्या एकंदर देखाव्यांत विलक्षण बदल होतो. समुद्रास भरती आल्यावेळीं हिचे मुखांतून घोड्याप्रमाणें पाण्याचा लोंढा वर २०० मैल पर्यंत जातो त्याची उंची १२ फूट पर्यंत असते. त्या लोंढ्यास 'घोडा' असें म्हणतात.

गंगेचा कालवा:—गंगेचा कालवा म्हणजे कृषिसृष्टींत एक अद्भूत चमत्कार आहे, यमुनेचा कालवा यशस्वी झाल्यामुळें हें प्रचंड काम हातीं घेण्याकडे सरकारचें लक्ष वेधलें. सन १८३७--३८ चे दुष्काळामुळें या प्रश्नास लवकरच मूर्त स्वरूप आलें. १८३९ त मेजर कॉटले या गृहस्थास हारिद्वार जवळच्या सखल प्रदेशाची पहाणी करण्यास नेमण्यांत आलें, त्यानें आपल्या कामाचा अहवाल सादर केल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरवात १८४२ त होऊन बरोबर १२ वर्षांनीं म्हणजे १८५२ मध्यें कालवा चालू झाला. हा कालवा हरिद्वार आणि कनखल याजमधील खडी फोडून काढला आहे. उपयुक्ततेच्या मानानें याच कालव्याच्या अनेक शाखा कालानुक्रमानें आजवर काढल्या आहेत. मुख्य कालव्याचा प्रवाह बोटी जाण्याजोगा प्रशस्त आहे. हा कालवा सहारणपूर, मिरत, मथुरा व कानपूर वगैरे जिल्ह्यांतून जातो. ह्याची एकंदर लांबी ५१९ मैल असून या सर्व जिल्ह्यांतील कृषीस याचा अत्यंत उपयोग होतो.

गंडकी:—उत्तर हिंदुस्थानांतील एक मोठी नदी नेपाळांत उगम पावून पाटणा शहराजवळ गंगेस मिळते. लांबी १९२ मैल मोठ्या प्रवाहास त्रिशूल गंगा हे नांव आहे.

कुंभकोणम्:—मद्रासकडे तंजावर जिल्ह्यांतील एक तालुक्याचे व दक्षिण हिंदुस्थानांतील अगदीं जुन्या शहरापैकीं एक आहे. शहराला कावेरी नदी आहे. हे पुर्वी ब्राम्हणी धर्माचे व संस्कृतीचे माहेरघर होतें, म्हणुन त्या प्रांतीं या ठिकाणास दक्षिण काशी म्हणतात. शंकराचार्य यांचा येथें एक मठ असून येथें शिवाचीं १२ व विष्णुचीं ४ मिळून एकंदर १६ मोठीं देवालयें आहेत. त्यांत नागेश्वर व सारंगपाणी फार प्राचीन व प्रेक्षणीय आहेत. कुंभकोणम् तालुक्यांत केळीं सुपारी हीं फार पिकतात.

कैलास:—तिबेटांत मानस सरोवराच्या उत्तरेस एक पर्वत हिंदु लोक शिव पार्वतीचे निवासस्थान ह्मणून कैलास पर्वताला पवित्र मानतात. प्रवासाच्या

दगदगीमुळें पुर्वीं फारसे कोणी जात नसत, पण अलिकडे जात आहेत. कैलास पर्वताचे हिमालयांतील प्रदेशाचे,सविस्तर वर्णन कैलास मानस सरोवर पुस्तकांत दिलें आहे ते जिज्ञासूनीं पहावें.

कृष्णानदीः--दक्षिण हिंदुस्थानांतील ही एक मोठी नदी असून लांबी एकंदर ८०० मैल आहे. गोदावरीची लांबी अधिक असली तरी विस्ताराच्या मानानें कृष्णा ही गोदावरीपेक्षां मोठी आहे. ही पश्चिम घाटांत महाबळेश्वराजवळ उगम पावते.हिला माहुलीस एडना, कऱ्हाड येथें कोयना,पुढें वारणा, पंचगंगा, घटप्रभा, मलप्रभा, भीमा तुंगभद्रा वगैरे नद्या मिळतात. गंगा, यमुना, प्रमाणें कृष्णा नदीहि हिंदुस्थानांत पवित्र मानली जातें.

कृष्णा माहात्म्य पुराणांत वर्णिलें आहेच, कन्याराशीला गुरु आला असतां हिला भागीरथी भेटावयास येते अशी समजूत आहे. गुदर व कृष्णा जिल्ह्यांत हिचे अनेक कालवे काढण्यांत आले आहेत.

कोलारः—हे जिल्ह्याचे ठिकाण म्हैसूर संस्थानांत आहे. येथें कोलार नांवाचे प्रसिद्ध देवालय आहे तें राजेंद्र कोलारच्या राजानें अकराव्या शतकांत बांधिलें म्हणतात. या शहरांत विंचू फार आहेत असें म्हणतात. कोलारच्या सोन्याच्या खाणी प्रसिद्ध असून या खाणी करितां बोरिंग पेठ स्टेशन ते कोलार पर्यंत स्वतंत्र रेलवेचा फाटा बांधला आहे.

गाणगापुरः—हें पवित्र क्षेत्र गाणगापूर स्टेशनापासून १४ मैल आहे. रस्ता चांगला नाहीं. गाणगापूर हें दत्ताचे जागृत स्थान भीमा आणि आमरजा या दोन नद्यांच्या संगमावर आहे. श्रींच्या मूळ पादुका चांदीच्या डब्यांत ठेविल्या असून त्यांवर केशर व अत्तरें यांचें लेपन करीत असतात. उत्सव वर्षांतून तीन वेळां होतो. शिवाय दर गुरुवारीं पालखी निघते. येथें पिशाच्च बाधा असलेले शेकडों लोक येतात. व दत्तसेवेमुळें त्यापासून मुक्त होऊन जातात. आरतीच्या वेळीं बाधा असलेले पुष्कळ लोक ओरडून एकच गर्दी करून सोडतात. ही गंमत येथें पहाण्यासारखी असते. गांवापासून संगम दोन मैल आहे. या संगमावरच गुरुचरित्रांत वर्णिलेला मूळ औदुंबर वृक्ष होता. तो भीमेच्या महापुरामुळें सुमारें १५ वर्षांपूर्वी वाहून गेला असें समजते. नदीवर संगमेश्वराचे देवालय आहे. जवळच भस्माचा भला एक डोंगर आहे. येथें पूर्वी मोठा यज्ञ

झाला होता. त्याचें हें भस्म आहे असें म्हणतात. शेकडों वर्षांपासून हजारों लोक भस्म नेतात व त्याचे खळगे पडले आहेत पण अद्यापि तो जशाचा तसा कायम आहे. ज्या महात्म्यांनीं या ठिकाणीं यज्ञ केला ते खरोखरच पुण्यश्लोक होत. गाणगापूर गांव लहान असून तो मोंगलाई हद्दींत आहे.

गिरनार:—हा पर्वत काठेवाडांत जुनागड शहरापासून पूर्वेस १० मैलांवर आहे. पर्वताची उंची समुद्रसपाटीपासून ३५०० फूट आहे. पालिठाण्याच्या खालोखाल हें एक जैन लोकांचे अतिपवित्र स्थान आहे. पर्वताच्या पायथ्याशीं खडकांवर इ. स. पूर्वी ३५० वर्षांचे अशोकाचे शिलालेख आहेत. नेमिनाथाचे देवालयाची जी चढण आहे तिच्या वाटेवर सहा विश्रांतीच्या जागा आहेत. आंबामाता म्हणून देवीचे दर्शनास आलेल्या विवाहित वधुवरांची अतिशय गर्दी असते. लग्नानंतर वधुवराचे पदरास गांठ घालून देवीचे दर्शनास म्हणून नेहमीं पुष्कळ लोक येतात. या पर्वतावर एकंदर सुमारें सोळा देवालयें असून त्या सर्वांत अतिशय जुनें व मोठें म्हणजे नेमिनाथाचे होय. देवालयाच्या अंगणाभोंवतीं सत्तर समाधि असून त्यांत जैन तीर्थकरांच्या आसनस्थ मूर्ती आहेत.

गिरसप्पा:—म्हैसूर प्रांतांत गिरसप्पा जवळ शरावती नदीचा धबधबा. गिरसप्पाचा धबधबा सर्व जगांत नामांकित आहे. गिरसप्पा गांवाजवळ शरावती नदी ८३० फूट उंची वरून उडी घेते त्याठिकाणीं पात्राची रुंदी २५० यार्ड आहे. शरावती चार प्रवाहांनी उडी घेते, त्यांत सर्वांत मोठा जो प्रवाह आहे त्याला राजा अशी संज्ञा आहे. धबधबा शिमोग्याहून ६४ मैल आहे. शिमोग्याहून सागरला (४५ मैल) रोजीं टपालतांगा जातो. माणशीं ३ रुपये पडतात. तेथून पुढें तेथिल अम्मलदाराला कळविल्यास सोय होते. सागरला व गिरसप्पाला उतारूकरितां म्हैसूर सरकारचे बंगले आहेत.

गुलबर्गा:—हें निजामच्या राज्यांतील दक्षिण भागाचे एक मुख्य शहर असून सुभा आहे. स्टेशनपासून शहर २ मैल आहे. शहरांत मुसलमानांच्या अनेक मशिदी आहेत. बहामनी राज्याचे कारकीर्दीत दक्षिणेतल्या मुसलमानी सत्तेचे व तदंगभूत राजकारणाचे गुलबर्गा हें केंद्र होतें. येथें बंदेन बाजचा उरूस जानेवारीचे आरंभीं फारच मोठा होतो. ४०।५० हजार लोक असतात. बंदे नबाजहा मुसलमान अवलिया फिरोजशहा या बादशहाचे कारकीर्दीत इ.स.१४१३

मध्यें गुलबुर्ग्यांस प्रगट झाला. या साधूनें आपल्या हयातींत अनेक चमत्कार केले असें सांगतात. मशींदीतील भिंतीवर कुराणातील वचनें रेखली आहेत. खरीज गांवांत लिंगायत समाजाचें शरण बसप्पा हें एक मोठें देवालय आहे. येथील तुरुंगांत निरानिराळ्या प्रकारचे तंबू सतरंज्या तयार होतात.

गोकाक बेळगांव जिल्ह्यांतलि तालुक्याचा गांव स्टेशनहून साडेतीन मैलांवर असून धबधबा नेहमींच पहाण्यासारखा असला तरी पावसाळ्यांत तो विशेष प्रेक्षणीय असतो. धबधब्यानजीकच गोकाकच्या सुताच्या गिरण्या आहेत. गिरणींतील यंत्रें धबधब्यापासून उत्पन्न केलेल्या शक्तीवर चालविण्यांत येतात. त्यामुळें त्याहि पाहण्यासारख्या आहेत. गोकाक शहर लांकडी रंगति खेळ व गोकाकचे आसपास मिळणाऱ्या हरएक प्रकारच्या मातीच्या अनेक रंगीत जिनसा या विषयीं प्रसिद्ध आहे. बहुतेक लांकडी रंगीत सामान सर्व प्रसिद्ध असून रंग पक्का असून जिन्नस अप्रतिम चांगले तयार होतात.

गोकर्ण महाबळेश्वरः—हें पवित्र क्षेत्र उत्तर कानडा जिल्हा कारवार पासून १० कोसांवर. जवळचे स्टेशन मार्म गोवा,तेथून ताड्री पोर्ट बंदारास जावें. ताड्री पोर्टला गोकर्णास जाण्यास बैलगाड्या मिळतात. रावणानें शिवाकडून आणलेले आत्मलिंग तें हेंच होय. गोकर्णास शिवरात्रीची मोठी यात्रा भरते. अहल्याबाई होळकरांनीं ठरवून ठेविल्याप्रमाणें भागीरथीची कावड अभिषेकाला येत असे. गोकर्णास शंकराचार्यांचा एक मठ आहे. नजीक मूकांबा हे देवीस्थान आहे. तेथें आद्यशंकराचार्यांनीं नास्तिकांचा पराजय केला.त्याठिकाणीं एक लांकडी सिंहासन आहे. त्याचे दर्शनास ५ रु. कर आहे.

गोदावरीः—पावित्र्य, उपयुक्तता व सृष्टिसौंदर्यदृष्ट्या गंगा व सिंधूनद यांच्या खालोखाल मध्यहिंदुस्थानांतली मोठी नदी म्हणजे गोदावरी ही होय. नाशिक जिल्ह्यांत सह्याद्रीमध्ये त्रिंबकेश्वराजवळ उगम पावून बंगालचे उपसागरास मिळते. एकंदर लांबी ८९८ मैल आहे. उगमापाशीं जें कुंड आहे तेथें जाण्यास ६९० पायऱ्या लागतात. कुंडाच्या वरच्या भागास जी पाषाणाची मूर्ति आहे तिचे मुखांतून थेंब थेंब पाणी कुंडांत पडतें व तेथून प्रवाह निघतो. नाशिक, निजामचें राज्य यांतून गेल्यावर सिरोंचाजवळ वर्धा, पैनगंगा आणि वैनगंगा या तीन मिळून झालेली प्राणहिता ही मोठी नदी येऊन मिळते. पुढें इंद्रावती व सावेरी या

मिळाल्यावर पात्र सुमारें दोन मैल रुंद होतें. सावेरीचा संगम झाल्यावर नदीकिनाऱ्यालगतचें सृष्टिसौन्दर्य अनुपम आहे. यामुळेंच गोदावरीला युरोपियन प्रवाशांनीं मोठें सन्मानार्ह नांव दिलें आहे. गोदावरी नदी भाग आत्रेय, गोमती, बुद्धगौतम, भारद्वाज, कौशिक आणि वशिष्ठ अशा सात मुखांनीं समुद्रास मिळते. हीं सर्व तीर्थें सप्तगोदा या नांवानें सारखींच प्रसिद्ध आहेत; गौतमीप्रवाह विशेष पवित्र मानिला आहे.

हिंदुस्थानांतल्या इतर अकरा पवित्र नद्यांप्रमाणें दर बारा वर्षांनीं सिंहस्थ पर्वणीस गोदेचे विशेष महात्म्य असतें. गोदावरीची मुख्य तीर्थस्नानें म्हणजे त्रिंबकेश्वर, नाशिक, भद्राचलम् व कोटीपल्ली हीं होत. गोदावरीचें महात्म्य प्रथम प्रत्यक्ष श्रीरामांनीं गौतमऋषीस कथन केलें आहे इतकी ती पवित्र व वंद्य आहे. प्रवाहाच्या दोन शाखांमधील भागांवर दौलीश्वरम् म्हणून जो गांव आहे तेथें गोदावरीस प्रचंड धरण बांधून कृषीस उपयोगी असे तीन कालवे काढले आहेत. त्या कालव्यांचें काम सर आर्थर कॉटन याच्या हातून सन १८५० मध्यें पुरें झालें. आंतली बेटें धरून प्रवाहाची रुंदी या ठिकाणीं ३॥ मैल आहे. हें धरण म्हणजे डकवणींत (सीमेंट) दगड बसवून मजबूत बांधले असून त्याची लांबी अडीच मैल व रुंदी १३० फूट आहे. सन १८६४ त हा कालवा वाढवून कृष्णेस नेऊन भिडविल्यामुळें हा नवीन संयुक्त जलमार्ग शेतीस व व्यापारास अत्यंत उपयुक्त असा झाला आहे. गोदावरीच्या कालव्याची लांबी अदमासें सहाशें मैला-वर असून त्यापैकीं बराच भाग लहान लहान बोटी जाण्याजोग्या प्रशस्त असून त्याच्या पाण्यावर एकंदर ८।१० लक्ष एकर जमीन भिजते. वैदिक कालानंतर आर्यांची दक्षिणेस जसजशी वसाहत होत गेली तसतसें ऐक्याची जाणीव असलेल्या थोर आर्यांनीं वैदिक नदीसूक्तास जास्ती व्यापक असें रूप दिलें याचें प्रत्यंतर म्हणजे पुराणांतला ”

गंगेच यमुनेश्चैव गोदावरि सरस्वती ॥
नर्मदे सिंधू कावेरीजलेस्मिन् संनिधं कुरु ॥

हा श्लोक होय. यावरून गोदावरीस असलेलें महत्व फार प्राचीन कालापासूनचें आहे.

ग्वाल्हेरः—हे शिंद्याचे संस्थान व संस्थानचे राजधानीचें शहर. संस्थानांत २३ मोठीं शहरें धरून एकंदर गांवें ९५३८ आहेत, उत्पन्न दीड कोटीचें आहे.

संस्थानचे ग्वाल्हेर व माळवा असे दोन भाग असून एकंदर ११ जिल्हे आहेत. या संस्थानांत अनेक प्रकारचे औद्योगिक कारखाने २०० वर आहेत. ग्वाल्हेरचा किल्ला हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. किल्ल्याची एकंदर लांबी सुमारें दीड मैल असून तो अत्यंत मजबूत व प्रेक्षणीय आहे. जैनमताचे एक पुरातन ठिकाण, हिंदू कालाच्या राजप्रसादाचा कलाकौशल्याचा एक नमुना व हिंदुस्थानांतील प्रमुख राजघराण्याची राजधानी अशा तीन दृष्टींनीं ग्वाल्हेरचे महत्व आहे. पद्मनाभ हें जैनांचे जुनें देवालय व कांहीं लेणीं प्रेक्षणीय आहे. किल्लयांत "तेलीका मंदिर म्हणून एक देवालय आहे. राजवाडा, पदार्थ संग्रहालय, संस्थानचे वर्कशॉप व राजघराण्यांतील पुरुषांच्या समाधि वगैरे ठिकाणें प्रवाशास पहाण्यासारखीं आहे. संस्थानचे स्वतःचे पोष्ट ऑफीस स्टांप व नाणीं आहेत. शेष व सूर्य हीं येथील राजचिन्हें आहेत. किल्लयांत जैनांच्या ज्या प्रचंड मूर्ती आहेत त्यांत एक तर ५७ फूट उंच आहे, पाण्याची अनेक टांकीं आहेत.

घाटः—या शब्दाचे दोन अर्थ रूढ आहेत. व्युत्पत्तिदृष्ट्या घाट म्हणजे डोंगरांतून असणारी खिंड अथवा नदीचे पात्रास खालपर्यंत ज्या पायऱ्या बांधून काढलेल्या असतात, त्यालाहि घाट अशी संज्ञा आहे. मध्यहिंदुस्थानांतून निघालेल्या दोन डोंगरांच्या रांगा पूर्व व पश्चिम अशा दोन बाजूनें किनाऱ्या किनाऱ्यानें जात दक्षिणेस कन्याकुमारी टोंकास एकमेकांस मिळाल्या आहेत. यांसच पूर्वघाट व पश्चिमघाट असें म्हणतात. अशा रितीनें जो त्रिकोण साधला आहे, त्यायोगानें दक्षिणच्या पठारास (आंतील प्रदेशास) हे घाट म्हणजे सृष्टनिर्मित अशा अजस्त्र भिंतीच होत. पूर्वघाट व समुद्र यांमध्यें बराचसा प्रदेश आहे; पण पश्चिमघाट व समुद्र यांचे दरम्यान काय तो कोंकणपट्टीचा तेवढा अगदीं चिंचोळा प्रदेशच आहे. या घाटमाथ्याचा विशेष हा आहे कीं, पूर्वघाटापासून निघालेली नर्मदा व तीस बहुतेक समांतर अशी तापी या नद्या पश्चिमेस खंबायतचे आखातास येऊन मिळतात व पश्चिमघाटांत उगम पावलेल्या कृष्णा, गोदावरी व कावेरी या नद्यांमधला देशाचा सर्व विस्तीर्ण रुंद प्रदेश ओलांडून पूर्व किनाऱ्यास बंगालचे उपसागरास येऊन मिळतात. नद्यांच्या मुखाजवळचा भाग सोडून बाकी पूर्वघाटाखालचा प्रदेश रुक्ष आहे. पण पश्चिमघाटाचें तसें नाहीं. कोंकणकिनाऱ्यावर बहुधा शंभर व कांहीं विशिष्ट ठिकाणीं जवळ जवळ २०० इंच पाऊस दरवर्षी

पडतो. लागवडीच्या जमीनची कोंकण किनाऱ्याला असलेली उणीव झाडपाल्यांच्या नैसर्गिक संपत्तीनें पश्चिम घांटाला समृद्ध केल्यामुळें भरून निघाली आहे. कानडा मलबार व म्हैसर भागांत असलेल्या डोंगरावर अनेकविध वृक्षसमूह व वनस्पतींनीं भरून गेलेलीं दाट अरण्यें असल्यामुळें त्यांवर अक्षय हिरवा गालीचा सदैव पसरल्याचा भास होतो, जहाजाचे शीड व डोलकाठीस जगांत दुसरें कोणतेहि लांकूड सिंदूरवृक्षाइतकें उपयुक्त नाहीं. फणस, टेंभुर्णी, वेळु, साग व शिसवा यांचीं जंगलें अमूप असून वेलदोडे, मिरें वगैरे मौल्यवान झाडी अर्थात् ही सर्व सृष्टसंपत्ति अपरिमित आहे. पूर्वघाटाचा आरंभ ओरिसांत होतो व त्यातीसंबंध मद्रास इलाखाभर असून पश्चिमघाटाची सुरवात तापीचे उत्तरेस होते व तो खानदेश, नाशिक, ठाणें, रत्नागिरी, मलबार, कोचीन व त्रावणकोर हीं संस्थानें यांतून जातो. कांहीं भाग निलगिरीस मिळतो. पश्चिमघाटांत महाबळेश्वर, पुरंदर, सिंहगड हीं शिखरें प्रत्येकीं साडेचार हजार फुट उंच असून त्यांवरून पुरंदर व सिंहगड हे ऐतिहासिक किल्ले आहेत. पश्चिमघाटांतील बहुतेक डोंगर अगदीं उभे व त्यायोगें ढाळ व वरंगळ असल्यामुळें चढण्यास अत्यंत कठीण आहेत. या त्यांच्या स्वभावसिद्ध मजबुतीस कृत्रिम साधनांनी म्हणजे किल्ले वगैरेनीं अधिकच बळकटी आणली आहे. हे डोंगरी किल्ले म्हणजे हिंदुस्थानच्या ऐतिहासिक काळांतले दक्षिणचे कोट अथवा बुरूज असे मानले गेले आहेत. या पूर्व–पश्चिम घाटाची एकंदरींत पण थोडीबहुत कल्पना येण्यास वाचकांनीं कर्जत, लोणावळ्याजवळचे बोरघाट हे एकवार जाऊन पहावें अशी शिफारस आहे. **सह्याद्रीः**—हें नांव विशेष साधारणपणें तापी नदीपासून कन्याकुमारीपर्यंत लांबच लांब जी पर्वतांची रांग पसरली आहे तिला दिलें गेलें आहे. परंतु मुख्यत्वें करून दक्षिणेंतील समुद्रकांठाच्या जिल्ह्यांतून ज्या रांगा गेल्या आहेत, त्यांत हें नांव आहे. या अर्थानें पाहिले तर सह्यादीची सुरवात खानदेशांत होऊन तो थेट गोव्यापर्यंत जातो. समुद्रकांठच्या जिल्ह्याचे उदाहरण पाहिजे तर रत्नागिरीचें देतां येईल. या भागांत सह्याद्री समुद्र किनाऱ्याशीं अगदीं समांतर जातो, त्याची सर्वसाधारण उंची ३००० फुट आहे, तथापि कित्येक शिखरें ५००० फूट उंच आहेत, कित्येक सखल भागांत भातांचें पीक चांगलें पिकत असले तरी एकंदरीनें जमीन हलकी व नापीक आहे. पश्चिम किनाऱ्यास मिळणाऱ्या मोठमोठ्या नद्यांचीं मुखें व खाड्या यांतून अंतर्गत प्रदेशांत बोटीनें दहा वीस मैलपर्यंत जातां

येतें. बोटी जाऊं शकतील तेथपर्यंत महत्वाचीं पुष्कळ शहरें वसलेलीं आहेत. भूगर्भशास्त्रविषयक संबंधांत सह्याद्रीची व्याप्ती विस्तृत असून तींत तापी नदीपासून कन्याकुमारीपर्यंत सबंध द्वीपकल्पभर पसरलेल्या पश्चिम घाटाचा समावेश होतो.

महेंद्रो मलयः सह्यः शुक्तिमानृक्षपर्वतः
विंध्यश्च पारियात्रश्च सप्तैते कुलपर्वताः ॥ १ ॥

या श्लोकांत वर्णिलेले हिंदुस्थानांतले हे सप्त पर्वत म्हणजे शांतींचीं व एकांतांत ध्यान करण्याचीं रम्य स्थळें म्हणून प्रसिद्ध आहेत.

चाफळः—सातारा जिल्ह्यांतलि एक गांव. समर्थांचे वडील बंधू रामी रामदास यांच्या वंशजाकडे इनाम आहे. मधून मांड नांवाची नदी वाहाते. समर्थांनीं स्थापिलेल्या श्रीरामाचें व मारुतीचें देऊळ त्यांच्या वाड्यांतच असून तें बाळाजी मांडवगणे नांवाच्या श्रीमंत ब्राम्हणानें बांधिलें, त्यास एक लक्ष रुपये खर्च आला म्हणतात. तेथून एक कोसावर 'शिंगणवाडी' येथें शिवाजीस समर्थांचा अनुग्रह झाला. शिवाय रामघळ, कुबडीतीर्थ वगैरे समर्थांशीं संबंध आलेलीं अनेक स्थळें या चाफळखोऱ्यांत आहेत.

चिंदंबरम्—मद्रास कडील दक्षिण अर्काट जिल्ह्यांत मद्रासहून १५४ मैल आहे. या ठिकाणची प्रसिद्धी येथील महादेवाचें देवालयामुळें आहे. दक्षिणेंत पंचभूतात्मक जीं पांच लिंगें आहेत त्यापैकीं येथलें आकाशलिंग आहे.

कनक सभा म्हणून शिव आणि पार्वतीचें मुख्य देवालय आहे. त्याची आख्यायिका अशी आहे कीं, या सुंदर इमारतीचा मुळचा भाग हिरण्यवर्ण चक्रस्ति या राजानें बांधिला, त्याचा महारोग येथें नाहींसा झाला. ज्या अर्थी काश्मीरच्या बखरींत याचें वर्णन आढळतें त्या अर्थी हें देवालय इ० स० च्या पांचव्या शतकांतील काश्मीरच्या राजानें बांधिले असावें. नंतरच्या काळांत पांड्य व केरळ या घराण्यांनीं त्यांत भर घातली. आज मितीलि देवळानें एकंदर ३९ एकर जमीन व्यापिली आहे. भोंवतीं तीस फूट उंचीच्या दोन भिंती असून त्यांच्या प्रत्येक कोपऱ्यास १२५ फूट उंचीचे गोपूर आहेत. मध्यभागीं एक हजार स्तंभ असलेला भव्य व विस्तीर्ण सभामंडप आहे. त्याच्या समोरच असलेली मिरत सभा विष्णुचें स्थान शिवगंगा अथवा हेम पुष्करिणी हें तीर्थ हीं ठिकाणें प्रेक्षणीय

आहेत. तीर्थास चोहोंबाजूंनीं घाट बांधुन काढले असल्यामुळें त्यास अर्थातच एक प्रकारची शोभा आली आहे. गणेशाची मूर्ती तर हिंदुस्थानांतील कोणत्याहि ठिकाणापेक्षां अतिशय मोठी आहे असें म्हणतात. पतंजली उपमन्यु इत्यादि वैदिककालचे ऋषि सूक्ष्म स्वरूपांत या ठिकाणीं रहातात असें म्हणतात. वेदाध्ययनाच्या पुष्कळ पाठशाळा आहेत. येथें अनेक धर्मशाळा आहेत. दोनदां यात्रा भरते. वृद्धाचलम् मनारगूडी वगैरे दुसरीं ठिकाणें जवळपास आहेत. येथें मुख्यत्वें रेशमी लुगडीं तयार होतात.

चित्रकूट—हें स्टेशन झांशी ते माणिकपूर रस्त्यावर आहे. रामायणांत भरतभेटीमुळें प्रसिद्ध असलेला चित्रकूट पर्वत स्टेशनहून साडेतीन मैलांवर आहे. श्रीरामचंद्रानें या ठिकाणीं कांहीं काल वास केल्यामुळें हें स्थान पवित्र आहे. वाटेनें दाट झाडी आहे. हा वृक्षसमुदाय यात्रेकरूंस मार्ग दाखवतो. चित्रकूटास रामसेवकांच्या—माकडांच्या—झुंडीच्या झुंडी आहेत. गांवाजवळ मंदाकिनी व पैशुनी यांचा संगम आहे. संगमाहून पर्वत मैलभर आहे. पर्वताच्या सभोंवतीं एकंदर तीनशेंवर देवालयें आहेत. हीं बहुतेक मोठीं मोठीं बांधलीं आहेत. अशा जंगलांत या पर्वतावर असलीं भव्य व मोठीं देवालयें कोणीं व कधीं बांधलीं असावी अशी जिज्ञासा उत्पन्न होते. परंतु कसलाहि उल्लेख आढळत नाहीं. टेंकडीचे पिछाडीस बाजार आहे. त्याला रामबाजार म्हणतात. प्रदक्षिणेच्या वाटेला चुना घालून चांगली फरसबंदी केली आहे. ही फरसबंदी पन्ना संस्थानचे महाराज रामचंद्र कुमार यांनीं १५० वर्षांपूर्वी केली असल्याचें समजतें. येथून आसपास १० मैलांचे टापूंत, हनुमान, धाराकोटतीर्थ, भरतकूप व गुप्त गोदावरी अशीं अनेक पवित्र ठिकाणें आहेत. पर्वतावर बैराग्यांची वस्ती बरीच आहे.

चिंचवडः—पुणें जिल्ह्यांत. स्टेशनहून गांव दोन मैल आहे. येथें पवनानदी आहे, नदी कांठीं गणपतीचें देवालय आहे तें प्रेक्षणीय आहे. देवस्थानाकडे उत्पन्न बरेंच आहे. मोरया गोसावी हे महान् सत्पुरुष सोळाव्या शतकांत महाराष्ट्रांत होऊन गेले, त्यांची समाधि (शके १५००) येथें आहे. देवळाजवळ धर्मशाळा आहे,

जबलपूरः—मध्यप्रांतांतलें एक मोठें शहर तसेंच जंक्शनहि आहे. येथून ई. आय. रेलवे अलहाबादकडे जाते. जबलपूर हे एक चालू अमलांतले महत्वाचे

लष्करी ठिकाण आहे. येथील पहाण्यासारखीं ठिकाणें म्हणजे ठगी जेल व उद्योगशाळा होत. तेथें तंबू सतरंज्या वगैरे फार चांगल्या तयार होतात. येथून ११ मैलांवर भेडा घांट हें अत्यंत प्रेक्षणीय ठिकाण आहे. येथें नर्मदेला स्फटिकवत् पांढरा खडक असून एके ठिकाणीं नदीचा प्रवाह एका अरूंद खिंडींतून वहातो. ती खिंड इतकी अरूंद आहे कीं, वानराची उडी सहज पैल तीराला जाते. म्हणून त्यास बन्नरकुदी म्हणतात. नदीवर कित्येक सरकारी नांवा ठेवलेल्या आहेत. त्यांतून थेट धबधब्यापर्यंत सहल करून येतां येते. चंद्रप्रकाशांतली येथील सृष्टी सौन्दर्य शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे.

जयपूरः—हें संस्थान व शहर राजपुतान्यांत आहे, या संस्थानांत एकंदर १० जिल्हे व अडतीस शहरें असून एकंदर उत्पन्न पासष्ठ लक्षांचें आहे. शहराभोंवतीं मोठा तट असून त्याला सात वेशी आहेत. व तोफाकरितां मधून मधून बुरुज बांधलेले आहेत. सर्व हिंदुस्थानांत सुंदर रस्ते व इमारती जणूं काय नकाशा काढून बांधल्याप्रमाणें आहेत. अशी जयपूरची प्रसिद्धी आहे, शहर मध्यावर महाराजांचा राजवाडा असून भोंवतालीं सुंदर बगीचे आहेत, शहरांत शिक्षण संस्था अनेक असून व्यापारी पेढ्याबद्दलहि प्रसिद्धी आहे. खेरीज या शहरचे भूषण म्हणजे राजा सवाई जयसिंगानें बांधिलेली वेधशाळा व तेथील वेधयंत्रें होत. संगमरवरी दगडावरील खोदकाम व सोन्याच्या मुलाम्याचे काम करणें हें येथलि मुख्य धंदे होत.

जिंजीः—हा एक बळकट किल्ला मद्रासहून ४० कोसावर अर्काट प्रांतांत आहे. मराठ्यांचा काळांत याला चंदी चंदावर म्हणत असत. किल्ल्यांत कित्येक सुंदर इमारतींचे अवशेष आहेत. त्यांत कल्याण महाल, कोठारें, स्नानाचे चौरंग व कैद्यांची विहीर वगैरे पाहण्यासारखी आहेत. संभाजीचे वधानंतर राजाराम वगैरे मंडळी जिंजीसच होती म्हणून औरंगजेबाने ७ वर्षे वेढा घातला होता, परंतु किल्ला पडला नाहीं. रियासतकार सरदेसाई जिंजीच्या वेढ्याची जगांतील प्रसिद्ध वेढ्यांत गणना करतात.

जेजुरीः—पुणें जिल्ह्यांतील पुरंदर तालुक्यांत श्री खंडोबाचे मुख्य स्थान आहे. देवस्थान डोंगरावर असून भोंवतीं तट आहे. तटाचे आवारांत आणखी लहान देवळें आहेत. महाद्वारानजिक यशवंत हवालदाराचे स्थान

म्हणून ठिकाण आहे. तेथें एक चौकोनी भोंक आहे त्या संबंधीं अशी कथा आहे कीं, देवालयाचा विध्वंस करण्याकरितां औरंगजेब तटावर चाल करून येत असतां देवानें त्यांतून भुंगे सोडले व त्या भुंग्यांनीं असा त्रास दिला कीं, मोगल सैन्यानें अखेर पाय मागें काढिला. गांवांत होळकरांचा वाडा, होळकरांची छत्री, जानाईचें मंदिर, देवगीर गोसावी यांचा मठ हीं पहाण्यासारखीं स्थळें आहेत. मल्लारी म्हाळसाकांत हा शिवाचा अवतार होय. मणिमल्ल नांवांच्या दैत्याचा वध केला म्हणून मल्लारी हें नांव पडलें. येथें देवाचें नांवें माणसें सोडण्याचा प्रघात आहे.

ठाणेश्वर अथवा कुरुक्षेत्र:—हें दिल्लीच्या उत्तरेस ९६ मैल आहे. पूर्वीं हें एक राजधानीचें शहर असून एकंदर विस्तार ११६७ मैल होता. ह्याचाहि बहुतेक ऱ्हास झाला आहे. आर्यांची पाहिली वसाहत होऊन हिंदुधर्माचा उगम प्रथम याच क्षेत्रांत झाल्यामुळें हें ठिकाण पुरातन कालापासून प्रसिद्ध आहे. सांप्रत ही क्षेत्रमर्यादा ७० मैल आहे. या येवढ्या टांपूत एकंदर ३५२ देवस्थानें असून त्यांत ठाणेश्वर हें अग्रेसर आहे. ठाणेश्वरपासून मैलावर जें तळें आहे, त्याच्या कांठीं व मध्यभागीं अशीं अनेक देवालयें आहेत. कुरुक्षेत्र सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांच्यामध्यें असल्याचें संस्कृत ग्रंथांत वर्णिलें आहे. ठाणेश्वरास रेलवे झाल्यानंतर १८९४ च्या एप्रिलच्या ६ व्या तारखेस जें सूर्यग्रहण होतें त्यावेळीं जी पहिली मोठी यात्रा भरली होती तीं ७५००० वर होतीं असा अंदाज आहे.

तिरुपति:—हें व्यंकटेशाचें स्थान आहे. स्टेशनहून गांव (गोविंदराज परस) जवळ आहे. गांवापासून एक मैलावर तिरुपतीस जाण्यास डोंगर चढावा लागतो. ही चढण एकंदर ७ मैलांची आहे. व्यंकटेश अथवा बालाजीला देशाचे सर्व भागांतून नेहमीं लोक येतात. तथापि दसऱ्याला उत्सव होतो त्यावेळीं गर्दी अधिक होते. तिरुपतीची जी पर्वताची रांग आहे तिच्या शेषाचलम् या पर्वतशिखरावर हें श्रीव्यंकटेशाचें स्थान आहे. हे पर्वत मेरुपर्वताचेच भाग आहेत असें म्हणतात. एकदां शेष व वायु यांच्यामध्यें मोठा कोण म्हणून स्पर्धा लागली, तेव्हां शेषानें मेरुपर्वताचें एक शिखर आपल्या डोक्यावर उचलून घेतलें. पण वायूनें इतकें जगडव्याळ स्वरूप धारण केलें कीं, शेषाचे शिरावरील पर्वत सहज लीलेनें खालीं आले, ते हेच पर्वत होत. येथें एकंदर ३१ तीर्थें आहेत. त्यांत स्वामी

पुष्करणी हें सर्वांत मोठें आहे. श्रीव्यंकटेशाची मूर्ति चतुर्भुज असून फारच विस्तीर्ण म्हणजे सात फूट उंच आहे. शंख, चक्र, गदा, पद्म यांनीं युक्त असें हें ध्यान फारच मनोरम आहे. गांवापासून एक मैलावर "कपिल तीर्थ" नांवाचें तीर्थ आहे त्यांत स्नान करून नंतर डोंगर चढावा लागतो. डोंगराचे वाटेवर रात्रीचे समयीं दिव्यांचा लखलखाट असतो. तिरुपतीस तांब्या पितेळच्या मूर्ती फार कुशलतेनें तयार करतात. दगड्या सहाणा वगैरे येथून मुख्यत्वें बाहेर जातात. डोंगराचे पायथ्याशीं गोंविंदराज पट्ट्यांत श्री व्यंकटेशाचे बंधू श्री गोविंदराज यांची शयन केलेली प्रचंड मूर्ती एका मनुष्याचे आकाराहून मोठी आहे. उशाशीं एक पायलीचें माप आहे. व्यंकटेशास अर्पण केलेल्या द्रव्याचें माप घेतांघेताच गोविंदराजास निद्रा लागली म्हणतात. तिरुपतीस दोन स्टेशनें आहेत. गांवाला तिरुपती ईस्ट स्टेशन अगदीं जवळ आहे. गांवांत रामाचार्यांनीं बांधिलेली धर्मशाळा फारच सोईस्कर आहे. गोविंदराज पट्टणाहून २ मैलांवर पद्म सरोवर हें रम्य ठिकाण आहे. तेथें वैष्णव स्वामीचा मठ आहे.

त्रिचनापल्ली:—हें मद्रास इलाख्यांतील जिल्ह्याचें ठिकाण. मूळ नांव त्रिशिरापल्ली. रावणाचा भाऊ त्रिशिर या राक्षसाचें हें शहर कावेरी नदीच्या दक्षिण तीरावर वसलें आहे. व तें फार प्राचीन आहे. येथील किल्ला मोठा असून तो सोळाव्या शतकांत बांधला म्हणतात. किल्ल्याच्या आं। एका उंच खडकाच्या सुळक्यावर शिवमंदिर आहे. जवळच नबाबाचा राजवाडा आहे. हैदर व टिपू यांचे कारकीर्दींत या शहरास अनेक वेळां वेढे पडल्याचे इतिहासांत प्रसिद्ध आहे. लोकवस्ती एक लाखावर आहे; व हें त्या भागांतील रेल्वेचे एक मोठे जंक्शन ठिकाण असल्यामुळें तें वाढत आहे. त्रिचनापल्ली शहर चिरूटांविषयीं प्रसिद्ध आहे. कावेरी व कोलेरून नद्या वहात असल्यामुळें हा जिल्हा सुपीक आहे.

त्रिवेंद्रम्:—ही त्रावणकोर संस्थानची राजधानी; तसेंच येथील किल्ल्यांत अनंत पद्मनाथ स्वामीचें देवालय असल्यामुळें क्षेत्रहि आहे. या देवस्थानास हिंदुस्थानचे अ॰ क भागांतून लोक येतात. शहरच्या मध्यभागीं महाराजांचा राजवाडा वगैरे प्रेक्ष॰ीय इमारती आहेत. शहर समुद्रकिनारीं, म्हणजे शहरापासून समुद्र केवळ दोन मैलांवर आहे.

त्र्यंबकेश्वर:—श्रीक्षेत्र त्र्यंबक हें पवित्र स्थान नासिकहून २० मैलांवर आहे. त्र्यंबकेश्वर हा सह्याद्रीचाच एक भाग आहे. नासिकहून चांगली सडक

आहे. येथें एकंदर आठ तळीं असून त्यांत गंगा तलाव फार मोठा आहे. त्रिंबक हें बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक महादेवाचें स्थान आहे. तें अत्यंत पवित्र व रमणीय आहे. गांव फारसा मोठा नाहीं. गांवाजवळच्या टेकडीवर प्राचीन काळचा एक मजबूत किल्ला आहे. ५७ सालचें बंडांत भिल्ल लोकांनीं येथें बंडाळी केली होती. त्र्यंबकेश्वराचे लिंग महादेवाचे इतर लिंगाप्रमाणें नसून पाण्याच्या धारेंत निरनिराळ्या तीन मुद्रारूप आकृति मात्र आहेत. त्रिंबकास कुशावर्त कनखल तीर्थ, चक्रतीर्थ अशी तीर्थें आहेत. गंगाद्वारें कुशावर्ते बिल्वके नील पर्वते । स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते ॥ १ ॥ असे याचे महात्म्य विशेष आहे.

तुळजापूरः—हें पुरातन क्षेत्र सोलापुराहून २४ मैलांवर निजामचे हद्दींत आहे. वाटेंत तुळजापूरचे जवळच सिंदफळ हा गांव लागतो. येथें मुद्गलेश्वराचें देवालय आहे. मुद्गलेश्वर या ऋषीस देवीनें आपला पिता मानला होता, त्यामुळें सिंदफळ हें देवीचें माहेर असें समजतात. येथील श्रीजगदंबेचें देवालय फारच विस्तीर्ण व पाहण्यासारखें आहे. गर्भ–देवालयास जाण्यास बऱ्याच पायऱ्या उतरून खालीं जावें लागतें. कांहीं पायऱ्या उतरल्यानंतर कल्लोळ व गायमुख हीं दोन तीर्थे आहेत. कल्लोळांत स्नान करण्यास ब्राम्हणेतरांस४आणे कर आहे. समोर होम-शाळा आहे. अश्विन वद्य९स मोठा होम होत असतो. या ठिकाणीं दरवर्षी नगरच्या तेल्याची पालखी येते. या विषयींची दंतकथा अशी आहे कीं, या घराण्याच्या मूळ पुरुषाला देवाचा वर होता तो असा कीं, त्यानें पालखी घेऊन निघतांच त्याचें घर जळून जावयाचें व तो परत जाईपर्यंत तें पुन्हां नवें कोरें होत असे. ही चाल अद्यापि चालू आहे. सांप्रत तो एक पर्णकुटिका तयार करून त्याला अग्नि लावून देऊन येत असतो. पालखीचा खालचा सांटा नवमीच्या दिवशीं रात्रीं होमांत टाकतात व दांडी मात्र परत न्यावी लागते. सभामंडपाच्या दारावर एक संस्कृत स्तोत्र लिहिलेलें आहे. शेवटीं हस्ताक्षर 'अनंत पाठक वारकरी शके१७७५ श्रावण कृष्ण९शुक्रवार प्रमादीनाम संवत्सरे'असा उल्लेख आहे. तेथून देवीचें दर्शन होतें. भवानीचे मस्तकावर मुकुटांत मध्यभागीं शिवलिंग आहे. ध्यान फारच मनोहर आहे. गर्दी होऊं नये म्हणून दर्शन घेतलेल्या लोकांस दक्षिण दरवाजानें बाहेर सोडतात. या दरवाजावर देवासच्या महाराजांच्या बंधूंनीं केलेलें स्तोत्र चांदीच्या पत्र्यावर लिहिलेलें आहे. त्यांतील ४।५ श्लोक आमच्या प्रेमळ व

रसिक वाचकांसाठीं खालीं देत आहों. ते असेः—झाला महापुरुष या परमार वंशीं ॥ नामाभिधान बरवें जगदेव त्यासी ॥ कीं तो तुझाच्च जननी निजबाळ होता॥ तुझे कृपे सकळ वैभव येत हातां * * * * माझे पितामह पितादि याच वंशीं ॥ झाले मीहि जन्मलों पदसेवनासी ॥ पुरवून हेतु मनिंचे भवबंध तोडीं ॥ दासाभिमानी सहसा जननी न सोडी ॥ देवास नाम नगरी करि वास देवी ॥ ही राजधानी बहुपुण्य पवित्र ठावी ॥ तेथील भूप दुसरा स्तवितों मी माते ॥ दे सौख्यराशी तव भक्ति सदैव मातें ॥ * * * * शुभं चैत्र शुक्ल १० शुक्रवार तुळजापुर महापूजावत्सर श्रीभगवत्यै समर्पितमिदं स्तोत्रं शकाब्दाः १८०३ संवत् १९३८. देवीचे नवसाचे प्रकार एकंदर ३५ आहेत. त्यांत भोगी हा मुख्य व सर्व साधारण आहे. या क्षेत्रांतली विशेष गोष्ट म्हणजे पलंग अगर बाज याजवर कोणी निजत नाहीं. गांवांत तेल्याचा घाणा अगर कुंभाराचे चाक नाहीं. गांवांत होतर लावीत नाहींत. म्होतर लावणें झाल्यास रानांत जाऊन लावावा लागतो. देवालयांतच देवीचें संस्थान म्हणून कचेरी आहे. या ठिकाणीं देवालयाचा जमा-खर्च राहतो. देवालयाच्या पश्चिमेस अर्ध्या मैलांवर भारतीबुवांचा मठ आहे. येथें यात्रेकरूंवर " खुंटाफळी " म्हणून दर गाडीमागें १। रु. कर आहे. गांवांत कुंकवाचा मोठा कारखाना आहे. सोलापुराहून बैलगाड्या व तांगे मिळतात. बैलगाडीला जातां येतां अजमासें पांच सहा रुपये पडतात.

तंजावरः—मद्रास इलाख्यांत एक जिल्ह्याचें ठिकाण. या जिल्ह्यांतील जमीन फार सुपीक आहे. प्राचीन काळापासून राजकारणांत भाषाविषयक अगर धार्मिक वगैरे कोणत्याहि बाबतींत तंजावर शहर हें दाक्षिण हिंदुस्थानांत एक प्रमुख ठिकाण गणलें गेले आहे. येथील कला कौशल्याची कामें अप्रतिम आहेत. येथील महादेवाचे देवालय भव्य व विस्तीर्ण असून सर्व भरत खंडांत प्रसिद्ध आहे. व तें इ. स. १३३० चे सुमारास कांजीवरमच्या एका राजानें बांधलें आहे. येथलि नंदी अतिशय प्रचंड आहे. त्याची लांबी सोळा फूट असून उंची बारा फूट आहे. रेशमी वस्त्रें, तांबे पितळेची मांडीं वगैरे बद्दल तंजावरची प्रसिद्धी आहे.

दतियाः—ग्वाल्हेरच्या अलीकडे हें एक संस्थान आहे. स्टेशनहून शहर दोन मैल आहे. शहराभोंवतीं तट आहे. शहरांत दोन तीन राजवाडे व मान-कऱ्यांचीं घरें वगैरे अनेक चांगल्या इमारती आहेत. राजवाड्याभोंवतीं रमणीय

उद्यान असून तो विविध फल-फुलझाडांनीं समृद्ध आहे. येथून चार मैलांवर अनेक प्राचीन जैन देवालयें असून तीं पुराणवस्तुसंशोधकांस प्रेक्षणीय आहेत. तेथून सात मैलांवर उनाव येथें सूर्याचें देवालय व तीर्थ आहे. तेथील स्नानापासून महारोगाची बाधा दूर होते म्हणतात. इंग्रज सरकारनेंहि अलीकडे ही आपली राजधानी केली आहे.

दिल्लीः—हें शहर फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. सांप्रतचें शहर जरी शहाजाहान बादशहानें इ. स. १६३१ त वसविलें आहे तरी आसमंताच्या प्रदेशांतच पांडवांची राजधानी हास्तिनापूर हें शहर होतें. भरतखंडांत निरनिराळ्या वेळीं जी निरनिराळी राजसत्ता स्थापित झाली व ती स्थापन होण्यापूर्वी जें घोर रणकंदन व राजकारण झालें तें सर्व दिल्लीस होय. मोगलांच्या वेळच्या अनेक प्रेक्षणीय चिजा या ठिकाणीं आहेत. त्यांत किल्ल्यांतील दिवाण इ आम व दिवाण इ खास हे दोन बादशाही दरबार मुख्य आहेत. दिवाण इ खास ही पांढऱ्या संगमरवरी दगडाची सुंदर इमारत म्हणजे कला कौशल्याचा एक अत्युत्तम नमुना आहे. या इमारतीवर एक लेख आहे तो असा कीं "पृथ्वीवर स्वर्ग कोठें असेल तर तो येथेंच" खेरीज जुम्मामशीद, हमायूनची कबर, खुशरुकवीची कबर, काला मशीद वगैरे शेंकडों इमारती व ठिकाणें पहाण्यासारखीं आहेत. त्या सर्वांचे निराळें वर्णन देणें शक्य नाहीं, नव्या मनूंतील नवी दिल्ली-राजधानी-वसविण्याचें काम जोरांत चालू आहे. जुम्मा मशीदीजवळच बादशाहा सप्तम एडवर्ड यांचा भव्य पुतळा उभारला आहे. चांदणी चौक हा दिल्लीचा मोठा रस्ता आहे. जरीकांठीं कलाबतूविषयीं दिल्ली शहर प्रसिद्ध आहे. शहरांत सर्वत्र विजेनें चालणारी ट्रामवे आहे.

देवनिंबर्गीः—सोलापूराहून १० कोसांवर हें मारुतीचें जागृत स्थान आहे. देवस्थान गांवाबाहेर रानांत आहे. मंदिरांत रामचंद्राची मूर्ती व शिवलिंग असून मारुतीचे नांवें स्थान प्रसिद्ध असण्यास कारण, तसा मारुतीस हरिहराचा वर आहे अशी कथा आहे. थोरले माधवराव पेशव्यांनीं टिपूवरील स्वारीचे वेळीं नवस केला व हेतू प्रमाणें कार्य सिद्धी झाली त्यामुळें मंदिर बांधलें व ७०० ची नेमणूक करून दिली तचि चालत आहे.

देहूः—पुणें जिल्ह्यांत शेलारवाडी स्टेशनहून ३ मैलांवर भगवद्भक्त तुकाराम बुवाची जन्मभूमी. देहू हा गांव इंद्रायणीचे कांठीं आहे. मुख्य पांडुरंगाचें

नर्मदेचें महत्व आहे. आचार्यांचें नर्मदा स्तोत्र तर प्रसिद्धच आहे. वास्तविकपणें कलियुगाची ५००० वर्षें भरलीं तेव्हां (संवत १९६१) गंगेचें महात्म्य कमी झालें,पण नर्मदेचें आहे तसेंच राहाणार. कित्येक भाविक लोक समुद्रापासून अमरकंटकास तिचे उगमापर्यंत जाऊन दुसऱ्या तिरानें मुखापर्यंत पायीं येऊन प्रदक्षणा करतात. त्याला दोन वर्षे लागतात.

नंदिकेश्वरः—विजापूर जिल्ह्याच्या बदामी तालुक्यांत. येथील महाकुपच्या देवळांमुळें व लिंगामांकरितां प्रसिद्ध आहे. येथें पुष्करणी नांवाचें कुंड आहे. कुंडांत ब्रम्हाची मूर्ती आहे. देवालयें द्रविड पद्धतीचीं आहेत. महाकुप देवळाच्या सभोंवार भिंत असून त्या भिंतीच्या अवारांतच लज्जा गौरीचे देवालय आहे. अशी कथा आहे कीं, शिव पार्वती हे जलक्रीडा करित असतां तोहि दर्शनास आला शिव देवळांत गेले व पार्वती पाण्यांत गुप्त झाली. वांझ बायका या गौरीची पूजा करितात. येथील देवळावर सातव्या शतकांतील कित्येक शिलालेख आहेत.

नवसरीः—बडोदे संस्थानांतील एक प्रांत व शहर. मुसलमानांच्या छळामुळें जे पारशी लोक देशत्याग (इराण) करून हिंदुस्थानांत आले,(इ. स. ११४२) ते नवसरीस येऊन राहिले. अर्थात् पारशांची वस्ती येथें पुष्कळ आहे. पारशी लोकांची अग्यारी व टॉवर ऑफ सायलेन्स म्हणजे मृतांना ठेवण्यासाठीं केलेली जागा ही पहाण्याचीं ठिकाणें आहेत. कस्ती नांवाची पारशी लोकांची जानवी येथेंच तयार होतात.

नागपूरः—मध्यप्रांतांत मुख्य शहर व राजधानीचें ठिकाण. सातपुड्याशीं संलग्न अशा अनेक टेकड्या या जिल्ह्यांत आहेत, त्यापैकीं एकींवर सुप्रसिद्ध रामटेकचे देवालय आहे. हिंदुस्थानांत सर्वांत उष्ण ठिकाणांपैकीं नागपूर हें एक आहे. इतकें कीं, वैशाखांत ११६° पर्यंत उष्णता वाढते. शहरः—नागपूर हें नांव येथील नाग नांवाच्या नदीवरून मिळालें, अगर प्राचीनकाळीं नाग नामक लोकांचे राज्य होतें त्यावरून मिळालें असावें असें कित्येक म्हणतात. स्टेशन ते शहर सडक चांगली रुंद असून दोन्ही बाजूस गिरण्या व मध्यभागीं तलाव असल्यामुळें देखावा फार मनोहर दिसतो. एंप्रेस मिल व स्वदेशी मिल या गिरण्या नामांकित आहेत, भोसल्यांचे रुक्मिणी मंदिर अत्यंत प्रेक्षणीय आहे, व तसेच त्यांचे वाडे व टाऊन हॉल शहराच्या मध्यभागीं आहेत. महाराजा व

तुळशीबाग हीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. पंचवटींतील काळ्या रामाचे विस्तीर्ण देवालय हें येथील म्हणतात. साध्वी अहल्याबाईची धर्मशाळा गंगामंदिर कपालेश्वर हीं आणखी देवालय आहे. देवालयावरील प्रचंड घंटा नारो शंकर यांनीं दिल्लीहून आणली यांची समाधि आहे. पलीकडील कांठास सरदार नारो शंकर यांचे महादेवाचे लक्ष्मीनारायण, मुरलीधर वगैरे अप्रतिम देवालयें असून जवळच देव मामलेदार कुंडावर रामानें दशरथाचे उत्तरकार्य केल्याचें सांगतात. अलीकडच्या कांठाला काढिलीं आहेत. त्यास नीलकंठेश्वर, गोऱ्या रामाचे कुंड अशीं नांवें आहेत. याच नाशिक, पलीकडे पंचवटी, येथूनच रावणानें सीतेचे हरण केलें. नदींत कुंडें बांधून नाशिक हें नांव पडलें म्हणतात. गोदावरी नदी क्षेत्राचे मधून वाहते. अलिकडे नाशिक हें पुरातन क्षेत्र आहे. श्रीरामचंद्रानीं शूर्पणखेचे नाक कापलें त्यावरून गेलें आहे. नाशिक शहर स्टेशनहून ५ मैल आहे. स्टेशनहून ट्रामवे नेली आहे. सन्निध व प्रत्यक्ष श्रीरामचंद्राचे वास्तव्य झालें असल्यामुळें पवित्र क्षेत्र मानलें नांव होतें असा रामायणांत उल्लेख आहे. अशा रीतीनें हें पुरातन स्थान गोदेचे देवालयें पेशव्यांचे वेळीं बांधलीं आहेत. रामायण कालीं नाशिकला जनस्थान असें णाप्रमाणें येथल्याहि कित्येक देवालयांचा विध्वंस झाल्यावर हल्लींची बहुतेक मोठीं यामुळेंच नाशिकला पश्चिम काशी म्हणतात. मुसलमानांच्या अमलांत इतर ठिका-

नाशिकः—हें पौराणिक शहर असून येथें एकंदर ६० देवालयें आहेत.

असून तिचे तीरावर अनेक भव्य देवालयें आहेत.

यानें ही मूर्ति मथुरेहून मोठ्या थाटानें मेवाडांत आणिली. नाथद्वाराला बनास नदी तीं येथें आणून स्थापिलेली आहे. सन १६७१चे सुमारास उदेपुरचा राणा राजसिंग वल्लभपंथी वैष्णवांचे एक प्रसिद्ध व पवित्र स्थान. मथुरेस जी कृष्णाची मूळ मूर्ति होती

नाथद्वारः—राजपुतान्यांत उदेपूर संस्थानांत उदेपुराहून २२ मैलांवर

" धोतरजोडा " म्हणजे रेशीम कांठीं कापडाविषयींहि नागपुरची प्रसिद्ध आहे. प्रांतांतून आलेला जंगलचा मालहि नागपूरहून पुष्कळ रवाना होतो. तसेंच नागपुरी हैद्राबाद (दक्षिण) वगैरेकडे जातात. छत्तीसगड व संबळपूर वगैरे आसपासच्या स्थापना झाली आहे. नागपूरची संत्रीं जगजाहीर असून तीं मुंबई, नामांकित आहे. येथें दोन मोठीं कॉलेजें असून नागपूर विश्वविद्यालयाची नुकतीच तुळशीबाग हीं पहाण्यासारखीं आहेत. तसेंच येथील पशुपक्षी संग्रहालयहि अत्यंत

क्षेत्रदैवत् होय. श्रीरामचंद्राचे मनोहर ध्यान शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे. जवळच सीतागुंफा (सुवर्ण मृगाचा पाठलाग करण्यास जातेवेळीं सीतेस ठेवलेलें ठिकाण) तपोवन पंचवटीहून दोन मैल आहे. येथें गौतम ऋषीचा आश्रम होता म्हणतात. तपोवन बैराग्याच्या मालकीचे आहे. अद्यापि येथें अनेक सत्पुरुष ध्यानस्थ बसलेले पाहून पूर्वकालच्या आश्रमस्थानांची कल्पना येते. तपोवनांतहि दोन तीन मोठीं देवालयें आहेत. श्रीराम ध्यानस्थ बसत असत तो एक विस्तीर्ण वटवृक्ष येथें आहे. खालीं गोदेचे पात्रांत शूर्पणखेस मारलेली जागा आहे. नाशिकहून दोन कोसावर गोदावरीचा धबधबा घांट व त्यावरील नऊ देवालयें, तीन कोसांवरील रामशय्या नांवाचे स्थान, दीड कोसांवर टाकळीचा हनुमान हीं आसपासचीं प्रेक्षणीय स्थळें आहेत. खेरीज दोन कोसांवर पांडव लेणीं आहेत. तीहि पहाण्यासारखीं आहेत. नाशकास भाजीपाला व द्राक्षें चांगलीं होतात. तांब्यापितळेच्या भांड्या विषयीं नाशिक तर प्रसिद्धच आहे. नाशिकहून त्र्यंबकेश्वर २० मैल आहे. त्र्यंबकेश्वर हें बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक असून शिवाय उगमस्थान म्हणून पवित्र क्षेत्र आहे. तिथकास एकंदर बारा धर्मशाळा आहेत. नाशिकहून १२ कोसांवर सप्तशृंग गड हें देवीचे स्थान आहे. गडाची चढण एकंदर ५ मैल आहे. देवीची उंची १२ फूट आहे. यात्रा विजयादशमीस असते.

नेपाळः—हिंदुस्थानांतील एकच एक सर्वस्वीं स्वतंत्र असें हिंदु संस्थान. क्षेत्रफळ ५४ हजार मैल. लोकसंख्या ५० लाख, बहुतेक लोक हिंदू आहेत. हिमालयाची बर्फाच्छादित उत्तुंग शिखरें व त्यावर घनदाट झाडी यामुळें येथील वनशोभा कांहीं अपूर्व आहे. जंगलांत सर्व प्रकारचे वनपशू आढळतात. मे ते डिसेंबर या अवधींत अतिशय पावसामुळें इकडील हवा खराब असते. नेपाळ हें पूर्ण स्वतंत्र राष्ट्र आहे अशी अलीकडे (१९२३) इंग्रजांनीं त्यास मान्यता दिली आहे. नेपाळ सरकारचें सालीना उत्पन्न २ कोटीचे आहे. खडे सैन्य ४५०००. गोवध करणारास या राज्यांत शासन दिलें जातें. या राज्यांत गुलामगिरी नुकतीच बंद करण्यांत आली आहे.

नेवासेः— अहमदनगर जिल्ह्यांत तालुक्याचे ठिकाण, प्रवरेच्या कांठीं मोहनीराजाचें स्थान. ज्ञानेश्वरानीं आपली ज्ञानेश्वरी ज्या खांबाजवळ बसून लिहिली तो खांब आहे. हल्लीं भोंवतीं दगडी बांधकाम केलें आहे.

पन्ना:— बुंदेलखंडांतील एक संस्थान बांद्याहून ६२ मैलावर. संस्थानची राजधानी पन्ना हें एक शहर व ८०० खेडीं संस्थानांत आहेत. या संस्थानची प्रसिद्धी तेथील हिऱ्याच्या खाणीमुळें आहे. पन्ना शहर मोठें टुमदार असून इमारती सर्व दगडी असून रस्ते वगैरे प्रशस्त आहेत. महाराजांचा नवीन राजवाडा बलरामाचें व इतरहि अनेक देवालयें वगैरे प्रेक्षणीय आहेत.

परळी वैजनाथ:— हें बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक स्थान व पवित्र-क्षेत्र हैदराबाद संस्थानांत परभणीहून १४ कोसांवर आहे. देवालय प्रचंड असून प्रेक्षणीय आहे.

पालिठाणा:— पालिठाणा संस्थानचें मुख्य शहर काठेवाड द्वीपकल्पाचे पूर्वेस आहे. या पर्वताचें शिखर अनेक सुंदर देवालयांनीं गजबजून गेलें आहे. त्यांत आदिनाथ कुमारपाळ, विमलास, चार्जमुख व संप्रतिराजा हे प्रमुख आहेत. धार्मिक विधी आटोपल्यावर यात्रेकरूंनीं खालीं गेलेंच पाहिजे, पर्वतावर अन्न ग्रहण करतां अगर निजतां कामा नये असा येथें सांप्रदाय आहे.

पुष्कर:— हें पवित्र तीर्थ व यात्रेचें ठिकाण व गांव अजमीरहून ७ मैलांवर आहे. अखिल भरतखंडांत ब्रह्मदेवाची पूजा फक्त याच ठिकाणीं आहे. पुष्करास ब्रह्मदेव वराह, बदरीनारायण व शिव आत्मतत्त्वेवर अशीं पांच मुख्य देवालयें आहे. पुष्करच्या हद्दींत कोणत्याहि प्राणिहत्येस मनाई आहे. दरसाल सरासरी एक लाख यात्रा जमते.

पुरी:— पुरी अथवा जगन्नाथ हे ओरिसा प्रांतांत जिल्ह्याचें शहर व क्षेत्र आहे. जगन्नाथाचें देवालय फारच प्रचंड म्हणजे औरस चौरस लांबी रुंदी प्रत्येकीं २५० फूट आहे. देवालयाच्या प्रचंड आवारांत अनेक लहान देवालयें आहेत. जगन्नाथाचें मंदिरांत जगन्नाथ बलराम व त्याची बहीण सुभद्रा अशा मूर्ती आहेत. देवापुढें भोग अथवा प्रसाद जो ठेवतात त्यांतील कांहीं लोकांस वांटतात. व बाकीचा देवालयांतच आनंद बाजार म्हणून जागा आहे तेथें विकावयास ठेवतात. हा भोग तयार करण्यास २०० स्वयंपाकी ठेवले आहेत. हा प्रसाद फार पवित्र मानला जातो, त्यास स्पर्शास्पर्श दोष नाहीं. ब्राह्मण व शूद्र तो सारख्याच प्रेमानें स्वीकारतात. रथजत्रा व स्नानजत्रा या दोन यात्राप्रसंगीं सुमारें एक लाख यात्रा जमते.

पुणें:—हें महाराष्ट्रांतलें इतिहासप्रसिद्ध शहर आहे. श्री छत्रपती शाहू महाराजांचे वेळीं मराठी साम्राज्यसत्ता पेशव्यांकडे आली, तेव्हां पेशव्यांनीं आपली गादी पुण्यास स्थापिली. मराठी साम्राज्याच्या वाढत्या काळांत पुणें म्हणजे सर्व मराठा सरदारांचें केंद्रस्थान असून राजकारणांतल्या अनेक उलाढाली पुण्यास होत असत. या अवधींत सुखाचा लाभ पुणें शहरास बराच कालपर्यंत मिळाला आहे. पुणें हें सदर्न मराठा व जी. आय. पी. रेल्वेचें जंक्शन असून हुबळी धारवाडकडे जाणारांस या ठिकाणीं गाडी बदलावी लागते. पुण्याची हवा उत्कृष्ठ असून शहरची स्वच्छता व हौदामुळें पाण्याची असलेली सोय या दृष्टीनें पहातां पुणें हें एक चांगलें आरोग्यवर्धक शहर आहे. वर्षास पुण्यास सरासरी २९ इंच पाऊस पडतो. पावसाळ्यांत मुंबई सरकारचें ठाणें पुण्यास असते. पुणें हें मुळा नदीच्या कांठीं असून मुळा व मुठा याचा संगमहि जवळच आहे. पुण्यास पेशव्यांच्या कारकीर्दीत पहाण्यासारखें मुख्य ठिकाण म्हणजे पर्वतीचें देवालय. हें त्याच नांवाच्या एका टेकडीवर आहे. देवालयाचे दिशा साधन असें उत्तम साधलेले आहे कीं, सभामंडप महाद्वार वगैरे दरम्यान आहेत तरी नगारखान्याच्या मधल्या खिडकीमधून वर्षांतून २२ मार्च व २३ संपटेंबर या दिवशीं दिनमान समान असतां सूर्योदयीं सूर्यकिरणें देवाचें अंगावर पडतात. टेंकडीच्या पायथ्याशीं हिराबाग म्हणून सुंदर बाग आहे, या ठिकाणीं पूर्वी पेशव्यांचे विश्रांतिगृह होतें असें म्हणतात. खेरीज शहरांतील प्रेक्षणीय ठिकाणें म्हणजे डेक्कन व फर्ग्युसन कॉलेज, कौन्सिल हॉल, येरवड्याचा तुरुंग, सासून हॉस्पिटल वगैरे आहेत. पुण्याहून दहा मैलांवर खडकवासल्यास पाण्याचा मोठा सांठा आहे. येथूनच शहरास अमूप पाण्याचा पुरवठा होतो. पुण्याहून अनुक्रमें दहा व वीस मैलांवर सिंहगड आणि पुरंदर हे दोन इतिहाप्रसिद्ध किल्ले आहेत. शहरापासून थोड्याच अंतरावर मुळा व मुठा यांचा संगम आहे. मुळेच्या कांठीं "बंड गार्डन" नांवाचा सुंदर बगीचा आहे. या ठिकाणीं नदींत पाणी खोल रहावें म्हणून पात्रांत केलेलें बांधकाम व त्यावरून पाणी खालीं पडतांना दिसणारा सुंदर धबधबा हीं प्रेक्षणीय आहेत. पुणें हें महाराष्ट्रांतील विद्या व विद्वानांचे माहेरघर व नूतन चळवळीचे उगमस्थान म्हणून अलीकडे पुण्याची ख्याति आहे. खेरीज शहरांत अनेकविध सार्वजनिक संस्था पहाण्यासारख्या आहे.

पुणतांबे:— हें एक जुनें ठिकाण आहे. हल्लीं वस्ती पाडिक आहे. स्टेशनहून गांव दीडमैलावर गोदेचे कांठीं आहे. दक्षिणेंतून काशीयात्रेस जाणारे यात्रेकरू प्राय:येथें उतरून गोदास्नान करून पुढें जातात. मुक्कामास उतरण्यास हें सोईचेंहि आहे. श्री ज्ञानेश्वराचे समकालीन योगी चांगदेव येथेंच होऊन गेलें. त्यांचा वंश येथें चालू आहे. चांगदेवाच्या योगसमाधी तापी कांठीं तेरा आहेत व येथली अखेरची १४ वी होय. समाधी नदीतरीं अश्वत्थ वृक्षाखालीं आहे.नदीला घाट अहल्याबाई होळकरांनीं बांधलेला आहे.

पैठण:— हें दक्षिणेतलें प्राचीन शहर निजामचे राज्यांत गोदावरीचे कांठीं आहे. येथील शालिवाहनाची विहीर अतिशय खोल आहे व ती सर्व विटांनीं बांधलेली आहे. शालिवाहनानें जें आपल्या सैनिकांचे मातीचे पुतळे केलें होते, व जे सचेतन होऊन त्यांनीं विक्रमादित्याचा पराभव केला अशी दंतकथा आहे, ते पुतळे याच विहीरींत टाकले होते म्हणतात. पैठणची प्राचीन माहिती प्रतिष्ठान महात्म्यांत दिली आहे. येथें नदीकाठीं श्री एकनाथ महाराजांचे देवालय आहे. भगवद्भक्त व कवि एकनाथाची ही जन्मभूमि होय. गांवांत एकनाथाचे देऊळ आहे: तेथें एक रांजण आहे तो फाल्गुन व॥ ५ ला किंवा षष्ठीला भरतो. एरव्हीं कितीहि पाणी टाकलें तरी भरत नाहीं. नाथ षष्ठीस (फाल्गुन व॥ ६ स) येथें मोठा उत्सव होतो. मानभाव पंथाचा उत्पादक कृष्णभट्ट नांवाचा प्रसिद्ध पुरुष येथेंच होऊन गेला. येथें रेशमी लुगडीं तयार होतात, यावरूनच स्त्रियांच्या रेशमी वस्त्रास पैठणी हें नांव रूढ झालें आहे.

प्रभास पट्टण:—अथवा पट्टणसोमनाथ हें जुनागड संस्थानांतलि एक अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक ठिकाण बेरावळ बंदर व स्टेशन पासून ३ मैलांवर. समुद्रकिनारीं सोमनाथाचे विशाल देवालय आहे. शेजारी भातकुंड नांवाचें तीर्थ आहे. येथेंच श्री कृष्ण निजधामास गेल्याचें सांगतात. श्रीकृष्णाचे वेळचे स्मृतिशेष या ठिकाणच्या आसपास अनेक आढळतात. अलिकडची सोमनाथःची प्रसिद्धी म्हणजे तेथें लांकडी व लोखंडी कुलुपें चांगलीं तयार होतात.

पंढरपूर:—पंढरीला भूवैकुंठ म्हणतात. हें श्रीपांडुरंगाचें स्थान सोलापूर जिल्ह्यांत, सोलापुराहून ३८ मैलावर भीमेच्या कांठीं आहे. येथें आषाढी व कार्तिकी अशा दोन मोठ्या यात्रा भरत असून या प्रसंगीं हजारो भाविकांची

श्रींचे दर्शनास जी दाटी जमते तिचें वर्णन करणें केवळ अशक्य होय. पंढरी क्षेत्रास पूर्वी दिंडीरवन हें नांव होतें. श्रीकृष्णांनीं रुक्मिणीचें शोधार्थ येथें आल्यावर पांडुरंग स्वरूप धारण करून भक्तराज पुंडलीकास दर्शन दिलें तेव्हां-पासून पंढरी क्षेत्र अथवा पंढरपूर म्हणून प्रसिद्धीस आलें. हें भागवत धर्म व वारकरी सांप्रदायाचें आदिपीठ आहे. श्रीज्ञानेश्वर, नामदेव, इत्यादि संतानीं आपल्या भागवत धर्माची पताका येथूनच फडकाविली. भीमा येथें अर्धचंद्रकार वाहते. व त्याप्रमाणें तीस येथें चंद्रभागा असें नांवहि आहे. चंद्रभागेंतच पुंडली-काचे देवालय आहे. पुंडलीकाचे दर्शन आधीं घ्यावयाचें एवढेंच नाहीं पण पाडुरंगाचें आधीं त्याचें नांव घ्यावयाचे असा त्यास वर आहे. म्हणून " पुंडलीक वरदे हरि विठ्ठल " असें म्हणतात. पांडुरंगाचे पायरलीच नामदेवाची समाधि आहे. चंद्रभागेला येथें एकंदर अकरा घांट असून ते अनेक उदारधनिनीं बांधविले आहेत. त्यांत महाद्वार घांट फार रहदारीचा आहे व तो चितो नागेश बडवे यानें सन १७७५ त बांधविला. ते खेरीज प्रदक्षिणेच्या वाटेवर अनेक देवालयें व सत्पुरुषांचे मठ आहेत. पंढरपुरास बुक्का, कुंकू, तपकीर वगैरेंचा मोठा व्यापार आहे. नुसता बुक्काच दरसाल सुमारें ४ लाख रुपयांचा खपतो असा अंदाज आहे.

फलटणः—हें संस्थानचें ठिकाण साताऱ्याच्या ईशान्येस ३७ मैलांवर बाण गंगेच्या कांठीं आहे. निंबाळकर हे येथलि संस्थानिक आहेत. येथील रामपंचा-यतन प्रसिद्ध आहे. मानभाव पंथाचे लोक येथें पुष्कळ आहेत.

बडोदेः—ही गायकवाड सरकारची राजधानी गुजराथेंतील दुसऱ्या नंबरचे शहर विश्वामित्री नामक नदीचे कांठीं आहे. या राज्यांत एकंदर ४ प्रांत व ४२ महाल आहेत. तथापि मुलुख कांहीं गुजराथेंत तर कांहीं काठेवाडांत असा तुटक आहे. इकडील भागांत मुख्य खाद्य धान्य म्हणजे बाजरी होय. सध्यांचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनीं शहरची तसेंच संस्थानच्या एकंदर राज्यकारभारांत अनेक सुधारणा केल्या आहेत. शहरचे मोठे मोठे रस्ते व दोन्हीं बाजूच्या टोलें-जंग इमारती वगैरे बडोद्याची एक अपूर्व शोभाच होत. बडोद्यास प्रेक्षणीय अशी ठिकाणें म्हणजे नजरबाग व मकरपुरा हे राजवाडे, सोन्या चांदीच्या तोफा, वरिष्ट अदालत बडोदे सेंट्रल लायब्ररी वगैरे नवीन इमारती, तसेंच विठ्ठल मंदिर, स्वामी-नारायण व खंडोबाचे देवालय हीं होत.बडोदे शहर एकवार अवश्य पहाण्यासारखें

आहे. बडोदा हा शब्द वटोदर याचा अपभ्रंश आहे. पूर्वी शहराभोंवतीं पुष्कळ वडाचीं झाडें होतीं त्यावरून हें नांव पडलें म्हणतात.

बदरीनारायणः— सयुंक्त प्रांतांतील गरवाल जिल्ह्यांत हिमालय पर्वताचे हें एक शिखर आहे. याची उंची समुद्रसपाटीपासून २३२१० फूट आहे. या ठिकाणास जवळचे रेलवे स्टेशन म्हणजे हरिद्वार. हरीद्वारहून पायीं अगर खेंचरावर जावें लागतें. बद्रीनाथ हें श्री विष्णूचे देवस्थान याच शिखराच्या एका भागावर म्हणजे श्रीनगरच्या ईशान्येस ५६ मैलावर आहे. बाजूच्या बर्फाच्छादित गिरिकंदरातून अलकनंदा व तिला मिळणाऱ्या नद्या यांचे उगम आहेत. हे देवालय सुमारें आठशें वर्षांपूर्वी शंकरस्वामी म्हणून एका स्वामींनें बांधलेले आहे. मूर्ती स्वामींनीं नदीच्या तळाशीं दहा वेळां बुडी मारुन काढून आणलेली आहे असें म्हणतात. साऱ्या भारतवर्षांत हें स्थान अतिपवित्र आहे. कला कौशल्यापेक्षां धार्मिक दृष्ट्या या स्थानास महत्व अधिक आहे. देवालयाची इमारत गोपुच्छाकार असून शिखर तांब्याचें व त्यावरील कळस सोन्याचा आहे. येथली इमारत पूर्वी अनेक वेळां पर्वतावरून घसरत येणाऱ्या धोंडमिळें खराब झाली आहे. व सध्यांच्या बांधणुकीसहि भूकंपाचा धक्का एकदां बसला होता असें सांगतात. देवालयाचे खालचे बाजूस पवित्र तीर्थ आहे. तेथें स्नान करण्यास दरसाल लाखों लोक येतात. मुख्य उपाध्याय किरात मलबाराकडील नंबुरी जातीचा ब्राह्मण असून त्यास राऊळ असें म्हणतात. यात्रेकरुडून आलेल्या उत्पन्ना खेरीज कांहीं जमिनी देवस्थानाकडे आहेत. यात्रेकरूंकरितां पुष्कळ धर्मशाळा येथें आहेत.

बंगलोरः—हें शहर हैसूर संस्थानांत असून अमल इंग्रज सरकारचा आहे. वस्ती लाखावर आहे. शहरचे क्षेत्रफळ वीस चौरस मैल असून त्याचे जुना व नवा असे दोन भाग आहेत. बंगलोरचे हवापाणी फार चांगलें आहे. अनेक सार्वजनिक व खाजगी इमारती प्रेक्षणीय आहेत. कबनपार्क, लालबाग हीं उद्यानें रम्य आहेत. बंगलोरचा किल्ला हें जुनें ऐतिहासिक ठिकाण आहे. मूळचा तो •केंपें गोंडा यानें १५३७ त बांधला, पुढें मुसलमानांनीं पुन्हां चांगला बांधला, त्यास दिल्ली व म्हैसूर दरवाजा असे दोन दरवाजे आहे. किल्ल्यापासून १ मैलावर गवीं गंगाधरेश्वर म्हणून लेणें आहे. त्यांतील मूर्तीची उंची १५ फूट आहे. हैसूरचे

महाराजाचा नवा राजवाडा, पदार्थ संग्रहालय, सरकारी कॉलेज हीं दुसरीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. टाटा रिसर्च इंन्स्टिट्यूट ही संस्था ३ मैलांवर आहे. बंगलोर जंक्शन असून हैसूर रेल्वे येथून हैसूरकडे जाते.

बदामी:— विजापूर जिल्ह्यांतील हा तालुक्याचा गांव स्टेशनहून तीन मैल आहे. बदामीस ब्राह्मणांची तीन व जैनांचें एक अशीं चार लेणीं आहेत. पैकीं पाहिलें अगदीं गांवालगत असून द्वारावर शिवगणांचे पुतळे आहेत. व आंत शिवाचे तांडव नृत्य व अर्धनारीनटेश्वर वगैरे मूर्ती आहेत. नं. २ चे लेण्यांत वराह अवतार व विष्णूची अष्टभुजा मूर्ती असून ती वामन अवताराची द्योतक असावी असें म्हणतात. कारण जवळचे दुसरे पुतळे बळी, त्याची बायको व आचार्य शुक्र यांचे असावेत. बळी शुक्राचार्यांचे इच्छेविरुद्ध उदक सोडीत आहे असा देखावा आहे. नं. ३ चे लेणें तर ब्राह्मणाच्या सर्वोत्कृष्ट कारागिरीपैकीं एक आहे. येथें जो शिलालेख आहे त्यावरून तें सन ५७८ तील असल्याचे दिसतें. नं. ४ चे लेणें जैनांचे असून त्यांत अनेक नग्न पुतळे असून त्यांत गौतम स्वामी, पार्श्वनाथ, हे पहाण्यासारखे आहेत. या लेण्याजवळ जें मोठें तळें आहे त्याच्या पाण्याचा आज शतकानुशतकें बदामीला पुरवठा होत आहे. जवळच्या टेकडीवरच बदामीचे दोन जुने किल्ले आहेत. स्टेशनहून ९ मैलांवर परसगड हें गांव आहे. येथें बनशंकरी देवीचे फार रम्य स्थान आहे. कर्नाटकांत ही देवी पुष्कळांच्या घरीं आहे. जानेवारींत मोठी यात्रा भरते, स्टेशनवर धर्मशाळा आहे.

बऱ्हाणपूर:—बऱ्हाणपुरपासून मध्यप्रांत लागतो. हा निमार जिल्ह्यांपैकीं तालुक्यांचा गांव आहे. स्टेशनहून शहर तीन मैल आहे. खानदेशाच्या फरुकी घराण्यांतील पहिला नासरखान यानें हें शहर इ. स. १४०० त वसविलें. शहरच्या आसपास पूर्वीचे कालवे पहाण्यासारखे केलेले आहेत. येथें दोन उत्कृष्ट मशीदी आहेत. पादशाही किल्याचे अवशेष आहेत. त्यांत स्त्रीवर्गाची (जनाना) स्नान करण्याची जागा म्हणजे तुर्कांच्या स्नान पद्धतीचा एक प्रेक्षणीय नमुना आहे. लालबाग स्टेशन जवळ आहे. दीड कोसावर तापीचे कांठीं राजा जयसिंगची छत्री आहे. येथें किनखापाचे, जरीकांठी, काबुली व रेशमी काम चांगले तयार होते.

बाबांबुदन अथवा चंद्रद्रोण:—म्हैसूर संस्थानांत कडूर जिल्ह्यांत ही पर्वताची रांग आहे. हिचा आकार घोड्याच्या टापेसारखा आहे. हिंदुस्थानांत कॉफीची लागवड याच ठिकाणीं पाहिल्यांदा करण्यांत आली. ही कॉफी मूळ बाबाबुदन नामक एका मुसलमान साधूनें सुमारें दोन शतकापूर्वी मक्केहून या ठिकाणीं आणली; म्हणून या पर्वतास त्याचें नांव पडलें आहे.त्याची समाधी टेंकडीवर एका गुहेंत आहे. ही गुहा सध्यां एका मुसलमान कलंदराचे ताब्यांत आहे,तो येथून एका मैलावर अठिंगुटी या गांवीं राहतो. हा पर्वत दत्ताचें स्थान आहे असेंहि मानतात.

बारामती:—पुणें जिल्ह्यापैकीं तालुक्याचे ठिकाण व टुमदार गांव आहे. सुमारे २५ वर्षापूर्वी निरा नदीचा कालवा निघाल्यापासून बारामतीचे महत्व व व्यापार वाढला. कालव्याचे पाण्यावर बारामतीचे व आसपासचे भागांत ऊंस पुष्कळ पिकतो.मुख्यत्वें येथील गूळ ह्मणजे नामांकित अशी प्रसिद्धी आहे.सुप्रसिद्ध मोरोपंत कवि येथेंच होऊन गेले. गांवाला कऱ्हा नदी आहे. नदी कांठीं सिद्धेश्वरचे मोठें देवालय प्रेक्षणीय आहे. नंदीहि फार मोठा आहे. याच देवळांत एके ठिकाणीं बसून मोरोपंत आर्या लिहित असत म्हणतात. शिखर सिंगणापूर येथून २० मैल आहे.

बार्शी:—सोलापूर जिल्ह्यांतील हा तालुक्याचा गांव व बार्शीलाईट रेल्वेचे स्टेशन आहे. स्टेशनहून गांव मैलभर आहे. बार्शीचे मूळ नांव द्वादशी क्षेत्र असें होते. अंबरीष राजानें द्वादशीस पारणें येथें फेडलें असें म्हणतात. त्याचाच अपभ्रंश बार्शी असा झाला आहे. बार्शीस भगवंताचे देऊळ सुप्रसिद्ध आहे. देवळांतील संगमरवरी फरशीवर नुसते क्षणभर बसल्यास मनुष्यास अगदीं आराम होतो. जवळच्या निजाम हद्दीतील व ह्या तालुक्यांतील कापूस शेंगदाणा वगैरे धान्यांची पैदास यांची बार्शी ही एक उतारपेठ आहे. बार्शी कुर्डुवाडी जंक्शनहून २५ मैल आहे.

भडोच:—गुजराथ प्रांतांतील जिल्ह्याचे तसेंच कपाशीच्या व्यापारामुळें व्यापाराचे एक महत्वाचे शहर नर्मदेच्या उजव्या तीरावर मुखापासून ३० मैलावर आहे. हें मूळ भृगु ऋषीनें वसाविलें म्हणतात. शहरच्या पूर्वेस प्रख्यात राजा बळीनें त्रिपाद भूमी दान दिली तें व भृगु ऋषीचें स्थान ही ठिकाणें भाविकांस

महत्वाचीं आहेत. भडोचहून १० मैलांवर सकल तीर्थ म्हणून पवित्र स्थान नर्मदा कांठीं आहे.

भद्राचलम्:— मद्रास इलाख्यांत गोदावरी जिल्ह्यांतील हा तालुक्याचा गांव राजमहेंद्रीहून १०४ मैल आहे. हें एक रामाचें स्थान आहे. लंकेस जातांना श्री रामचंद्रांनीं गोदावरी येथेंच ओलांडली म्हणतात. रामनवमीस मोठी यात्रा भरते. हें देवालय मूळ सुमारें चार शतकांपूर्वी प्रतिष्ठा नामक ऋषीनें बांधलें आहे. पण वेळोवेळीं त्यांत नवीन भर घातली आहे. ह्या देवालयास निजामसरकाराकडून वर्षासन आहे. येथें फक्त वैष्णवांकरितां एक व इतर सर्वांकरितां एक अशा दोन धर्मशाळा आहेत. भद्राचलम् हें निजाम रेल्वेच्या येलांडू स्टेशनहून ५६ मैल आहे.

भरतपूर:— राजपुतान्यांतील एक संस्थान, प्रदेश बहुतेक सपाट आहे. तथापि कांहीं टेकड्याहि आहेत. दिल्ली आग्रा येथील कित्येक नामांकित इमारती भरतपुरी दगडाच्याच बांधलेल्या आहेत. संस्थानची राजधानी भरतपूर शहर आग्र्याहून ३३ मैलांवर. येथें बिहारीचें (श्रीकृष्णाचें) देवालय आहे. भरतपूरला चवऱ्या चांगल्या तयार होतात व ही कला दरबारच्या आश्रित कुटुंबांमध्येंच काय ती अवगत आहे.

भांडक:—गांव चांदा जिल्ह्यांत. महाभारतांत वर्णिलेलें भद्रावती शहर या ठिकाणीं होतें म्हणतात. भीमानें अश्वमेध यज्ञाचे वेळीं श्यामकर्ण येथील राजाकडून ह्याच ठिकाणाहून हिरावून नेला. अद्यापि येथील "देवल" टेकडीवर भीमाची पावलें असलेली दाखवितात. आसपास डोंगरांत असलेली लेणीं, टेकड्यांवरील किल्ल्याचे अवशेष, भद्रावतीचें देऊळ व शिवाय अनेक जीर्ण देवालयें तळीं वगैरे प्राचीनकाळीं हें ठिकाण पूर्वी मोठें शहर असल्याचें दाखवितात.

भिलसा:—हें ठिकाण ग्वाल्हेर संस्थानांत असून बौद्ध समुदायामुळें प्रसिद्ध आहे. किल्ल्यांत १९ फूट लांबीची एक जुनी पितळेची तोफ आहे. ती जहांगीरचे कारकीर्दीतील आहे म्हणतात. पूर्व पश्चिम १७ मैल व दक्षिण उत्तर ६ मैल एवढ्या टापूंत बौद्धांचे एकंदर ६५ स्तूप आहेत. व ते सर्व अशोकच्या वेळचे असावेत.

भुज:—कच्छ संस्थानचें मुख्य शहर प्राचीन काळच्या अनेक अवशेषां-

विषयीं प्रसिद्ध आहे. एकेकाळीं या भागांत नागपूजा प्रचारांत होती. शहरांत राजवाडा व राजघराण्यांतील पुरुषांच्या समाधि व आसपासचे भागांत अनेक देवस्थानें आहेत. भुजला मोरवीवरून जावें लागते.

भुवनेश्वरः—हें यात्रेचें ठिकाण बेंगाल नागपूर रेल्वेवर आहे. इ. स. ५०० पासून ११३० पर्यंत म्हणजे सुमारें सहा शतकें ओरिसाच्या केसर घराण्यांतलि राजांची ही राजधानी होती. येथें बिंदुसरोवर म्हणून जें पवित्र तीर्थ आहे, त्याभोंवतीं पूर्वी ७००० देवालयें होतीं. हल्लीं सुमारें ५०० शिल्लक आहेत. बाकीचीं कालाच्या तडाख्यांत सांपडून नामशेष झालीं आहेत. या देवालयावरून ओरिसांतील प्राचीन शिल्पकामांची चांगलीच ओळख पटते. मुक्तेश्वराचें देवालय म्हणजे भुवनेश्वरचे एक रत्नच आहे. येथून तीन मैलांवर असलेल्या खोंडगिरी आणि उदयगिरी या टेकड्यांवर तिसऱ्या व चौथ्या शतकांतील बौद्ध लोकांचीं लेणीं व देवळें यांचे अवशेष आहेत. पुरीहून परत जातांना लोक या ठिकाणीं उतरतात. भुवनेश्वर कलकत्त्याहून २७१ मैल आहे.

भेडाघांटः—हा गांव जबलपुराजवळ नर्मदेचे कांठीं आहे. नदीतीरावरील रमणीय देखावा प्रेक्षणीय आहे. या ठिकाणीं नदींत अगदीं शुभ्र खडक आहे. नदीचा प्रवाह दोन उंच खडकांच्या एका सुळक्या मधून जातो. या ठिकाणीं नर्मदेचे पात्र इतकें अरुंद आहे कीं, लोक त्या खिंडीला " वानराची उडी " असें म्हणतात. खडक इतका शुभ्र आहे कीं, त्याला संगमरवरी खडक असें नांव आहे. चंद्रप्रकाशांत तर येथील देखावा अवर्णनीय दिसतो. जवळच एका निमुळत्या टेंकडीवर महादेवाचें देवालय आहे. मिरगंज स्टेशनहून भेडाघांट तीन मैल आहे.

मनारगुडः—हें एक यात्रेचें ठिकाण तंजावर जिल्ह्यांत वेन्नार नदीचे कांठीं असून येथें ब्राम्हण वस्ती बरीच आहे. हिला दक्षिण द्वारका म्हणतात. हरिद्रा नदी नांवाचे तीर्थ व चार विष्णूचीं व पांच महादेवाचीं अशीं नऊ देवालयें असून त्यांत राजागोपाळस्वामीचें सर्वांत मोठें आहे. रेशमी विणकाम येथें चांगले होतें.

मथुराः—आर्यांच्या पुराण ग्रंथातले एक अत्यंत पवित्र असें ठिकाण. मथुरा गोकुळ व वृंदावन येथें भगवान कृष्णाचा जन्म व बालपण गेलें असल्या-

मुळें हीं सर्व ठिकाणें पुण्यप्रद आहे. मथुरेच्या आसपासच्या प्रदेशास व्रज-मंडल अशी संज्ञा आहे. कृष्ण लहानपणीं नंदाच्या घरीं ज्या ठिकाणीं वाढला तें महावन म्हणून जुनें ठिकाण मथुरेहून सहा मैल आहे. त्या ठिकाणीं नंदाचा वाडा आहे. ज्यांत यशोदा ताक करीत होती ती माथण व गोपींनीं एकदां कृष्णाची मुरली ज्या ठिकाणीं लपवून ठेवली होती ती जागा हीं आहेत. महावनापासून कृष्णावतार जेथें झाला तें गोकुळ एक मैलावर यमुनातीरीं आहे. तसेंच वृंदावनास हि श्रीकृष्णवास बराच कालपर्यंत प्रत्यक्ष झाला असल्यामुळें तीं ठिकाणें अत्यंत पवित्र आहेत हें सांगण्याचें कारण नाहीं. वृंदावनास जीं देवस्थानें आहेत त्यांत गोविंददेव गोपीचंद हीं प्रसिद्ध आहेत. मथुरेचें पुराणवस्तुसंग्रहालय हा एक विशेष आहे. जुने ग्रंथ, खोदीव मूर्ती व विटावरील प्राचीन संस्कृत शिलालेख यांचा अमूप संग्रह आहे. तेथें त्यासंबंधीं माहितीपत्रक मिळतें. जवळच गोवर्धन हें जुनें ठिकाण व तेथील मानसगंगा तीर्थ दर्शनीय आहे. मथुरेस ठसे दिलेले कापड पुष्कळ तयार होतें. तसेंच मथुरेचा पेढा नामांकित असतो हें प्रसिद्धच आहे. शहरांत पुष्कळ धर्मशाळा आहेत. मथुरेस जरासंधाच्या बायका सती गेल्या तद्दर्शक एक बुरूज आहे.

तघलखाबाद:—हें शहर दिल्लीजवळ आहे. स्टेशनहून तीन मैलांवर ग्यासुदीन तघलघ यानें वसविलेल्या शहराचे जुने अवशेष कुतुबमिनार व लोहस्तंभ हीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. पश्चिमेस पांच मैलांवर राय पिठोरा अथवा जुनी दिल्ली व शेवटचा हिंदुसम्राट पृथ्वीराज चव्हाणानें उभारलेला स्तंभ प्रेक्षणीय आहे.

मद्रास:— पूर्वेस कलकत्ता, पश्चिमेस जशी मुंबई तसेंच दक्षिणेस मद्रास हें इलाख्याचें मुख्य शहर आहे. शहर व उपनगरें मिळून क्षेत्रफळ सुमारें २७ मैल आहे. शहरची जागा मूळ चंद्रगिरीच्या राजाकडून इंग्रजांस सन १६३९ त बक्षिस मिळाली. तेव्हां ईस्ट इंडिया कंपनीनें आपली वखार बांधिली. इंग्रजांचें वर्चस्व प्रथम मद्रासेस स्थापन झालें. येथील सर्वसाधारण भाषा म्हटल्या म्हणजे तेलगू व तामिळ ह्या होत. पदार्थसंग्रहालय, स्कूल ऑफ आर्ट, व्हिक्टोरिया हॉल, लॉर्ड मनरो व कॉर्नवॉलिस यांचे पुतळे " फोर्ट सेंट जॉर्ज " हा किल्ला हीं ठिकाणें बघण्यासारखीं आहेत. किल्ल्यांत तोफखाना असून त्यांत टिपू सुलतान जवळून कार्बीज केलेल्या तोफा ठेविलेल्या आहेत. कर्नाटकच्या नवाबाचा जुना

राजवाडा, गव्हर्नमेंट हाऊस व वेधशाळा हीं दुसरीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. येथली वेधशाळा फार नामांकित असून तींत ज्योतिषाचीं उपकरणें अमूप आहेत. सर्व हिंदुस्थानांत याम्योत्तर वृत्त येथूनच घेतलें जातें. सरकारी पदार्थसंग्रहालयास जोडूनच सर्वसाधारण व शास्त्रीय ग्रंथांची असलेली लायब्ररी संग्रहालयाचीच एक शाखा आहे. " माउंट रोड " हा शहरांतील सर्वांत मोठा रस्ता आहे. इलाख्याच्या निरनिराळ्या खात्याच्या कचेऱ्या, सुंदर सार्वजनिक इमारती व मोठमोठीं दुकानें व महत्त्वाची देवघेव याच बाजारांत होते. येथील दीपगृह १२५ फूट उंचावर असून त्याचा प्रकाश समुद्रांत पंधरा मैलांवरून दृग्गोचर होतो. उद्योग-धंदे व यांत्रिक कारखाने यांत मुंबई सारखी या शहरची प्रगति नाहीं. मद्रासला गवती चटया फार नामांकित होतात. शहरांत उतरण्याच्या सोई म्हणजे धर्म-शाळा अनेक आहेत, त्यांत नामदार रामस्वामी मुदलियार यांनीं बांधलेली धर्म-शाळा सेंट्रल स्टेशन (मद्रास) च्या जवळ आहे.

महाबळेश्वरः—हें सह्याद्रीच्या पश्चिम घाटावर एक पुरातन क्षेत्र व चालू मनूंतील हवा खाण्याचें ठिकाण वाठार स्टेशनहून ४० मैलांवर आहे. उंची समु-द्रसपाटीहून ४५०० फूट आहे. डोंगरमाथ्यावरील पठाराचें क्षेत्र ३०० एकरच्या-वर आहे. इतका विस्तृत डोंगरमाथा क्वचितच असतो.पाण्याचा पुरवठा विपुल व निसर्गसौन्दर्य साहाजिकच रमणीय आहे. महाबळेश्वरास कृष्णा, वेण्या, कोयना वगैरे नद्यांचे उगमस्थान असल्यामुळें पुण्यप्रद आहे. आसपास प्रतापगड मकरंदगड वगैरे मराठ्यांचे किल्ले ५।७ मैलांचे अंतरावर आहेत. पर्जन्य वृष्टि अतिशय होत अस-ल्यामुळें पावसाळ्यांत रहातां येत नाहीं. वाठाराहून मोटारची सोय आहे.

महोबा—संयुक्त प्रांतांतील हमीरपुर जिल्ह्यांत हें एक प्राचीन शहर आहे, तें मूळ राजा चंद्रवर्मा यानें सुमारें ८०० वर्षांपूर्वी वसविलें असून तें मदन सागर नांवाच्या तलावाचे कांठीं आहे. चंदेलाच्या वेळच्या कारागिरीच्या शिला महोबाच्या आसमंतांत अनेक आहेत. तलावाच्या कांठीं व मधल्या बेटांवर अनेक प्राचीन मूर्ती वगैरे अवशेष आहेत.

माथेरान—हें सह्याद्रीवरील एक गिरिशिखर असून मुंबई इलाख्यांतलें एक शीत हवेचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. येथें ट्रामवेपेक्षां पायीं जाणें बरें कारण अनुपम सृष्टिसौंदर्य व मराठयांच्या पराक्रमाचीं स्मारकें

वगैरे ऐतिहासिक गोष्टीचेहि शांतपणें निरीक्षण करतां येते. माथेरानची उंची समुद्रसपाटीहून २५०० फूट आहे. दरसाल नेरळहून पुष्कळ श्रीमंत माणसें माथेरानास हवा खाण्यास जातात. भीमाशंकर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक भीमेचें उगमस्थान ५ कोसांवर आहे. भीमाशंकरला बेल मिळत नाहीं. बेला-ऐवजीं निर्गुडीचीं त्रिदळें वहातात. उन्हाळ्यांत मुंबईच्या मोठ मोठ्या लक्ष्मी-पुत्रांची येथें पुष्कळ गर्दी होते.

मुंबईः—पश्चिम हिंदुस्थानचें महत्त्वाचें बंदर, बेट व इलाख्याचें मुख्य ठिकाण असून सर्व ब्रिटिश साम्राज्यांतल्या शहरांत मुंबईचा दुसरा नंबर आहे. कोंकण किनाऱ्यास पसरलेला जो बेटांचा पुंजका आहे, त्यांपैकींच मुंबई हें एक बेट आहे. या बेटाची पूर्ण मालकी इंग्रजांकडे आली तेव्हांपासून व्यापारामुळें सारखी भरभराट होत जाऊन मुंबई हें जगांत एक मोठें शहर बनलें. या बेटाची लांबी ११ मैल व रुंदी ३ मैल आहे. मुंबई हें नांव तेथें असलेल्या मुंबादेवी या देवस्थानावरून पडलें आहे. मुंबईच्या व्यापाराच्या व दळणवणाच्या प्रगतीस मुख्य मदत झाली ती रेलवेमुळें. जी. आय. पी. रेलवे रस्ता बांधण्यास १८५० त सुरुवात होऊन तीन वर्षांनीं गाडी ठाण्यापर्यंत चालू झाली. ही हिंदुस्थानांतली पहिली रेलवे होय. पश्चिम व मध्य हिंदुस्थान यांत पैदा होणाऱ्या कापसाची मुख्य उतारपेठ या नात्यानें मुंबईच्या भरभराटीस अनेक पट मदत झाली आहे. अमेरिकन युद्धाच्या वेळीं (१८६१–६५) कापसाच्या व्यापारांत झालेल्या भरभराटीचें मूर्त स्वरूप म्हणजे हल्लींच्या सुंदर इमारती व प्रचंड गोद्या होत. राष्ट्रीय चिन्ह अगर स्वरूप यांत मुंबईपेक्षां अधिक वैचित्र्य जगांतल्या दुसऱ्या कोणत्याहि शहरांत क्वचितच आढळेल. हिंदुस्थानांतल्या अठरा पगड जाती तर आहेतच पण चिनी, यहुदी, अमेरिकन, जर्मन इत्यादि सर्व देशांतील रहिवाशांची मुंबईस वस्ती आहे. या विविध जनांचें रूपसादृश्य, पेहराव, भाषा व रीतिरिवाज यांत असलेलें वैचित्र्य खरोखर हृदयंगम आहे. मुंबईच्या भर बाजारांत टेहळणी करणाऱ्या नूतन प्रवाशास अनेकविध जातींचा व अनेक रंगांचा व अनेक आकारांचा पोशाख असलेला जनसमुदाय अवलोकन केल्या-वर आश्चर्य व कुतूहल वाटल्याखेरीज रहात नाहीं. मुंबई बंदराचा देखावा बहारीचा आहे. मुंबई शहराच्या पांच पांच सात सात मजली इमारती व शह-

रची एकंदर रचना यांचीं वास्तविक प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज खरी कल्पना होणें केवळ दुरापास्त आहे. मुंबई नजीक विहार व तुळसी या नांवाचे दोन तलाव व घारापुरीचीं लेणीं पहाण्यासारखीं आहेत. घारापुरीस जाण्यास अपॉलो बंदराहून बोटीनें एक तासाचा रस्ता आहे. मुंबईसारख्या अफाट वस्तीच्या शहरांतील सर्वच ठिकाणांचे वर्णन देणें अशक्य आहे. म्हणून प्रमुख प्रेक्षणीय ठिकाणांचा नुसता नामनिर्देश केला आहे, तीं येणेंप्रमाणें:—

बोरी बंदर स्टेशन, राजाबाई टॉवर, क्राफर्ड मार्केट, हायकोर्ट, राणीचा बाग (भायखळ्याजवळ) टांकसाळ, म्युनिसिपालिटी, मलबार हिल, विश्वविद्यालय, दीपगृह.

खेरीज समुद्राला बांधलेले मोठे मोठे धक्के, गिरण्या, रेलवे वगैरेंचे शेंकडों कारखाने पहाण्यासारखे आहेत. मुंबईला हवेंत उष्णता बरीच असली तरी समुद्रावरील सायंकाळचा शीतल वायुहि मिळतो. मुंबईस पावसाचें मान वर्षास सरासरी ७० इंच आहे.

मेलार:—बंदरहून ५ मैलांवर हें मल्हारीचें मूळस्थान मल्हारीचे प्राचीन देवालय असून मोठमोठालीं दगडी कुंडें व जुने वाडे आहेत. मल्हारीचा येळकोट प्रसिद्ध आहे. येळ म्हणजे सात अर्थात् मल्हारी सातकोटि सेनेचा स्वामी होता असा अर्थ आहे. शंभर वर्षांमागें गांव फार बिघडला म्हणून मल्हारीनें गांवास शाप देऊन गांव सोडला, यामुळें तो उजाड झाला. वाडे ओसाड असून भांडीं कुंडीं जेथलीं तेथें आहेत. पण कोणी चोरी करीत नाहीं.

मेलुकोट:—म्हैसूर प्रांतीं हसन जिल्ह्यांतील एक पवित्र ठिकाण. येथें श्री वैष्णव ब्राह्मणांची बरीच वस्ती आहे. वैष्णव मतप्रवर्तक श्री रामानुजाचार्यांचे कांहीं काल निवासस्थान होतें. त्यांचा येथें मठ आहे. मठांत अनेक विद्वान् ब्राह्मणांचें अध्ययन, अध्यापन चालू असतें. खसखस नामक गवताचे पंखे इकडे फार चांगले तयार होतात. आसपास गोपीचंदन पुष्कळ मिळतो व तो काशीपर्यंत बाहेर देशीं देखील रवाना होतो.

मंगलोर:— हें दक्षिण–कानडा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. नद्या, नाले वगैरे अगणित जलप्रवाह या भागांत विपुल आहेत, भाजीपाला, विस्तीर्ण अरण्यें, समुद्र किनारीं असलेली नारळीची दाट राई व भाताचीं हिरवीं शेतें पाहून जिकडे तिकडे

एक प्रकारची उत्तम चिकणमाती सांपडते, तिचा नमुनेदार मातीचीं भांडीं सृष्टिसुंदरी हिरवा शालूच नेसली आहे काय असा भास होतो. या जिल्ह्यांत करण्याकडे उपयोग होतो. यंत्राचे साह्यानें कौलें व विटा करण्याचे अनेक कारखाने मंगलोरास असून हीं कौलें मंगलोरी कौलें या नांवानें प्रसिद्ध असून शहरच्या नूतन हवेल्या व सरकारी कचेऱ्या त्यांस आपल्या शिरावर समाधानानें वागवीत असल्याचें सर्व प्रसिद्धच आहे. कौलें तयार करण्याचे अनेक कारखाने आहेत. साग, शिसवा वगैरे इमारती लांकूड व मायफळ, दालचिनी इत्यादि मसाल्याचे जिन्नस येथून बाहेर जातात.

म्हैसूरः—ही म्हैसूर संस्थानची राजधानी आहे. या शहरची अलीकडील थोड्या वर्षांत कल्पनातीत प्रगति झाली आहे. शहरचे रस्ते व सार्वजनिक इमारती पहाण्यासारख्या आहेत. शहरांतील प्रेक्षणीय इमारती म्हणजे व्हिक्टोरिया ज्युबिली इन्स्टिट्यूट, कॉलेजें, मरिमल्लपाची शाळा व कर्झन पार्क हीं होत. महाराजांचा राजवाडा जुन्या किल्ल्यांत असून त्यावरील युरोपियन चिताऱ्यांनीं केलेल्या कांहीं अपवादात्मक रंगकामाखेरीज, तो पराकाष्टेचा हिंदुपद्धतीचा बांधलेला आहे. चार सुंदर नक्षीकाम केलेल्या लांकडी स्तंभावर उभारलेल्या भव्य दिवाणखान्यांत राजसिंहासन आहे. तें फार पुरातन आहे असें म्हणतात. १८९७ च्या आगीनंतर वाड्याचा बराचसा भाग पुन्हां बांधण्यांत आला. वाड्यावर सोनेरी शिखर आहे तें शहराच्या सर्व भागांतून दृग्गोचर होतें. म्हैसूरला प्राणीसंग्रह असलेल्या बागा फार चांगल्या असून तेथील जमिनीवरून जुन्या नागमोडीच्या वाटा असल्यामुळें, नूतन प्रेक्षकांस करमणुकीचें तें एक साधनच होतें. म्हैसूरच्या आग्नेयेस चामुंडी म्हणून एक डोंगर आहे. त्यावर चामुंडी देवीचें स्थान आहे. चढण चढतांना वाटेंत खडक कोरून तयार केलेला एक प्रचंड नंदी आहे. त्याची उंची सुमारें सोळा फूट आहे. व तो दोड्डदेव राजाचे कारकीर्दीतील आहे. म्हैसूरला दसऱ्याचा समारंभ थाटाचा होतो. म्हैसूर उदबत्त्या वगैरे सुगंधी पदार्थांविषयीं प्रसिद्ध आहे.

मरकाराः—(म्हैसूर मार्गे) कुर्ग प्रांताचें मुख्य शहर. म्हैसूरहून तांगे मिळतात. शहरांत पहाण्यासारखीं ठिकाणें म्हणजे कुर्ग स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते दोडदेव, राजेंद्र वगैरे पुरुषांची समाधिमंदिरें होत. कुर्ग प्रांतातलें कॉफीचे लागवडीचें हें एक मुख्य केंद्र आहे.

राजमहेंद्रीः— गोदावरी जिल्ह्यापैकीं तालुक्याचें ठिकाण. इकडील तांदूळ पिकणाऱ्या प्रदेशाच्या गर्भांतलें एक मुख्य ठिकाण असल्यामुळें व गोदावरीचे कालव्यामुळें व्यापारी महत्त्वाचें आहे. येथून जवळच गोदावरी समुद्रास मिळते. शहर नदीचे डावे तीरावर आहे. येथून जवळ असलेल्या नरसापूर गांवाजवळ सप्त गोदा म्हणून जीं सात पवित्र स्थानें आहेत त्यांपैकीं अंतर्वेदी हें एक आहे. गोदावरी सातमुखांनीं समुद्रास मिळते म्हणून सप्तगोदा म्हणतात.

रामटेकः— हें ठिकाण नागपूरहून २४ मैलांवर आहे. स्टेशनहून रामटेक गांव ३ मैल असून रामाच्या पहाडाला लागून आहे. ह्या पहाडाला सुंदरगिरी असें म्हणतात. पहाडाखालीं विस्तीर्ण तलाव आहे. भोंवतालीं नागपूरच्या भोसल्यांनीं घाट बांधून काढले आहेत. कांठाला लहान लहान बरींच देवालयें आहेत. ह्या पहाडावर जाण्यास एकंदर ७५० पायऱ्या चढाव्या लागतात. झुंबरेश्वर, वसिष्ठ व दशरथ, वराहमूर्ति, राम, लक्ष्मण, लवकुश यांचीं देवालयें हीं सर्व ठिकाणें व येथील वनश्री पाहिल्यावर व श्रीरामाचें दर्शन झाल्यावर आराम न वाटणारा मनुष्य दुनियेंत कोण असूं शकेल ? गांवाच्या आसपास १०।१२ तळीं आहेत. पहाडावरून शहराचा देखावा फारच मजेचा दिसतो. रामटेकचीं विड्याचीं पानें अतिशय प्रसिद्ध आहेत. हें विड्याचें पान निबर असतें. यामुळें पक्कीं पानें चांगलीं होतात व तीं पुष्कळ स्वस्त मिळतात. येथें पानांची लागवड अतिशय असून तीं सुमारें तीन शतकापासून आहे. येथील विड्याचीं पानें फार लांबवर जातात.

श्री क्षेत्र **रामेश्वरः**— हें पवित्र क्षेत्र हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकास रामनद जमिनदारींत आहे. रामेश्वर हें बेट आहे. रामेश्वर व मुख्य · भूप्रदेश यांच्या मध्यें पंबन्‌ची खाडी आहे. ह्या बेटाचें एकंदर क्षेत्रफळ सुमारें २५ मैल व रुंदी सहा मैल आहे. येथील लिंगाची स्थापना प्रत्यक्ष ; भगवान् श्री रामचंद्रानें सिताशुद्धीस लंकेस जातेसमयीं केली असल्यामुळें येथील महत्त्व कांहीं अपूर्व आहे. रामेश्वराचें देवालय कॅंडीचा राजा बरराजा सकवार यानें सिंहलद्वीपांतील दगड आणून बांधिलें अशी स्थानिक दंतकथा आहे. बाहेरील भव्य सभामंडप रामनदच्या सेतुपतींनीं बांधिलेला आहे. रामेश्वराचें देवालय फारच विस्तीर्ण म्हणजे लांबी सुमारें १००० फूट व रुंदी ६५७ फूट असून सभामंडपाचें खोदीव काम

अप्रतिम आहे. देवालयाची खरी कल्पना प्रत्यक्ष दर्शनाखेरीज येणें दुरापास्त आहे. या देवालयाविषयीं लिहितांना फर्ग्युसन साहेब आपल्या पौर्वात्य शिल्पकलेचा इतिहास या ग्रंथांत म्हणतातः—द्राविडी पद्धतीची कारागिरी कला व तींतील सौंदर्याच्या पूर्वावस्थेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून एखादें देवालय निवडावयाचें झालें तर तें कोणीहि निःसंशय रामेश्वरचेंच पुढें करील. काशीहून भागीरथी आणून रामेश्वरास घातली व रामेश्वराचा सेतू प्रयागास भागीरथीमध्यें टाकला म्हणजे एक यात्रा पुरी झाली असा सांप्रदाय आहे. देवालय, देवाची पूजा व तेथील सेवाधारी ब्राम्हण या संबंधाच्या खर्चाप्रीत्यर्थ रामनदच्या जमीनदारीकडून बरेंच मोठें उत्पन्न आहे. देवळा जवळच धर्मशाळा आहेत. देवालय दाक्षिणेंतलें असून पुजारी महाराष्ट्र ब्राम्हण (पांच कोंकणस्थ व ४ देशस्थ) आहेत व ही व्यवस्था पेशव्यांचे वेळेपासून झाली असें म्हणतात. स्टेशनहून देवालय व समुद्र जवळ आहे. रामेश्वराची यात्रा बारा महिने चालू असते. बाहेरून आलेले कां होईना पण सर्व सामान वगैरे मिळते. त्रावणकोर, म्हैसूर, इंदूर वगैरे संस्थानिकांकडून येथें अन्नसत्रें आहेत.

रितपूरः— हा गांव वऱ्हाडांत मोर्सी तालुक्यांत उमरावतीहून २६ मैलांवर असून महानुभाव पंथाचें मुख्य पीठ आहे. महानुभाव पंथाचे पुरुष व स्त्रिया दोघेहि डोकीचें केस काढतात व परमार्थाला वाहून घेतल्याची खूण म्हणून काळीं वस्त्रें नेसतात. श्रीरामाचे देवालय व मानभावांचा राममठ हीं दोन पहाण्यासारखीं ठिकाणें आहेत.

लाहोरः—हें पंजाबप्रांताचें राजधानीचें शहर व जिल्ह्याचें ठिकाण आहे. लाहोरचे मुळचे नांव पांचाळनगर होतें. पूर्वी रावीनदी शहराला लागून वहात असे. एकदां महापुरामुळें प्रवाह वळला तो हल्लीं शहराहून ६ मैलांवर आहे. शहराभोंवतीं तट आहे. मोंगलाच्या कारकीर्दींत अनेक आणिबाणीचे प्रसंग या शहरानें पाहिले आहेत. शिल्पकामापैकीं आतां बघण्यासारखे जें कांहीं आहे तें सर्व मोंगलांच्या वेळचें आहे. सरकारी मोठ्या इमारती, पदार्थ संग्राहालय, रणजित सिंगाची कबर वगैरे ठिकाणें पहाण्यासारखीं आहेत "झमझमा" ही सुप्रसिद्ध तोफ सेंट्रल म्युझियमच्या समोर आहे. ही तोफ सन १७६१ च्या पानिपतच्या संग्रामांत कामास आली होती. पण ती अतिशय बोजड असल्यामुळें अहमदशहा

अबदालीनें काबुलास परत नेली नाहीं. मुसलमानांच्या पुष्कळ मशीदी आहेत त्यांत दात बक्ष वगैरे फार प्रसिद्ध आहेत.

लखनौः—मुंबई मद्रास व कलकत्ता यांचे नंतर हिंदुस्थानांतील शहरांत लखनौचा चवथा नंबर लागतो व तें अयोध्या प्रांताचें मुख्य शहर आहे. येथल्या औधचे नबाबांचे कारकीर्दीतील जुन्या इमारती ह्मणजे मच्छीभवन, इमामबारा व हुसेनाबाद हीं प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. नवीन ह्मणजे पदार्थसंग्रहालय, वेधशाळा लोखंडी पूल हीं होत. ऐतिहासिक महत्त्वांचीं ठिकाणें ह्मणजे आलमबाग दिलखुष, केसरबाग, राजवाडा आणि छतरमंझील ही प्रवाशांस पहाण्यासारखीं आहेत. अलमबागेंत ५७ सालांतला सेनापति हावेलाक याचें थडगें आहे. या खेरीज चिनीबाग, सिकंदरबाग हीं उद्यानें व सफेतपिंपळ नांवाचा लखनौला एक पुरातन (३५० वर्षे) अश्वत्थवृक्ष आहे. याला चार पांच पांढरीं पानें येतात. झाडाची उंची सारी दीड फूट असून तो नवसास पावतो म्हणतात. मलमल किनखाबी कापड मुख्यत्वें तयार होतें. हिंदुस्थानी संगीत पद्धतीचें लखनौ हें मुख्य पीठ असल्यामुळें सशास्त्र अभ्यास केलेले गायनपटु इकडे पुष्कळ आहेत.

वांईः— सातारा जिल्ह्यांत तालुक्याचें ठिकाण व क्षेत्र आहे. वाईस कृष्णा नदी आहे. कृष्णाबाईचे घाट व त्यावरील अनेक मंदिरें आपापल्यापरी सर्वच प्रेक्षणीय आहेत. घाटांवर एक मोठी धर्मशाळा असून तेथील चौकांत आजवर अनेक यज्ञ झाले आहेत. त्यांतला शेवटचा भाऊशास्त्री लेले यानीं शके१८३४साली केला. रास्त्यांनीं बांधलेल्या ढोल्या गणपतीची मूर्ती इतकी विशाल आहे कीं, दुर्वा वहाण्यास शिडी लागते. वाईचें हल्लींचें वैभव पेशवाईतलें आहे. तेथल्या विद्वान ब्रम्हवृंदाचा लौकिक देशांत सर्वत्र आहे. वाईस वाठार हें जवळचें स्टेशन अजमासें १० कोस आहे.

विजापूरः— हा जिल्ह्याचा गांव असून जुनें शहर आहे. विजापूरच्या आदिलशाही कारकीर्दीतील अनेक जुन्या इमारती येथें प्रेक्षणीय आहेत. त्यांत बोल घुमट, जुम्मामशीद, उपरी बुरूज, तासबावडी, मुलखमैदान तोफ हीं प्रमुख आहेत.बोल घुमट स्टेशनाहून दहा पांच पावलावर आहे.इमारत फारच भव्य,अतिशय उंच व विस्तीर्ण आहे. घुमटाच्या गाभाऱ्यांत ध्वनीला प्रातिध्वनी सात आठ वेळां स्पष्ट ऐकूं येतो. ही मौज पाहिल्यावर कोणालाहि हसूं आल्याखेरीज रहात नाहीं.

बोळ–घुमट ही एक जगांतील अप्रतिम चीज आहे. असें म्हणण्यास हरकत नाहीं. जुम्मा–मशीद ही फारच मोठी म्हणजे हींत एकाच वेळीं दोन हजाराहून अधिक माणसें प्रार्थनेस सहज उभीं राहू शकतात. असार–महाल ही बादशहाचे वेळची दरबारची जागा होती असें म्हणतात. लांडा–कसाब नांवाच्या बुरुजावर मुलुख-मैदानपेक्षांहि प्रचंड अशी एक तोफ आहे. असार–महालाशेजारींच आनंद–महाल,गगन–महाल हे पूर्वींच्या राजवाड्याचे भाग आहेत. तास–बावडी ही एक अतीशय मोठी विहीर आहे. इब्राहिम–रोजा नांवाची इमारत फारच नक्षीदार आहे. यांत बादशहा इब्राहिम वगैरेचीं थडगीं आहेत. ह्या इमारतीवर फारशी लिपी कोरलेली आहे. जवळच मुलुख–मैदान ही प्रचंड तोफ आहे. तोफेवर ती महंमद बिन हसन रूमी या तुर्की अमलदारानें सन १५४९ त तयार केली असा उल्लेख आहे. ही पंच धातूंची असल्यामुळें आजची अगदीं नवी असल्यासारखी आहे. शिवाय उपरी–बुरुज मेहतर–महाल इत्यादी अनेक इमारती आहेत. महेतर–महालाची आख्यायिका अशी आहे कीं, पहिला इब्राहिम बादशहास रक्तपितीचा रोग जडला तेव्हां त्याला एका ज्योतिषानें सूर्योदयाला प्रथम भेटेल त्या मनुष्याला पुष्कळ द्रव्य दान म्हणून द्यावें असें सांगितलें. अशा रीतीनें तें द्रव्य आपल्यास मिळावें असा त्याचा हेतू होता, परंतु सकाळीं त्याच्या अगोदर बादशहाची व एका भंग्याची गांठ पडली. त्यामुळें इब्राहिमनें त्याला पुष्कळ द्रव्य दिलें, त्याची त्या मेहतरानें मशीद बांधिली म्हणून त्यास मेहतर–महाल हें नांव आहे. विजापूर प्रांतांत कापूस चांगला पिकतो.

विंध्याद्रीः—विंध्यपर्वताच्या रांगा हिंदुस्थानच्या मध्यावर असून त्यामुळें मोठमोठ्या नद्यांनीं वेष्टिलेलें उत्तरहिंदुस्थानचें मैदान व दक्षिण असे देशाचे दोन भाग झाले आहेत. हें नांव पडण्याचें कारण व त्यासंबंधाची कथा अशी आहे कीं, विंध्याद्रीनें अत्युच्च होऊन सूर्यचंद्राची गति रोधिली तेव्हां चोहोंकडे हाहाःकार उडाला, हें पाहून अगस्तिऋषि कोपायमान झाले. ऋषीचा कोप पाहून गिरिराज भयभीत झाला व त्यानें त्यास साष्टांग नमस्कार घातला. त्या वेळेपासून तो पूर्व-पश्चिम पसरलेला आहे. सूर्यचंद्राची गति विंधल्या (रोधिल्या) मुळें त्यास विंध्याद्री हें नांव पडलें. प्राचीनकाळीं विंध्याद्री हे नांव मोघमपणें नर्मदेच्या दक्षिणेस असलेल्या सातपुड्यालाहि लावीत असत व

कित्येक संस्कृत पुराणांत तर हें अभिधान विशेषेंकरून सातपुड्यालाच लावण्यांत आलें आहे. अलिकडे नर्मदेच्या उत्तरेच्या रांगांनाच तेवढें विंध्याद्री ह्मणतात. विंध्यपर्वत ह्मणजे प्राचीनकाळापासून मानववंश व राजकीयदृष्ट्या उत्तर व दक्षिण यांजमधील सरहद्द होती. संस्कृत ग्रंथांत वर्णिलेला आर्य व अनार्य यांचा झगडा, आर्यांनीं केलेली वसाहत व अलिकडील मुसलमानांच्या स्वाऱ्या याच मार्गानें झाल्या. या सर्व गोष्टीमुळेंच विंध्याद्रीचें महत्त्व विशेष आहे. अद्यापि देखील विंध्याद्रीवरच्या प्रदेशांत भिल्ल वगैरे अनार्य जातींची वस्ती विशेष आहे. विंध्याद्रीची उंची ५००० फूट आहे.

विझगापट्टमः—वालेरहून एक फाटा विझगापट्टमला जातो. स्टेशन शहराचे मध्यभागीं आहे. शहर समुद्र किनारीं आहे. ताग गूळ वगैरे मुख्यत्वें बाहेर जातो. विझगापट्टमची प्रसिद्धी देशांत विशेष हस्तिदंती कामाविषयीं आहे. जवळच्या एका डोंगरावर ख्रिस्ती चर्च, हिंदू देवालय व मुसलमानांची मशीद अशा तीन निरनिराळ्या धर्ममतांचीं ठिकाणें अगदीं जवळ जवळ आहेत हें एक आश्चर्यकारक आहे. येथून सहा मैलावर सिंहाचलम् हें नरसिंहाचें एक स्थान आहे. देवळांत कप्पेस्तंभ (बेडकाचा खांब) आहे. ह्या खांबाच्या आलिंगनानें वांझ स्त्रिया गर्भवती होतात असा तिकडे समज आहे.

वेरुळः— हा गांव निजामचे राज्यांत गोदावरी रेलवेच्या दौलताबाद स्टेशनहून ७ मैलांवर आहे. वेरुळचीं लेणीं जगप्रसिद्ध आहेत. ह्या लेण्यांचे तीन भाग असून त्यांत बुद्धांची १२, ब्राम्हणांची १७ व जैनांचीं पांच अशीं लेणीं आहेत. त्यांत कैलास ही जी इमारत आहे ती सर्वोत्कृष्ट आहे. या संबंधानें फर्ग्युसन साहेब फार प्रशंसेचे उद्गार काढतात. खेरीज आपल्या सेवकगणासह कमलावरील लक्ष्मी, नंदीचा मंडप व मंडपाच्या दोन्ही बाजूंस असलेले ध्वजानंद म्हणून सुमारें ४५ फूट उंचीचे प्रचंड स्तंभ ह्या प्रेक्षणीय चिजा आहेत. दौलताबाद सिकंदराबादेहून ३३६ मैल आहे.

शिव समुद्रम्ः— म्हैसूर प्रांतांत कावेरीचे काठीं सदर्न मराठा रेलवेच्या मद्दुर स्टेशनहून ३७ मैलांवर असून येथें कावेरीचा धबधबा व धबधब्याचे शक्तीचे साह्यानें विद्युत् उत्पन्न करण्याची योजना पहाण्यासारखी आहे. येथें कावेरी ४०० फूट उंची वरून उडी घेते. नदीच्या दोन शाखेच्या धबधब्यास गगन

चक्री व बार चक्री अशीं नांवें आहेत. उन्हाळ्यांत प्रवाह लहान झाल्या वेळीं लहान लहान अनेक धबधबे होतात त्या वेळचें सृष्टीसौंदर्य अनुपम असतें. याहिपेक्षां धबधब्यावरील विद्युत् उत्पन्न करण्याची योजना अधिक अवर्णनीय आहे. याविषयीं लिहितांना " व्यर्थ खर्चून जाणारी सृष्टीची शक्ती उपयोगांत आणण्याचा असा चातुर्याचा व यशस्वी प्रयत्न हिंदुस्थानांत अगर आशियांत तर दुसरा नाहीं " असें मि. सिडले लो यांनीं म्हटलें आहे. या धाडसी प्रयत्नाचें सर्व श्रेय म्हैसूर सरकारचे माजी ब्राम्हण दिवाण सर शेषाद्री अय्यर यांजकडे आहे. येथें उत्पन्न होणाऱ्या विजेच्या शक्तीवर कोलारच्या सोन्याच्या खाणी (९० मैलांवर) चालतात . म्हैसूर व बेंगलोर शहरास विद्युत्प्रकाशांचा पुरवठा केला जातो हिंदुस्थानच्या भूत, वर्तमान अगर भविष्यकालाविषयीं आस्था बाळगणारांस विद्युत्शक्ती उत्पन्न करण्याचें ठिकाण पहाण्यास दूर अंतरावर जाऊन येणें अत्यंत उपयुक्त आहे. शिवसमुद्रमूला जाणारांनीं येथील ट्रँन्सपोर्ट जमादारला आगाऊ कळाविल्यास तांग्याची चांगली सोय होते.

शृंगेरी:— हें पवित्र ठिकाण हैसूर प्रांतांत तुंगभद्रेच्या खोऱ्यांत वसलेलें आहे. विभांडक ऋषीनें तप केलें व ऋष्यशृंगाचा जन्म येथील डोंगरावरच झाला म्हणतात. डोंगरावर घनदाट झाडी व सुशोभित बागा आहेत. गांव नदी कांठीं अर्धवर्तुलाकार वसलेला आहे, शृंगेरीस जगद्गुरू शंकराचार्यांचा प्रमुख मठ आहे. मठाचा परिवार बराच मोठा आहे. सुरेश्वराचार्यांचे समाधिमंदिर अत्यंत प्रेक्षणीय आहे. प्रभातकाळीं मठांत व घांटावर अनेक ब्राम्हण स्नान करून भस्म धारण करून आपापल्या आन्हिक कार्यांत मग्न झालेले व त्यांचा चाललेला ईश गुणानुवाद ऐकून मन अत्यंत सुप्रसन्न होतें. मठांत परंपरेनें होऊन गेलेल्या आचार्यांच्या समाधि आहेत. चंद्र मौलीश्वर नांवांचे स्फटिकाचे शिवलिंग व रत्नगर्भ हेरंब ही गणपतीची मूर्ती दर्शनीय आहे. मठास सालीना सुमारें दीड लाखाचें उत्पन्न आहे, खेरीज म्हैसूर सरकारकडून दरमहा १५०० रु. ची नेमणूक आहे.

श्रीरंगपट्टण:—हैसूर संस्थानची जुनी राजधानी हैसूरपासून आठ मैलांवर कावेरींतील याच नांवाच्या बेटावर आहे. बेटाची लांबी, रुंदी, अनुक्रमें तीन व एक मैल आहे. पश्चिम बाजूस किल्ला आहे. तो हैसूरच्या वाघानें (टिपूनें) बांधलेला आहे. हा किल्ला ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाचा आहे. कारण इग्रजांच्या व

टिपूच्या अखेरच्या सर्व झटापटी येथेच झाल्या आहेत. किल्ल्यांत असलेल्या जुन्या इमारतींत टिपूचा राजवाडा(हल्लीं चंदन वगैरे लांकूड सांठविण्याच्या कामीं उपयोग करतात) रंगनाथ स्वामींचें जुने देऊळ, टिपूनें बांधलेली जुम्मामशीद हीं प्रमुख आहेत, किल्ल्याबाहेर दर्यादौलत बाग ही टिपूची आरामवाटिका असून तींत सन १७८० त कांजीवरमास झालेल्या बेलीच्या पराजयाच्या निदर्शक अशा कांहीं तसबिरा आहेत. पूर्व बाजूस लाल बागेंत हैदर व टिपूचीं थडगीं आहेत. या बेटावर तांदूळ व ऊंसाचें पिक टिपूनें बांधलेल्या कालव्याचें पाणी नळ बांधून मुख्य जमिनीवरून या बेटावर आणून सोडिलें आहे,व त्याचे पाण्यावर पिक मनमुराद येतें. इतिहासः—श्रीरंगपट्टण हें गांव कावेरींतील श्रीरंगम् बेटावरील श्रीरंगाचे देवालयावरून पडलें आहे. बल्लाळ राजांनी हें बेट वैष्णवाचार्य , रामानुजाचार्य यास दान दिलें होतें. विजयानगर नंतर टिपूची ती राजधानी होती. टिपु पडल्यानंतर (१७९९ व इंग्रजांचें स्वामित्व स्थापित झालें. या बेटावर मलेरिया तापाचा फार बोभाटा आहे, इतका कीं, परका मनुष्य रात्रीं तेथें निजावयास धजत नाहीं. याचे कारण येथच्या ज्वरहारक अशा वनस्पतींचा नाश करण्यांत आला असा लोकसमज आहे.

श्रीनगरः—ही कश्मीरची राजधानी आहे. झेलम नदी शहरांतून मधोमध वाहते. नदीस सात पूल बांधून काढल्यामुळें शहराच्या दोन्ही भागांतून परस्पर दळणवळण चालतें, शहराचा महाराजगंज म्हणून जो मोठा बाजार आहे तेथें काश्मीरांत होणाऱ्या अनेक चिजा तयार मिळतात, शहराच्या ईशान्येस पांच मैल लांबी व अडीच मैल रूंदीचा एक विस्तीर्ण तलाव आहे. तलावाच्या पृष्ट भागावर पुष्कळ भागांत काश्मीरचें विशेष असें तरंगते बगीचे मनोहर असून तेथें कलिंगडें, खरबुजें वगैरेंचें पीक मनमुराद येतें, श्रनिगरास प्रसिद्ध हिवरांच्या झाडांची एक मोठी राई आहे. ती मूळ शिखांनीं लावली असून ती अगदीं एका सरळ रेषेंत आहे. खेरीज शालिमार बागनासिम व निशत हें बाग प्रेक्षणीय आहेत. बारादारी किल्ला, राजवाडा व तक्तै सुलेमान पर्वतावरील श्रीशंकराचार्यांचे देवालय हीं ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. गुलमार्ग हें हवाशीर ठिकाण येथून २८ मैल आहे. श्रीनगरहुन तट्टे मिळतात. पंजाबांतून काश्मीरास जाण्याचे पांच मार्ग आहेत, त्यांत मरीहून जाणें सोईचें

आहे. मरी व रावळपिंडी येथें तांगे व एक्के मिळतात. तांगाभाडें दर माणशीं रावळपिंडी तें श्रीनगर रूपये ४५ लागतें. रावळपिंडीहून श्रीनगरास जाण्यास पांच दिवस लागतात वाटेनें विश्रांतीगृहें आहेत.

सरवान (श्रावण):—हा गांव आयोध्या प्रांतांत उनाव जिल्ह्यांत उनाव पासून २६ मैलांवर आहे या ठिकाणासंबंधानें मि. इलियट उनावचे वर्णन या आपल्या ग्रंथांत म्हणतात, " तीर्थाटनास निघालेला पितृनिष्ठ श्रावण आपल्या अंध मातापित्यांस घेऊन तेथें आला. त्यांची तहान भागविण्यास पाणी आणण्यास तळ्यांत गेल्या वेळीं पाण्याचा आवाज ऐकून सावज आलें असें वाटून राजा दशरथानें बाण मारिल्यामुळें श्रावण मृत झाला. श्रावणाच्या मातापित्यांनीं राजा दशरथास शाप दिला. तेव्हां पासून आजवर कोणीहि क्षात्रिय येथें राहिला नाहीं. सध्यां हें तळें आहे व कांठाला एका झाडाखालीं श्रावणाचे धड म्हणजे दगडी पुतळा पडला आहे. तृषा हरण होण्यापूर्वी श्रावणाचें प्राणोत्क्रमण झाल्यामुळें ह्या पुतळ्याच्या नाभीस्थानांत कितीहि पाणी घातलें तरी नाभी कधींहि भरत नाहीं. पण आहे तितकेंच राहतें. हा साक्षात्कार एका इंग्रजानें वर्णिला आहे हे लक्षांत घेण्यासारखें आहे.

सातारा:— सातारा शहर ही पूर्वी मराठ्यांची राजधानी व हल्लीं जिल्ह्याचें ठिकाण कृष्णा व वेण्णा यांचें संगमाजवळ असून महाबळेश्वरच्या पायथ्याशीं असल्यामुळें एक हवाशीर ठिकाण आहे. हल्लीं येथें पहाण्यासारखें साताऱ्याचा सुप्रसिद्ध अजिमतारा हा किल्ला व सातारच्या छत्रपतींचा वाडा हीं होत. येथून ३ कोसांवर सज्जनगडास समर्थ रामदास स्वामींची समाधि आहे. समर्थांच्या वेळची कुबडी वगैरे जिनसा तेथें जपून ठेविल्या आहेत. समर्थांचा समाधीकाल मि॥ माघ व॥ ९ शके १६०३ होय.

सांगली:—सांगली हें पटवर्धनांचें एक संस्थान मिरजहून पांच मैलांवर कृष्णेच्या कांठीं आहे. संस्थानांत एकंदर पांच मोठीं गांवें व २३५ खेडीं. क्षेत्रफळ ८९६ चौ. मैल. सरकारी वाडा व पॉलीस केलेल्या काळ्या दगडांनीं बांधलेलें टुमदार गणपती मंदिर प्रेक्षणीय आहेत. येथील हवापाणी फार उत्तम आहे. पितळेच्या भांड्याविषयीं सांगलीची प्रसिद्धी आहे. सांगलीहून बाहेरगांवीं गूळ पुष्कळ रवाना होतो.

सांची:— भोपाळ नंतर हें स्टेशन लागतें. येथें बौद्धांचे अनेक अवशेष आहेत.

स्टेशनहून पंधरा मिनिटांच्या रस्त्यावर एका टेंकडीवर एक अतिप्राचीन बौद्ध स्तूप आहे. सांची व सांचीचे आसपास बुद्धांचे अनेक विहार वगैरे प्राचीन अवशेष अद्यापि विपुल आढळतात, हा स्तूप अशोकाचे वेळचा (इ. स. पूर्वी २५०) आहे.

सिमला:– ही हिंदुस्थान सरकारची उन्हाळ्यांतली राजधानी आहे. कलकत्याचे गव्हर्नर जनरल व बडे बडे अंमलदार उन्हाळ्यांत या ठिकाणीं रहावयास जातात. कौन्सिलच्या बैठकीहि केव्हां केव्हां तेथें होतात. सिमला हें हवाशीर ठिकाण हिमालयांत असून समुद्रसपाटीपासून ७०८४ फूट आहे. सिमल्यास पहिला बंगला लेफ्टेनंट रॉस या साहेबानें सन १८१९ मध्यें बांधला. अलिकडे येथील वस्ती झपाट्यानें वाढली आहे.

सिंगणापूर:—हें प्रसिद्ध शंभुमहादेवाचें स्थान त्याच नांवच्या डोंगरावर सातारा प्रांतीं प्रसिद्ध असून बारामतीहून २० मैल आहे. यास कोणी शिखर सिंगणापूर असेंहि म्हणतात. वतें मूळ यादव वंशातल्या राजासिंघणानें वसविलें असेंहि म्हणतात. चैत्रमासीं मोठी यात्रा भरते. सिंगणापुरास एक कोष्टी आहे त्याचे कुळांत दर सोमवारीं दिवसभर पागोटें विणून वर्षभरांत होईल त्या पागोट्याचा चैत्र शु॥ ८ स ाशिवपार्वतीचे विवाहकालीं देवास ध्वज बांधण्याचा दरसालचा नेम आहे, हा नियम अनेक पिढ्या चालत आला आहे.देवस्थानास सातारकरांची नेमणूक आहे, ती चालू आहे. शहाजी राजे येथेंच मृत्यु पावले. त्यांची समाधी येथें आहे.

सिंहगड:—भुलेश्वर या डोंगराच्या एका उंच शिखरावर पुण्याहून १५ मैलावर एक डोंगरी किल्ला. मूळचें नांव कोंडाणा, गड घेतांना रणवीर तानाजी मालुसरे कामांस आल्यामुळें छत्रपति शिवाजी महाराजांनीं ह्याचें नांव सिंहगड असें ठेविलें.

सिद्धपूर:—हें एक यात्रेचें ठिकाण व रेल्वे स्टेशन अहमदाबादेच्या उत्तरेस ६४ मैलांवर बडोदा संस्थानांत सरस्वती नदीचे कांठीं आहे.सिद्धपुरास मातृगया असें म्हणतात, रुद्र माला म्हणून महादेवाचें सुप्रसिद्ध देवालय आहे. ह्या देवालयाच्या शिल्पकामाबद्दल अनेक मार्मिक इंग्रज गृहस्थांनीं देखील फारच तारीफ केली आहे. केवळपुरा गोसाव्याचा मठ ह्मणून एक भली मोठी इमारत आहे. खेरीज बिंदू सरोवरें, ज्ञानवापी वगैरे तीर्थें आहेत.

सुब्रम्हण्य क्षेत्रः— मंगलोरहून ३०. मैलांवर कूर्ग प्रांताचे सरहद्दीवर आहे. मंगलोरहून मोटारची सोय आहे. हें एक कार्तिकेयाचे क्षेत्र आहे.

देवस्थान अगदीं अरण्यांत आहे. झाडी इतकी दाट आहे कीं, सूर्य दर्शनहि होत नाहीं. या वनांत सर्प फार आहेत. कारण गरुडापासून निर्भय असें हें स्थान कार्तिक स्वामींनीं वासुकीला दिलें अशी कथा विस्तृत रीतीनें तेथील क्षेत्रमहात्म्यांत दिली आहे. सुब्रम्हण्याचें स्थान नजीकच एका जुनाट–मंदिरांत पुरुषभर उंचीच्या वारुळावर आहे. सुब्रम्हण्यगांव अगदीं खेडें म्हणजे दहा पांच ब्राम्हणांचीं घरें आहेत. देवालय कुमारधारा नदी तीरीं आहे.

सोलापूरः—जिल्ह्याचें ठिकाण व वाढतें व्यापारी शहर आहे. सुताच्या व कापडाच्या मिळून सहा सात गिरण्या असून यांत कापड चांगलें तयार होतें. सोलापुरी धोतरजोडा टिकाऊ असतो अशा विषयीं सोलापूरची प्रसिद्धी आहे. येथील प्रेक्षणीय ठिकाणें म्हणजे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व मलिकार्जुन हीं देवस्थानें व भुइकोट किल्ला हीं होत. सिद्धेश्वराचें देवालय एक लहानशा तळ्याच्या मध्यभागीं असल्यामुळें फार शोभायमान दिसतें, मकरसंक्रांतीस मोठी यात्रा भरते. त्यावेळीं देवळाजवळ महिनाभर मोठा बाजार भरतो. देवालयास लागूनच असलेला भुइकोट किल्लाहि प्रेक्षणीय आहे. तो विजापूरचे आदिलशाहिचे कारकीर्दींत बांधलेला आहे. शहरास पाण्याचा पुरवठाहि परगा तलावापासून होतो. हा तलाव शहरा पासून ३ मैलांवर आहे. तलावाचा परिघ सुमारें सात मैल असून याचें जे पाट काढून नेले आहेत, त्या पाटाच्या पाण्यावर डोमगांव वगैरे बाजूच्या बऱ्याच ठिकाणचीं पिकें तयार होतात.

सोंडूरः—बल्लारी जिल्ह्यांतील एक छोटेखानी संस्थान सोंडूर नजीक डोंगरावर कार्तिकस्वामींचें स्थान आहे. चढण बरीच चढावी लागतें. कुमारस्वामी, शंकर व पार्वती अशीं तीन देवळें आहेत. जवळच आगस्ती तीर्थ आहे. कार्तिकेयाचें दर्शन सौभाग्यवती स्त्रियांस वर्ज आहे. कारण विवाहापूर्वी स्त्रिया कशा असतात असें विचारतां " माझ्या सारख्याच म्हणून पार्वतीनें सांगितल्यावरून त्या सर्वच माता होत असें कार्तिक स्वामीनें सांगितलें म्हणून दर्शन नाहीं.

सौंदत्तीः– बेळगांव जिल्ह्यांतील परसगड तालुक्यांपैकीं हा एक मुख्य गांव आहे. सौंदत्ती पासून दोन मैलांवर परसगड म्हणून सुप्रसिद्ध किल्ला आहे. सौंदत्ती-

हून साडेपांच मैलांवर यल्लमा देवीचें स्थान आहे. तेथें वर्षांतून दोनदां यात्रा भरते. असे सांगतात कीं, यल्लमा ही ऋषिपत्नी होत, व तिला तीन मुलें होती. कांहीं अवज्ञा झाल्यामुळें ऋषीनें आपल्या मुलांस तिचा वध करण्यास सांगितलें, सर्वांत धाकट्या मुलानें बापाची ही आज्ञा पाळली व त्याच्याच सांगण्यावरून पुन्हां तिला सजीव केले, अशी कथा आहे.

हस्तिनापूरः—हें महाभारत कालीं कौरव साम्राज्याचें राजधानीचें शहर असल्या विषयीं पुरातन कालापासून प्रसिद्धच आहे. हें शहर मूळ भरतवंशांतील हास्तिन राजानें वसविलें म्हणून हस्तिनापूर म्हणतात. कौरवपांडवांचा भयंकर रणसंग्राम या ठिकाणींच झाला. जुनें शहर सांप्रत नामशेष झालें आहे. सध्या जें खेडें आहे, तें मरित पासून २२ मैलांवर आहे. कार्तिक महिन्यांत जैन साधूप्रीत्यर्थ मोठी यात्रा भरतें. येथें जैनांची दोन देवालयें आहेत.

हुबळीः—दक्षिण महाराष्ट्रांतलें एक मोठे व्यापारी शहर व कपाशीच्या व्यापाराचें एक केंद्र आहे. म्हैसूर स्टेट रेलवेचा फाटा हुबळीहून फुटतो. रेलवेचे लोकोमोटिव्ह वर्कशॉप, व रुई काढण्याच्या अनेक गिरण्या आहेत. शहरांत कपाशीच्या बाहेरील मोठ मोठ्या व्यापाऱ्यांचीं अनेक अडतीचीं दुकानें आहेत. खेरीज तांब्यापितळेची भांडीं, मीठ, धान्य वगैरेचा मोठा व्यापार चालतो. रेलवे व कमेटीच्या खर्चानें बांधण्यांत आलेली पाणीगिरण व तलाव हुबळी व अमरगोळ यांचें दरम्यान रेलवेंतून जातांना दिसतात. हुबळीला श्रीकृष्णाचें मंदीर प्रेक्षणीय आहे.

हरिद्वारः— हें स्थान हिमालयांत शिवालिक डोंगराच्या पायथ्याशीं गंगेच्या उजवे तीरावर आहे. शैव व वैष्णव या दोन्ही पंथांमधें येथील नांवासंबंधानें बराच वाद आहे. शैव हरद्वार म्हणतात, तर वैष्णव हरिद्वार म्हणतात. महाराज कपिल मुनीनें या ठिकाणीं तप केलें, म्हणून कपिलस्थान असेंहि म्हणतात. चंदीपहार मायादेवी व सर्वनाथ हीं तीन प्रमूख देवालयें आहेत, हरीका शरण किंवा हरी कापारी म्हणून मुख्य घाट आहे. घाटावर श्रीविष्णूची पावलें आहेत. जवळच गंगद्वार म्हणून देऊळ आहे. दरवर्षी वैशाख शुद्ध प्रतिपदेला म्हणजे गंगा ज्या दिवशीं पृथ्वीवर प्रगट झाली, त्या दिवशीं व कुंभ मेळ्याचे वेळीं फार मोठी म्हणजे सुमारें ३ लाख यात्रा जमते. हरिद्वार स्टेशन सहारणपूराहून ३९ मैल आहे.

हैद्राबादः—हें निजामच्या राज्याचें राजधानीचें शहर. लोकवस्तींत या शहराचा हिंदुस्थानांत ४ था नंबर लागतो. शहरांतून मुसा नदी वहाते. पूलांनें शहराचें दोन्ही भाग जोडले आहेत. सन १९०८ सालीं मुसा नदीस एकाएकीं भयंकर पूर आल्यामुळें हैद्राबादला मोठा जलप्रलय झाला त्यावेळीं शहरची बरींच नासाडी झाली.त्या नंतर अलीकडे बरीच नवी वस्ती झाली आहे.ः हें शहर मूळ कुतुबशाही घराण्यापैकीं महमद कुली नामक राजानें सन १५८९ त वसविलें. कुतुब शाहीचें स्मारक म्हणजे चार मिनार अथवा चार मनोरे ही प्रचंड इमारत शहराच्या मध्यभागीं आहे. जवळच मक्का मशीद नांवाची एक मशीद आहे. फलकनुमा नांवाचा निजामचा सुंदर राजवाडा एका टेंकडीच्या माथ्यावर आहे. तेथून सर्व शहराचा उत्कृष्ट देखावा दिसतो. हुसेन सागर व मीर आलम या नांवाचें २ सुंदर तलाव शहरालगतच आहे.

हंपीः— हें गतकालचे वैभवसंपन्न असें शहर हॉसपेट स्टेशनहून ७ मैलावर तुंगभद्रेच्या कांठीं असून हल्लीं पडीक आहे. पूर्वीं ही विजयानगरच्या हिंदूसाम्राज्याची राजधानी होती. त्यामुळें पुराण वस्तुसंशोधकांस हें ठिकाण महत्वाचें आहे. विजयानगरच्या कारकिर्दींत या शहरांत अनेक देवालयें व राजवाडे होते. सीझर फ्रेडरिक नांवाचा इंग्रज प्रवासी आपल्या प्रवास वर्णनांत असें लिहितो कीं, विजयानरच्या राजवाड्यासारखा ज्यांस नऊ दरवाजे आहेत असा राजवाडा आपण कधींच पाहिला नाहीं. अद्यापि जे अवशेष आहेत त्यांत विठोबाचें देऊळ राजवाडा, हत्तीचा तबेला इत्यादि अनेक प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. पडीक पडलेलें विस्तीर्ण शहर हिंडून अवलोकन करीत असतांना कोणासहि इतक्या प्राचीन काळीं हल्लीं सारखीं यांत्रिक साधनें उपलब्ध नव्हतीं तेव्हां असली ही शिल्पकलेची प्रचंड कामे अगदीं शास्त्रीय पद्धतीनें कशी झाली असतील याचें आश्चर्य वाटल्या खेरीज रहात नाहीं. सुग्रीवाची किष्किंधा नगरी येथून जवळच होती असें म्हणतात. हंपीस अनेक जुनें अवशेष अत्यंत प्रेक्षणीय आहेत. त्याचें पृथक वर्णन करण्यापेक्षां तें प्रत्यक्ष पहाणेंच बरें.

हिमालयः—ही संस्कृत संज्ञा आहे. हिम म्हणजे बर्फ व आलय म्हणजे आगर अथवा घर असा त्याचा अर्थ असून त्यांचा गगनचुंबित व जगांत अत्युच्च

शिखरें असलेला हा महान् पर्वत हिंदुस्थानच्या उत्तर मर्यादेला प्रशस्तपणें पसरलेला आहे. हिमालय पर्वत म्हणजे भरतखंडाचा उत्तर मर्यादेकडील स्वभावसिद्ध कोट आहे. या निसर्गसिद्ध तटाची लांबी १९०० मैल व रुंदी १५० मैल आहे. हिमालय व अमेरिकेंतील अँडज पर्वत याजमध्यें एकप्रकारचें विशेष सादृश्य व साम्य आहे. या दोन्ही पर्वतांच्या समांतर अशा तीन रांगा असून त्यांतून जलप्रवाह निघतात. प्रथम दोन रांगांमधून निघालेले प्रवाह बाजूनें वहात शेवटीं कडेच्या रांगांतून आपला मार्ग बाहेर काढतात. या जगड्व्याळ पर्वतावरील उंच मैदानें म्हणजे पेरु व तिबेट हे दोन देश. या दोन्ही ठिकाणीं लोकर हाच मुख्य उत्पन्नाचा पदार्थ आहे. व्यापकदृष्टीनें पाहतां हिमालय म्हणजे उंचीनें परस्परांविषयीं वरचढ व आकाशाशीं स्पर्धा करूं पाहणाऱ्या तीन पर्वतश्रेणींचा, परस्पर संलग्न असा प्रचंड पर्वत असून त्यास (व्याख्येच्या सोईकरितां) उत्तर, मध्य व दक्षिण अशीं नांवे आहेत. उत्तररांगेचे स्वभावतःच पूर्व व पश्चिम असे भाग झाले आहेत. या पश्चिमेकडील भागाला काराकोरम् अथवा मुझतगड म्हणजे बर्फांचा डोंगर असें नांव आहे. हिंदुकुशपासून तिबेटांतल्या मानससरोवराजवळील कैलासपर्वतापर्यंत जे घाट आहेत त्यांत काराकोरम चंगचेन्मो हे प्रसिद्ध असून त्यांची उंची अनुक्रमें १८।१९००० आहे. मानससरोवराचे पूर्वेस उत्तर आणि मध्य रांगांचा मिलाफ जाहला आहे व त्याच्या पूर्वेस सांपू अथवा ब्रह्मपुत्रा नदीचा उगम आहे. पंडित नयनसिंह यानें सन १८७२ त टेंगरीनूर या सरोवराचा शोध लावला तो तिबेटी तरुण याच्या प्रवासांनीं स्पष्टपणें सिद्ध झालेले आहे. मध्यरांगेचा आरंभ काश्मीरच्या शेवटच्या टोंकाला नागपर्वत म्हणून जें शिखर आहे तेथून होतो. नागपर्वत हें शिखर २६६२९ फूट उंच आहे. या मध्यरांगेवरील हिमाच्छादित गिरिशिखरापासूनच गंगा, ब्रह्मपुत्रा, काली, कर्नाली, नारायणी, गंडकी, त्रिशुळीगंडकी, भुतीया व अरुण इत्यादि लहान मोठ्या नद्या व जलप्रवाह स्वच्छंदपणें विहरतात. दक्षिणरांगेलाच हिमालयाची अत्युच्च शिखरमालिका असून त्यांत एव्हरेस्ट अथवा गौरिशंकर हेंच जगांत सर्वांत उंच शिखर २९००२ फूट उंच आहे. हिमालयासारखी विविध तृणजाति व बहुमोल वनस्पति इतरत्र क्वचितच आढळतात. गंधसरू, देवदार, व सिंदूरवृक्ष यांची तर घनदाट अरण्यें लागून गेलीं आहेत.

तसेंच पशुकोटीहि अनेक तऱ्हेची असून त्यांत हत्ती, गेंडे, जंगली बकरें, कस्तुरी मृग, तित्तिरपक्षी, इत्यादि विशेष आहेत. हिमालयाच्या अभ्यासावर परिश्रम केलेले हॉडगसन साहेब म्हणतात, साधारणपणें पाहतां जीवजंतु अथवा पशुकोटीच्या विविधतेंत हिमालय व मलाया बेटें यांत बराच सारखेपणा दृगोचर होतो, परंतु प्रवासी जसजसा उत्तरेस हिमभागाकडे जातो तसतसें हिमालयावरील व युरोपांतील निसर्ग विलक्षण साम्य त्यास आढळून येतें. भूगर्भशास्त्रदृष्ट्या हिमालयाचा शोध अद्यापि विशेष लागला नाहीं, तेव्हां त्याच्या प्रामाण्याविषयींचीं साधनेंहि फार थोडी आहेत तथापि पुष्कळ ठिकाणीं व विशेषतः सतलज आणि कालीं या नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत लोखंड, शिसें व तांबें हे धातू सांपडतात. मानववंशाच्या दृष्टीनें पहातां हिमालयावरील प्रदेश ह्मणजे आर्य व तुराणी या दोन वंशाच्या दृष्टीनें पहातां हिमालयावरील प्रदेश म्हणजे सरमिसळ झाली असली तरी त्यांमधील फरक ओळखण्याजोगा आहे. पहाडीं डोग्रा काशिरी व चित्रळी हे आर्यवंश व बाल्टी वगैरे तुराणी या दोन स्वतंत्र शाखेच्या मानवजातीची हिमालयांत वस्ती आहे. नगाधिराज हिमालयाच्या अद्वितिय निःसर्ग शोभेचे वर्णन एलफिन्स्टन इतिहासकार आपल्या ग्रंथांत पुढीलप्रमाणें करतो.प्रवासी कितीहि साधा व भोळा, गंभीर किंवा कांटेतोल लिहिणारा असो, हिमालयाच्या सृष्टीशोभेंत अशी कांहीं जादू भरली आहे कीं, त्याचें मन भराऱ्या मारूं लागतें व ही सौंदयस्मृति त्याचे हृदयसंपुटांत कायमचीच रहातें. हिमालयांत पार्वती परमेश्वरांच्या विवाहासंबंधीं अनेक स्थानें आहेत. गजानन हें नांव गणपतिला कसें मिळाले या गोष्टीवर प्रकाश पाडणारें " मुंडकटीया गणेश " नांवाचें एक देवस्थान हिमालयांत आहे. मस्तक नसलेली गणेशाची मूर्ती असलेलें देऊळ हिंदुस्थानांत हें एकच आहे. देहांत शक्ति असें तोंपर्यंत हिमालयाचे दर्शन एकदां तरी घ्यावें. हिमालयाचें दर्शन झाल्यावर मनुष्य कितीहि नास्तिक असला तरी तो ईश्वरचरणीं लीन झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

यापुढें निरनिराळ्या विषयांची व माहितीची परिशिष्टे आहेत.

परिशिष्ट अ.

हिंदुस्थान देशाचा विस्तार

मुख्य राजकीय विभाग

प्रांत १४

१ मुंबई २ बंगाल ३ मद्रास ४ संयुक्तप्रांत ५ पंजाब ६ बहार व ओरिसा ७ मध्यप्रांत व वऱ्हाड ८ आसाम ९ ब्रम्हदेश १० दिल्ली ११ वायव्य सरहद्दीवरील प्रांत १२ अजमीर—मरवारा १३ कूर्ग १४ अंदमान व निकोबार बेटें शिवाय देशी संस्थानें.

दक्षिणोत्तर लांबी २००० मैल
पूर्वपश्चिम रुंदी १९०० मैल
एकंदर क्षेत्रफळ १८०५३३२ चौ. मैल
एकंदर शहरें व मोठीं गांवें २३१३
,, खेडीं ६८५६२२
,, संस्थानें सुमारें ७००

मुंबई

जिल्हे	तालुके व पेटे
१ अहमदाबाद	१ दसक्रोई २ धंधूका ३ गोधा ४ धोलका ५ प्रांतिज ६ मोडासा ७ सनंद ८ विरमगांव
२ भडोच	१ अमोद २ अंकलेश्वर ३ हंसोत (पेटा) ४ भडोच ५ जंबुसर ६ वाग्रा
३ खेडा	१ आनंद २ बोरसद ३ कपडवंज ४ मटर ५ मेहमदाबाद ६ नाडियाद ७ धासरा
४ पंचमहाल (गोध्रा)	१ दोहद २ झालोड (पेटा) ३ गोध्रा ४ कालोल ५ हालोल (पेटा)
५ सुरत	१ बारडोली २ वालोड ३ बलसार ४ चिखली ५ चोरसी ६ जलालपूर ७ मांडवी ८ ओलपाड ९ पार्डी
६ ठाणें	१ वसई २ भिवंडी ३ डहाणू ४ उंबरगांव ५ कल्याण ६ माहीम ७ मुरबाड ८ साष्टी ९ शहापूर १० मोखाडा (पेटा) ११ वाडे

१४ बेळगांव	१ अथणी, २ बेळगांव ३ चांदगड (पेटा) ४ चिकोडी ५ हुकेरी (पेटा) ६ गोकाक ७ खानापूर ८ परसगड ९ मुरगोड (पेटा) १० संपगांव
१५ विजापूर	१ बदामी २ बागलकोट ३ बिळगी ४ बागेवाडी ५ विजापूर ६ हुगगुंद ७ इंडी ८ मुद्देबिहाळ ९ सिंदगी
१६ धारवाड	१ बंकापूर २ धारवाड ३ गदग ४ मुंदरर्गी (पेटा) ५ हनगल ६ हुबळी ७ कलघटगी ८ करजगी ९ कोड १० नवलगुंद ११ नरगुंद (पेटा) १२ राणिबेन्नुर १३ रोण
१७ कानडा (कारवार)	१ अंकोला २ होनावर ३ भटाकल (पेटा) ४ कारवार ५ कुमठा ६ सिद्पूर ७ सिरसी ८ हल्ल्याळ ९ सुपे (पेटा) १० यल्लापूर ११ मुंडगोड (पेटा)
१८ कुलाबा (अलिबाग)	१ अलिबाग २ कर्जत ३ खालापूर (पेटा) ४ महाड ५ माणगांव ६ पनवेल ७ उरण (पेटा) ८ पेण ९ नागोठणे (पेटा) १० रोहे
१९ रत्नागिरी	१ चिपळूण २ गुहागर (पेटा) ३ दापोली ४ मंडणगड (पेटा) ५ देवगड ६ खेड ७ मालवण ८ राजापूर ९ रत्नागिरी १० संगमेश्वर ११ वेंगुलें
७ अहमदनगर	१ अकोला २ कर्जत ३ जामखेड ४ कोपरगांव ५ नगर ६ नेवासें ७ पार-

	नेर ८ राहुरी ९ संगमेश्वर १० शेवगांव ११ पाथर्डी १२ श्रीगोंदे
८ पूर्व खानदेश	२ अमळनेर २ पारोळा ३ भुसावळ ४ एदलाबाद ५ चाळीसगांव ६ चोपडे ७ एरंडोल ८ जळगांव ९ जामनेर १० पाचोरा ११ भडगांव १२ रावेर १३ यावल.
९ पश्चिम खानदेश (धुळे)	१ धुळे २ नंदुरबार ३ नवापूर ४ पिंपळनेर ५ शहादा ६ शिरपूर ७ शिंदखेड ८ तळोदे
१० नाशिक	१ चांदोर २ दिंडोरी ३ इगतपुरी ४ केळवण ५ मालेगांव ६ नांदगांव ७ नाशिक ८ निफाड ९ पेंट १० सटाणें ११ सिन्नर १२ येवले
११ पुणें	१ भिमथडी २ दौंड (पेटा) ३ ३ हवेली ४ मुळशी (पेटा) ५ इंदापूर ६ जुन्नर ७ खेड ८ आंबेगांव ९ मावळ १० पुरंदर ११ शिरूर (घोडनदी)
१२ सातारा	१ जावळी २ मालकमपठे (पेटा) ३ कऱ्हाड ४ खानापूर ५ खटाव ६ कोरेगांव ७ माण ८ पाटण ९ सातारा १० तासगांव ११ वाई १२ खंडाळा (पेटा) १३ वाळवे १४ शिराळे (पेटा)
१३ सोलापूर	१ बार्शी २ करमाळे ३ माढे ४ माळसिरस ५ पंढरपूर ६ सांगोले ७ सोलापूर
२० सिंधप्रांत हैद्राबाद	१ हैद्राबाद २ तांडो अल्लायार ३ हाला ४ गुणी ५ डेरोमोहबत ६ तांडो बागो ७ बादिन.

२१ नवाबशाह	१ शहादादपूर २ नसरत ३ सिंझोरो ४ सकरंड ५ मोरो ६ नोशेरो फिरोज ७ कांडियारो.
२२ कराची	१ कराची २ टाटा ३ मिरपूर साको ४ घिराबारी ५ केटी बंदर ६ शहाबंदर ७ जाटी ८ सुजावल ९ मिरफर बाथोरो १० कोर्बी ११ मान्झड १२ कोहिस्तान
२३ लारकाना	१ लारकाना २ राटोडेरो ३ कांबेर ४ लबडारिया ५ नसिराबाद ६ मेहेर ७ काकर ८ जोही ९ दादू १० शेवान
२४ सक्कर	१ सक्कर २ सिकारपूर ३ घारियासिन ४ रोहरी ५ पानो आकिल ६ घोटकी ७ मिरपूर साथेलो ८ डबारो
२५ थर आणि पारकर (उ रकोट)	१ मिठी २ काचरो ३ नगरपारकर ४ दिपलो ५ उमरकोट ६ पिठोरो ७ सांघेर ८ खिपरो ९ मिरपूर खास १० जमेसाबाद ११ डिम्री
२६ अमरसिंध कॉटियर जाकोबाबाद	१ जाकोबाबाद २ शहादादपूर ३ काश्मीर ४ यळ ५ कांडकोट

संस्थानें:—एकंदर संख्या ३७५ पैकीं मोठीं कच्छ, कोल्हापूर, वडोदे, पालनपूर, जुनागड, भावनगर, नवानगर, ईदर, राजपिंपळा, गोंडळ इ०

२ बंगाल

जिल्हे २८

१ बरद्वान, २ बिरभूम ३ बांकुरा, ४ मिदनपूर, ५ हुगळी (चिनसुरा) ६ हौरा, ७ कलकत्ता, ८ चोवीस परगणे (अलीपूर), ९ नडिया(कृष्णनगर) १० मुर्शिदाबाद, ११ यशोहर, १२ खुलना, १३ डाका, १४ मैमनसिंग, १५ फरीदपूर, १६ बाकरगंज १७ चितागांग,१८ जौखाली, १९ टिपरा, २० चितागांग डोंगरी प्रदेश २१ राजशाही (रामपूर बोलिया), २२ दिनाजपूर

२३ जल पैगुरी, २४ रंगपूर, २५ बोग्रा, २६ पबना, २७ माल्दा २८ दार्जिलिंग

संस्थानें:—१ कुचबिहार व २ त्रिपूर.

३ मद्रास

जिल्हे २५

१ अनंतपूर २ उत्तर अर्काट (चितूर) ३ दक्षिण अर्काट (कडलोर) ४ बल्लारी ५ दक्षिण कानडा (मंगलोर ६ चिंगलपठ ७ चितूर ८ कोइमतूर ९ कडपा १० गंजम (चिकाकोल) ११ गोदावरी (राजमहेंद्री) १२ गुंटूर कृष्णा (मच्छलीपट्टण) १४ कर्नूल १५ मद्रास १६ मदुरा १७ मलबार (कालिकत) १८ नेलोर १९ निलगिरी (उकटकमंड २० रामनाड २१ सेलम २२ तंजावर २३ तिनेवेल्ली (पालमकोटा) २४ त्रिचनापल्ली २५ विजगापट्टम्

संस्थानें:—१ त्रावणकोर २ कोचीन ३ सोंड्र ४ पदुकोटा व ५ बगनपल्ली.

४ संयुक्त प्रांत

जिल्हे ४८

१ डेराड्रन २ सहारणपूर ३ मुजफरनगर ४ मिरत ५ बुलंदशहर ६ अलीगड ७ मथुरा ८ आग्रा ९ मैनपुरी १० इटा ११ बरेली १२ बिजनोर १३ बुदन १४ मुराबाद १५ शहाजहानपूर १६ पिलभित १७ फरुकाबाद (फत्तेगड) १८ इटावा १९ कानपूर २० फत्तेपूर २१ अलाहाबाद (प्रयाग) २२ झांसी २३ जलोन २४ हमीरपूर २५ बांदा २६ बनारस (काशी) २७ मिरझापूर २८ जानपूर २९ गाझीपूर ३० बालिया ३१ गोरखपूर ३२ बस्ती ३३ अजमगड ३४ नैनीताल ३५ अलमोरा ३६ गर्वाल (ब्रिटिश) ३७ लखनौ ३८ उनाव ३९ रायबरेली ४० सितापूर ४१ हरडोई ४२ खेरी (लाखिमपूर) ४३ फैजाबाद ४४ गोंडा ४५ बहरचे ४६ सुलतानपूर ४७ प्रतापगड ४८ बाराबंकी

संस्थानें:—१ टेहरी २ रामपूर व बनारस

५ पंजाब

जिल्हे २८

१ हिसार २ रोहटक ३ गुरगांव ४ करनाळ ५ अंबाला ६ सिमला ७ कांग्रा ८ होशारपूर ९ जालंदर १० लुधियाना ११ फिरोजपूर १२ लाहोर १३ अमृतसर १४ गुरुदासपूर १५ सियालकोट १६ गुजराणवाला १७ गुजराथ १८ शहापूर १९ झेलम २० रावळपिंडी २१ अटक २२ मियानवाली २३ मुलतान २४ जंग २५ लियामपूर २६ मॉटगॉमरी २७ डेरागाझीखान २८ मुझफरगड.

संस्थानें:—एकंदर ३४ पैकीं मोठीं:—१ भावलपूर २ पतियाळ ३ नाभा ४ झिंद ५ कपुरथला ६ मालेर-कोटला ७ फरीदकोट इ.

६ बहार व ओरीसा

जिल्हे २१

१ पाटणा (बाकीपूर) २ गया ३ शहाबाद (आरा) ४ सारण चापरा ५ चंपारण्य [मोतीबारी] ६ मुझफरपूर ७ दरभंगा ८ मोंगीर ९ भागलपूर १० पुरवा ११ संताळ परगणाज ओरिसा भागः—१२ कटक १३ बलसार १४ अनगल १५ पुरी १६ संबलपूर १७ हजारीबाग १८ रांची १९ पालमन २० मानभुम (पुरूलिया) २१ सिंगभुम

संस्थानें:—(ओरिसा विभाग) एकंदर २४ पैकीं मोठीं मोरभंज बामरा, नरसिंगपूर, सोनपूर हिंदोल इत्यादि.

७ मध्यप्रांत आणि वऱ्हाड

जिल्हे २२

१ नागपूर २ भंडारा ३ वर्धा ४ बालाघाट ५ चांदा ६ जबलपूर ७ सागर ८ दमोह ९ मंडला १० शिवणी ११ हुशंगाबाद १२ बैतुल १३ नेमाड १४ नरसिंगपूर १५ छिंदवाडा १६ रायपूर १७ द्रूग १८ बिलासपूर.

वऱ्हाडः—१९ उमरावती २० यवतमाळ २१ अकोला २२ बुलढाणा.

संस्थानें:—एकंदर १६ पैकीं मोठीं १ बस्तार २ जसपूर ३ राजनांदगांव ४ उदेपूर इ.

८ आसाम

जिल्हे १४

१ बलिपारा सरहद्दी वरील प्रदेश २ काचार (सिलचार) ३ डरँग (तेजपूर) ४ कारोहिल्स. (तुरा) ५ गोलपाडा (धुबरी) ६ कामरूप (गोहत्ती) ७ खासी व जयंतिया हिल्स (शिलाँग) ८ लाखिमपूर (डिब्रूगड) ९ लुशाय हिल्स (अज्जल) १० नागा हिल्स (कोहिमा) ११ नोगांग १२ सादिया सरहद्दी वरील प्रदेश. १३ सिबसागर (जोरहट) १४ सिलहट.

संस्थानें :– १ मणीपूर २ खासी इष्टेटी व ३ जयंतिया इष्टेटी.

९ ब्रह्मदेश

जिल्हे. ८

अपर बर्मा ३ व लोअर बर्मा ५.

१० दिल्ली

१ दिल्ली

११ वायव्य सरहद्दीवरील प्रांत

जिल्हे ५

१ हजारा २ पेशावर ३ कोहट ४ बन्नु व ५ डेरा इस्माइलखान.

१२ अजमीर मरवारा

मुख्य शहर अजमीर

४ मोठीं शहरें व ७४० गांवें

१३ कूर्ग

तालुके ५

१ नंजरापट्टण २ मर्कारा ३ पादिनालकनाड ४ येदे नालकनाड व ५ कितगनाड.

१४ अंदमान व निकोबार बेटें

अंदमान एकंदर बेटें २०४ मुख्य ठिकाण पोर्ट ब्लेअर निकोबार एकंदर बेटें १९

हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांतील
प्रमुख संस्थानें

काश्मीर—मुख्य शहर श्रीनगर

हैद्राबाद
जिल्हे १५

१ औरंगाबाद २ बीड ३ परभणी ४ नांदेड गुलबर्गा ६ रायचूर ७लिंगसुगूर ८ धाराशीव ९ बेदर १० मेदक ११ इंदूर (निजामाबाद) १२ महिबनगर १३ वरंगल १४ नरगूंडा १५ यलगंदल.

म्हैसूर
जिल्हे ८

१ म्हैसूर २ हसन ३ चितलदुर्ग ४ कडूर ५ शिमोगा ६ कोलार ७टुभकुर ८ बंगलोर,

बडोदे
प्रांत ४

१ कडी २ बडोदे ३ नवसरी ४ अमरेली.

१ कडी २ बडोदे ३ नवसरी ४ अमरेली

राजपुताना
एकंदर संस्थानें

पैकीं मोठीः—१ प्रतापगड २ उदेपूर ३ जयपूर ४ किशनगड ५ रेवा ६ टोंक ७ बुंदी ८ अलवार ९ भरतपूर १० धोलपूर ११ बिकानेर १२ जेसलमीर १३ जोधपूर.

मध्य हिंदुस्थानांतील
संस्थानें

एकंदर संस्थानें सुमारें १५०

पैकीं मोठीं:—१ ग्वाल्हेर २ इंदूर ३ भोपाळ ४ नरसिंहगड ५ देवास ६ रतलाम ७ धार ८ उरुचा ९ दतिया १० पन्ना इ.

फ्रेंच वसाहती

तालुके ५

१ पांडिचरी २ माही ३ कारीकल ४ चंद्रनगर ५ यानान.

पोर्तुगीज वसाहती

भाग ३

१ दीव २ दमण आणि गोवे. एकंदर ३ मोठीं शहरें व ४०७ गांवें.

स्वतंत्र संस्थानें

नेपाळ	राजधानी काटमांडू
भूतास	,, पुनखा

———

परिशिष्ट आ

हिंदुस्थानमधील प्रमुख नद्या

नांव	लांबी मैल	उगम	संगम अगर मुख
सिंधू	१८००	हिमालय (कैलास)	अरबी समुद्र (कराची)
ब्रम्हपुत्रा	१८००	हिमालय(मानस सरोवर)	बंगालच्या उपसागरास
गंगा	१५००	गंगोत्री	,,
गोदावरी	९००	त्र्यंबकेश्वर	,, (राजमहेंद्रीजवळ)
सतलज	९००	मानस सरोवर	मिठाणकोटजवळ सिंधूस)
यमुना	८६०	हिमालयांत (जमनोत्रीजवळ)	प्रयागास, गंगेस
नर्मदा	८०१	अमरकंटक पर्वत	भडोचजवळ खंबायताचे अ. स
कृष्णा	८००	महाबळेश्वर	बंगालच्या उप० (मच्छलीपट्टण)
चंबळा	६५०	इंदूर संस्थानांत (जानपओ डोंगरांत)	यमुनेस (इटावाजवळ)
गोग्रा	६००	हिमालयांत	चंपरागांवाजवळ गंगेस
महानदी	५२०	छत्तीसगड (मध्यप्रांत)	बंगालचे उप० (कटकजवळ)
कावेरी	४७०	कूर्गप्रांत	बंगालचे उपसागरास
गोमती	५००	संयुक्तप्रांतांत	गाजीपूरजवळ गंगेस
शोणनद	४६०	अमरकंटक पर्वत	दिनापुराजवळ गंगेस
झेलम	४५०	काश्मीर (वीर नाग नांवाच्या झऱ्यापासून)	तिमू शहराजवळ चिनाबला
तापी	४४०	सातपुडा (बैतुलजवळ)	खंबायताचें अखात
तुंगभद्रा	४००	म्हैसूर सरहद्दीवर	अलमपुराजवळ कृष्णेस
मांजरा	३८७	नलदुर्ग जिल्ह्यांत	गोदावरीस
रामगंगा	३७३	हिमालयांत	कनोजजवळ गंगेस
पेन्नार (उत्तर)	३५५	,, म्हैसूर संस्थान	,, बंगालच्या उपसागरास
पेन्नार (दक्षिण)	२४५	,,	,,

नांव	लांबी मैल	उगम	संगम अगर मुख
मही	३५०	माळवा	खंबायतचें आखातास
बिटवा	३६०	भोपाळ जवळ	महीरपूर जवळ यमुनेस
दामोदर	३५०	तोरी परगणा (बंगाल)	हुगळीस
लुनी	३२०	अरवली पर्वत	कच्छेचे आखात
काळीनदी (कालिंदी)	३१०	मुजफरनगर जिल्ह्यांत	कनोज जवळ गंगेस
बनास	३००	आरवली डोंग ांत	रामेश्वरगांवाजवळ चंबळेस
बियास	२९०	हिमालयांत	कपूरथळाचे सरहद्दीवर सतलजला
पालार	२३०	म्हैसूर संस्थानांत	बंगालच्या उपसागरांस
काळीसिंध	२२५	विंध्याद्रि (बरझिरी	कोटासंस्थान पिपरगांवाजवळच
पालर	२३०	म्हैसूरसंस्थान खेड्याजवळ	बंगालच्या उपसागरास
कुशी	२२०	नेपाळांत सप्तकौशिक प्रदेशांत	बंगाल्यांत पूर्णिया जिल्ह्यांत गंगेस
ताम्रपर्णी		कार्डमम पर्वतांत	मनारच्या आखातास
पार्वती	२२०	विंध्याद्रि	चंबळेस
साबरमती	२००	अरवली पर्वत	खंबायतचे आखातास
गंडकी	१९२	नेपाळांत धवलगिरीपासून	पाटण्यास गंगेस
भीमा	१७५	भीमाशंकरचें डोंगरांत	कृष्णा स्टेशनजवळ कृष्णेस
कपिलीनदी	१६३	आसामांत जंटिआटेंकडी	कलांग नदीला मिळते.
कर्मनाशा	१४६	बंगाल्यांत कैमूर डोंगरांत	गंगेस
पूर्णा	१४५	कन्नड तालुक्यांत(निजाम	गोदावरीस
मुसा	१४४	अनंत गिरी डोंगरांवर	वारापल्ली जवळ कृष्णेस.
कर्णफुली	१२१	आसाम चितागांगचे डोंगरांत	बंगालचें उपसागरास
अर्कावती नदी	१२०	म्हैसूर संस्थानांत	कावेरीस
क्षिप्रा	१२०	माळव्यांत विंध्याचे उत्तरेस	चंबळेस

परिशिष्ट (इ)

हिंदुस्थानांतील पर्वत (सरासरी)

नांव	लांबी मैल	उंची फूट
१ हिमालय	१५००	२००००
७ सह्याद्रि	१०००	४०००
८ पूर्वघाट	९००	२०००
३ हिंदु कुश	६५०	१५०००
२ काराकोरम	६००	१८०००
९ विंध्याद्री	६००	२०००
१० सातपुडा	५००	२०००
४ सुलेमान	३५०	७०००
११ अरवली	३००	२०००
५ हाला	२००	७०००
६ निलगिरी	१००	५०००

परिशिष्ट (ई)

हिंदुस्थानांतील सरोवरें.

पंपा सरोवर	कर्नाटकांत किष्किंधे जवळ
मंचर	सिंध प्रांतांत
सांबर	अजमीर प्रांतांत
दल	
वुलर	काश्मीर प्रांतांत
मानसबल	
बिंदु सरोवर	,,
	सिद्ध पुराजवळ
ताल	भोपाळ जवळ
धेबर तलाव	उदेपूर संस्थानांत. उदेपूर पासून ३० मैलांवर
पलिकत कोलेर	मद्रास इलाख्यांत
चिलका	पुरी जिल्ह्यांत
नारायण सरोवर	द्वारकेजवळ
विहार	मुंबईजवळ
तुळशी	
पुष्कराज	अजमीर जवळ
लोणार सरोवर	वऱ्हाडांत बुलढाणा जिल्हा
पाखाल तलाव	वरंगल जिल्हा हैद्राबाद संस्थान
कोलेर	मद्रास इलाख्यांत
नैनीताल	संयुक्त प्रांतांत

परिशिष्ट (उ)

	हिंदुस्थानांतील धबधबे	उंची फूट
१ चेरापुंजी	खांसी डोंगराजवळ (आसाम)	१८००
२ इरावतीचा	गिरसाप्पा गांवाजवळ	१०००
३ कावेरीस	म्हैसूर प्रांतीं (शिवसमुद्रम्चा धबधबा)	३००
४ लालगुली धबधबा	उत्तर कानडा जिल्हा यल्लापूरजवळ	२५०
५ घटप्रभेचा धबधबा	गोकाकजवळ	१७५
६ नर्मदेस	मंडळा येथें	
७ बैकरा नदीस	निलगिरी पर्वतांत	
८ वेण्येचा	महाबळेश्वरास	

परिशिष्ट (ऊ)

हिंदुस्थानांतील आखातें, भूशिरें व सामुद्रधुन्या

कच्छचे आखात	हिंदुस्थानचें पश्चिमेस
खंबायतचें आखात	,,
मानारचें आखात	हिंदुस्थानचे दक्षिणेस

भूशिरें

मनोरा भूशिर	कराची जवळ
केप जगत्	गुजराथेंत
केप रामास	गोव्याचें दक्षिणेस
कन्या कुमारी	हिंदुस्थानचे दक्षिणेस

सामुद्रधुन्या

पालकची सामुद्रधुनी	हिंदुस्थान व सिलोन यांचे मध्यें
पंबनची सामुद्रधुनी	हिंदुस्थान व रामेश्वर बेट

परिशिष्ट (ए)

हिंदुस्थानांतील उष्णोदकांचें झरे

१ ठाणे जिल्ह्यांत भिवंडी तालुक्यांत वज्राबाईचे देवालय आहे

२ सुरत जिल्ह्यांत देवकी कुंडानजीक पुष्कळ झरे आहेत.

३ गुजराथेंत डाकूर गांवाजवळ कुसोंद्राकुंड येथील पाणी उष्ण असून खारटाहि आहे.

४ रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूरास

५ मोंगीर जवळ सीताकुंड

६ गंगोत्री जवळ

७ सिंध देशांत

या पाण्यांत गंधक वगैरे उष्ण द्रव्यें असतात व तें औषधी असतें.

८ उनवदेव एरंडोल रोड स्टेशनहुन ४५ मैलांवर खानदेशांत

९ राजगड डोंगर बंगाल नजीक पाटणा जिल्ह्यांत

१० गळतेश्वर महादेव महिकाठ्यांत एकोरा पलीकडे

११ तुळशीरामाचें कुंड (गोडे पाण्याचे) काठेवाडांत

१२ सर्व तीर्थ नासिकाजवळ टाकेद गांवाजवळ येथें जटायूची समाधि आहे.

परिशिष्ट. (ऐ)

हिंदुस्थानांतील थंड हवेची ठिकाणें.

उटकमंडः—निलगिरीवर समुद्रसपाटी पासून ७३०० फूट उंच असून ते जो बलवर्धक हवामान व सृष्टिशोभा यां विषयीं प्रसिद्ध आहे.

दार्जिलिंग, नैनीताल } हिमालयांत.

कोडायकनालः—पळनी डोंगरावर. मदुरा जिल्ह्यांत उंची ७००० फूट आहे.

भिमाशंकर, महाबळेश्वर, पांचगणी, माथेरान } सह्याद्रीवर.

मसूरीः—हिमालयाच्या पायथ्याशीं डेहराडून जिल्ह्यांत उंची सुमारे ७००० फूट आहे.

पंचमडीः—सातपुड्यावर.

श्रीनगर, मरी } काश्मीर प्रांतात.

यरकाड हॅरिवराय डोंगरांवर (द. हिंदुस्थान.) उंची ४५०० फूट

सिमलाः–पंजाबांत हिमालयाच्या पायथ्याशीं.

पंचमढीः—मध्यप्रांत; सातपुड्यावर.

परिशिष्ट. (ओ)

अखिल भारतीय संस्था

अखिल भारतीय गोरक्षण मंडळ नं.	१० जुने पोष्ट ऑफीस कलकत्ता.
भारत धर्म महामंडल	जगतगंज बनारस.
पार्शी राजकीय सभा	अपॉलोस्ट्रीट फोर्ट मुंबई.
राष्ट्रिय सभा	,,
मुस्लिम लीग	लखनौ.
शिख लीग	अमृतसर.
अखिल भारतीय हिंदु सभा	दिल्ली.
सर्व्हंटस ऑफ् इंडिया सोसायटी	गिरगाव मुंबई व पुणें
सेवा सदन	मुंबई पुणे.
सेंट जॉन अम्ब्युलन्स असोशियेशन	मुंबई
अखिल भारतीय महिला विद्यापीठ	हिंगणे बुद्रुक पुणें.
भारत इतिहास संशोधक मंडळ	पुणे सदाशिव पेठ.
भांडारकर ओरियंटल रीर्च इस्टिटयूट	पुणे
गांधर्व महा विद्यालय	सॅटर्स्ट रोड गिरगांव मुंबई
अखिल भारतीय सारस्वत ब्राह्मण सभा	ग्रँट रोड मुंबई
डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी	गिरगांव मुंबई
पॅसेंजर अँड ट्रॅफिक रिलीफ असोसिएशन	आपोलो स्ट्रीट मुंबई

परिशिष्ट (औ)

हिंदुस्थानांतील धर्म.

	लोक संख्या.
वैदिक (हिंदु)	२२ कोटि.
२ इस्लाम (मुसलमान)	७ कोटि.
३ खिस्ती	३८ लाख.
४ शीख	३० लाख.
५ जैन	१२ ,,
३ बौद्ध	३ ,,
७ पारशी	१ ,,
८ यहुदी	२० हजार.